सत्यमेव जयते

नगरपरिषद इचलकरंजी

इचलकरंजी

लेखा परीक्षण अहवाल

2019-2020

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, कोल्हापुर

जिल्हा परिषद जुनी इमारत, नागाळा पार्क

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे नगरपरिषद इचलकरंजी यांनी 2019-2020 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी
जि.कोल्हापूर
लेखा परिक्षण अहवाल सन 2019-2020

जा.क्र.स्था.18/ब/न.प.इचलकरंजी/ले.प.अ-19-20/कोल्हापूर- 929

सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
जिल्हा परिषद जुनी इमारत,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
दिनांक :- 16-11-2021

प्रेषक

सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
कोल्हापूर.

प्रति,

मा. नगराध्यक्षा,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जिल्हा- कोल्हापूर या संस्थेचे सन 2019-2020 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण, श्री.दि.नं.शिंदे, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोल्हापूर यांचे पथकाने दिनांक 11/01/2021 ते 26/03/2021 अखेर पूर्ण केले असुन श्री. ग.बा.पाटील, सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग ,पुणे यांनी दिनांक 21/10/2021 रोजी अंतिमीकरण केले.

लेखा परीक्षण कालावधीत खालील पदाधिकारी कार्यरत होते.

अ.क्र	नाव	पदनाम	कालावधी
1.	ॲड.अलका अशोक स्वामी	नगराध्यक्षा	01/04/2019 ते 31/03/2020

लेखा परीक्षण कालावधीत खालील अधिकारी कार्यरत होते.

अ.क्र	नाव	पदनाम	कालावधी
1.	श्री.दिपक ह.पाटील	मुख्याधिकारी	01/04/2019 ते 31/03/2020

चर्चा करून अंतिमीकरण केले.

मुख्याधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद

अध्यक्षा,
इचलकरंजी नगरपरिषद

इचलकरंजी नगरपरिषद स्थापना १८९३ जि. कोल्हापूर

अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण 1

I PART I :**मागील लेखा परीक्षण अहवाल** **3**

नगरपरिषद इचलकरंजी 3

PART II **12**

नगरपरिषद इचलकरंजी 12

कलम ९ अ खालील आक्षेप **13**

1 अर्थसंकल्पीय तरतूद कमी जादा खर्चाबाबत. 14

2 मत्ता व दायित्वाबाबत. 18

3 वार्षीक लेख्याबाबत. 21

4 नगरपरिषद इचलकरंजी शिक्षण मंडळाकडील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालनाबाबत. 24

5 नगरपरिषदेकडील प्रलंबीत परिच्छेदांचे अनुपालनाबाबत. 25

6 निवृत्तीवेतन बाबत. 26

7 परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना कार्यपध्दतीबाबत. 27

8 भविष्य निर्वाह निधी रोकडवही व बृहतपत्रक नोंदवहीबाबत. 28

9 आवश्यक शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण नसताना पदोन्नती दिलेबाबत. 30

10 जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेबाबत. 31

11 कमाल टप्प्यावर वेतन निश्चिती न करता जादा वेतन अदा केले बाबत. 33

12 मुख्याधिकारी यांचे निवृतीवेतन व प्रशासकीय खर्च भरणा न केलेबाबत. 34

13 इचलकरंजी नगरपालीके कडील कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती मुळे जादा वेतन अदा झाले बाबत. 35

14 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 9,10,13,14,16,18,21,22,23,24 व 25 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे खर्चातील अनियमितता.(14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन) 37

15 प्राथमिक शाळेसाठी स्मार्ट टीव्ही खरेदीबाबत. 55

16 शहापूर होळकर चौक ते खंजिरे पेट्रोल पंप व परिसर केबल खुदाई चर डांबरी पॅचवर्क करणे. 57

17 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतून करण्यात आलेल्या गटर बांधकामातील अनियमिततेबाबत. 59
18 गट नं.155 ओपनस्पेस पूर्व पश्चिम व दक्षिण बाजूस हाफ राउंड गटर करणे. 64
19 शहापूर मेन रोड ते इंदिरानगर ते टॅनर्स सोसा. व हॉटेल सारथी ते उत्तरेस टॅनर्स सोसा.ओघळ रस्ते डांबरीकरण करणे. 67
20 म.सु.ज.न.अ.(राज्य) अंतर्गत शहरातील मुख्य गटर करणे कामातील अनियमितते बाबत 70
21 न.पा. हद्दवाढ झालेल्या भागातील नागरी सोयी सुविधांचा विकास करणे कामी मुख्य आरसीसी गटर करणे 88
22 कापड मार्केट राजीव गांधी परिसर केबल खुदाई चरीचे डांबरी पॅचवर्क करणे. 93
23 थोरात चौक ते विक्रमनगर ते एसटीआगार रस्ता डांबरी पॅचवर्क करणे 96
24 घरफाळा व पाणीपट्टी वसुली करणे कामी 5 वाहने भाडेतत्वावर पुरविणे खर्चातील अनियामिततेबाबत. 100
25 एकत्रित करावरील रिबेटबाबत 103
26 सन 2019-20 मधील कराची थकबाकीबाबत. 104
27 पापु देखभाल दुरुस्ती अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रासाठी लिक्विड क्लोरीन 900 KG डीपार्टमेंटल कंटेनर मध्ये पुरविणेतील अनियमिततेबाबत 106
28 पाणीपुरवठा विभागाकडील पंपांचे ठिकाणचे वीजदेयकांबाबत 109
29 संगणकीय आज्ञावली व BPMS संकेतस्थळावरून दिलेल्या बांधकाम परवाना प्रक्रियेबाबत 114
30 नगरपालिका हद्दीत वाढीव कबनूर व शहापूर भागामध्ये भुयारी गटर बांधणे कामातील अनियमिततेबाबत 116
31 पाटबंधारे विभागाकडील पाणी उपसा देयकातील उणिवाबाबत 119
32 नगररचना विभागाकडील भूसंपादन विषयक खर्चाचे लेखे प्राप्त न झालेबाबत 121

कलम ९ ब खालील आक्षेप 123

33 वेतन देयक त्रुटी बाबत. 124
34 धारवट झोपडपट्टी व महाराष्ट्र वे ब्रिजजवळ ड्रेनेज व्यवस्था करणे कामाबाबत 125

35 जलशुद्धीकरण केंद्रामध्ये ॲजिटेअर्स पुरविणे बसविणे व चाचणी देणे तसेच FLACULATOR/BRIDGE MOTORS ,CHLORINATOR UNIT दुरुस्ती व अनुषंगिक दुरुस्तीची कामे करणे कामाबाबत 128
36 प्रभाग क्रमांक 11 मेघदूत हॉटेल, शास्त्री सोसायटी, स्वामी मळा परिसरामध्ये GI पाईपलीन टाकणे कामाबाबत 132
37 पंचगंगा व कृष्णा नदी उद्भवावरून येणाऱ्या दाबनलिकेच्या गळती काढणे कामाबाबत....136
38 800 MM व्यासाची मजरेवाडी जॅकवेल कडून येणारी दाबनलिका काळा ओढा आमराई शेड जवळ सरकविणे कामाबाबत 138
39 मलशुद्धीकरण केंद्र (सिवेज ट्रीटमेंट प्लांट (STP)) देखभाल दुरुस्ती व प्रचालन करणे (त्रैवार्षिक) कामातील उणिवाबाबत....141
40 जुना चंदूर रोड, चंदूर नाला येथे नाईक मळ्याजवळ मातीचा बंधारा बांधणे कामाबाबत....145
41 14 वा वित्त मुलभूत अनुदानातून (16-17) बोअरवर सबमर्सिबल पंप व अनुषंगिक कामांच्या प्रक्रियेबाबत 148
42 नगरपरिषद हद्दीत विविध 8 बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे कामांतील अनियमिततेबाबत....150
43 वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत डी झोन सांगली नाका येथील पाण्याची टाकी येथे 500 MM DIK-9 पाईप पुरविणे या अपूर्ण कामातील अनियमिततेबाबत 154
44 जुना चंदूर रोड पुलाजवळ मातीचा बंधारा बांधणे कामाबाबत....159
45 नगरपरिषद हद्दीत विविध सात बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे कामातील उणिवाबाबत 163
46 प्रभाग क्रमांक 15 मधील जाधव मळा लाखे नगर व रोहिदास नगर परिसरामध्ये G.I. पाईपलाईन टाकणे कामाबाबत 167
47 प्रभाग क्रमांक 6 मधील राखी कोंड्या बंगला ते संदीप जैन बंगल्यापर्यंत BJP मार्केटमध्ये G.I. पाईप जोडणे कामाबाबत....170
48 स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वाहन खरेदी वर खर्चाबाबत.(DPR मधून) 173
49 स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत बायोमायनिंग वरील खर्चाबाबत. (DPR मधून)....176
50 आरोग्य विभागाकडे जंतुनाशके, किटकनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत.....180
51 आरोग्य विभागा अंतर्गत डस्टबीन खरेदी खर्चातील अनियमितता बाबत. 183

52 अमृत अभियान योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाबाबत. 186
53 आरोग्य विभागाअंतर्गत शहरातील सारण गटर्स सफाई करणे खर्चातील अनियमितता बाबत...188
54 कचरा डेपो येथे कचरा सपाटीकरणासाठी जेसीबी पुरविणेबाबत. 189
55 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 1 ते 26 मधील घरोघरी कचरा गोळा करुन वाहतूक करुन कचरा डेपोमध्ये जमा करणे खर्चातील अनियमितता. 192
56 नगरपालिका हददीतील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणेबाबत. 198
57 कचरा डेपो येथे कचरा सपाटीकरणासाठी डोझर पुरविणेबाबत. 201
58 तांत्रिक तपासणी फी रक्कम खर्चाबाबत. 203
59 कच-यापासून खत निर्मिती वरील खर्चाबाबत. 204
60 इचलकरंजी न.प. मधील सिसनं.139 अर्बन मैदान शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे. 207
61 इचलकरंजी न.प. मधील 2017-18 आराखडयामधील उदयान विकसित करणे. 211
62 न.प. हद्दवाढ झालेल्या भागातील नागरी सुविधांचा विकास करणे अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चातील अनियमितता बाबत. 215
63 इचलकरंजी न.प. मधील 2016-17 आराखडयामधील उदयान विकसित करणे. 220
64 सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चातील अनियमितता बाबत.(2016-17 DSR नुसार) 223
65 सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चातील अनियमितता बाबत.(2018-19 DSR नुसार) 229
66 प्र. क्र. 15 चैतन्य नगरी बावस्कर घरासमोर डांबरीकरण करणे खर्चातील अनियमितता बाबत. (रस्ता अनुदान) 234
67 विक्रमनगर आरगे माळ परिसर डांबरी पॅचवर्क करणे खर्चातील अनियमितता बाबत. (न.पा. फंड) 236
68 प्रभाग क्रं. 3 भुईनगर येथे गटर्स करणे 239
69 प्रभाग क्रं. 8 जवाहनगर संतोषी माता ते विठ्ठल मंदिर रस्ता डांबरीकरण करणे. 243
70 प्रभाग क्रं.3 दत्त मंदिर परिसरात गटर्स करणे 247
71 प्रभाग क्रं. 1 शाहु सोसायटी मधील रस्त्यांना गटर्स करणे. 251
72 प्रभाग क्रं. 1 शाहु सोसायटी मधील रस्ते डांबरीकरण करणे. 255
73 तिरंगा चौक ते महासत्ता चौक रिंगरोड डांबरी करणे. 260

74 लालनगर अंतर्गत रस्ते कॉक्रिट करणे व गटर्स करणे. 265
75 चंदुर रस्ता ते अलायन्स हॉस्पीटल रस्ता डांबरीकरण करणे 268
76 प्रभाग क्रं. 22 गुंजवाली वसाहती मधील मुदगल घर भांबिष्टे घर ते कुजुंगे घर रस्त्यांना गटर करणे 273
77 निविदा स्विकृतीबाबत. 277
78 बांधकाम विभागाकडील खर्च प्रमाणके लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध न झालेबाबत.....279
79 म.सु.ज.न.अ.(राज्य) अंतर्गत मेन रोड कामातील अनियमितते बाबत.....280
80 न.प.फंड तून घनकचरा व्यवस्थापन प्रलंबित देयके अदा खर्चाबाबत. 294
81 घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करणे फी रक्कम अदाईबाबत.....296
82 वाहन क्रमांक MH 09 AG 236 च्या खर्चाबाबत. 297
83 वाहन विभागातील कर्मचारी इतर विभागात कार्यरत असलेबाबत.....298
84 मुख्याधिकारी यांच्या वाहन वापराबाबत. 299
85 बंद स्थितीत असलेल्या वाहनाचा विमा काढलेबाबत. 304
86 बंद असलेल्या वाहनामधील इंधनाबाबत. 304
87 प्रभाग क्र.7 इंदिरा सहकारी गृहनिर्माण संस्था येथे ओपन जीम साहित्य पुरविणे. 306
88 महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला महोत्सव 2020 साजरा खर्चाबाबत. 308
89 महिला बाल कल्याण विभागाअंतर्गत बालवाडी मुलांना करिता शेकोटी कार्यक्रमासाठी आवश्यक साहित्य पुरविणेबाबत. 310
90 प्रभाग क्रं. 3 भोईनगरमधील ओपन स्पेस ओपन जिम साहित्य पुरविणे. 311
91 प्रभागक्रं. 22 ढवळे हॉस्पीटल शेजारील न.पा. ओपन स्पेस कंपौंडची उंची वाढविणे. 313
92 शाहु हायस्कूल सुवर्ण महोत्सवी सांस्कृतिक कार्यक्रममध्ये माजी विद्यार्थ्यांचे गॅदरिंग व सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत. 316
93 प्राथमिक शाळेतील विद्यार्थि विद्यार्थिनीना खाऊ वाटपाबाबत. 318
94 छत्रपती शिवाजी महाराज शाळा क्रं. 6 टेरेसकरिता वॉटर प्रुफिंगबाबत 320
95 इचलकरंजी नगरपरिषद मालकीच्या फक्रुद्दीन अली शाळा व रफिक किडवाई शाळेसह इतर शाळेमधील दुरुस्ती करणे व पाण्याची व्यवस्था करणे शाळा क्रमांक 45 संडास बाथरुम दुरुस्ती करणेबाबत.....322
96 भविष्य निर्वाह निधी परतावा / ना परतावा अग्रीमा बाबत. 325

97 नोकर तसलमात रक्कम प्रलंबित असले बाबत. 326
98 दिव्यांगाना 5 टक्के आर्थिक तरतूदीमधुन लाभ देणेबाबत. 327
99 अग्निशमन कर कमी दराने वसूल केलेबाबत. 329
100 कर मागणी नोंदवहीतील अनियमिततेबाबत. 329
101 सन 2018-19 ची कराची थकबाकी व सन 2019-20 ची सुरुवातीची शिल्लक यातील तफावतीबाबत. 336
102 कचरा संकलन शुल्क कमी वसुल केलेबाबत. 337
103 एक्झमशन, कोर्ट, शासकीय व इतर इमारतींवर एकत्रित कर समायोजीत केलेमुळे झालेल्या नुकसानीबाबत 339
104 ऑफलाईन पद्धतीने बांधकाम परवाना प्रक्रियेतील अनियमिततेबाबत 340

कलम ९ क खालील आक्षेप 345

105 मालमत्ता विभागाकडील कमी रकमा जमा असलेबाबत. 346
106 पाणीपुरवठा विभागाकडील कमी जमेबाबत. 347
107 मालमत्ता कर वसुलीचे धनादेश न वटता कर मागणी रक्कम कमी झाल्याबाबतची अनियमितता. 349

कलम ९ ड खालील आक्षेप 352

108 बँक ताळमेळ न घेतलेबाबत. 353
109 अखर्चित रकमा शासनास परत करणेबाबत 354
110 नपा निधीचे बॅक ताळमेळ न घेतलेबाबत. 356
111 तीन वर्षावरील ठेवी व्यपगत न केले बाबत. 357
112 इचलकरंजी नगरपालिका,अधिकारी व कर्मचारी यांचे लोकहितास्तव सेवा पुनर्विलोकन करने बाबत. 358
113 सेवा पुस्तकातील उणीवा बाबत. 359
114 बालवाडी विभागातील विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदीबाबत. 361
115 नगरपरिषद शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तकात सेवेसंबंधित आवश्यक त्या नोंदी न घेतल्याबाबत. 363

116 म.सु.ज.न.अ.(राज्य) अंतर्गत शहरातील फुटपाथ व गटर बांधकाम करणे कामातील अनियमितते बाबत. 364
117 मोजमाप पुस्तक साठा नोंदवहीबाबत 372
118 अपूर्ण कामाबाबत. 374
119 म.सु.ज.न.अ.(राज्य) अंतर्गत शहरातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण व मजबुतीकरण करणे कामातील अनियमितते बाबत 375
120 पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रासाठी PAC पावडर पुरविणेबाबत 384
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र 390

विवरणपत्रे व जोडपत्रे 391

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

विभाग	९अ	९ब	९क	९ड
इतर	13			
सामान्य प्रशासन	9, 10, 11, 12	33		112, 113
शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम	16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23	60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79		116, 117, 118, 119
पाणी पुरवठा व मल निसा:रण	27, 28, 29, 30, 31	34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47		120
लेखा विभाग	1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8	96, 97		108, 109, 110, 111
नगर रचना	32	104		
कर निर्धारण व संकलन	25, 26	99, 100, 101, 102, 103	105, 106, 107	
आरोग्य		48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59		
वाहन विभाग	24	82, 83, 84, 85, 86		
घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प	14	80, 81		
शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण	15	91, 92, 93, 94, 95		115
महिला व बालकल्याण विभाग		87, 88, 89, 90		114

समाज विकास किंवा सामाजिक न्याय विभाग		98		

I Part I :मागील लेखा परीक्षण अहवाल

नगरपरिषद इचलकरंजी

इचलकरंजी नगरपरिषद , इचलकरंजी ,

भाग 1 मागील लेखापरिक्षण

मागील अहवालातील खालील परिच्छेद प्रलंबित असून त्याबाबत आयुक्त व संचालक ,न.पा. प्रशासन पुणे विभाग पुणे यांचेकडे स्वतंत्र पत्रव्यवहार चालू आहे

अ.क्र.	वर्ष	परिच्छेद क्रमांक	एकूण परि.
1	58-59-60	12,14,20,27,	**4**
2	60-61-62	15,16,18,19,20,21,22,23,24,25,29,30,34	**13**
3	1962-63	14अ	**1**
4	1963-64	20,21,22	**3**
5	1964-65	निरंक	
6	1965-66	4,41,46,50(2),55	**5**
7	1966-69	4,18,19,20(1,2,4),40(1),44,45,50,51	**9**
8	1969-72	5,16,17,65,76,79,87,100,104,119	**10**
9	1972-74	4,5,6,10,16,17,18,19,20,22,30,31,37,44,47,63,75, 90,104,105,107,111,115	**23**
10	1974-75-76	8क,9,12,20(3,4,5,6,7,8),22,41,46,48,56(3),60,64,70,71,77,96,99 ,100,102,104,114,117,125,130,153,154,162,180,181,183	**29**
11	1976-77-78	4(अ,ब,क,ड)5,6,12(1,2(2),3,4,5,6),14,15,17,18,21,22,33,34,35, 46(6),47,49,50,64,67,74,77(4),78,79,80	**24**
12	1978-79-80 विशेष	2,3,4,5,7,8,9,10,12,13,16(3,5),17,18,19,20,21,22,25	**18**
13	1978-79-80 नियमित	6,8,11,14(1),17(4),19,31,40(5,6),41(2),42,47(5),49(3),57,60,68, 75,78,88,91,98,111,116(ब),126	**23**
14	1980-81-82 विशेष	3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21	**19**
15	1980-81-82 नियमित	8,11,17,24,29,30,31,32,39,41,43,45,46,53,70,77,79,80,83,84,91 ,106,109,114,116,118,125,127,131,142	**30**
16	1982-83	7,9,14,15(1,2,3),23,25,26,27,28,29,30,31,32,34,36,37,46,47,49, 55,62,68,72,73,74,79	**26**
17	1983-84-85	7,10,14,15(ब),16,17,22(4,5),29(5,6),32(3,4),34(2,3),41(2,3),	**29**

		42(4),43,44,47,50,51,54,59,64,75(ब),76,77,78,79,82,90,91,101	
18	1985-86	4(1,2,3),6(अ,ब ,क),9,10,13,15(3,4,5,6,7,8,9),16(5,6,8,9), 17(1,2,3,4,6,8,10,12),18(1,5,14,16,19,20,24,25),20(4),24(4),25, 36(1),37(1,2,3,4,5,6),54,59,67,68,82(1,2),83(1,2)	**20**
19	1986-87	8(4),9(3),10(1),17,25(2,3),27(3,4),28(1),44,56,57,81(1),88(अ,क), 89(ड ,इ),90,93(ड)	**15**
20	1987-88-89	5(4,5),6,7,11,12,14,15,19(1,2,3),25(1,2,3,4),32,44(अ,ब ,क)(ब ,क), 51,55,64,65,68,76,82,99,102(3),104(ब ,क),106,107	**23**
21	1989-92	7,8,11,12,13,15,17,19,29,35(अ),41(इ ,फ),42,43,44,46(अ,ब ,क,ड , फ),47(अ,ड ,ई ,फ),48,49,53,54,61,62,82,86,95,100,109,116,122,1 24,128,129,165,171,176,178,179,180,181,182,186,189,193,198 ,205,207(3),223,228	**48**
22	1992-94	5,44,46,53(3,4,5,6),54(2,3,4),59(2कड ,3),94,114,119(अ,ब),126,1 30(1),140,145(3,4),146,150,163	**16**
23	1994-96	4,6(1,2,3,5,6),12,26,27,50,54(ब),64,93,97,102(ब ,4,7,11),106, 109,110,121,127,133,144,151(3)	**19**
24	1996-98	4,18,19(9,10),26,53,54,55,63,65,71,77,79,80,85(1,3,4),94,117, 126,135,136,157(4),158	**21**
25	1998-2000	3(1,5,),5,7,11,13,15,19,21,24,30(1),31,33,34(9,12,13),35, 38(7,9),49(6),50(4,6),51,54(6),60,68,72,74,75(2),79(3),82,83,86 (1,2),95,100(1,3),102,109,123,136,143,146,155	**37**
26	2000-2001	2,5,6,10,11(1,2),13(1,2),16,18(4,5),22(5,6),27,30(2,5,7),33(1,3) 36,42,43,44,47,61,63(2,5),64,90,93,95,97,103,109,110,126,128 ,129,130,143,149,151,154,156,157(5,7)	**37**
27	2001-2002	8,13,15,16(1,3,4),17,19,26,32(3),39,44,50,55,57,108,108(अ),10 8(ब),111	**17**
28	2002-2003	1,7,8,11,12,13,14,15,17,19,22,23,30,37,39,42,43,46,48,51,56,5 8,67,71,73,84,86,91,92,95,98,105,106,109,116,128,129,131, 132,141,150,152,153,154,157,161,162,165,171,172,174,177	**51**
29	2003-2004	6,7,11,13,14,15,16,24,28,29,31,32(1),33,34,36,37,39,44,48,61, 65,70,71,75,77,81,86(4),87,88,89,91,92,93,95,102,119,134,144 ,148,151,152,154,155,156,158,159,161,163,164,165,167,170, 189,192,193,195,197,200,201	**59**
30	2004-2005	3,7,8,9,10,14,15,16,17,18,19,20अ,21,22,23,24,25,26,27,29,30,3 3,34,35,37,41,42,43,46,47,48,50,51,52,55,56,57,58,59,68,69, 70,71,72,73,74,77,80,81,83,84,86,87,89,91,92,93,95,96,100,10	**75**

		2,104,106,107,110,113,114,115,116,117,118,119,123,124,126	
31	2005-2006	3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,17,18,20,21,22,24,25, 26,27,28,30,31,32,33,35,36,40,42,44,47,49,52,53,56,64,65,69,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82, 83,85,86,87,88,89,90,91,92,93,94,95,96,97,98,99,100,101,102, 103,108,109,110,113,115,116,118,119, 120,122,123,124,125,127,128,129,130,132,136,140,141,142,144,146,149,150,151,152,153,158,159	**101**
32	2006-2007	3,4,6,7,8,10,11,12,13,14,15,16,17,18,19,21,24,25,27,28,29,30, 31,32,33,34,36,39,40,42,48,49,50,51,52,53,56,57,60,61,62,64, 65,67,67अ,71,72,73,74,75,77,81,83,85,86,87,88,89,90,93,94,95,96,97,99,100,103,104,105,106,107,108,119,121,122,123,124, 125,126,129,130,133,136,137,138,139,140,141,142,143,144, 145	**92**
33	2007-2008	1(1ते 6),2,3(1ते 9),4(1ते 5),5(1ते 11),6(1ते 6),7(1ते 8),8(1ते 4),9(1,22), 10(1,2),11(1,2),12(अ,ब,क),13,14,15,16,17,18,19,20,22(1ते 4),23,24,26,27,31,33,34(1,2),39,40(1,2),41,43(1ते 4),44,45,46(1ते 4),47,48(1ते 9),49,50(1ते 3),51(1ते 5),52(1ते 4),53(1ते 3), 55,56,61(1ते 4), 62(1,2),64(1,2,3),68,70,71,72,74,76(1ते 6),77(1ते 5),78(1ते 4), 79(1ते 6),80(1ते 9),81(1ते 4),83(1ते 3),86(1ते 3),87,89,90,92,93,94, 95(1,2),96,98,99,101,102(1ते 5),104(1,2),105,106, 109,111,115, 116,123,124,126,128,132,133,134(1),136(1ते 8),137,139(1ते 3), 146,148,149,150(1ते 7),151(1ते 6),152(1ते 12),153(1ते 5),154(1ते 3),155(1ते 7),156(1ते 7),157(1ते 6),158(1ते 5),159,162(1ते 3),163(1,2),165,166(1ते 5),167(1ते 3),168,169(1ते 4), 171(1ते 5),173(ब)	**110**
34	2008-09-10-2011	1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,28,29,30,31,32,33,34,35,36,38,39,40,41,42,43,44,45,47, 48,49,50,51,52,53,54,55,56,57,59,60,61,62,63,64,65,66,67,68, 69,70,71,72,73,74,75,76,77,78,78,80,81,82,83,84,85,88,89,91, 92,93,94,95,96,97,99,100,101,102,103,105,107,108,109,110,	**149**

		112,114,115,116,117,118,119,120,121,122,123,124,125,126, 127,135,139,141,144,146,148,149,150,151,152,154,155, 156,157,158,159,161,162,163,164,166,167,168,169,170,171, 172,173,178,181,182,183,184,185,186,187	
35	2011-12	3,4,5,6,7,8,10,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27 ,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47, 48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,64,65,66,67,68, 69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85,86,87,88, 89,90,91,92,93,94 9 (PAC) - साईट नं .107 मध्ये इनप करिता कॉमन फॅसिलिटी सेंटर इमारतीच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे . 11 (PAC) - गुतंवणुकीबाबत. 63 (PAC) - लेखापरीक्षणास दप्तर उपलब्ध न केलेबाबत.	**92**
36	2012-13	1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,28,29,30,31,32,33,34,35,36,38,39,40,41,42,43,44,45,47, 48,49,50,51,52,53,54,55,56,57,59,60,61,62,63,64,65,66,67,68, 69,70,71,72,73,74,75,76,77,78,78,80,81,82,83,84,85,88,89,91, 92,93,94,95,96,	**96**
37	2013-14	1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,28,29,30,31,32,33,34,35,36,38,39,40,41,42,43,44,45,47, 48,49,50,51,52,53,54,55,56,57,59,60,61,62,63,64,65,66,67,68, 69,70,71,72,73,74,75,76,77,78,78,80,81,82,83,84,85,88,89,91, 92,93,94,95,96,97,98, 99, 100, 101, 102, 103, 104, 105, 106, 107, 108, 109, 110, 111, 112, 113, 114, 115, 116, 117, 118, 119, 120, 121, 122, 123, 124	**124**
38	2014-15	1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,28,29,30,31,32,33,34,35,36,38,39,40,41,42,43,44,45,47, 48,49,50,51,52,53,54,55,56,57,59,60,61,62,63,64,65,66,67,68, 69,70,71,72,73,74,75,76,77,78,78,80,81,82,83,84,85,88,89,91, 92,93,94,95,96,97,98, 99, 100, 101, 102, 103, 104, 105, 106, 107, 108, 109, 110, 111, 112, 113, 114, 115, 116, 117, 118, 119, 120, 121, 122, 123, 124,125,126,127, 128, 129,130,131,132,133,134,135,136,137,138,139,140,141,142, 143	**143**
39	2015-16	1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,4	**178**

		5,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65 ,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85, 86,87,88,89,90,91,92,93,94,95,96,97,98,99,100,101,102,103,10 4,105,106,107,108,109,110,111,112,113,114,115,116,117,118, 119,120,121,122,123,124,125,126,127,128,129,130,131,132,13 3,134,135,136,137,137,139,140,141,142,143,144,145,146,147, 148,149,150,151,152,153,154,155,156,157,158,159,160,161,16 2,163,164,165,166,167,168,169,170,171,172,173,174,175,176, 177,178.	
40	**2016-2017**	**1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,4 5,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65 ,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85, 86,87,88,89,90,9192,93,94,95,96,97,98,99, 100,102,102,103.**	**103**
41	**2017-2018**	1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,4 5,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65 ,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85, 86,87,88,89,90,91,92,93,94,95,96,97,98,99,100,101,102,103,10 4,105,106,107,108,109,110,111,112,113,114,115,116,117,118, 119,120,121,122,123,124,125,126,127,128	**128**
42	**2018-2019**	1)निरंक प्रमाणकांद्वारे खर्च नोंदविण्यात आलेबाबत . 2)नगरपरिषद निधी व अन्य निधीची प्रमाणके उपलब्ध न झालेबाबत 3) प्रमाणकाची रक्कम व रोजकिर्दिमधील रक्कम यामध्ये असलेल्या तफ़ावतीबाबत 4) करपावती रिबेटबाबत 5) आरोग्य विभागांतर्गत फ़ायबर मुतारी खरेदीतील अनियमिततेबाबत 6)न. प. आरोग्य कर्मचारी यांना गमबुट पुरविणे खरेदीतील अनियमितताबाबत 7)आरोग्य विभागांतर्गत प्लास्टीक घमेली खरेदीतील अनियमिततेबाबत 8)सन 2017-18 ची पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम व सन 2018-19 च्या पाणीपट्टी कराची रक्कम यातील तफ़ावतीबाबत. 9)कराची थकबाकीबाबत 10)सन 2017-18 ची पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम	**87**

		सन 2018-19 मध्ये घेतलेली नाही. 11)कालबाह्य योजनांच्या अखर्चित रक्कमा नगरपरिषदेकडे नाहक पडून असलेबाबत 12)परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना कार्यपध्दतीबाबत 13) भविष्य निर्वाह निधी वार्षिक लेजर (खाते नोंदवही), रोजकीर्द व ब्रॉडशीट (बृहतपत्र) मधील अनियमितता बाबत. 14) पाणीपट्टी कराची रक्कम जास्त थकित असतानाही पाणी कनेक्शन सुरु ठेवलेबाबत 15) नपा निधीचे बॅक ताळमेळ न घेतलेबाबत 16) वेतनदेयकातील अनियमितता 17) कर विभागाकडील रद्द पावत्याबाबत. 18) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 1 ते 26 मधील घरोघरी कचरा गोळा करुन वाहतूक करुन कचरा डेपोमध्ये जमा करणे खर्चातील अनियमितता. 19) आरोग्य विभागाकडील केमिकल/औषधे खरेदि वरील खर्चाबाबत 20) सन 2017-18 मधील कराच्या थकबाकीची अखेरची शिल्लकवरुन 2018-19 मधिल कराची सुरुवातीची शिल्लक यामधील तफ़ावतीबाबत. 21) भांडवली मूल्यावर आधारीत कर आकारणी न केलेबाबत 22) कर आकारणीबाबत 23) सन 2017-18 ची कराची थकबाकी रक्कम व सन 2018-19 च्या कराची रक्कम यातील तफ़ावतीबाबत. 24) सन 2017-18 ची कराची थकबाकी रक्कम सन 2018-19 मध्ये घेतलेली नाही 25) महिला व बालकल्याण विभागातील महिला महोत्सवासाठी स्टेजमंडप खुर्च्या, टेबल, स्वागत मटेरीअल, योजना छपाई, नाट्यगृह उपलब्ध करून देणे इ. पुरविणेबाबत. 26) सेवा पुस्तकातील उणिवाबाबत. 27)पावतीनुसार जमा झालेली रक्कम किर्दीस जमा न केले बाबत. 28)निवृत्तीवेतनाबाबत 29)महिला व बालकल्याण विभागाकडील महिला महोत्सव – कलाकार मानधनमधील अनियमिततेबाबत 30)शिक्षण विभागाकडील DBT द्वारे राबवलेल्या योजनांमध्ये झालेल्या अनियमितते बाबत 31)आरोग्य विभागाअंतर्गत डस्टबीन खरेदितील अनियमितता. 32)नगरपालिका हददीतील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे या बाबीवरील	

		खर्चातील अनियमितता. 33)आरोग्य विभाग अंतर्गत स्वच्छ भारत अभियान लघुपट डॉकयुमेंटरी तयार करणे व स्वच्छता जनजागृतीसाठी प्रेरणागीत निवेदन ऑडीओ तयार करणे बाबत. 34)सार्वजनिक शौचालय स्वच्छतेसाठी पाण्याचे टँकर भाडयाने घेणे. 35)बँक ताळमेळ न घेतलेबाबत(योजना अनुदान) 36)कचरा डेपो लेवल करणे व कचरा गाडयांना जाण्यासाठी वाट करणे कामी जेसीबी/ बुलडोझर भाडयाने घेणे वरील खर्चाबाबत. 37)वाहन विभागातील वाहनांच्या एकत्रित माहितीबाबत. 38)भुयारी गटर योजनेअंतर्गत बी झोन ट्रंक मेन देखभाल दुरुस्ती करणे 39)कच-यापासून खत निर्मिती वरील खर्चाबाबत. 40)गुंतवणूक व गुंतवणूक नोंदवहीमधील उणीवाबाबत 41)महिला व बालकल्याण विभागांतर्गत वेगवेगळया योजना राबविणे अंतर्गत उच्च रक्तदाब व हृदयरोग शिबीर आयोजन व बालवाडीतील मुलांचा बुध्यांक तपासणे व आवश्यक मार्गदर्शक व उपचार करणे. 42)शहरातील 16 मीटर उंचीचे हायमास्ट दुरुस्त करणे 43)प्रभाग क्रमांक 5 जवाहर नगर गटनंबर 66 पेअँड युज शौचालय पुर्वेस दक्षिण उत्तर व पुर्व पश्चिम आरसीसी गटर्स बांधणे 44)भुयारी गटर योजनेअंतर्गत डी झोन मधील देखभाल दुरुस्ती करणे 45)प्रभाग क्रमांक 21 लक्ष्मी मार्केट, बडोदा बँक, गायत्रि भवन व बडवे गल्ली याठिकाणी गटर करणे 46)शाळा नंबर 21 विठ्ठल रामजी शाळेकरिता ड्रेनेज व्यवस्था करणे 47)15 ऑगस्ट दिनानिमित्त कार्यक्रम विना निविदा खर्चाबाबत 48)भुयारी गटर योजनेअंतर्गत सी झोन ट्रंक मेन देखभाल वा दुरुस्ती करणे 49)सांगली नाका येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या आवारामध्ये अंतर्गत सुविधा करणे व कंपौंड भिंत बांधणे 50)विना निविदा खर्चाबाबत 51)वाहन विभागामध्ये खर्च नोंदवहया न ठेवल्याबाबत 52)वाहनाचे लॉगबुक व हिस्ट्री शिट अद्यावत न ठेवलेबाबत 53)जवाहरनगर येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या आवाराभोवती कंपौंड भिंत बांधणे (पश्चिम बाजू) 54)मत्ता व दायीत्वाबाबत 55)सुट्टीच्या दिवशी वाहनांचा वापर केल्याबाबत	

		56)वाहनांची एकत्रित नोंदवही सादर न केलेबाबत 57)कार्यालयीन कामकाजासाठी झेरॉक्स काढणे 58)अनुदानाची नोंदवही व अखर्चित रकमेबाबत. 59)वाहनाच्या टाकीच्या इंधन क्षमतेपेक्षा जादा इंधन भरलेबाबत. 60)महिला व बालकल्याण विभागाकडील झालेल्या कामांमधील अनियमिततेबाबत. 61)अदत्त रकमांचे लेखेबाबत. 62)वाहन क्रमांक एम.एच.09 एजी-235 च्या वापराबाबत. 63)घसारा निधीबाबत 64)कर्ज रक्कमांबाबत. 65)मेन रोड भागामध्ये विविध ठिकाणी डीआय के 7 पाईप लाईन टाकणे 66)गावभागामध्ये अस्तित्वातील डीआय के 7 पाईप लाईन टाकणे 67)महिला व बालकल्याण विभागांतर्गत बालोदयान विकसित करणे व बालदिन कार्यक्रम आयोजीत करणे अंतर्गत ओपन जिम बसविणे. 68)तसलमात रकमांचे समायोजनाबाबत 69)डी झोनकरिता विविध व्यासाच्या पाईप लाईनचे चोक अप काढणे 70)जवाहरनगर येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या आवाराभोवती कपौंड भिंत बांधणे (पुर्व बाजू) 71)नगर विकासाच्या विविध निधी खाते मधून रकमा अन्य निधी खाती वर्ग केल्याबाबत 72)मक्तेदारांच्या ठेवी व इतर ठेवीबाबत 73)जलशुध्दीकरण केंद्रासाठी लिक्वीड गॅस 900 केजी कंटेनरमध्ये पुरविणे 74)डी झोनकरिता विविध व्यासाच्या पाईप लाईनवर क्रॉस कनेक्शन करणे 75)आवश्यक शैक्षणिक अर्हता उतीर्ण नसतांना पदोन्नती दिलेबाबत 76)वार्षिक लेखा व अंदाजपत्रकीय तरतूद कमी जादा खर्चाबाबत 77)गावभाग झोनकरिता विविध व्यासाच्या पाईपलाईन करिता गळत्यांची दुरुस्ती करणे 78)नगरपालिका हद्दीत वाढीव कबनूर व शहापूर भागामध्ये भुयारी गटर बांधणे 79)महिला व बालकल्याण विभागांतगर्त बालवाड्यामध्ये खेळणी पुरविण्याबाबत. 80)इचलकरंजी न.प. प्राथमिक शिक्षण विभागाकडे कार्यरत असलेल्या इयत्ता 5 वी ते 7 वी करिता ग्रीनबोर्ड पुरवणे व पहिली ते चौथी करिता व्हाईट सिरॅमिक बोर्ड पुरवणे कामातील अनियमिततेबाबत 81)महिला व बालकल्याण विभागांतर्गत वेगवेगळ्या योजना राबविणे अंतर्गत ओपन जिम बसविणे. 82)सन 2017-2018 ची कराची थकबाकी रक्कम व सन 2018-2019 च्या कराची रक्कम यातील तफावतीबाबत	

		83)इचलकरंजी नगरपरिषदच्या नेताजी सुभाषचंद्र बोस शाळा क्र.23 व 45 शाळेमधील दुरूस्ती कामातील अनियमिततेबाबत 84)सन 2017-2018 ची पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम व सन 2018-2019 च्या पाणीपट्टी कराची रक्कम यातील तफावतीबाबत 85)विहित नमुन्यात प्रमाणकान्वये नगरपालिका निधीसह इतर अन्य निधीमध्ये रकमा खर्च करताना झालेल्या अनियमिततेबाबत 86)अंगणवाड्यांमध्ये व्हाईट बोर्ड बसविणे कामातील अनियमिततेबाबत 87)महिला व बालकल्याण विभागांतर्गत वेगवेगळ्या योजना राबविणे अंतर्गत महिला प्रशिक्षण देणे.	
		एकूण	**2086**

उपरोक्त परिच्छेदाबाबत ज्या त्या वर्षाच्या पुढील शे़्यामध्ये नमूद केलेले परिच्छेद क्रमांक व अंतिम समजण्यात यावेत.

Part II

नगरपरिषद इचलकरंजी

भाग एक

गंभीर अनियमितता

कलम ९ अ, ब, क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

1 अर्थसंकल्पीय तरतूद कमी जादा खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

नगरपरिषदेने महसुल रकमेचे अंदाज फुगवले असून त्याप्रमाणे कामे घेवून कामावर प्रत्यक्ष खर्च होत असल्याने नपा निधीवर अतिरिक्त दायित्व निर्माण होत आहे. इमारती व जमीन भाडे यापासून मिळणारे उत्पन्न स्थायी स्वरुपाचे असताना याबाबत उत्पनाचा अंदाज चुकीचा नमूद केला आहे. तरतुदीपेक्षा जास्त खर्च करण्यापूर्वी त्यास नगर परिषद सर्वसाधारण सभेची ठरावाने मान्यता घेवून मा.जिल्हाधिकारी यांचे पूर्व मान्यता घेतलेली नाही लेख्यांचे विवरणपत्र व अर्थसंकल्प रहिवाशांच्या निरीक्षणाकरीता खुले ठेवण्यात आलेबाबतची कार्यवाही केलेली नाही. अर्थसंकल्प नगरपरिषद अधिनियम कलम 101 व लेखासंहिता नियम 25 व 26 मधील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे वस्तुनिष्ठ तयार केला नसल्याचे दिसून येते.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर सन 2019 - 2020 चे लेखापरीक्षणात अर्थसंकल्पीय तरतूद व कमी जादा खर्चाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

नगरपरिषदेचा सन सन 2019 - 2020 या वित्तीय वर्षाचा जमा व खर्चाचा अर्थसंकल्प स्थायी समितीने ठराव क्र. 289 दिनांक 28/2/2019 अन्वये मंजूर केला असून त्यास जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र.कार्या/11/नपा/ अन्वये मंजूर केला आहे सदर अर्थसंकल्पीय विवरणपत्र पडताळणी केली असता नगरपरिषदेने केलेला नपा निधीची सर्वसाधारण जमा खर्च तरतूद व प्रत्यक्ष जमा व खर्च याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष जमा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	लेखाशिर्ष	मुळ तरतूद	जमा
1	जमीन व घरे यावरील कर	244400000	167763084
2	सोलर बँक हमी कर्जफेड निधी	1050000	0

3	भूयारी गटर कर	14000000	10443028
4	स्पेशल सानिटरी सेस	1050000	805050
5	ट्रि सेस	7500000	6001007
6	स्पेशल पाणीपट्टी	80000000	60814487
7	स्पेशल पाणीपट्टी (जल व मलप्रवास निधी)	500000	0
8	जाहिरात कर	300000	2582
9	सिनेमा थिएटर, सर्कस यावरील कर	100000	252613
10	आग्निशामक सुरक्षा निधी	2000000	1665190
11	विशेष शिक्षण कर	21000000	16762236
12	भुयारी गटर कर (जल व मलप्रवास निधी)	500000	0
13	मुद्रांक शुल्क	10000000	9426292
14	करमणुक करावरील अनुदान	3000000	5620451
15	जमीन महसूल अनुदान	500000	205449
16	मॅजिस्ट्रीअल फाईल / ग्रॅड इन एड अनुदान	200000	0

ब) अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष खर्च

अ.क्र.	लेखाशिर्ष	मुळ तरतूद	प्रत्यक्ष खर्च	कमी खर्च	जादा खर्च
1	आस्थापना सामान्य कारभार	15800000	13436432	2363568	0
2	पब्लीक वर्क्स विभाग नोकर पगार	8952000	5636166	3315834	0
3	इस्टेट विभाग	11027000	15612016	0	4585016

4	वाहन विभाग	15672000	18784201	0	3112201
5	प्रशासकीय लाईट बिल	20000000	98701530	0	78701530
6	पाणीपुरवठा लाईट बिल	70000000	72476185	0	2476185
7	नाटयगृह लाईट बिल	3000000	4534210	0	1534210
8	सा.प्रशा.छपाई /कागद खरेदी	2000000	817397	1182603	0
9	दावे खटले खर्च	5000000	1336149	3663851	0
10	पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल	2500000	0	2500000	0
11	तांत्रिक मंजूरी फी	20000000	8248870	11751130	0
12	गटर बांधकाम / दुरुस्ती	25000000	17998694	7001306	0
13	भुयारी गटर योजना / देखभाल दुरुस्ती	20000000	2834469	17165531	0
14	मुतारी बांधकाम / दुरुस्ती	2500000	329771	2170229	0
15	औषधे खरेदी	500000	391765	108235	0
16	रोग व जंतुनाशके खरेदी	18000000	5238300	12761700	0
17	कचरा उठाव करणे	0	0	0	0

18	घनकचरा व्यवस्थापन	22500000	8184256	14315744	0
19	बिगर शेतसारा भरणे	1000000	699855	300145	0
20	कल्याणकारी खर्च	2500000	0	2500000	0
21	अपंग कल्याण खर्च	12000000	12427670	0	427670
	एकूण	277951000	287687936	81099876	90836812

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नगरपरिषदेने अर्थसंकल्पाचे अवलोकन करता उपरोक्त तपशीलाप्रमाणे जमेबाबत कमी / जादा तरतूद केली आहे म्हणजेच जमेबाबत कोणताही आढावा व नियोजन न करता ढोबळ मानाने तरतूद केली असून प्रत्यक्षात अपेक्षित जमेपेक्षा रकमा कमी झालेचे दिसून येते.

2) अर्थसंकल्पात नगरपरिषदेने नगरपरिषदेस मिळणाऱ्या अस्थाई स्वरुपाच्या उत्पन्नाचे अवास्तव आकडे नमूद करुन अर्थसंकल्पीय आकडे फुगवले आहेत. त्यामुळे खर्चाच्या बऱ्याच बाबीवर अनावश्यक तरतूद केली आहे.

3) नगरपरिषदेकडील इमारती व जमीन भाडे यापासून नगरपरिषदेस मिळणारे उत्पन्न अंदाजपत्रकात केवळ 244400000/- इतकी तरतूद केली असून प्रत्यक्षात जमा रक्कम रुपये 167763084/- इतकी आहे. इमारती व जमीन भाडे यापासून मिळणारे उत्पन्न अर्थसंकल्पात जादा नमूद केल्याने नगरपरिषद नपाच्या इमारती व जागा यापासून मिळणारे उत्पन्न वाढविणे बाबत नियोजन नसल्याने दिसून येते.

4) नपाने अर्थसंकल्पात भांडवली उत्पन्न (शासनाकडून मिळणारे अनुदान) जमा सदरी अर्थसंकल्पात रक्कम रुपये 1199200000/- इतक्या रकमेची तरतूद केली असून प्रत्यक्ष जमा रक्कम रुपये 810815744/- इतकी असून ती प्रत्यक्ष तरतूदीच्या 68 टक्के इतकी कमी आहे.

5) महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 चे नियम 28 मधील तरतुदीनुसार अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जास्त खर्च करता येत नाही, असे स्पष्ट नमूद केले आहे. उपरोक्त तरतूद व खर्चाचे अवलोकन केले असता सर्वच बाबीवर कमी खर्च झाल्याचे निदर्शनास येत असले तरी खालीलप्रमाणे अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा वार्षीक लेख्यानुसार अर्थसंकल्पात सर्वसाधारण खर्च बाबीवर रक्कम रुपये 1813693000/- इतकी तरतूद केली असून प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 1397171364/- इतका झाला आहे. म्हणजेच जमा रकमेपेक्षा खर्चाचे प्रमाण कमी आहे. नपाने जमा होणाऱ्या महसूल रकमेचे अंदाज फुगवले असून त्याप्रमाणात कामे घेवून कामावर प्रत्यक्ष खर्च होत

असल्याने नगरपरिषद आर्थिक संकटात सापडत आहे.

6) महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 चे नियम 30 नुसार तरतुदीशिवाय झालेल्या खर्चास महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 चे कलम 101 (6) अन्वये तरतुदीपेक्षा जास्त खर्च करण्यापूर्वी त्यास नगर परिषद सर्वसाधारण सभेची ठरावाने मान्यता घेवून मा.जिल्हाधिकारी यांचे पूर्व मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक होते. परंतू नगर परिषदेने तशी कार्यवाही न करताच खर्च केलेला आहे.

7) महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 चे कलम 103 अन्वये नगर परीषदेचे तिमाही व वार्षीक लेखे जमा व संवितरण व मंजूर झालेला अर्थसंकल्प हे नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही प्रौढ रहिवाशास निरीक्षणाकरीता खुले असतील. या करिता अशा लेख्यांचे विवरणपत्र व अर्थसंकल्प रहिवाशांच्या निरीक्षणाकरीता खुले ठेवण्यात आल्याबद्दलची सूचना स्थानिक वृत्तपत्रात प्रासिध्द करणे बंधनकारक आहे, परंतू सन 2019-2020 चे वार्षीक लेखे व अंदाजपत्रकाबाबत सूचना स्थानिक वृत्तपत्रात दिल्याबाबतचे वृत्तपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही, त्यामुळे लेख्यास प्रसिध्दी दिल्याची खात्री करता आली नाही.

8) उपरोक्त बाबी पाहता नगरपरिषदेने आपला सन 2019-2020 या वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प नगरपरिषद अधिनियम कलम 101 व लेखासंहिता नियम 25 व 26 मधील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे वस्तुनिष्ठ तयार केला नसल्याचे दिसून येते.

DATSKKM8001 (Ref No : 18, Hmm No : 17)

2 मत्ता व दायित्वाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

प्रलंबित तसलमातीचा मेळ घेतलेला नाही. तसेच अशा प्रकारच्या रकमांचा मत्ता व दायित्व विवरणपत्रात दर्शविलेला नाही. करांच्या रक्कमा येणे बाकी असतांना त्या मत्ता सदरी दर्शवून पोकळ वाढ दर्शविण्यात आलेली आहे. बँक गॅरंटी ही त्यांचे काम पुर्ण झाल्यानंतर परत द्यावी लागते त्यामुळे प्रत्यक्षात ती मत्ता नसतांना ती मत्ता सदरी दर्शविण्यात आली आहे. अखर्चित निधी नगरपालिकेने शासनास भरणा केलेली नाही त्यामुळे नपा प्रशासनाने शासकीय निधीची मोठी रक्कम अडकून ठेवून वित्तीय अनियमितता केलेली आहे.

मत्ता दायित्व विवरणपत्र वस्तुनिष्ठ बनविणेत आलेले नाही.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात मत्ता दायित्वाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नगरपरिषदेने नोकर तसलमात रक्कम रु. 10439338/- व नोकरांना सण अग्रिमापोटी रक्कम खर्चापोटी आदा केल्या आहेत परंतू त्यापैकी नोकर तसलमात रक्कम रु. 915708/- व नोकरांना सण अग्रिमाची रक्कम रुपये 12030800/- इतकी रक्कम जमा झालेचे वार्षाक लेख्यावरुन दिसून येते, म्हणजेच प्रत्यक्ष समायोजनानंतर राहिलेली रक्कम ना निधीत रोखीने जमा होईल ती मत्तेत धरता येईल तसेच जर जादा खर्च आदा करावा लागणार असल्यास ते दायित्व ठरणार आहे. असे असतांना नगरपरिषदेने प्रलंबित तसलमातीचा मेळ घेतलेला नाही. तसेच अशा प्रकारच्या रक्कमांचा मत्ता दायित्व विवरणपत्रात दर्शविलेला नाही. तसेच मक्तेदारांकडून तसलमात रु. 17790319.75 इतकी रक्कम जमा दिसून येते तथापी सन 2019-2020 मध्ये त्यांना आदा केलेचे खर्च दिसून येत नाही. तरी सदर जमा घेतलेल्या मक्तेदारांकडील तसलमात व इतर तसलमात कधीपासूंच्या येणे होत्या हया ताळमेळाभावी समजू शकले नाही व त्या अचूक असलेबाबतची खात्री करता आली नाही. सदर तसलमातीच्या रक्कमा व्याजासह वसून करुन संबंधित / नपा निधीत तात्काळ भरणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे या तसलमाती वसुली झाल्यानंतर मत्ता सदरी घेणे आवश्यक आहे. तसेच नोकर तसलमाती नगर प्रशासनाचे स्थायी निर्देश क्र.35 मधील तरतूदीनुसार वसुलात आणावी व पहिले तसलमात समायोजन झालेशिवाय दुसरे तसलमाती देणेत येवू नयेत. वरील तसलमाती या ज्या त्या वित्तीय वर्षामध्ये समायोजन होणे आवश्यक आहेत.

2) नगरपालिकेने भाडे येणे, पाणीपट्टी, मालमत्ता करापासून मिळणाऱ्या रक्कमेपैकी वसुल होणे बाकी असलेली रक्कम रुपये 201218967/- मत्ता सदरी दर्शविणेत आलेली आहे. सदर रक्कम वसुल झालेशिवाय मत्ता म्हणता येत नाही सदर रक्कम मत्ता सदरी दर्शविलेमुळे मत्तेमध्ये पोकळ वाढ दिसून येते.

3) शासनाने मान्य केलेबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत सदर बाबत वर्षनिहाय प्राप्त झालेले व व्हावयाचे अनुदान यांचा मेळ घेवून अनुपालन सादर करणे आवश्यक आहे. तो पर्यंत सदर रक्कम ही मत्ता म्हणता येत नाही.

4) मत्ता सदरी दर्शविणेत आलेली गुंतवणुक सदराखाली हायड्रो टेक्नो गॅरंटी रुपये 1501000/- व पाटबंधारे सांगली रुपये 2178000/- या प्रमाणे त्रयस्थ संस्थेचे बँक गॅरंटी ही गुंतवणूक सदरी ठेवली तरी ती मत्ता होवू शकत नाही ती संबंधीतास बँक गॅरंटी ही त्यांचे काम पुर्ण झालेनंतर परत द्यावी लागते त्यामुळे ती मत्ता दाखविल्याने मत्तामध्ये पोकळ वाढ दिसून येते.

5) मत्ता सदरी दर्शविणेत आलेल्या वेगवेगळया निधीअंतर्गत अखर्चित राहिलेली निधी शासन खाती वित्त

विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण/ 10.17/प्र.क्र. 64/ आर्थोपाय मुंबई 32 दिनांक 21.9.2017 नुसार शासनाने वितरीत केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली दिलेली आहे. तसेच वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण /10.17/प्र.क्र.128/आर्थोपाय मुंबई दिनांक 6.6.2018 नुसार अखर्चित निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. असे असताना व या बाबत संचालनालयाचे स्पष्ट निर्देश असताना अखर्चित निधी नपा प्रशासनाने शासनास भरणा केलेली नाही. त्यामुळे नपा प्रशासनाने शासकीय निधीची मोठी रक्कम अडकून ठेवून वित्तीय अनियमितता केलेली आहे. तरी आता 12 वा वित्त आयोग इतर विकास कामे रुपये 3102190.63, 12 वा वित्त आयोग घनकचना व्यवस्थापन रुपये 1957362 व 13 वा वित्त आयोग रुपये 18128501/- अखर्चित निधी तात्काळ शासनास संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करुन पुर्ततेसह अनुपालन सादर करणेत यावे.

6) दायित्व सदरी सेवा कर / व्हॅट हे निरंक दर्शविण्यात आलेले आहे तसेच मत्ता सदरी सदर विषयाची नोंद दिसून येत नाही. तसेच शासकीय कपातीच्या रक्कमा या वेगवेगळया विकास कामाच्या माध्यमातून करत असताना कंत्राटदाराच्या देयकातून कपात करुन घेण्यात आलेल्या रक्कमा व प्रत्यक्षात भरणा रक्कमा यांचा मेळ घेवून त्याप्रमाणे शासकीय रक्कमा भरणा करणेबाबत कार्यवाही झालेचे दिसून येत नाही. तरी कंत्राटदाराच्या दयेकातील कपात रक्कमा व भरणा रक्कमा यांचा मेळ घेवून अनुपालन सादर करण्यात यावे.

7) दायित्व सदरी दर्शविणेत आलेली अनुदाने 13 वा वित्त आयोग अखर्चित निधी शासनास तात्काळ भरुन दायित्वे कमी करण्यात यावीत.

8) दायित्व सदरी मक्तेदार डिपॉझिट रक्कम रुपये 91398406/- दर्शविण्यात आलेली आहे. व पापु डिपॉझीट रुपये 96244902/- दाखविली आहे. सदर रक्कमांचा मेळ हा नोंदवहीतील रक्कमेशी घेवून तफावत नसलेची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच पापु डिपॉझीट नोंदवहीस डिपॉझिट रकमेचा मेळ घेवून सदर रक्कमांचा मत्ता सदरी ही दायित्वाप्रमाणे दर्शविणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे मत्ता / दायित्वातील त्रुटीमुळे मत्ता दायित्व विवरणपत्र हे योग्य आहे असे म्हणता येत नाही.

9) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.लेखासं/102004/71/प्र.क्र.5/04 नवि 31 दिनांक 6.7.2005 अन्वये नगरपरिषदेने व्दिनोंद लेखापध्दती चा अवलंब करुन सन 2006-2007 पासून अंदाजपत्रक, ताळेबंद, मत्ता दायित्व व जमा खर्च पत्रक तयार करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाह करणेबाबत गंभीर पणे दक्षता घेवून कार्यवाही करणे / अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

10) भारत सरकारच्या नगरविकास विभागाने प्रस्तूत केलेल्या Model National Municipal Aseet valuation methodology Mannual नुसार किंवा महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या पध्दतीने तनाच्या ताब्यात / मालकीच्या असलेल्या मालमत्तेचे (उदा. जमीन, इमारती, रस्ते, जल व जलनिस्सारण व पापु योजना, वाहन, फर्निचर व तत्सम मालमत्ता इत्यादी) चे मुल्यमापन करुन मुल्य निर्धारण न केलेमुळे नपाचे भांडवली

गुंतवणुकीतील निश्चित मत्ता व दायित्व कळून येत नाही व ती दाखविण्याचा प्रयत्न मत्ता दायित्वामध्ये केलेला नाही त्यामुळे मत्ता दायित्व योग्य दध्दतीने सादर केलेले नाही.

11) दायित्व सदरी मक्तेदारांची प्रलंबित देयके खाती रुपये 183419808 एवढी दर्शविण्यात आलेली आहे. संबंधीत प्रलंबित देयके ही नंबर 2 मधील प्रलंबित देयकांची नोंदवहीतील नोंदीशी मेळ घेवून प्रलंबित देयकांची रक्कम ही दायित्व सदरी दर्शविणेपुर्वी सदर देयके ही दुबार अदा होणार नाही याबाबत पडताळणी करुन प्रलंबित देयकांची रक्कम ही योग्य असल्याचे प्रमाणीत करुन कौन्सीलच्या मान्यतेने सदर रक्कमा या दायित्व सदरी दर्शविणे आवश्यक आहे परंतू सदर प्रलंबीत देयकाबाबत प्रलंबित रक्कमेचा मेळ घेतला नसल्याने दिसून येते सदर बाबत पुर्ततेसह अनुपालन सादर करणेत यावे.

12) नगरपरिषदेने ट्री प्रिझर्वेशन ॲक्ट 1975 अन्वये नपाने वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक स्वतंत्र निधी स्थापन करुन वृक्ष प्राधिकरणाचे अंदापत्रक 31 ऑक्टोंबरपुर्वी करण्यात येवून त्यास प्राधिकरणाने मान्यता देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे नगरपालिकेने कार्यवाही केलेली नाही.

वरील त्रुटीसह मत्ता दायित्व विवरणपत्र नपाने सादर केलेली आहे सदर बाबत पुर्ततेसह अनुपालन सादर करणेत यावे.

DATSKKM8001 (Ref No : 15, Hmm No : 14)

3 वार्षीक लेख्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 19

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

प्राप्त होणाऱ्या भांडवली अनुदानापैकी विकास कामामधील पायाभुत सुविधावर खर्च करण्यात आलेला आहे. गुंतवणुकीवरील व्याज नपा प्रशासनाने विकास कामावर खर्च करणे अपेक्षित होते. नोकर तसलमात मोठया प्रमाणावर असून समायोजन करण्यात आलेले नाही. शासनाकडून भांडवली अनुदानाची रक्कम अखर्चित असल्याने शासनास भरणा करणे आवश्यक आहे. भरणा केलेल्या कपातीची चलने याचा मेळ घेणे आवश्यक. शासकीय भांडवली अनुदानापोटी किती रक्कम प्राप्त झाली व प्रत्यक्षात किती खर्च झाला व त्रयस्थ संस्थेकडून लेखापरीक्षण अहवालासह विनियोग दाखले करण्यात आले व किती कामे प्रलंबित आहेत याचा आढावा घेणे

आवश्यक. नपाने व्दिनोंद पध्दती अनुसरलेली नाही. प्रशासनावर 25 % पेक्षा जादा खर्च झालेला आहे. जंगम नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. कर विभागाकडून घरफाळा रिबेट देण्यात आले आहे त्याचा मेळ घेणे आवश्यक. आरोग्य विभागाअंतर्गत घनकचरा यावर मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. सन 2019-2020 मध्ये मत्ता दायित्वामध्ये मक्तेदाराची देयके प्रलंबित निरंक दर्शविण्यात आली आहे. सदर रकमा सन 2019-2020 मध्ये खर्ची टाकल्यास संबधित जबाबदाराकडून वसुलात आणण्यात येईल. वार्षिक लेख्यांची प्रत वर्ष अखेरीनंतर कॉन्सीलच्या मान्यतेने नपा संचालनालय, विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी कार्यालयास विहित कालावधीत पाठविणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. वार्षीक लेखा तयार करताना किर्द शिल्लक व बँक शिल्लक याचा ताळमेळ घेवून वार्षीक लेखा वस्तुनिष्ठ बनविणे आवश्यक आहे.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात वार्षीक लेखा पडताळणी केली असता खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) वार्षीक लेख्याचे जमा बाजुचे विवरणपत्र पडताळणी करण्यात आली असता सन 2018-2019 अखेर म्हणजेच 2019-2020 चे आरंभी शिल्लक रुपये 1941864876/- इतकी असून वर्ष अखेरी एकूण जमा रु.2473921764/- इतकी दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने भांडवली जमेची रक्कम रु.1173979568/- इतकी आहे. खर्च बाजुचे अखेरची शिल्लक सन 2019-2020 अखेर एकूण एकंदर रु. 2072630731/- इतकी असून प्रत्यक्ष भांडवली खर्च रु. 945984544/- इतकी आहे. वरील विवरणपत्रावरुन एकूण प्राप्त होणाऱ्या भांडवली अनुदानापैकी विकास कामावरील खर्चाची टक्केवारी अंदाजे 35 टक्के रक्कम पायाभुत सुविधावर खर्च झाल्याचे दिसून येते.

2) वार्षिक लेख्याच्या जमा बाजुस विकास कामासाठी मिळणाऱ्या भांडवली अनुदान हे नपा ने भांडवली गुंतवणुकीवरील व्याज (अनुदानावरील व्याज) ही रक्कम रु. 88585143/- इतकी दर्शविली आहे त्यामुळे नपा प्रशासनाने विकास कामावर खर्च करणे अपेक्षित आहे

3) नोकर तसलमात ची रक्कम मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याने रु 915708/- जमा दिसून येते. परंतू प्रत्यक्षात दिलेली तसलमातीचे त्या आर्थिक वर्षात समायोजन करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली जात नाही.

4) शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या भांडवली अनुदानाची रक्कम ही अखर्चित असल्याने सदर रक्कम ही वित्त विभाग शासन निर्णय दि. 21.9.2017 नुसार सदरची रक्कम शासनास भरणा करणे आवश्यक आहे. उदा 11 वा वित्त आयोग, 13 वा वित्त आयोग, अप्लसंख्यांक अनुदान योजना, दलित वस्ती सुधार योजना, स्वच्छ महाराष्ट्र योजना अनुदान, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान इ.

5) शासनाच्या विकास कामाच्या देयकातून कपात करण्यात आलेल्या वेगवेगळया कपातीच्या रकमांचा भरणा योग्य त्या लेखाशिर्षाखाली शासनाकडे भरणा केल्याची चलने व भरणा केलेली आणि कपातीच्या रकमा यांचा

मेळ घेणे आवश्यक आहे.

6) वार्षिक लेख्यामध्ये खर्च बाजुस इतर मत्ता, किर्दिवरील शिल्लक वर्गीकरण (जमा खर्ची) या सदरा खाली रक्कम रु इतकी दर्शविण्यात आलेली आहे. परंतू संबंधित रकमेच्या ट्रान्सफर एंन्ट्री नोंदवही व प्रत्यक्षात वर्गीकरण झालेल्या रकमेचा व करावयाच्या रकमेचा मेळ घेणे आवश्यक आहे.

7) नपा स वेगवेगळया शासकीय भांडवली अनुदानापोटी किती रक्कम कोणत्या निधीतून प्राप्त झाली, प्रत्यक्ष खर्च किती झाला, शिल्लक रक्कम किती आहे व शासनाकडे प्रत्यक्ष भांडवली अनुदानावर खर्च झालेल्या पुर्ण कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण अहवालासह विनियोग दाखले सादर करण्यात आलेले आहेतव किती कामांचे अद्यापही प्रलंबित आहेत याचा आढावा घेवून उर्वरित कामासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

8) सन 2019-2020 च्या वार्षिक लेख्याप्रमाणे करापासून मिळणारे उत्पन्न हे प्रत्यक्षात सन 2019-2020 च्या अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा कमी असल्याने करापासून मिळणाऱ्या उत्पन्न वाढीसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करणेत यावी.

9) नपाने व्दिनोंद लेखा पध्दतीचा अवलंब केलेला नाही.

10) नपाचे प्रशासनावरील खर्च हा 25 टक्के पेक्षा जादा झालेला आहे. याबाबत स्वतंत्र आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे. 25 टक्के वरील जादा प्रशासकीय खर्च हा लेखापरीक्षणात तात्पुतरा अमान्य करण्यात येत आहे.

11) नपा ने घसारा निधी, वृक्ष प्राधिकरण निधी, अग्निशमन निधी व आपतकालीन निधी याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय व अधिसुचनेनुसार संबंधति निधी खाती लोकसंख्येच्या / मालमत्तांच्या प्रमाणात निधी तयार करणे आवश्यक आहे. संबंधित बाबतीत स्वतंत्र लेखे ठेवून प्रत्यक्ष विषयानुषंगाने शासकीय मार्गदर्शक सुचनेप्रमाणे निधीचा विनियोग करणे आवश्यक आहे.

12) नपा ने स्थावर जंगम मालमत्ता नोंदवही अद्यावत ठेवली नसल्याने नपा चे भांडवली गुंतवणुकीचा अंदाज येत नाही. त्यामुळे घसारा निधी योग्य त्या प्रमाणात जमा केला जात नाही. याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

13) 14 वा वित्त आयोगातून आरोग्य विभागाच्या घनकचरा व्यवस्थापन, कचरा संकलन, संकलन व वाहतुक प्रक्रिया इ. कामे कली जातात. परंतू त्याचबरोबर 14 व्या वित्त आयोगातून नपाच्या हिश्याची लोवर्गणी च्या हिश्यापोटी शासनाकडे मोठया प्रमाणात रकमा भरल्या जातात. परंतू लोक वर्गणी ची रक्कम भरणा केल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अनुदानातून विकास कामे हि 14 वा वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक असता तशी कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते. कारण 14 व्या वित्त आयोग निधीपोटी पोकळ खर्च जादा दिसून येतो. 14 वा वित्त आयोग खाती लोवर्गणीची खर्चाची रक्कम पुन्हा परत जमा करुन 14

व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार खर्च करणे अपेक्षित आहे.

14) नपा ने जल, विदुयत, फायर ऑडिट दरवर्षी करुन घेवून त्याप्रमाणे त्रुटीबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

15) सन 2019-2020 मध्ये आरोग्य विभागाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी मोठया प्रमाणात खर्च केलेला आहे. परंतू घनकचरा व्यवस्थापनेचे कामकाज हे समाधानकारक होत असल्याचे दिसून येत नाही. कारण संकलित कचऱ्यावर पूर्ण प्रक्रिया करुन डंपिंग एरिया स्टॉकसाठी Clearance करुन घेवून नवीन येणाऱ्या कचऱ्यासाठी जागेची व संबंधित कचरा डेपोसाठी होणाऱ्या संभाव्य रोगराईचा प्रसार होवू नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजनेसाठीसुध्दा खर्च करणे अपेक्षित आहे.

16) नपा कडे महत्वकांक्षी प्रकल्प म्हणून UIDSSMT कबनूर विस्तारीत पाणीपुरवठा, स्वर्णजयंती नगरात्थान योजना, सांडपाणी प्रक्रिया केंद्र, घनकचरा व्यवस्थापन, शतकोटी वृक्ष लागवड, नागरी दलित्तेतर योजना, खत निर्मिती, रमाई आवास योजना, IHSDP, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, प्रधानमंत्री आवास योजना इ. महत्वाकांक्षी प्रकल्पावर नागरिकासाठी पायाभुत सुविधा तयार करुन प्राप्त होणारे अनुदान पुर्ण विनियोग करणेबाबत प्रशासनाने शासनाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

17) नपा ने आपल्याकडील अग्निशमन यंत्रणा व्यवस्थापन व safaty measures इ. बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासाठी मालमत्ता करावर अग्निशमन कर आकारुन स्वतंत्र निधी स्थापन करणेत यावा. नपाच्या सन 2019-2020 मधील मालमत्ता करावर अग्निशमन कर आकारुन स्वतंत्र निधी स्थापन करणेत यावा. नव्याने बांधकाम परवानगी देताना उपलब्ध अग्निशमन यंत्रणेची क्षमता पाहून संबंधित विभागाचे ना हरकत प्रमाणत्र घेतल्यानंतरच बांधकाम परवानगी देणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

18) अधिनियमातील तरतूदीनुसार वार्षीक लेख्यांची प्रत वर्षअखेरीनंतर कौन्सीलच्या मान्यतेने नपा संचालनालय, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालयास विहित कालावधीत योग्य त्या तरतुदीचे पालन करुन पाठविणे आवश्यक आहे. याबाबत पुर्तता झाल्याचे लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

19) वरीलप्रमाणे वार्षिक लेखा तयार करताना लेखा विभागाने आपल्याकडे असणाऱ्या लेख्यांचे किर्द शिल्लक व बँक शिल्लक याचा ताळमेळ घेवून वरील उणीवांच्या पुर्ततेसह वार्षिक लेखा वस्तुनिष्ठ बनविणे आवश्यक आहे.

DATSKKM8001 (Ref No : 20, Hmm No : 19)

4 नगरपरिषद इचलकरंजी शिक्षण मंडळाकडील प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालनाबाबत.

अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

नगरपरिषद इचलकरंजी शिक्षण मंडळाचे थकित परिच्छेदांचे अनुपालन पुर्वलक्षी प्रभावाने करण्यात आलेले नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात शिक्षण मंडळाचे प्रलंबीत परिच्छेदाच्या लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे,

नगरपरिषद इचलकरंजी शिक्षण मंडळाचे सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात सन 1965-66 ते 2015-2016 अखेर एकूण 1303 परिच्छेद प्रलंबित असल्याचे दिसून आले. संबंधित परिच्छेदांचे अनुपालन पुर्वलक्षी प्रभावाने करण्यात आले नाही. त्यामुळे आता नपा शिक्षण मंडळाचे थकीत परिच्छेदांचे अनुपालन नपाच्या शिक्षण विभागामार्फत सादर करुन तात्काळ कार्यवाही करुन त्यामध्ये गुंतलेल्या शासकीय व नपा निधीची रक्कम वसुल करणेबाबत व मुक्त करणेबाबत कार्यवाही करणेत यावी याबाबत पुर्तता करणे आवश्यक आहे.

DATSKKM8001 (Ref No : 22, Hmm No : 21)

5 नगरपरिषदेकडील प्रलंबीत परिच्छेदांचे अनुपालनाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

प्रलंबीत परिच्छेदांचे अनुपालन पूर्वलक्षी प्रभावाने केले जात नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात नगरपरिषदेच्या प्रलंबीत परिच्छेदाच्या लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे,

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात सन 1958 ते 2018-2019 अखेरपर्यंत एकूण 2086 इतके परिच्छेद प्रलंबीत असल्याचे दिसून आले. संबंधीत परिच्छेदांचे अनुपालन पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात आले नाही. नपाने थकीत परिच्छेदांचे अनुपालन सादर करुन तात्काळ कार्यवाही करुन गुंतलेल्या शासकीय व नपा निधीची रक्कम वसूल करणेबाबत व मुक्त करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. याबाबत पुर्तता करणे आवश्यक आहे.

DATSKKM8001 (Ref No : 23, Hmm No : 22)

6 निवृत्तीवेतन बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

निवृत्तीवेतनधारकांची सर्वकष माहिती विहीत नमुन्यात ठेवण्यात आली नाही. हयातीच्या दाखल्यांच्या नोंदी नोंदवहीमध्ये घेण्यात आल्या नाहीत. निवृत्तीवेतन प्रदान आदेश विहीत नमुन्यात काढला जात नाही. निवृत्तीवेतन देयके विहित नमुन्यात तयार केली जात नाहीत प्रत्येक महिन्याच्या निवृत्तीवेतन अदा करताना मागील महिन्याच्या निवृत्तीवेतनाच्या रक्कमेचा ताळमेळ घेतला जातो तथापी त्यावर प्राधिकृत अधिकारी यांच्या स्वाक्षरी घेतल्या जात नाहीत. शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक वर्षी जूनमध्ये महागाई भत्त्याचे अतिप्रदान रोखण्यासाठी प्रमाणपत्र घेतले जात नाही.

1) निवृत्तीवेतनधारकांना दरमहा निवृत्ती वेतन अदा करण्यासाठी व त्याचे पर्यवेक्षण करण्यासाठी निवृत्तीवेतन शाखेमध्ये महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 परिशिष्ट 4 ख नुसार नमूना क्रमांक 91 मध्ये निवृत्तीवेतन नोंदवही व नमुना क्रमांक 97 मध्ये लेखापरीक्षा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, तथापी अशा प्रकारच्या नोंदवहया या विभागात न ठेवल्यामुळे निवृत्तीवेतनधारकांची सर्वकष माहिती एकित्रित रित्या पाहता येत नाही. उदा. निवृत्तीवेतन धारकांची वैयक्तीक माहिती, निवृत्तीवेतनधारका कोणत्या विभागातून सेवानिवृत्त झालेला आहे, त्याची निवृत्ती वेतनाची रक्कम, उपदान, अंशराशीकरण, नामनिर्देशन, कुटुंब निवृत्ती वेतनाचा दर इ. माहिती एकाच वेळेला तपासता येत नाही.

2) महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 परिशिष्ट 4 ट मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्ती वेतन प्रदान

आदेश नमुना 92 मध्ये मुख्य अधिकारी यांचेकडून देणे आवश्यक आहे तथापी, विहति नमुन्यात निवृत्तीवेतन प्रदान आदेश देण्यात येत नाहीत.

3) महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 परिशिष्ट 4 त नुसार प्रत्येक निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले दरवर्षी 1 एप्रिल व 1 ऑक्टोंबर रोजी निवृत्तीवेतनधारकाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. हयातीचे दाखले या विभागाकडून घेण्यात आले आहेत, तथापी त्याच्या नोंदी नमुना 97 मध्ये नोंदवही ठेवली नसल्याने अप्राप्त हयातीच्या दाखल्याच्या नोंदी पाहता आल्या नाहीत. त्यामुळे हयातीचा दाखला न दिलेल्या निवृत्तीवेतनधारकास निवृत्तीवेतन अदा करण्यात आले आहे किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

4) मासीक निवृत्तीवेतनाचे देयक महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 परिशिष्ट 4 ट मध्ये नमूद केल्याप्रमाणे नमुना 93 मध्ये तयार करणे आवश्यक आहे. तथापी य विभागातील निवृत्तीवेतनाचे लेखे तपासले असता नमुना 93 मध्ये निवृत्तीवेतनाची देयके तयार केली जात नसून पेन्शन पत्रकावरुन रक्कमा आहरि केल्या जातात. विभागातील सर्व निवृत्तीवेतन धारकांचे त्या त्या महिन्याचे पेन्शन पत्रक तयार करुन त्यावर एकूण रक्कम अंकी व अक्षरी लिहीली जाते व त्यावरुन रक्कम अदा करण्यात येते व आहरीत करण्यात येते. सदरची ही पध्दत चुकीची असून विहीत नमुन्यात देयक तयार करुन त्यावरुन रक्कम आहरीत करण्यात यावी.

5) मासीक निवृत्तीवेतन अदा करताना मागील महिन्याील निवृत्तीवेतन धारकांची संख्या व त्याची रकम व चालू महिन्यातील निवृत्ती वेतन धारकांची संख्या व रकम याचा ताळमेळ घेतला जातो, तथापी त्याच्या वरती प्राधिकृत अधिकाऱ्यांची स्वाक्षऱ्या घेण्यात येत नाहीत.

6) शासन निर्णय वित्त विभाग क्र. मकोनी/1000/प्र.क्र.188 कोषा 5 दि. 4.3.2002 अन्वये प्रत्येक वर्षी जूनमध्ये प्रत्येक विभागाकडून अनुकंपा तत्वावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची व पुर्ननियुक्त कर्मचाऱ्यांची माहिती घेऊन महागाई भत्त्याचे अतिप्रदान होते किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे अतिप्रदान झाले असत्यास तात्काळ वसूली सूरु करणे आवश्यक आहे.

DATSKKM8001 (Ref No : 25, Hmm No : 24)

7 परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना कार्यपध्दतीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

अंशदायी निवृत्तीवेतन योजनेच्या कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत लेखे ठेवलेले नाहीत. कर्मचाऱ्यांना लेख्याचे विवरणपत्र देण्यात आले नाहीत. PRAN No. देण्यात आले नाहीत. गुंतवणूका या राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात आल्या नाहीत. रोखवहया व गुंतवणूक नोंदवहयामध्ये मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना कार्यपध्दतीबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) नियुक्त अंशदायी निवृत्त वेतन योजनेचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्याबाबत लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.

2) वित्तीय वर्ष निहाय संबंधित कर्मचाऱ्यांना मासिक वेतनातून कपातीने जमा होणारे 10 टक्के व नपा हिश्याचे 10 टक्के मिळून होणाऱ्या एकत्रित रकमेचा वार्षीक जमा खर्च पत्रक ठेवून संबंधित कर्मचाऱ्यांना लेखे विवरण वितरीत करण्यात आलेले नाही.

3) नपा ने अंशदायी निवृत्ती वेतन योजनेचे PRAN No. देण्यात आलेले नाहीत ते देणे आवश्यक आहे.

4) नपा कडे जमा होणाऱ्या निधीची गुंतवणुक ही राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणेबाबत शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार नपाने वाणिज्यीक व खाजगी बँकेत ठेवणेत आलेले आहेत. उदा आयडीबीआय, ॲक्सीस बँक सदर बाबत अनियमितता झालेली असून ती राष्ट्रीयकृत बँकत ठेवून अंशदायी निवृत्ती वेतन योजनेच्या रकमेची सुरक्षा ठेवणे आवश्यक आहे.

5) रोखवही व गुंतवणुक वहयाबाबत लेखाधिकारी व मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

DATSKKM8001 (Ref No : 26, Hmm No : 26)

8 भविष्य निर्वाह निधी रोकडवही व बृहतपत्रक नोंदवहीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

खतावणी नोंदवहीवर लेखाधिकारी व मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466 (5) मधील (ग) नुसार नोंदवहया ठेवलेल्या नाहीत, वर्गणी दाराला भविष्य निर्वाह निधीचे वार्षिक विवरणपत्र देणे आवश्यक असता, त्या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही. रोकडवही व बृहतपत्रक यामध्ये खालील प्रमाणे तफावत आढळून आली नाही. गुंतवणुकीबाबतचे अभिलेख लेखापरिक्षणादरम्यान आढळून आले.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी भविष्य निर्वाह निधी रोकड वही व बृहतपत्रके यांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा आढळून आल्या.

1)खतावणी नोंदवही नमुना क्रमांक 88 मध्ये ठेवणेत आलेली आहे, परंतू त्यावर लेखाधिकारी व मुख्याधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

2)महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466 (5) मधील ग नुसार भविष्य निर्वाह निधी खातेवही नमुना नंबर 98 मध्ये व बृहतपत्रक नोंदवही नमुना नंबर 99 मध्ये ठेवणे आवश्यक आसता अशा नमुन्यात नोंदवही ठेवणेत आलेली नाही.

3)महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466 (5) मधील ख अन्वये वर्गणीदारांना भविष्य निर्वाह निधीचे वार्षीक विवरणपत्रक देणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4)रोकड वही व बृहतपत्रक यामध्ये खालीलप्रमाणे तफावत आहे.

5)भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमा हया खाजगी बँकेत गुंतवण्यात आल्या आहेत.

निधीचे नांव	दि. 31.3.2020 रोजी किर्दीप्रमाणे शिल्लक रु.	दि. 31.3.2020 रोजी बृहतपत्रकाप्रमाणे शिल्लक रु.	तफावत रु.
भविष्य निर्वाह निधी	183064825/-	226643643/-	43578818/-

उपरोक्त तफावतीचे कारण नगरपरिषद कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यावरील देय व्याज अगर त्यापेक्षा जास्त रक्कम असू शकते. त्याबाबत न.प. ने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भविष्य निर्वाह निधी कपातीच्या रक्कमांची गुणतवणूक करुन त्यावरील प्राप्त व्याज रक्कमेतून उक्त कर्मचाऱ्यांस भ.नि.नि. व्याज प्रदान करता आले असते, परंतू अशी गुंतवणुकीची कार्यवाही न केलेने भविष्यात सदर व्याज रक्कमेचे अनावश्यक दायित्व न.प.वर निर्माण होऊ शकते. त्यामुळे भविष्यात न.प.कडील प्राप्त महसूली जमेतून सदर भ.नि.नि. व्याज अदा करावे लागेल. तरी सदरचे नुकसान टाळण्यासाठी नगरपरिषदेने भविष्य निर्वाह निधीच्या

रक्कमांची योग्य गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

DATSKKM8001 (Ref No : 59, Hmm No : 43)

9 आवश्यक शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण नसताना पदोन्नती दिलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

विभागातील निवडक सेवापुस्तकांची तपासणी केली असता खाली नमूद चतुर्थश्रेणी वर्ग 4 कर्मचाऱ्यांना आवश्यक शैक्षणिक अर्हता संगकण अर्हता, टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण, LSGD / LGS उत्तीर्ण नसताना वर्ग 3 लिपीक पदी पदोन्नती दिलेचे दिसून येते.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरीक्षणामध्ये आस्थापना विभागाकडील चाचणीदाखल काही निवडक कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांची तपासणी केली असता, आवश्यक शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण नसतांना पदोन्नती दिलेबाबत आढळून आले, त्याबाबतचे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे.

1) सन 2019-2020 चे लेखापरीक्षणा दरम्यान आस्थापना विभागाकडील निवडक सेवापुस्तकांची तपासणी केली असता खाली नमूद चतुर्थश्रेणी वर्ग 4 कर्मचाऱ्यांना आवश्यक शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण नसताना वर्ग-3 लिपीक पदोन्नती दिलेचे दिसून येते. याबाबत खालील अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नांव	संगणक अर्हता उत्तीर्ण	टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण	LSGD/LGS उत्तीर्ण
1	प्रसाद बाळकृष्ण पळसुले	-	-	नाही
2	उज्वल विला कुरणे	नाही	नाही	नाही
3	गंगाधर शामराव लोखंडे	नाही	नाही	नाही

2) उपरोक्त उदाहरण दाखल नमूद कर्मचाऱ्यांना मे.कौन्सिल ठराव नं. 64 दि. 10.7.2008 , नियुक्ती आदेश

23.7.2008 नुसार वर्ग 3 लिपीक पदी पदोन्नती देणेत आली आहे, सदरच्या नियुक्ती आदेशातील नमूद अटीनुसार पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांनी संबंधित पदासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व शैक्षणिक अर्हता दोन वर्षाच्या कालावधीत प्राप्त करणे आवश्यक आहे, परंतू सदरच्या पदोन्नत कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली नाही. आवश्यक शैक्षणिक अर्हते अभावी व नियुक्ती आदेशातील अटींच्या पूर्ततेअभावी अशा कर्मचाऱ्यांची वेतनवाढ रोखणे आवश्यक होते, परंतू वरील कर्मचाऱ्यांची वेतनवाढ रोखलेली दिसून येत नाही.

3) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग प्रशीक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39 दिनांक 19.3.2003 नुसार दिनांक 19.3.2003 रोजी किंवा त्यानंतर गट अ, गट ब व गट क मधील ज्या पदाची निवड प्रक्रिया सुरु होईल अशा नव्याने नियुक्त होणाऱ्या गट अ ते गट क मधील सर्व शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील अशा प्रकारची अट अशा उमेदवारांच्या नियुक्ती पत्रात घालण्यात यावी अशी तरदूर आहे, तथापी अशा प्रकारची अट नियुक्तीपत्र आदशामध्ये घालणेत आली नसलेचे निदर्शनास येते.

4) परीपुर्ण नियुक्ती / पदोन्नती आदेश नसतांनाही ज्या कार्यालयात संबंधित कर्मचारी रुजू होणेसाठी हजर होणेसाठी झाले असता संबंधित कार्यालय प्रमुख यांनी नियुक्ती पत्रामध्ये शासन नियमातील अटीचा उल्लेख नसलेबाबत संबंधित कर्मचारी व नियुक्ती प्राधिकारी यांचे निदर्शनास आणून देवून सुधारित नियुक्ती आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही संबंधित कार्यालय प्रमुख यांनी केलेचे दिसून येत नाही.

5) शासन आदेशातील विहीत अटीनुसार ज्या कर्मचाऱ्यांनी दोन वर्षात संगणक हाताळणी अर्हता उत्तीर्ण केली नाही अशा सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांना सदरची अटी पुर्ण करत नसलेबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी शासन आदेशातील तरतुदीनुसार दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता पुर्ण केलेली नाही अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करणेबाबत नियुक्ती प्राधिकारी यांना प्रस्ताव सादर करणे ही जबाबदारी कार्यालय प्रमुख यांची असून त्यांनी अशा प्रकारे कार्यवाही केली नाही.

DATSKKM8001 (Ref No : 28, Hmm No : 27)

10 जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.बीसीस 2018/प्र.क्र.308/16ब दि.21.12.2019 नुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.8928/2015 अन्वये कार्यवाही करणेत आलेली नाही.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरीक्षणामध्ये लेखापरीक्षणात / बिंदूनामावलीची पडताळणी केली असता खालील कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्याप अप्राप्त असलेबाबत दिसून आले.

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नांव	पदनाम	नियुक्ती दिनांक	शेरा
1	डॉ. सुनिलदत्त गणेशराव संगेवार	आयु.वैद्यकिय अधिकारी	19.12.1997	कार्यरत
2	रामदास दामोदर जाधव	वाहन चालक	01.06.2004	से.नि.
3	पोपट बाबूराव भांगरे	वाहन चालक	25.05.2004	से.नि.
4	शिवाजी आणाप्पा जुजारी	वाहन चालक	07.06.1993	कार्यरत
5	सखाराम बापू कोळी	वीजतंत्री	12.04.1985	कार्यरत

याबाबत खालील अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1)उपरोक्त कर्मचारी हे ज्या पदावर कार्यरत आहेत, ती पदे आकृतीबंध आदेशातील तरतुदीनुसार अस्थायी स्वरुपातच मंजूर असलेने व आकृतीबंध आदेशातील तरतुदीनुसार अस्थायी पदावर नियुक्ती देता येत नसलेने, वरील तीनही कर्मचारी यांना अधिसंख्य ठरविणे व त्यांचे पदवर अ.ज. प्रवर्गातून सरळसेवेव्दारे पदभरती करणे या दोन्ही बाबीवर मा. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडून शासनाकडे शासन तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही अद्याप झाली नसले बाबत लेखापरीक्षणात आढळून आले आहे.

2) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.308/16 ब दि. 21.12.2019 नुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. 8928/2015 (चेअरमन अँड मॅनेजर डायरेक्टर एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि. 6.7.2017 रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही असा निर्णय आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ नागपूर यांनी रिट याचिका क्र. 3140/2008 मध्ये दि. 28.8.2009 च्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या

आदेशानुसार दि. 31.12.2019 पर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार उपरोक्त शासन निर्णयातील नियम क्र. 1 ते 6 नुसार कार्यवाही करुन पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

3) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.बीसीसी 2019/प्र.क्र.581/16 ब दि. 15.6.2020 नुसार अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना नियमित पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रमाणे आश्वासित प्रगती योजना, पदोन्नती, वार्षिक वेतनवाढ, सेवानिवृत्ती वेतन, कुटूंब सेवानिवृत्ती वेतन, अनुकंपा तत्वावरील नियुक्ती यासारखे व इतर सेवाविषयक लाभ देताना शासनाचे पुढील आदेशाशिवाय देण्यात येऊ नये.

DATSKKM8001 (Ref No : 35, Hmm No : 31)

11 कमाल टप्प्यावर वेतन निश्चिती न करता जादा वेतन अदा केले बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 सुधारित वेतन संरचनेत वार्षिक वेतन वाढ़ीच्या वेतनबँड मधील कमाल टप्प्याच्या पुढील रक्क़मेवर जात असलेस शासन निर्णय क्र.वेपुर /1210/प्र.क्र 124 /सेवा 9 दि.1.9.2015 नुसार कार्यवाही नाही.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरीक्षणामध्ये आस्थापना विभागाकडील सेवा पुस्तके व वेतन देयकांची पडताळणी केली असता त्यामध्ये कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतन वाढ़ी दिलेल्या आहेत त्याबाबत त्रुटी दिसून आल्या आहेत. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 सुधारित वेतन संरचनेत वार्षिक वेतन वाढ़ीच्या वेतनबँड मधील कमल टप्प्याच्या पुढील रक्क़मेवर जात असलेस शासन निर्णय क्र.वेपुर /1210 /प्र.क्र 124 /सेवा 9 ,दि. 1.9.2015 नुसार अश्या कर्मचाऱ्यांस वेतन, वेतनबँड मधील कमाल टप्प्यावर सिमित करण्यात यावे व कमाल टप्प्यावर 1 वर्षे वेतन घेतले नंतर अश्या कर्मचाऱ्यांस महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 मधील नियम 10 नुसार खालील परंतुका नुसार लगतचा उच्च वेतनबँड अनुदेय राहिल, असे आदेश असताना

खालील कर्मचाऱ्यांना कमाल टप्प्यावर वेतन अदा झालेले आहे.

तरी जादा झालेल्या वेतानाची आज अखेर परिगणना करुन रक्कम वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

कर्मचार्याचे नाव	कमाल टप्पा वेतन महिना	देय वेतन	दिलेले वेतन
श्री. बजरंग केरबा लोकरे, वॉर्ड सर्व्हंट	जुलै 2010	7440+1800	7450+1800
श्री. नारायण मारुती जाधव, शिपाई	जुलै 2008	7440+1800	7490+1800
श्री. कुमार तातोबा भाळगे	जुलै 2011	7440+1800	7430+1800
श्री. महावीर भालचंद्र कांबळे, वॉचमन	जुलै 2016	7440+1800	7580+1800

सदर कर्मचारी हे उदाहरण दाखल असून उर्वरित कर्मचाऱ्यांचे आपलेस्तरावर आढावा घेऊन त्यानुसार कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATSKKM8001 (Ref No : 40, Hmm No : 33)

12 मुख्याधिकारी यांचे निवृतीवेतन व प्रशासकीय खर्च भरणा न केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 2

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 75 प्रमाणे व महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा नियम 1981 मधील परिशिष्ठ 4 नुसार मुख्याधिकारी यांचे सेवापुस्तक नोंद घेणेसाठी संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचेकडे पाठविले नाही. अ वर्ग नागरपालीकासाठी प्रतीवर्षी रक्कम रुपये 11030/- प्रशासकीय खर्चाची रक्कम शासनाकडे भरणा करणे आवश्यक असतानाही त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरीक्षणामध्ये मुख्याधिकारी यांचे निवृत्ती वेतन व प्रशासकीय खर्च शासनास भरणा केलेला नाही. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 75 प्रमाणे व महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा नियम 1981 मधील परिशिष्ठ 4 नुसार तसेच नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचे परिपत्रक क्र.नपप्रस/कक्ष-1/न.प.खर्च प्रदान/2004 दिनांक 16.10.2004 अन्वये नगरपरिषदेनी त्यांच्या निधीतून मुख्याधिकारी सेवा खर्चाची वर्गणी यामध्ये रजावेतन वर्गणी, निवृत्तीवेतन वर्गणी व प्रशासकीय वर्गणी शासनास प्रदान करणे आवश्यक असताना मुख्याधिकारी सेवा खर्च रक्कम नगरपरिषदेने शासनास प्रदान केलेला नाही. मुख्याधिकारी यांचे निवृत्ती वेतन व रजा अंशदानाची रक्कम नगरपरिषदेने शासन कोषागारात भरून चलनासह संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांचेकडे मुख्याधिकारी यांचे सेवापुस्तकात नोंद घेणेसाठी पाठविणे आवश्यक आहे. परंतु सन 2019-2020 या कालावधीत सदर नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एमसीओ-1297/सीआर-40/97/नवी/14 दि. 10.12.1998 मधील अ.क्र.2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे 1500 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या अ वर्ग नगरपालिकांसाठी प्रतिवर्षी रक्कम रुपये 11030/- प्रशासकीय खर्चाची रक्कम शासनाकडे भरणा करणे आवश्यक असतानाही सन 2019-2020 मध्ये रक्कम रुपये 11030/- शासनाकडे भरणा केलेला नाही. तरी याबाबत नोंदवही ठेऊन मागील सर्व मुख्याधिकारी यांचे निवृत्ती वेतन, रजा वेतन अंशदानाची रक्कम तसेच प्रशासकीय खर्चाची रक्कम भरणा केल्याच्या सर्व नोंदी घेऊन नोंदवही अद्यावत करून अनुपालन सदर करावे.

DATSKKM8001 (Ref No : 44, Hmm No : 35)

13 इचलकरंजी नगरपालीके कडील कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती मुळे जादा वेतन अदा झाले बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक वेपुर 1209/प्र.क्र.69/सेवा-9 दिनांक 5.5.2010 अन्वये कार्यवाही न केले बाबत.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरीक्षणामध्ये अस्थापना विभागाकडील सेवा पुस्तके व् वेतन देयकांची पडताळणी केली असता त्यामधे कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतन वाढी दिलेल्या आहेत त्याबाबत त्रुटी दिसून आल्या आहेत. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 सुधारित वेतन संरचनेत वेतनवाढीची परिगणना करताना रक्कम पुढील 10 च्या पटीत घेण्यासंधार्भात महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक वेपुर 1209/प्र.क्र.69/सेवा-9 दिनांक 5.5.2010 मध्ये 2.5 मध्ये खुलासा करण्यात आला आहे.

सुधारित वेतन संरचनेत वेतनबँड मधील वेतन व ग्रेड वेतनावर 3% दराने वेतनवाढ देण्याची तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम 2009 मधील नियम 9 मध्ये आहे. सदर 3% रक्कम पुढील 10 च्या पटीत घेण्यात येते.

वेतन वाढीची परीगणना करताना 3% रक्कम 10 च्या पटीत घेताना एक रुपया व त्या पेक्षा अधिक रक्कम पुढील दहाच्या पटीत घेण्यात यावी, मात्र 99 पैसे व् त्यापेक्षा कमी पैसे दुर्लक्षित करण्यात यावेत. असे नमूद आहे.

असे आदेश असताना खालील कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या वेतन निश्चिती मुळे जादा वेतन अदा झाले आहे.

तरी जादा झालेल्या वेतानाची आज अखेर परिगणना करुन रक्कम वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

कर्मचार्याचे नाव	कमाल टपप् वेतन महिना	देय वेतन	दिलेले वेतन
श्री. महेश सुभाष पांडव	जुलै 2006	7930+2400	7940+2400
श्री. गौतम सुखदेव कांबळे	जुलै 2006	7050+1900	7060+1900

सदर कर्मचारी हे उदाहरण दाखल असून उर्वरित कर्मचाऱ्यांचे आपलेस्तरावर आढावा घेऊन त्यानुसार कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATSKKM8001 (Ref No : 51, Hmm No : 38)

14 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 9,10,13,14,16,18,21,22,23,24 व 25 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे खर्चातील अनियमितता.(14 वा वित्त आयोग घनकचरा व्यवस्थापन)

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 4

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 111892802.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 88400.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 111804402.00/-

एकाच प्रशासकीय मान्यतेने मंजूर केलेल्या कामासाठी एकच ई निविदा मागविणे आवश्यक असताना एकाच कामासाठी वेगवेगळ्या निविदा मागविणेत आल्या आहेत. अपात्र निविदा धारकांना कामाचा मक्ता देणेत आला आहे. करारनामा कमी रकमेच्या मुद्रांकावर करणेत आला आहे. निविदेतील अटी व शर्तीचे पालन केले नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे या कामावर एकूण र. रु. 111892802 खर्च केलेचे दिसून येते. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 56 दि. 16/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

न.पा. इचलकरंजी येथे एकूण 26 वार्ड असून त्यापैकी 11 वार्ड ची रस्ते व गटर सफाई ही मक्तेदाराकडून करून घेतली आहे व उर्वरित वार्ड ची सफाई न.पा. च्या सफाई कर्मचा-यांकडून करून घेतली आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.

1)घनकचरा व्यवस्थापन शासन निर्णय दि.26.10.2006 च्या परि.क्र.21 नुसार सर्व प्रभागासाठी व कचरा प्रकीयासाठी एकच निवीदा देवून त्यातून बहुव्याप्त कंपनीस कंत्राट दिले असते तर घनकचरा व्यवस्थापनावर नगरपरिषदेचे संनियंत्रण योग्य रितीने झाले असते. तथापी वरीलप्रमाणे वार्ड निहाय वेगवेगळी निवीदा,वेगवेगळे मक्तेदार, अल्प कालावधीसाठी कामाचे आदेश व कचरा प्रकीयेसाठी वेगळे मक्तेदार व मक्तेदारांना देण्यात आलेल्या मुदतवाढी याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात यावे. तसेच निविदा प्रसिद्ध करताना ठेकेदाराचा वर्ग नमूद केला नाही. त्यामुळे पात्र निविदा धारकांनीच निविदा भरलेची खात्री करता येत नाही.

2)या साफसफाई कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी रस्ते व गटर ची मापे ही आरोग्य निरीक्षक यांच्या अहवालावरून घेतली आहेत, वास्तविक सदर मापे ही बांधकाम अभियंता यांनी घेऊन अंदाजपत्रक तयार करणे

आवश्यक होते. त्यामुळे सदर रस्ते व गटर ची मापे तसेच अंदाजपत्रक योग्य असलेची खात्री पटत नाही.

3)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार रु. 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे तसेच 50 लक्ष वरील अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राष्ट्रीय स्तरावरील दैनिक प्रकाशन, राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

A)नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 9,18,24 व 25 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे खर्चातील अनियमिततेबाबत.

1	कामाचे नाव	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 9,18,24 व 25 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे
2	लेखाशिर्ष	14 वा वित्त आयोग
3	अंदाजपत्रकीय तरतूद	18666118
4	प्रशासकीय मान्यता	जिल्हाधिकारी कार्यालय क्रमांक कार्या-11/नपा/एस.आर/730इ/18 दि.15-10-2018 रक्कम रुपये - 18666118
5	तांत्रिक मंजूरी	तांत्रिक मान्यता घेणेत आली नाही.
7	कौन्सील ठराव	106/29.8.18

वरील तपशिलानुसार शहरातील 4 वॉर्ड साठी एकाच वेळी कौन्सील ठरावाने अंदाजपत्रकास मंजुरी घेणेत आली असून मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांची प्रशासकीय मान्यता देखील घेणेत आली आहे. मात्र सदर कामासाठी एकाच प्रशासकीय मान्यतेची एकच निविदा काढणे आवश्यक असताना 4 वार्ड साठी नियमबाह्यपणे 4 वेगवेगळ्या निविदा काढलेल्या आहेत.

<u>अ) वार्ड क्र. 9 ची निविदा प्रक्रिया-</u>

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 9 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका

		कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	5053852
3	निविदा प्रकिया	निविदा प्रकाशित करणे दि. 20.10.2018 निविदा उघडणे दि. 13.11.2018
4	मंजूर निविदा	एकनाथ य. पाथरवट अंदाजपत्रकीय दराने
5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 171 दि. 26.11.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 30/11/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1)शिवाजी सी. धुमाळ - 5% जादा दराने 2)एकनाथ य. पाथरवट - अंदाजपत्रकीय दराने 3) अनिल आ. शिंदे - 10% जादा दराने

1)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 36 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांची व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या खालील तपशिलानुसार आवश्यकतेपेक्षा कमी असलेचे दिसून येते, असे असताना कशाच्या आधारे मक्तेदारास पात्र समजून कामाचा ठेका देणेत आला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
1	शिवाजी सी. धुमाळ	9	36
2	एकनाथ य. पाथरवट	5	36
3	अनिल आ. शिंदे	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	36

2)अनिल आ. शिंदे यांचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

3)सदर कामास कौन्सिल सभा क्र. 3 ठराव क्र. 94 दि. 2.8.2019 अन्वये 1 वर्षाची मुदतवाढ दणेत आली असून या ठरावमध्ये सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी घेणेबाबत निर्देश देणेत आले आहेत. तथापि सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी न घेताच केलेने दि. 1.12.2019 ते 31.3.2019

पर्यंतचा खर्च लेखापरीक्षाणामध्ये मान्य करता येत नाही.

ब) वार्ड क्र. 18 ची निविदा प्रक्रिया

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 18(अंशतः) मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	3360473
3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 20.10.2018 निविदा उघडणे दि. 13.11.2018
4	मंजूर निविदा	एकनाथ य. पाथरवट अंदाजपत्रकीय दराने
5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 171 दि. 26.11.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 30/11/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1)राहुल रो. गायकवाड - अंदाजपत्रकीय दराने 2) संतोष भू. मोने - 1% जादा दराने 3) अनिल न. शिकलगार - 8% जादा दराने

1)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 36 कर्मचारी आवश्यक असताना वरील तीनही मक्तेदारांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही त्यामुळे वरील पात्र मक्तेदाराकडे आवश्यक कामगार संख्या असल्याची खात्री करता आली नाही.

2)राहुल रो. गायकवाड, संतोष भू. मोने, अनिल न. शिकलगार यांचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

3)सदर कामास कौन्सिल सभा क्र. 3 ठराव क्र. 94 दि. 2.8.2019 अन्वये 1 वर्षाची मुदतवाढ दणेत आली असून या ठरावमध्ये सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी घेणेबाबत निर्देश देणेत आले आहेत.

तथापि सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी न घेताच केलेने दि. 1.12.2019 ते 31.3.2019 पर्यंतचा खर्च लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

क) <u>वार्ड क्र. 24 ची निविदा प्रक्रिया-</u>

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 24 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	5376203
3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 20.10.2018 निविदा उघडणे दि. 13.11.2018
4	मंजूर निविदा	एकनाथ य. पाथरवट - अंदाजपत्रकीय दराने
5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 171 दि. 26.11.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 30/11/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1)अनिल आ. शिंदे - - 5% जादा दराने 2) शिवाजी सी. धुमाळ - 5% जादा दराने 3) एकनाथ य. पाथरवट - अंदाजपत्रकीय दराने

1)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 33 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांची वरील मक्तेदारांची व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या खालील तपशिलानुसार आवश्यकतेपेक्षा कमी असलेचे दिसून येते, असे असताना कशाच्या आधारे मक्तेदारास पात्र समजून कामाचा ठेका देणेत आला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
1	अनिल आ. शिंदे	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	33
2	शिवाजी सी. धुमाळ	27	33
3	एकनाथ य. पाथरवट	5	33

3)शिवाजी सिद्धू धुमाळ यांचे PWD कडील मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्रानुसार रु. 10 लाख पर्यंतची कामे करण्याची मंजुरी असताना रु. 10 लाखावरील कामे दिली आहेत. अनिल आ. शिंदे यांचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

6)सदर कामास कौन्सिल सभा क्र. 3 ठराव क्र. 94 दि. 2.8.2019 अन्वये 1 वर्षाची मुदतवाढ दणेत आली असून या ठरावमध्ये सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी घेणेबाबत निर्देश देणेत आले आहेत. तथापि सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी न घेताच केलेने दि. 1.12.2019 ते 31.3.2019 पर्यंतचा खर्च लेखापरीक्षाणामध्ये मान्य करता येत नाही.

ड) वार्ड क्र. 25 ची निविदा प्रक्रिया-

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 25 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	4875550
3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 20.10.2018 निविदा उघडणे दि. 13.11.2018
4	मंजूर निविदा	शिवाजी सी. धुमाळ - अंदाजपत्रकीय दराने

5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 171 दि. 26.11.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 30/11/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1) शिवाजी सी. धुमाळ अंदाजपत्रकीय दराने 2)अनिल आ. शिंदे - 10% जादा दराने 3) एकनाथ य. पाथरवट - 5% जादा दराने 4)अनिल न. शिकलगार - 10% जादा दराने

2)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 36 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांची व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या खालील तपशिलानुसार आवश्यकतेपेक्षा कमी असलेचे दिसून येते. असे असताना कशाच्या आधारे मक्तेदारास पात्र समजून कामाचा ठेका देणेत आला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
1	शिवाजी सी. धुमाळ	27	36
2	अनिल आ. शिंदे	व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र नाही	36
3	एकनाथ य. पाथरवट	5	36
4	अनिल न. शिकलगार	व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र नाही	36

1)शिवाजी सिद्धू धुमाळ यांचे PWD कडील मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्रानुसार रु. 10 लाख पर्यंतची कामे करण्याची मंजुरी असताना रु. 4875550 रकमेची कामे दिली आहेत. यारून अपात्र मक्तेदाराची निविदा मंजूर केलेचे दिसून येते.

2)अनिल आ. शिंदे यांचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नाही.

3)सदर कामास कौन्सिल सभा क्र. 3 ठराव क्र. 94 दि. 2.8.2019 अन्वये 1 वर्षाची मुदतवाढ दणेत आली असून

या ठरावमध्ये सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी घेणेबाबत निर्देश देणेत आले आहेत. तथापि सदर खर्चास मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मंजुरी न घेताच केलेने दि. 1.12.2019 ते 31.3.2019 पर्यंतचा खर्च लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

B)नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 14 व 16 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे खर्चातील अनियमिततेबाबत.

1	कामाचे नाव	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 14 व 16 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे
2	लेखाशिर्ष	14 वा वित्त आयोग
3	अंदाजपत्रकीय तरतूद	8408118
4	प्रशासकीय मान्यता	जिल्हाधिकारी कार्यालय क्रमांक कार्या-11/नपा/आर.आर/364/इ/19 दि.1-9-2019 रक्कम रुपये - 8408118
5	तांत्रिक मंजूरी	तांत्रिक मान्यता घेणेत आली नाही.
7	कौन्सील ठराव	43/29.6.19

वरील तपशिलानुसार शहरातील 2 वॉर्ड साठी एकाच वेळी कौन्सील ठरावाने अंदाजपत्रकास मंजुरी घेणेत आली असून मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांची प्रशासकीय मान्यता देखील घेणेत आली आहे. मात्र सदर कामासाठी एकाच प्रशासकीय मान्यतेची एकच निविदा काढणे आवश्यक असताना 4 वार्ड साठी नियमबाह्यपणे 2 वेगवेगळ्या निविदा काढलेल्या आहेत.

अ) <u>वार्ड क्र.</u> 14 <u>ची निविदा प्रक्रिया-</u>

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 14 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	3393520

3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 31.8.2019 निविदा उघडणे दि. 09.09.2019
4	मंजूर निविदा	गणेश ब. चोळके - अंदाजपत्रकीय दराने
5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 68 दि. 11.09.2019
6	कार्यारंभ आदेश	दि. 31/10/2019
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1) गणेश ब. चोळके अंदाजपत्रकीय दराने 2)मनिष म. मेटे - 5% जादा दराने 3) मुरग्याप्पा भी. पाटील 8% जादा दराने

1)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 36 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांची व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या खालील तपशिलानुसार आवश्यकतेपेक्षा कमी असलेचे दिसून येते. असे असताना कशाच्या आधारे मक्तेदारास पात्र समजून कामाचा ठेका देणेत आला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
1	गणेश ब. चोळके	05	19
2	मनिष म. मेटे	05	19
3	मुरग्याप्पा भी. पाटील	व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र नाही	19

2)श्री मेटे यांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दि. 27.1.2018 रोजी संपलेली असल्याने ते निविदा भरण्यास पात्र ठरत नाहीत. तसेच मुरग्याप्पा भी. पाटील यांचे व्यवसाय नोदणी व मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नाही

ब) वार्ड क्र. 1 6 ची निविदा प्रक्रिया-

1	8	कामाचे नाव.	वार्ड क्र. 16 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2		अंदाजपत्रकीय रक्कम	5014198(आवश्यक कर्मचारी)
3		निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 31.8.2019 निविदा उघडणे दि. 09.09.2019
4	10	मंजूर निविदा	मनिष म मेटे - अंदाजपत्रकीय दराने
5	11	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 68 दि. 11.09.2019
6	12	कार्यारंभ आदेश	दि. 31/10/2019
7	13		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1) गणेश ब. चोळके 7% जादा दराने 2)मनिष म. मेटे - अंदाजपत्रकीय दराने 3) मुरग्याप्पा भी. पाटील 5% जादा दराने

2)करारपत्रातील अट क्र. 8 नुसार सदर कामासाठी 28 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांची व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या खालील तपशिलानुसार आवश्यकतेपेक्षा कमी असलेचे दिसून येते. असे असताना कशाच्या आधारे मक्तेदारास पात्र समजून कामाचा ठेका देणेत आला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या अंदाजपत्रकाप्रमाणे	आवश्यक संख्या करारपत्रानुसार
1	गणेश ब. चोळके	05	28	28

2	मनिष म. मेटे	05	28	28
3	मुरग्याप्पा भी. पाटील	व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र नाही	28	28

3)श्री मेटे यांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दि. 27.1.2018 रोजी संपलेली असल्याने ते निविदा भरण्यास पात्र ठरत नाहीत. तसेच मुरग्याप्पा भी. पाटील यांचे व्यवसाय नोदणी व मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नाही

C)नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 10,13,21,22 व 23 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे खर्चातील अनियमिततेबाबत.

1	कामाचे नाव	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 10, 13,21 ,22 व 23 मधील रस्ते व गटारी सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.प. ने सुचविलेले ठिकाणी जमा करणे
2	लेखाशिर्ष	14 वा वित्त आयोग
3	अंदाजपत्रकीय तरतूद	26018548
4	प्रशासकीय मान्यता	जिल्हाधिकारी कार्यालय क्रमांक कार्या-11/नपा/एस.आर/49/इ/18 दि.28-6-2018 रक्कम रुपये - 26018548
5	तांत्रिक मंजूरी	तांत्रिक मान्यता घेणेत आली नाही.
7	कौन्सील ठराव	6/31.5.18

वरील तपशिलानुसार शहरातील 5 वॉर्ड साठी एकाच वेळी कौन्सील ठरावाने अंदाजपत्रकास मंजुरी घेणेत आली असून मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांची प्रशासकीय मान्यता देखील घेणेत आली आहे. मात्र सदर कामासाठी एकाच प्रशासकीय मान्यतेची एकच निविदा काढणे आवश्यक असताना 5 वार्ड साठी नियमबाह्यपणे 5 वेगवेगळ्या निविदा काढलेल्या आहेत.

अ) <u>वार्ड क्र. 10 ची निविदा प्रक्रिया-</u>

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 10 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा.

		ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	6395640
3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 7.7.2018 निविदा उघडणे दि. 26.07.2018
4	मंजूर निविदा	संतोष भू. मोने अंदाजपत्रकीय दराने
5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 108 दि. 18.08.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 31/08/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 2)राहुल रो गायकवाड - 3.10% जादा दराने 3)अनिल न. शिकलगार 2% जादा दराने 3)संतोष भू. मोने अंदाजपत्रकीय दराने

1)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 41 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांची व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या खालील तपशिलानुसार आवश्यकतेपेक्षा कमी असलेचे दिसून येते. असे असताना कशाच्या आधारे मक्तेदारास पात्र समजून कामाचा ठेका देणेत आला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
1	राहुल रो गायकवाड	05	41
2	संतोष भू. मोने	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	41
3	अनिल न. शिकलगार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	41

2) संतोष भू. मोने व अनिल न. शिकलगार यांचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नाही.

ब) वार्ड क्र. 13 ची निविदा प्रक्रिया-

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 13 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	5822445
3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 7.7.2018 निविदा उघडणे दि. 26.07.2018
4	मंजूर निविदा	अनिल आ. शिंदे - अंदाजपत्रकीय दराने
5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 108 दि. 18.08.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 31/08/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1)संतोष भू. मोने 7% जादा दराने 2) अनिल आ. शिंदे - अंदाजपत्रकीय दराने 3) राहुल गायकवाड 10% जादा दराने

2) करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 36 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नसल्यामुळे त्यांच्याकडे आवश्यक मनुष्यबळ असल्याची खात्री करता आली नाही.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
2	अनिल आ. शिंदे	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	36
3	संतोष भू. मोने	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	36

4	राहुल गायकवाड	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	36

क) वार्ड क्र. 21 ची निविदा प्रक्रिया-

8	कामाचे नाव.	वार्ड क्र. 21 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
	अंदाजपत्रकीय रक्कम	4841268
	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 7.7.2018 निविदा उघडणे दि. 26.07.2018
10	मंजूर निविदा	अनिल न. शिकलगार - अंदाजपत्रकीय दराने
11	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 108 दि. 18.08.2018
12	कार्यारंभ आदेश	दि. 31/08/2018
13		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1)संतोष भू. मोने 2.5% जादा दराने 2) अनिल न. शिकलगार - अंदाजपत्रकीय दराने 3) राहुल गायकवाड 5% जादा दराने

1)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 36 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नसल्यामुळे त्यांच्याकडे आवश्यक मनुष्यबळ असल्याची खात्री करता आली नाही.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
2	अनिल आ. शिंदे	व्यवसाय नोंदणी	29

		प्रमाणपत्र नाही.	
3	संतोष भू. मोने	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	29
4	राहुल गायकवाड	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	29

2)मक्तेदार विठठल रा. जाधव यांनी सदर कामाची निविदा भरली असून त्यांना सदर कामाचा अनुभव नसल्याने अपात्र ठरविले आहे. परंतु निविदा नस्तीसोबत न.प. इचलकरंजी आरोग्य विभाग आरोग्य अधिकारी यांचे दि. 20.9.2017 च्या पत्रानुसार(नस्ती पान क्र. 46) दि. 11.2.2014 ते 30.9.2015 एकूण 19 महिने व न.प. जयसिंगपूर मु.अ. यांचे दि. 29.9.2017 (नस्ती पान क्र. 47) अन्वये 2.6.2015 ते 31.6.2016 एकूण 11 महिने असे एकूण 30 महिने म्हणजे अडीच वर्षाचा अनुभव असताना सदर मक्तेदारास कामचा अनुभव नाही असे म्हणून अपात्र ठरविले आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया मान्य होत नाही.

ड) वार्ड क्र. 22 ची निविदा प्रक्रिया-

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 22 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	5149160
3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 7.7.2018 निविदा उघडणे दि. 26.07.2018
4	मंजूर निविदा	राहुल रो गायकवाड - अंदाजपत्रकीय दराने
5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 108 दि. 18.08.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 31/08/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1) संतोष भू. मोने 8% जादा दराने

		2)राहुल रो गायकवाड - अंदाजपत्रकीय दराने 3)अनिल न. शिकलगार 4% जादा दराने

2)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 36 कर्मचारी आवश्यक असताना वरील मक्तेदारांची व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या खालील तपशिलानुसार आवश्यकतेपेक्षा कमी असलेचे दिसून येते.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
1	विठठल आ. जाधव	05	19
2	राहुल रो गायकवाड	05	19
3	संतोष भू. मोने	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	19
4	अनिल न. शिकलगार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	19

3) संतोष भू. मोने व अनिल न. शिकलगार यांचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नाही.

इ) वार्ड क्र. 23 ची निविदा प्रक्रिया-

1	कामाचे नाव.	वार्ड क्र. 22 मधील रस्ते व गटर सफाई करून जमा झालेला ओला व सुका कचरा विलगीकरण करून न.पा. ने सुचविलेल्या ठिकाणी जमा करणे
2	अंदाजपत्रकीय रक्कम	3810035
3	निविदा प्रक्रिया	निविदा प्रकाशित करणे दि. 7.7.2018 निविदा उघडणे दि. 26.07.2018
4	मंजूर निविदा	शिवाजी सि. धुमाळ अंदाजपत्रकीय दराने

5	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 108 दि. 18.08.2018
6	कार्यारंभ आदेश	दि. 31/08/2018
7		3 निविदा लिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 3 निविदा 1) शिवाजी सि. धुमाळ अंदाजपत्रकीय दराने 2)राहुल रो गायकवाड - 5% जादा दराने 3) संतोष भू. मोने 5% जादा दराने

1)करारपत्रातील अट क्र. 9 नुसार सदर कामासाठी 25 कर्मचारी आवश्यक असताना काही मक्तेदारांचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत नाहीत त्यामुळे त्यांच्याकडे आवश्यक मनुष्यबळ असल्याची खात्री करता आली नाही.

अक्र.	मक्तेदार	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रानुसार कामगार संख्या	प्रत्यक्ष आवश्यक संख्या
1	शिवाजी सि. धुमाळ	27	25
2	राहुल रो गायकवाड	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	25
3	संतोष भू. मोने	व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र नाही.	25

2) शिवाजी सि. धुमाळ संतोष भू. मोने व राहुल रो गायकवाड यांचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र नाही.

वरील सर्व निविदा प्रक्रियेमध्ये खालील त्रुटी असल्याचे दिसून येते.

1)सदर निविदेतील अट क्र. क(9) व करारपत्रातील अट क्र. 9 नुसार मक्तेदाराने साफसफाई च्या कामावर नियुक्त असलेल्या कर्माच्या-यांची दैनंदिन हजेरी आरोग्य निरीक्षक यानी घेणे आवश्यक असून सदर हजेरी नोंदवही देयकासोबत तपासणीस सादर करणे आवश्यक आहे. तथापी वारंवार मागणी करून देखील सदर हजेरी नोंदवही लेखापरिक्षणास सादर केली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष कामावर किती कर्मचारी उपस्थित होते याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2)सदर निविदेतील अट क्र. क(3) व करारपत्रातील अट क्र. 3 नुसार मक्तेदाराने सफाई केलेबाबत वार्ड निहाय प्रत्येक महिन्याचे स्वखर्चाने नोंदवही ठेवणेची आहे. तसेच नोंदवही सोबत वार्डातील 30 कुटुंबातील प्रमुख व्यक्तींची प्रत्येक आठवड्यातून एकदा सही घेवून नागरिक कामाबाबत समाधानी असलेबाबत चा अहवाल

संबंधित वार्ड चे आरोग्य निरीक्षक यांचेमार्फत प्रत्येक महिन्याचे 5 तारखेचा आत कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक असून त्याशिवाय देयक अदा करता येणार नाही. परंतु प्रत्यक्षात एकाही देयकासोबत असा अहवाल जोडल्याचे दिसून येत नाही.

3)घनकचरा व्यवस्थापनावर 14 वा वित्त आयोगाअंतर्गत खर्च पडलेला आहे. परंतू त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास पाठविणे आवश्यक आहे.

4)वरील सर्व कामांचा करारनामा करतेवेळी खालील तपशिलानुसार कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केलेचे दिसून येते. प्रथम कारानामा करतेवेळी रु. 100 व सदर कामास कौन्सिल सभा क्र. 3 ठराव क्र. 94 दि. 2.8.2019 अन्वये 1 वर्षाची मुदतवाढ दणेत आली असून मुदतवाढ दिलेनंतर र. रु. 500 च्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 महाराष्ट्र स्टॅप ॲकट (Amendment) मधील परिच्छेद क्र.34 नुसार केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे असून खालील तपशिलान्वये प्रथम कमी मुद्रांक वसूल केलेचे दिसून येते. तरी र. रु. 88400 वसूल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

अक्र	वार्ड नं.	मक्तेदार	अंदाजपत्रकीय रक्कम	प्रथम करारनामा वेळी कमी वसूल मुद्रांक र.	मुदतवाढ दिलेनंतर वसूल करावयाचे मुद्रांक र.
1	9	एकनाथ पाथरवट	5053852	4500	4100
2	10	संतोष माने	6395640	5800	5400
3	13	अनिल आ. शिंदे	5822445	5300	4900
4	14	गणेश ब. चोळके	3393520	2800	2400
5	16	मनीष मेटे	5014198	3900	3500
6	18	एकनाथ पाथरवट	3360473	2800	2400

7	21	अनिल अ. शिकलगार	4841268	4300	3900
8	22	राहुल रो गायकवाड	5149160	4600	4200
9	23	शिवाजी सी. धुमाळ	3810035	3300	2900
10	24	एकनाथ पाथरवट	5376203	4800	4400
11	25	शिवाजी सी. धुमाळ	4875550	4300	3900
		एकूण		46400	42000
		एकूण कमी वसूल मुद्रांक र. 88400			

वरील त्रुटी पूर्ततेअभावी र. रु. 88400 अंतिम अमान्य व र. रु. 111804402 तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 52, Hmm No : 59)

15 प्राथमिक शाळेसाठी स्मार्ट टीव्ही खरेदीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 4

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 868400.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 868000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

मुद्रांक कमी रकमेचा घेतला आहे. शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग करुन डीबीटीव्दारे शाळेस वर्ग करण्यात आली आहे. आयकर, कपातीची चलने लेखापरिक्षणात उपलब्ध झाली नाहीत.

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात प्राथमिक शाळेसाठी स्मार्ट टीव्ही खरेदीबाबत अर्धसमासपत्र क्रं. 116 दिनांक 25/03/2021 अन्वये निर्गमित करण्यात आले होते त्यानुसार त्यास अनुपालन प्राप्त झाले नाही.

इचलकरंजी नगरपरिषदकडील सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या शाळेसाठी 10 नग स्मार्ट टीव्ही व पाचवी ते आठवीपर्यंतच्या शाळेसाठी 10 नग स्मार्ट टीव्ही खरेदी करण्यात आले आहे. न.पा. कडील स्थायी समिती ठराव क्रं. 27 दिनांक 24/6/2019 अन्वये शाळा व्यवस्थापन समितीकडे रक्कम रुपये 868400/- वर्ग करण्यात आले आहे. GEM Portal चे दर जादा असल्याने बाजार भावातील दरानुसार कोटेशन मागविण्यात आली होती त्याचा तपशील खालीलप्रमाणे

पुरवठादार	1 लीते 4 थी	5 वीते 8 वी
पॅनगुरु सिस्टीम पुणे	49475	51400
महालक्ष्मी एंटरप्रायजेस कोल्हापूर	42250	44590
मुक्ती ई सिस्टीम सातारा	49650	51650

वरील दरपत्रक पहाता महालक्ष्मी एंटरप्रायजेस यांचे दर कमी असल्याने मंजूरी देण्यात आली आहे. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)सदर कामाचे निविदा स्विकृतीनंतर मक्तेदाराकडुन करारनामा घेताना मुंबई अधिनियम 1958 व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार पहिल्या 10 लाखार्यंत रक्कम रुपये 500/- व पुढील प्रत्येक लाखाकरिता रुपये 100/- याप्रमाणे वसुल करणे आवश्यक असता ते वसुल करण्यात आले नाही. तरी वरील कामामध्ये रुपये 100/- चा करारनामा करण्यात आला असल्यामुळे संबंधिताकडुन रक्कम रुपये 400/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2)स्मार्ट टीव्ही करिता ई टेंडर पध्दत वापरणे आवश्यक असता दरपत्रक मागवुन खरेदी करण्यात आलेली आहे

3)वैयक्तीक लाभाच्या योजनेसाठी डीबीटीव्दारे राबविण्यात येते. शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग करण्यात आलेली रक्कम शाळांना डीबीटीव्दारे रक्कम वर्ग करण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात यावे.

4)शासकीय कपातीची आयकर, जीएसटीची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत ती उपलब्ध करुन लेखापरिक्षणास दाखवावी.

उपरोक्त पुर्ततेस्तव वसुलपात्र रक्कम रुपये 400/- व रक्कम रुपये 868000/- लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATABKF8401 (Ref No : 54, Hmm No : 73)

16 शहापूर होळकर चौक ते खंजिरे पेट्रोल पंप व परिसर केबल खुदाई चर डांबरी पॅचवर्क करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 4

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1017339.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 22791.00/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाची कार्यादेश नोंदवही ठेवनेत आलेली नाही. रॉयल्टी कमी वसूल करणेत आली आहे. 10% रॉयल्टीची रक्कम वसूल करणेत आलेली नाही.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागांतर्गत खालीलप्रमाणे खर्च करणेत आला आहे.

कामाचे नांव	शहापूर होळकर चौक ते खंजिरे पेट्रोल पंप व परिसर केबल खुदाई चर डांबरी पॅचवर्क करणे.
लेखाशिर्षक	रस्ता खुदाई
अंदाजपत्रकीय रक्कम	816085/-
प्रशासकीय मंजूरी	मे. कौन्सिल स.नं.244, दिनांक 28.01.2019
तांत्रिक मंजूरी	96/07.02.2019
निविदा प्रक्रिया	ई-निविदा

निविदा रक्कम रुपये	962980/-
मंजूर निविदा रक्कम रु.	7.53 टक्के जादा दराने
मक्तेदाराचे नांव	श्री.भगवान काम्बुरे
कामाचा आदेश	जा.क्र.बांध./ /2019,
काम सुरु दिनांक	NA
काम पुर्ण दिनांक	NA
कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तिका	1100-पान नं.61 ते 63, 66
कामावरील एकूण खर्च	1017339/-

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे,

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाची कार्यादेश नोंदवही ठेवून त्यामध्ये सर्व कामांचा तपशील, कंत्राटदाराचे नाव, कार्यादेश क्रमांक,काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक इ.संबंधी नोंदी असतील, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2)नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/ 43/ 05 दि.03/01/2006 (स्थायी निर्देश क्र.37) नुसार अभिकर्त्याकडून कार्य पार पडण्यासाठी विविध अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. अ.क्र.(7) नुसार कामाचे देयक अदा करण्यापूर्वी मुख्याधिकारी यांनी स्थळ निरीक्षण करून कामाची गुणवत्ता योग्य आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.तसेच तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली किंवा नाही याचीही खात्री करणे आवश्यक आहे. मोजणीबाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्यासमोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. अशी 10% तपासणी करतेवेळी जास्त रक्कमेच्या बाबींची मोजणी तपासनीस प्राधान्य द्यावे. अशी तरतूद असताना याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अ.क्र.(8) व (9) नुसार कामाची मोजमापे घेताना मोजणी पुस्तकांत स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद करावी त्याचप्रमाणे कामाच्या दर्जाबाबत पाहणी करतेवेळी व मोजमापे घेतेवेळी

लोकप्रतिनिधी,शहराचे प्रतिष्टीत नागरिक / सेवाभावी संस्थाचे प्रतिनिधी/ पत्रकार यांना सोबत ठेवावे व त्यांची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेण्यात यावी अशी तरतूद असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3)सदर कामाच्या बिलातून रॉयल्टी रक्कम रु.60227.8/- कपात करणेत आली असून प्रत्यक्षात रॉयल्टीची परिगणना केली असता ती रु.75472/- होत असलेने रक्कम रु.15244/- कमी वसूल झाली आहे. तरी उर्वरित रक्कम मक्तेदाराकडून वसूल करून शासन खाती जमा करणेत यावी.

Item	Volume per Cubic mt.	Total Work	Total Volume (cu.mt)	Royalty per Cubic mt.(Rs.)	Amount
HM	1	38.35	38.35	141.34	5420
Grade I	1.32	375.48	495.63		70052
एकूण					75472

4)मा.जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांचे खनिकर्म शाखेचे पत्र क्र. कार्या-6अ/आरआर/15/2016 दिनांक 25.11.2016 नुसार व शासनाकडील अधिसूचना क्र.MDF-015/CR 34/IND-9 Dated 01.09.2016 उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबईच्या कलम 2 अन्वये प्रचलित गौण खाणी खाण पट्टाधारक, परवानाधारक व कंत्राटदाराकडून स्वामित्व धन रकमेच्या 10% निधी खनिज विकास प्रतिष्ठान करिता वसूल करावयाची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही तरी 10% DMF ची रक्कम रु. 7547/- मक्तेदाराकडून वसूल करणेत यावी.

अ.क्र.	आकारण्यात आलेली रॉयल्टी रक्कम	10%DMF
1.	75472	7547

वरील पुर्ततेअभावी रक्कम 22791/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DATSSMM9501 (Ref No : 63, Hmm No : 81)

17 महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतून करण्यात आलेल्या गटर बांधकामातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020

अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1480473.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 32779.00/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाची कार्यादेश नोंदवही ठेवनेत आलेली नाही. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा करणेत आलेला आहे. सप्लाय ॲटमवर 5 टक्के शुगर एरिया ची रक्कम अदा करणेत आली आहे. M20 व M15 चा दर हा with scada देनेत आला असून scada चे रिपोर्ट लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात बांधकाम विभागांतर्गत खालीलप्रमाणे खर्च करणेत आला आहे.

कामाचे नांव	1)प्र.क्र.22 गोकुळ चौक आण्णा रामगोंडा शाळेजवळ गटर बांधणे. 2)प्र.क्र.9 गणपती मंदिर ते मोहिते घर हाफ राउंड गटर करणे. 3)प्र.क्र.14 राहील गोरे घर ते जमादार शेडपर्यंत आरसीसी गटर करणे.
लेखाशिर्षक	नगरोत्थान
अंदाजपत्रकीय रक्कम	1)256915/- 2)504790/- 3)870485/-
प्रशासकीय मंजूरी	1)क्र.कार्या.11/न.पा./आरआर/49/इ/17, दिनांक 30.11.2017 2) क्र.कार्या.11/न.पा./आरआर/272/इ/19, दिनांक 18.07.2019 3)जिल्हाधिकारी कार्यालय दिनांक 31.03.2017

तांत्रिक मंजूरी	1)जा.क्र.पापु/तां.मं./1 ते 37/2017, दिनांक 06.10.2017 2)154/12.06.2018 3)पापु/7/2017दिनांक 07/10/2016
निविदा प्रक्रिया	ई-निविदा
निविदा रक्कम रुपये	1)256915/- 2)480750/- 3)870485/-
मक्तेदाराचे नांव	1)शिवाजी सि.धुमाळ 2)अरुण देशिंगे 3)प्रिया चं.नाईक
कामाचा आदेश	1)09.05.2018 2)05.02.2020 3)24.01.2018
काम सुरु दिनांक	1)09.05.2018 2)05.02.2020 3)24.01.2018
काम पुर्ण दिनांक	1)04.07.2018 2)15.02.2020 3)05.03.2018
कामाची मुदत	1)60 दिवस 2)30 दिवस 3)60 दिवस
मोजमाप पुस्तिका	1)1096/14 2)93

	3)844/129 ते 132, 124 ते 126
कामावरील एकूण खर्च	1)140038/- 2)480434/- 3)860001/-

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे,

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाची कार्यादेश नोंदवही ठेवून त्यामध्ये सर्व कामांचा तपशील, कंत्राटदाराचे नाव, कार्यादेश क्रमांक,काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक इ.संबंधी नोंदी असतील, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2)महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु.500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे असून खालीलप्रमाणे कमी घेणेत आलेने उर्वरित मुद्रांकाची रक्कम रु. 800 वसूल करून शासन खाती भरणा करणेत यावी.

काम क्र.	अंदाजपत्रकीय रक्कम	करारनामा रु.	करारनामा करणे आवश्यक	तफावत
1.	256915	100	500	400
2.	870485	100	500	400
एकूण				800

3)नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/ 43/ 05 दि.03/01/2006 (स्थायी निर्देश क्र.37) नुसार अभिकर्त्याकडून कार्य पार पडण्यासाठी विविध अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. अ.क्र.(7) नुसार कामाचे देयक अदा करण्यापूर्वी मुख्याधिकारी यांनी स्थळ निरीक्षण करून कामाची गुणवत्ता योग्य आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.तसेच तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली किंवा नाही याचीही खात्री करणे आवश्यक आहे. मोजणीबाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्यासमोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. अशी 10% तपासणी करतेवेळी जास्त रक्कमेच्या बाबींची मोजणी तपासनीस प्राधान्य द्यावे. अशी तरतूद असताना याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अ.क्र.(8) व (9) नुसार कामाची मोजमापे घेताना मोजणी पुस्तकांत स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद करावी त्याचप्रमाणे कामाच्या दर्जाबाबत पाहणी करतेवेळी व मोजमापे घेतेवेळी

लोकप्रतिनिधी,शहराचे प्रतिष्टीत नागरिक / सेवाभावी संस्थाचे प्रतिनिधी/ पत्रकार यांना सोबत ठेवावे व त्यांची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेण्यात यावी अशी तरतूद असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4)दर पृथक्करण तपासले असता कामामध्ये वापरण्यात आलेल्या TMT FE-500 स्टील बार च्या दरामध्ये 5 टक्के SFA जादा देण्यात आला आहे. शासन निर्णय पीडब्ल्युआर/डीएसआर/1091/6577 प्लॅनिंग 3 दिनांक 8/7/2003 अन्वये जादा टक्के सप्लाय ॲटमवर 5 टक्के शुगर एरिया ची रक्कम आकारणी करता येत नाही. तरी पुढील रक्कम रु. 9195/- अंतिम अमान्य करणेत येत आहे.

काम क्र.	तपशील	वापर (mt)	5% SFA जादा दर(रु)	जादा अदा (रु)
1	TMT FE - 500 स्टील बार	0.882	2533	2234
3	TMT FE - 500 स्टील बार	2.748		6961
एकूण				9195

4) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात यावीत व काम पूर्ण झाल्यावरही तेथील परिसराची सुधारित छायाचित्रे घेण्यात यावी असे असतांनाही नस्तीत याप्रमाणे छायाचित्रे आढळली नाही यावरून सदर शासन निर्णयानुसार करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

5) लेखासंहिता नियम 172(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कामांच्या कांही बाबीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसा शेरा मोजमाप पुस्तकात नमूद करणे आवश्यक असता तशी कार्यवाही नाही.

6) नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देशक्रमांक 36 अनुसार काम सुरु होण्यापूर्वी साहित्य चाचणी अहवाल घेणे आवश्य़क असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही त्यामुळे झालेल्या कामाची सत्यता

लेखापरीक्षणामध्ये पडताळता आली नाही.

8)महाराष्ट्र न.प.लेखा संहिता 1971 नियम 176 नमुना नं.132 नुसार कमी जादा केलेल्या कामाचा मोजमापाचा गोषवारा देयका सोबत जोडलेला नाही.

9) सदर डांबरीकरण कामाकरिता डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बाबींना दिलेली अतिरिक्त लीड रक्कम रु. 26951/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नसून ती अमान्य करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्रं.	तपशील	लिड	काम	लीड वसुली
1	50 एमएम एमपीएम	3.78	1933.71	7309
2	BC grading I	268.57	68.20	18385
3	Tack coat	0.65	1933.71	1257
	एकूण			26951

वरीलप्रमाणे रक्कम रुपये 26951/- लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही ती वसुल करुन निधीत भरणा करुन पुर्तता दाखवावी.

10) सदर कामाचे अंदाजपत्रक DSR 2018-19 नुसार तयार करण्यात आलेले असून DSR 2018-19 मधील पान क्र.9 नुसार मक्तेदारानी कामगार विमा पॉलिसी सादर करणे आवश्यक राहील, सदर पॉलिसीची रक्कम मक्तेदारास अदा करणेत येईल. परंतु जर मक्तेदारानी अशी पॉलिसी काढली नाही तर संबंधित कार्यकारी अभियंता हे पॉलिसी काढतील आणि पॉलिसी खर्चाच्या दुप्पट रक्कम मक्तेदाराच्या पहिल्या देयकातून दंड म्हणून वसूल करण्यात येईल. अशी अट निविदेमध्ये असणे आवश्यक होते. मात्र याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.मक्तेदाराच्या देयकातून 8341/- असा 1% विमा कपात करण्यात आलेली असून वरील प्रमाणे मक्तेदाराकडून 2 पट रुपये 16682/- वसुल करणे आवश्यक आहे.

11) सदर कामाचे थर्केड पार्लेटी ऑडीट केलेले नाही.

12) संबंधित कामाची निविदा ही ई निविदा पध्दतीने राबविणेत आलेली एल1 निविदा ही पाकिजा कन्स्ट्रक्शन यांची 12.60% अधिकची निविदा मंजूर करुन वर्कऑर्डर देण्यात आली. परंतु नपा संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रं. 36 ब मधील मुद्दा निविदा मंजूरीखालील मुद्दा क्रं. 45 प्रमाणे नगरविकास विभागाकडुन शासन परिपत्रक क्रं. जीईएन/1093/2365/प्रक्र 126/93 नवी 14 दिनांक 20 ऑक्टोबर 1993 नुसार नपाच्या विविध कामासाठी निविदा मागविण्याच्या/ स्विकारण्याच्या संदर्भात कांही मार्गदर्शक सूचना परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा रकमेची असले तर त्या अंदापत्रकातील रकमेपेक्षा का जादा आहेत याचे बाबनिहाय परिक्षण करुन निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचनेचे काटेकोर पालन करणे बाबत निर्देशित केले आहे तसेच स्थायी निर्देश क्र. 36 मधील मुद्दा क्रं. 45 व 46 नुसार कार्यवाही केलेली नाही. असे असताना नपानी सदर निविदा ही 12.60टक्के जादा दराची निविदा मान्य केलेने अनावश्यक रककम रुपये 90503/- चा जादा खर्च शासन निधीवर पडलेला आहे सदर चा खर्च लेखापरीक्षणात मान्य करण्यात येत आहे.

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 1060283/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DGPDNSM8501 (Ref No : 133, Hmm No : 123)

24 घरफाळा व पाणीपट्टी वसुली करणे कामी 5 वाहने भाडेतत्वावर पुरविणे खर्चातील अनियामिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 405776.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 405776.00/-

निविदेस तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. निविदेस व्यापक प्रसिद्धी देणेत आली नाही, त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ घेता आला नाही. निविदाकाराची तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारी कागदपत्रे नसताना कशाच्या आधारे मक्तेदार निवड करण्यात आली हे स्पष्ट होत नाही. खर्चाची निविदा ही कार्यालयीन सुट्टी व्यतिरिक्त 5 वाहने भाडेतत्वावर पुरविणे अशी आहे. परंतु देयकाची तपासणी केली असता कार्यालयीन सुट्टीचे दिवस न वगळता प्रदान केलेचे दिसून येते. त्यामुळे मक्तेदारास जादा प्रदान झाले आहे.

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात वाहन विभागाकडील घरफाळा व पाणीपट्टी वसुली करणे कामी वाहन भाडयाने घेणे खर्चाची तपासणी केली असता खालील प्रमाणे खर्च केलेचे दिसून येते. यामधील अनियमितता बाबत अर्धसमापत्र क्र.36 दि.09/03/2021 देण्यात आले होते तथापि त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

अक्र	प्र.क्र./दिनांक	रक्कम	मक्तेदार	तपशिल
1	611/31.3.2020	405716	राहुल ज्ञा. रसाळ	दि. 1.2.2020 ते 27.3.2020 या कालावधीत घरफाळा व पाणीपट्टी वसुली करणे कामी 5 वाहनांचे भाडे.

याबाबत खालील अभिप्राय आहेत.

1)आयुक्त तथा नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्र. 36 दि. 29.12.2005 मधील बाब क्र. 09 नगरपरिषदेने निविदा मागविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी घेवून तांत्रिक मंजुरी घेतल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 72 अन्वये प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2)वरील खर्चासाठी खालील तीन मक्तेदारांनी निविदा भरल्या आहेत.

अक्र	नाव	रेट
1	राहुल ज्ञा. रसाळ	2.01% कमी दराने
2	शिवाजी एस. धुमाळ	3.50% जादा दराने
3	जोतीराम ल. बरगे	5.80% जादा दराने

3)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार रु. 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना वरील कामांमध्ये काही कामे 5 लाखाच्या वरील असून देखील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

4)दै. राष्ट्रगीत व दै. वार्ताशक्ती यामधील इ निविदा सूचना क्र. 1 नुसार मक्तेदार नोंदणीकृत / व्यावसायिक असणे आवश्यक आहे. परंतु वरील तीनही मक्तेदारांचे नोंदणी प्रमाणपत्र नाही. GST प्रमाणपत्र नस्तीसोबत

नाहीत. स्थायी निर्देश क्रं. 36 दिनांक 29 डिसेंबर 2005 मधील परिशिष्ठ ब मधील बाब क्रं. 15 मधील ब नुसार निविदाकाराची तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारी कागदपत्रे नसताना कशाच्या आधारे मक्तेदार निवड करण्यात आली हे स्पष्ट होत नाही.

5)नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्र.36 दि.29.12.2005 मधील सूचना क्रमांक 27(iv) नुसार कंत्राटदार नोंदणीकृत व आवश्यक असलेले सर्व परवाना धारक असावा. तथापि, नगरपरिषद लेखासंहिता, 2011 मधील नियम 466 (4) संलग्न परिशिष्ट 3 मधील मुद्दा क्र.13(घ) नुसार मक्तेदार हा संबधित कामांसाठी समर्थ ठरत नाहीत. असे असताना नियमबाह्यपणे सदर कामांच्या निविदा मंजूर करून देयके अदा करण्यात आली आहेत. यावरून सदर निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे दिसून येते.

6)न.पा. ने एकूण 5 वाहने भाड्याने घेतली असून त्यामध्ये क्वालीस व टाटा सुमो गाड्यांचा समावेश आहे. यासाठी प्रति वाहन रु. 3439 असे एका दिवसासाठी 5 वाहनासाठी र. रु. 17139 इतका खर्च केला आहे. कर वसुलीचे काम ॲटो रिक्षा द्वारे सुद्धा करता आले असते यावरून न.पा. ने वाहने भाड्याने घेताना वित्तीय औचीत्याच्या सूत्रांचा वापर केलेचे दिसून येत नाही. यावरून कर वसुलीसाठी नाहक खर्च केल्याचे दिसून येते. कर वसुलीसाठी एवढा खर्च करून किती कर वसुली झाली याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

7)सदर खर्चाची निविदा ही कार्यालयीन सुट्टी व्यतिरिक्त 5 वाहने भाडेतत्वावर पुरविणे अशी आहे. परंतु देयकाची तपासणी केली असता कार्यालयीन सुट्टीचे दिवस न वगळता प्रदान केलेचे दिसून येते. त्यामुळे मक्तेदारास जादा प्रदान झाले आहे. तपशील खालीलप्रमाणे.

अक्र	वाहन क्र.	कालावधी	एकूण दिवस(दिलेले)	देय दिवस	जादा अदा दिवस	जादा परिगणना रक्कम
1	MH09AQ469	1.2.19 ते 27.3.2020	47	36	11	37829
2	MH10C9403	1.2.19 ते 27.3.2020	48	36	12	41268
3	MH23H3786	1.2.19 ते 27.3.2020	47	36	11	37829
4	MH14P2950	1.2.19 ते 27.3.2020	47	36	11	37829

5	MH12EG7638	1.2.19 ते 27.3.2020	47	36	11	37829
		एकूण	236	180	56	192584

वरील तपशिलान्वये मक्तेदाराने बिलामध्ये एकूण जादा 56 दिवसांची परिगणना करून बिल मागणी केली आहे. वरील देयकाचे प्रदान करताना सार्वजनिक सुट्टीचे दिवस वजा केले नाहीत तसेच कोरोना प्रादुर्भावामुळे महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र शासन महसूल आणि वन, आपत्ती व्यवस्थापन विभाग मंत्रालय, मुबई यांचे सूचना पत्र नं. DMU/2020/CR.92/DisM-1, दि. 23/03/2020 अन्वये दि. 23.03.2020 अत्यावश्यक सेवा वगळता सर्वत्र लॉकडाउन जाहीर केले होते तरी माहे मार्च मध्ये दि. 27.3.2020 पर्यंतचे वाहन भाडे अदा केले आहे. त्यामुळे वरील तपशिलान्वये मक्तेदाराने एकूण 56 दिवसांचे र. रु. 192584 इतके जादा बिल मागणी केली आहे.

8)मक्तेदाराने दि. 27.23.2020 रोजी दि. 1.2.2020 ते 27.3.2020 या कालावधीचे एकूण र. रु. 825307 चे बिल सादर केले असून वरील प्रमाणकानुसार त्यांना र. रु. 405716 एवढीच म्हणजचे सादर केलेल्या देयकाच्या अर्धी रक्कम अदा केली आहे. तरी राहिलेले बिल र. रु. 405776 अदा करताना 56 दिवसांचे जादा परिगणना र. रु. 192584 व शासकीय कपाती वसूल करून उरलेली रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे.

9)सदर वाहनाचे लॉग बुक तपासणी केली असता आवश्यक असणारे सर्व रकाने भरलेले नाहीत. प्रवास कराणा-या अधिका-याचे / कर्माचा-याचे नाव व हुद्दा लिहिला नाही.

वरील अनियमिततेपोटी रक्कम र. 405716 लेखापरीक्षणामध्ये आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 77, Hmm No : 58)

25 एकत्रित करावरील रिबेटबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 341214.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 341214.00/-

एकत्रित करावर 1 टक्के रिबेट देणाऱ्या ठरावास अधिनियमाच्या तरतूदीच्या अधिन उपविधी व सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेवून राजपत्रात प्रसिध्दी न दिलेने रिबेट ही नियमबाहय ठरते. त्यामुळे 1 टक्के रिबेट

वसुल करणे आवश्यक आहे.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात एकत्रित करावरील वरील रिबेटबाबत अर्धसमास पत्र क्रं. 18, दिनांक 10/02/2021 अन्वये निर्गमित केले होते त्यास उत्तर सादर केलेले नाही.याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)कर विभागाकडील सन 2019-2020 मध्ये एकत्रित कर वसुली करताना 1 टक्के अशी एकूण रक्कम रु. 341214/- रिबेट देनेत आले आहे तरी संबंधित रिबेटबाबतचा कौन्सिल सभेचा ठराव व ठरावाचा दिनांक लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. अशी रिबेट देताना महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील प्रकरण 9 नगरपालिकेची कर आकारणी कलम 105 प्रमाणे (1) सक्तीचे व ऐच्छीक कर लादणे 1 व 2 मुद्यास अनुसरुन कलम 106 प्रमाणे सुट दिल्यामुळे करापासुन होणाऱ्या उत्पन्नातील तोटयाची शासनाने प्रतिपुर्ती करणे संदर्भात पध्दत विशद केलेली आहे. त्याप्रमाणे होणाऱ्या तृटीची रक्कम निश्चित करुन सदर रकमेची तुटी एवढया रकमेची प्रतिपुर्तीसाठी कार्यवाही करणे आवश्यक असता तशी कार्यवाही झालेली नाही.

तसेच उक्त अधिनियमातील कलम 108 व 108(A) प्रमाणे उपविधी तयार केलेनंतर त्यास कलम 109(ब) नुसार कलम 322 प्रमाणे उपविधीस जिल्हाधिकारीसो यांनी मंजूरी दिलेली उपविधी त्याने शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या तारखेपासून किंवा त्यात उल्लेख करण्यात येईल अशा त्यानंतरच्या इतर तारखेपासून अमलात येतील असा उल्लेख आहे.

तसेच अधिनियमातील कलम 322 (1) ते (4) प्रमाणे कार्यवाही होवून पुर्ण झालेनंतर त्यास कौन्सील ठरावानुसार 1 टक्के रिबेट संबंधित तारखेपासून देता येते अशी कार्यवाही न झालेने इचलकरंजी नपानी पाणीपट्टी वसुलीवर दिलेली 1 टक्के रिबेट ही पुर्वलक्षी प्रभावाने प्रत्येक मालमत्तेच्या परवाना प्राप्त नळधारकाकडुन रक्कम वसुलात आणुन नपा निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त अनियमिततेपोटी रक्कम रु. 341214/- आक्षेपाधीन ठेवनेत येत आहे.

DATSSMM9501 (Ref No : 89, Hmm No : 72)

26 सन 2019-20 मधील कराची थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 164746156.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 164746156.00/-

कर विभागाकडील कर वसुलीची थकबाकी दिसून येते.

इचलकरंजी नगरपरिषदचे सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात कर विभागाकडील कर वसुली थकबाकीबाबत अर्धसमासपत्र क्र. 32 दिनांक 17/02/2021 अन्वये सूचित केले होते, त्यास कोणतेही अनुपालन प्राप्त न झालेने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

अ.क्र	कराचा तपशील	सन 2019-20 ची एकूण मागणी	सन 2019-20 मध्ये केलेली वसुली	थकबाकी रक्कम
1	संयुक्त कर	263916898	166800800	70874606
2	वृक्षकर	9438114	6001007	2388986
3	विशेष स्वच्छता कर	1355791	754347	467987
4	ड्रेनेज कर	15071133	10482931	3296803
5	पाणीपट्टी कर	118332761	59329497	44671426
6	विशेष शिक्षण कर	26263499	16762236	6944190
7	शिक्षण कर	83620818	52945260	18285240
8	रोजगार हमी	15303586	8802154	3570838
9	अग्नीशमन कर	2864637	1665190	923187
10	घनकचरा	22584407	9261514	13322893
11	करमणूक कर	--	--	--
12	जाहीरात कर	--	--	--

	एकूण	558751644	332804936	164746156

1)वरीलप्रमाणे थकबाकी पाहता कराची वसुली योग्यप्रकारे होत नसल्याचे आढळून आले आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे कलम 150,151,152 चे तरतुदीनुसार वेळीच कार्यवाही करुन वसुली करणे आवश्यक आहे. संबंधित जबाबदार कर्मचारी यांनी वेळीच लक्ष देऊन नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन थकबाकी रक्कम रु. 164746156/- वसुलात आणावी.

DATSSMM9501 (Ref No : 92, Hmm No : 70)

27 पापु देखभाल दुरुस्ती अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रासाठी लिक्विड क्लोरीन 900 kg डीपार्टमेंटल कंटेनर मध्ये पुरविणेतील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 623290.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 623290.00/-

स्थायी निर्देश क्र.36 दि.29.12.2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दराच्या निविदांबाबत फेर निविदा मागविणेबाबतची कार्यवाही झालेली नाही. करारनामा मुद्रांक कमी रकमेचा घेण्यात आलेला आहे. मंजूर निविदाधारक कंत्राटदार यांचे लिफाफा 1 मध्ये मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 नुसार दुकान नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही. प्रथम निविदेत अपात्र असताना फेरनिविदेत सदर निविदाधारक कोणत्या आधारे पात्र ठरविण्यात आले याबाबत खात्री करता येत नाही. तथापि, सदर निविदा प्रक्रिया सदोष दिसून येते. साठा नोंदवही उपलब्ध नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात पुढील खरेदीची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची तपासणी केली असता त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 74 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील

कामाचे नाव	पापु देखभाल दुरुस्ती अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्रासाठी लिक्विड क्लोरीन 900 kg डीपार्टमेंटल कंटेनर मध्ये पुरविणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार	नगरपरिषद निधी
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 960000
डीएसआर वर्ष/करारनामा दि.	2017-18 व 2018-19
प्रशासकीय मान्यता	स्थायी समिती सभा क्र.15 ठराव क्र.293 दि.25.1.2018
तांत्रिक मान्यता	क्र.55/13 दि.नमूद नाही. वर्ष 2018-19
निविदा प्रकार	ई-निविदा
निविदा रक्कम	रुपये 960000
मंजूर निविदा रक्कम	9.50% जादा दराने
मक्तेदाराचे नांव	एम.एम.अग्रवाल
कामाचे आदेश	दि.29.08.2018
कामाची मुदत	12 महिने
मुदतवाढ मंजुरी	स्थायी समिती सभा क्र.6 ठराव क्रमांक 92 दि.25.11.2019
मुदतवाढ कार्यारंभ आदेश	दि.10.12.2019
अंतिम मुदत	पुढील निविदा प्रक्रिया होईपर्यंत

खर्च तपशिल

प्र.क्र./दि.	रक्कम	बिल कालावधी/दिनांक	तपशील	मंजूर दर/वर्ष
88/42-6.9.2019	367920	12.6.2019 ते 1.4.2019	21 GAS CYLINDER पुरवठा	17520/ 2018-19
449/557-31.3.2020	70080	ऑगस्ट 2019	4 नग	17520/ 2018-19

450/558--31.3.2020	185290	फेब्रुवारी 2020	11 नग	16844.50/ मुदतवाढ
एकूण	**623290**			

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्र.36 दि.29.12.2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त खरेदीपैकी रुपये 16000 प्रति सिलिंडर दराने 25 सिलिंडरच्या खरेदी बिलामध्ये रुपये 9.5% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी 9.5% प्रमाणे खर्च झालेली रक्कम रुपये 38000 लेखापरीक्षणात मान्य करणेत येत नाही.

2) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त खरेदीपैकी सन 2018-19 मध्ये करारनामा करताना रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

3) मंजूर निविदाधारक श्री.अग्रवाल ह्यांचे कंत्राटदार नोंदणी प्रमाणनुसार MJP यांचेकडील स्थापत्य संबधी कामांकरिता नोंदणीकृत आहेत. मक्तेदार यांचे लिफाफा 1 मध्ये मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 नुसार दुकान नोंदणी प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर मक्तेदार हे लिक्विड क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी अधिकृत पुरवठादार असलेचे प्रमाणित होत नाही.

4) मक्तेदार श्री.अग्रवाल यांचे सुविधी इंडस्ट्रीज गुजरात यांचेकडील पत्र पाहता सदर पत्रावर डिलरशिप कधीपासून कधीपर्यंत वैध आहे त्याबाबत कालावधी नमूद नाही, पत्रावर दिनांक नमूद नाही. तसेच सदर प्रमाणपत्रावरील इंग्रजी अक्षरे हि दोन वेगळ्या FONT मध्ये दिसून येते. त्यामुळे नस्तीमधील श्री.अग्रवाल हे सुविधी इंडस्ट्रीजचे डीलर असलेचे पत्राची सत्यता प्रमाणित होत नाही. तथापि सदर मक्तेदार हे अधिकृत असलेचे प्रमाणित होत नाही.

5) निविदा नस्तीमधील कागदपत्रांनुसार प्रथम ई-निविदेतील प्राप्त निविदाधारक हे अधिकृत विक्रेते नसल्यामुळे त्यांना अपात्र ठरवून फेरनिविदा मागविण्यात आली आहे. श्री.एम.एम.अग्रवाल हे प्रथम निविदेमध्ये सहभागी होते परंतु त्यांचे क्लोरीन गॅस चे अधिकृत उत्पादक/उत्पादकाचे विक्रेता नसलेने अपात्र ठरविण्यात आले होते. परंतु फेरनिविदेमध्ये श्री. अग्रवाल यांची निविदा मंजूर करून कार्यादेश देण्यात आला आहे. तरी प्रथम निविदेत अपात्र असताना फेरनिविदेत सदर निविदाधारक कोणत्या आधारे पात्र ठरविण्यात

आले याबाबत खात्री करता येत नाही. तथापि, सदर निविदा प्रक्रिया सदोष दिसून येते.
6) उपरोक्त खरेदीची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे पुरवठा चलनाप्रमाणे पुरवठा झाला आहे की नाही याबाबत खात्री करता येत नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 623290 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 97, Hmm No : 93)

28 पाणीपुरवठा विभागाकडील पंपांचे ठिकाणचे वीजदेयकांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 83160.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 83160.00/-

सबमर्सिबल पंपाचे ठिकाणची विद्युत देयके 2 महिने ते एक वर्ष इतक्या कालावधीकरिता शून्य (0) युनिट वापर असताना नाहक स्थिर आकार व इतर शुल्क भरणा करावे लागत आहे.

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2019-20 चे लेखापरीक्षणात सबमर्सिबल पंपाचे ठिकाणची विजदेयके अदा करण्यात आली आहेत. त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 83 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.
1) पाणीपुरवठा विभागाने वेळोवेळी सबमर्सिबल पंपाचे जोडण्यांची तपासणी करून त्यानुसार जोडणी चालू-बंद ठेवणे आवश्यक आहे. परंतु सदरप्रमाणे नियमित तपासणी न झालेने एक वर्ष इतक्या मोठ्या कालावधीमध्ये बंद असलेल्या जोडण्यांबाबत योग्य कार्यवाही झालेली नाही.
2) सबमर्सिबल पंपाचे ठिकाणची विद्युत देयके तपासणी केली असता पुढीलप्रमाणे 70 ठिकाणच्या देयकांचा 2 महिने ते एक वर्ष इतक्या कालावधीकरिता शून्य (0) युनिट वापर दिसून येतो. तरीही 70 पैकी 56 देयकांची रुपये 30 ते रुपये 390 पर्यंत देयक रक्कम अदा केल्याचे दिसून येते. तरी सदरप्रमाणे पंपावरील वीजवापर शून्य (0) आहे म्हणजेच सदर पंप विनावापर आहे असे स्पष्ट होते. असे असताना एक वर्ष इतक्या कालावधीकरिता या पंपावरील विद्युत जोडणी चालू ठेवणे ही बाब संयुक्तिक नाही. जोडणी बंद न केलेने या पंपांचे नाहक स्थिर आकार व इतर शुल्क भरणा करावे लागत आहे.

अ.क्र.	ग्राहक क्रमांक	सबमर्सिबल पंपाचे ठिकाण	देयक कालावधी		बिल रक्कम रुपये	युनिट वापर	झिरो (0) युनिट वापर कालावधी
1	250382550371	कलानगर सुर्वे मळा	Feb.2020		0	0	पूर्ण ले.प.वर्ष
2	250382546870	आबाळे बोळ त्रिशूल चौक	21.12.2019	8.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
3	250382546870	आबाळे बोळ त्रिशूल चौक	8.2.2020	2.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
4	250382548171	अनुबाई कन्या शाळा	16.12.2019	8.2.2020	0	0	--
5	250382548171	अनुबाई कन्या शाळा	8.2.2020	2.3.2020	0	0	--
6	250382547833	नेहरूनगर	6.12.2019	6.2.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
7	250382547833	नेहरूनगर	6.2.2020	1.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
8	250382550494	गणेश फौंड्री	6.12.2019	5.2.2020	110	0	--
9	250382550494	गणेश फौंड्री	5.2.2020	1.3.2020	100	0	--
10	250382550087	बिशप हायस्कूल	4.12.2019	4.2.2020	110	0	--
11	250382550087	बिशप हायस्कूल	4.2.2020	1.3.2020	90	0	--
12	250382551130	तानाजी बुचडे घराजवळ	5.12.2019	5.2.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
13	250382551130	तानाजी बुचडे घराजवळ	5.2.2020	1.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
14	250382546551	कुंभार गल्ली	5.12.2019	5.2.2020	90	0	--
15	250382546551	कुंभार गल्ली	5.2.2020	1.3.2020	100	0	--

16	250382551440	फुले पुतळा	6.12.2019	5.2.2020	90	0	--
17	250382551440	फुले पुतळा	5.2.2020	1.3.2020	100	0	--
18	250382546519	plot 70/71 नारायणनगर	6.12.2019	5.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
19	250382546519	plot 70/71 नारायणनगर	5.2.2020	1.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
20	250382549208	गांधी पुतळा	19.11. 2019	7.2.2020	290	0	--
21	250382549208	गांधी पुतळा	7.2.2020	3.3.2020	290	0	--
22	250382548074	चावरे दवाखाना	19.11. 2019	7.2.2020	0	0	--
23	250382548074	चावरे दवाखाना	7.2.2020	3.3.2020	0	0	--
24	250382548112	अवधूत आखाडा	7.2.2020	3.3.2020	190	0	पूर्ण ले.प.वर्ष
25	250382548023	डीस्पेन्सरी जनरेटर रूम	3.12.2019	7.2.2020	200	0	पूर्ण ले.प.वर्ष
26	250382548023	डीस्पेन्सरी जनरेटर रूम	7.2.2020	3.3.2020	190	0	पूर्ण ले.प.वर्ष
27	250382546829	डीस्पेन्सरी सांगली रोड	3.12. 2019	7.1.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
28	250382549755	कबाडे कॉर्नर	21.12. 2019	8.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
29	250382549755	कबाडे कॉर्नर	8.2.2020	2.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
30	250382547493	दाते मळा	21.12. 2019	8.2.2020	390	0	पूर्ण ले.प.वर्ष
31	250382547493	दाते मळा	8.2.2020	2.3.2020	390	0	पूर्ण ले.प.वर्ष
32	250382547591	वार्ड नं.3 दवाखाना	21.12. 2019	5.1.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
33	250382547591	वार्ड नं.3 दवाखाना	8.2.2020	2.3.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष

34	250380919779	रोहिदास मंदिर टाकवडे वेस	30.12. 2019	8.2.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
35	250380919779	रोहिदास मंदिर टाकवडे वेस	8.2.2020	2.3.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
36	250382548139	माईसाहेब हौ.सो.	22.12. 2019	8.2.2020	110	0	पूर्ण ले.प.वर्ष
37	250382548139	माईसाहेब हौ.सो.	8.2.2020	3.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
38	250382550541	तांबे मळा सिद्धेश्वर फौंड्री	4.12. 2019	5.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
39	250382550541	तांबे मळा सिद्धेश्वर फौंड्री	5.2.2020	1.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
40	250380148494	5/203 धरे अण्णा मारवाडी घर	21.12. 2019	8.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
41	250380148494	5/203 धरे अण्णा मारवाडी घर	8.2.2020	2.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
42	250380310259	सुफियाना किराणा दुकान नारायणपेठ	21.12. 2019	8.2.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
43	250380310259	सुफियाना किराणा दुकान नारायणपेठ	8.2.2020	2.3.2020	30	0	पूर्ण ले.प.वर्ष
44	250380312723	बरगाले गॅस एजन्सी	11.12. 2019	6.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
45	250380312723	बरगाले गॅस एजन्सी	6.2.2020	2.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
46	250380314962	दत्त रोड दर्गा	14.12. 2019	8.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
47	250380314962	दत्त रोड दर्गा	8.2.2020	2.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
48	250380319981	अण्णाभाऊ साठे	5.2.2020	1.3.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष

		समाजमंदिर					
49	250380318683	हिरलगे मळा-मुसळे सायझिंग	14.12. 2019	6.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
50	250380318683	हिरलगे मळा-मुसळे सायझिंग	6.2.2020	2.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
51	250648715621	विजय एकल घराजवळ नमाजगे मळा	8.12. 2019	5.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
52	250648715621	विजय एकल घराजवळ नमाजगे मळा	5.2.2020	1.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
53	250382552918	लोहार घर प्रियदर्शिनी चौक	14.12. 2019	6.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
54	250382552918	लोहार घर प्रियदर्शिनी चौक	6.2.2020	9.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
55	250644036959	बोरे घराजवळ	16.12. 2019	7.2.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
56	250644036959	बोरे घराजवळ	7.2.2020	3.3.2020	0	0	पूर्ण ले.प.वर्ष
57	250382553761	आवाडे निवृत्ती गणपती येझरे घर	16.12. 2019	8.2.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
58	250382553761	आवाडे निवृत्ती गणपती येझरे घर	8.2.2020	9.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
59	250382546624	वडर गल्ली	6.12. 2019	5.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
60	250382546624	वडर गल्ली	5.2.2020	1.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
61	250382554210	तांबे मळा	5.12. 2019	5.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष

62	250382554210	तांबे मळा	5.2.2020	1.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
63	250382557545	अशोकनगर	9.12. 2019	5.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
64	250382557545	अशोकनगर	5.2.2020	1.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
65	250382557456	वार्ड नं.30 जमादार कारखाना	21.12. 2019	5.2.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
66	250382557456	वार्ड नं.30 जमादार कारखाना	5.2.2020	1.3.2020	90	0	पूर्ण ले.प.वर्ष
67	250382557235	गोलंगडे घर	22.12. 2019	5.2.2020	190	0	पूर्ण ले.प.वर्ष
68	250382557235	गोलंगडे घर	5.2.2020	1.3.2020	100	0	पूर्ण ले.प.वर्ष
69	250644053608	वार्ड नं.18 त्रिशूल चौक	3.12. 2019	8.2.2020	190	0	पूर्ण ले.प.वर्ष
70	250644053608	वार्ड नं.18 त्रिशूल चौक	8.2.2020	2.3.2020	190	0	पूर्ण ले.प.वर्ष
				एकूण	**6930**		

3) सदरचे लेखापरीक्षण हे चाचणी लेखापरीक्षण असलेने पूर्ण लेखापरीक्षण वर्षातील देयकांची पडताळणी करून उपरोक्तप्रमाणे विनावापर असलेल्या जोडण्या बंद करून नाहकचा खर्च थांबवणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 6930 प्रतिमाह प्रमाणे लेखापरीक्षण वर्षातील रुपये 83160 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 102, Hmm No : 98)

29 संगणकीय आज्ञावली व BPMS संकेतस्थळावरून दिलेल्या बांधकाम परवाना प्रक्रियेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

ऑनलाईन प्रस्ताव संगणक प्रणालीवर अपलोड केलेनंतर प्रस्ताव फाइलची हार्ड कॉपी नगरपरिषदेस जमा करणेत आलेली नाही. संगणकीकृत लेख्यांबाबत संगणकीय आज्ञावलीमधील पुस्तके व अभिलेख तयार करून ठेवण्यात आलेले नाहीत. इमारत बांधकाम परवानगीची नोंदवही नमुना क्रमांक 38 ठेवण्यात आलेली नाही. अद्ययावत दरसूची न वापरता जुना दर आकारलेने बहुतांश भागातील विकास शुल्क कमी आकारणी व भरणा झाले आहे. बांधकाम परवाना प्रकरणांची माहिती कर निर्धारण विभागास देण्यात आलेचे दिसून येत नाही.

नगरपरिषद इचलकरंजीकडील सन 2019-20 चे लेखापरीक्षणात नगररचना विभागाकडील संगणकीय आज्ञावली मधून ऑनलाईन बांधकाम परवाने देण्यात येत आहेत. सदर परवान्यांसंबंधी नगरविकास विभागाचे संकेतस्थळावर (Building Plan Management System) सन 2019-20 मधील नगरपरिषद इचलकरंजी कडील प्रकरणांची माहिती तपासणी करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 84 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

1) BPMS प्रणालीवरील नियमावलीनुसार ऑनलाईन प्रस्ताव संगणक प्रणालीवर अपलोड केलेनंतर प्रस्ताव फाइलची हार्ड कॉपी नगरपरिषदेस जमा करणे बंधनकारक आहे. परंतु सदरप्रमाणे प्रस्ताव लेखा परीक्षणास उपलब्ध नाहीत.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 मधील नियम क्रमांक 47 नुसार लेखा पुस्तके संगणकीकृत ठेवण्यात येत असतील त्याबाबतीत, वापरण्यात आलेली प्रणाली किंवा आज्ञावली लेखासंहितेत नमूद पुस्तके व अभिलेख कोणत्याही वेळी निर्माण करण्यास समर्थ असावी. असे असताना नगरपरिषदेने शासनाच्या संगणकीय आज्ञावलीमधील अशी पुस्तके व अभिलेख तयार करून ठेवण्यात आलेले नाहीत.

3) नियम 63(10) अन्वये इमारत बांधकाम परवानगीची नोंदवही नमुना क्रमांक 38 मध्ये ठेऊन लेखा प्रमुखाने दरमहा अद्ययावत, संतुलित करावयाचे, पडताळणी करावयाचे व मुद्रित करावयाचे आहे. नियम क्रमांक 65(1) नुसार संगणकीकृत लेखे ठेवण्यात येत असतील तर, पुस्तके व नोंदवह्या यांची मुद्रिते विनिर्दिष्ट कालावधीच्या शेवटी काढण्यात येतील. मुद्रितांची घट्ट बांधणी करण्यात येईल आणि पृष्ठांना अनुक्रमांकित करण्यात येईल. प्रत्येक पृष्ठावर नगरपरिषदेची सामान्य मुद्रा असेल आणि लेखा प्रमुखाची सही असेल. सदरप्रमाणे नगरपरिषदेने उक्त नियमाप्रमाणे संगणक प्रणाली मधून देण्यात येणाऱ्या परवान्याबाबत इमारत बांधकाम परवानगीची नोंदवही नमुना क्रमांक 38 ठेऊन दरमहा प्रमाणित करणे आवश्यक होते. परंतु नगरपरिषदेने याप्रमाणे नोंदवही ठेवलेली नाही.

4) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 चे कलम 124ख(3) अन्वये विकास शुल्क वाढविणेबाबत महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.26.03.2007 The Ichalkaranji Municipal Council Regulation

for Development Charge 2002 नुसार शासनाने दिनांक 01.04.2003 पासून बांधकाम परवाना विकास शुल्क हे रुपये 45 इतके संमत केले आहे. उक्त अधिनियमाचे कलम 124 ख(2) नुसार जमीन व इमारती यांच्या वापराचे विकास शुल्क दर, दुसऱ्या अनुसुचीच्या स्तंभ (4) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विकसित जमिनीच्या दराच्या 2% दराने आकारणे बंधनकारक आहे. नगरपरिषदेला या दरापेक्षा कमी विकास शुल्क आकारणी करता येणार नाही. परंतु नगरपरिषदेने उक्त अधिसूचनेप्रमाणे संमत केलेला दर सन 2019-20 अखेर आकारणी केला आहे, विकसित जमिनीचा दर अद्ययावत केला असता नगरपरिषद हद्दीतील बहुतांश भागांचे दर हे वार्षिक दरसूची 2017 (रेडी रेकनर) नुसार वाढलेचे दिसून येते. त्यावर 2% दराने गणना केली असता रुपये 45 पेक्षा अधिक दिसून येते. तथापि अद्ययावत दरसूची न वापरता जुना दर आकारलेने बहुतांश भागातील विकास शुल्क कमी आकारणी व भरणा झाले आहे.

5) नगररचना विभागाने त्यांचेकडील बांधकाम परवाना प्रकरणांची माहिती कर निर्धारण विभागास देणे आवश्यक असताना अशी माहिती देण्यात आलेचे दिसून येत नाही. तथापि, लेखापरीक्षण वर्षाआधीच्या बांधकाम परवान्यांतील पूर्ण बांधकामांवर कर आकारणी झाली किंवा कसे याबाबत पडताळणी करता येत नाही. तथापि, ऑनलाईन पध्दतीने देण्यात आलेल्या बांधकाम परवान्यांबाबत लेखापरीक्षणास योग्य ती पडताळणी करता आली नाही.

DATRDMF8501 (Ref No : 103, Hmm No : 99)

30 नगरपालिका हद्दीत वाढीव कबनूर व शहापूर भागामध्ये भुयारी गटर बांधणे कामातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व-निधी व शासन निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1215551837.00 /-

कामाची मुदत संपूनही विलंबाबाबत कार्यवाही दिसून येत नाही. मक्तेदारास कामापोटी मोबीलायजेशन ॲडव्हान्स देणेबाबत तरतूद नसताना सुध्दा ॲडव्हान्स दिला आहे. कामासाठी नगरपरिषदेने आयडीबीआय बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या व्याजाचा नाहक भुर्दंड बसत आहे. लेखा परीक्षण आक्षेपाबाबत कार्यवाही दिसून येत नाही. सदर निधीतून रकमा वर्ग केल्या आहेत, त्याबाबत अभिलेखे उपलब्ध नाहीत.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात नगरपालिका हद्दीत वाढीव कबनूर व शहापूर भागामध्ये भुयारी गटर बांधणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची पडताळणी करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 81 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील-

कामाचे नांव	नगरपालिका हद्दीत वाढीव कबनूर व शहापूर भागामध्ये भुयारी गटर बांधणे
लेखाशिर्ष	UIDSSMT भुयारी गटर योजना
अंदाजपत्रकीय रककम	रुपये 98.76 कोटी
प्रशासकीय मंजुरी	केंद्रीय वित्त मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र दि. 27/2/2014
तांत्रिक मान्यता	सुधारित मुख्य अभियंता मजिप्रा पुणे क्रमांक 8061 दिनांक 29/5/2017
निविदा प्रक्रिया	ई टेंडर
मंजूर निविदा रक्कम	रुपये 82.60 कोटी अंदाजपत्रकीय रकमेच्या 21.51 टक्के जादा दराने म्हणजेच रुपये 100,36,72,600/-
मक्तेदाराचे नांव	KIPL VISTACORE INFRA PROJCT JV
काम सुरु दिनांक	दि.28/8/2014
काम पुर्ण दिनांक	सन 2019-2020 अखेर अपुर्ण
कामाची मुदत	दोन वर्षे
मोजमाप पुस्तक क्रमांक	उपलब्ध नाही

एकूण खर्च	रुपये 121,55,51,837/- (मागील 1118390631+ चालू 97167206/-)

याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) लेखापरीक्षण अहवाल सन 2018-19 मध्ये सदर कामाबाबत अभिप्राय देण्यात आले आहेत. सदरचे काम सुरु दिनांक 28/8/2014 नमूद आहे. कामाची मुदत 2 वर्षे आहे तथापि दिनांक 27/8/2016 अखेर काम पुर्ण होणे अपेक्षित होते तथापि दिनांक 31/3/2019 अखेर काम अपुर्ण असलेचे दिसून येते. टेंडरमधील Special conditions of contract मधील बाब क्रमांक 9.1 नुसार व करारनाम्यातील अट क्रमांक 7 नुसार कामाच्या विलंबाकरिता प्रतिदिन रुपये 7500/- प्रशासकीय चार्जेस व प्रकल्प व्यवस्थापन चार्जेसकरिता नुकसान भरपाई मक्तेदार यांचेकडुन नगरपरिषदेस देणे आवश्यक असलेचे नमूद आहे. दिनांक 28/8/2016 ते 31/3/2020 अखेर एकूण 1312 दिवसाकरिता रुपये 7500/- प्रतिदिन प्रमाणे रुपये 98,40,000/- रक्कम वसुली होणे आवश्यक आहे.

2) स्थानिक निधी लेखा विभागाकडील सन 2015-2016 च्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 86 मधील उपपरिच्छेद क्रमांक 4 मध्ये नमूद केलेप्रमाणे रक्कम रुपये 14 कोटी मोबीलायजेशन ॲडव्हान्स व त्यावरील व्याजाची रक्कम येणे असलेबाबत नमूद केले आहे.न.पा.ने KIPL Vistacore JV या फर्म ला मोबीलायजेशन ॲडव्हान्स देणेबाबत कौन्सील ठराव क्रमांक 108 दिनांक 25/2/2014 रोजी केला असून ॲडव्हान्सवर मक्तेदार नगरपरिषदेस द.सा.द.शे. 9 टक्के दराने व्याज देणार असलेचे नमूद आहे. तथापि बी-1 टेंडरमधील बाब क्रमांक 4.0 पान क्रमांक 45 अन्वये मक्तेदाराला मोबीलायजेशन ॲडव्हान्स देता येत नसलेचे नमूद आहे. तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मध्ये मक्तेदारास कामापोटी मोबीलायजेशन ॲडव्हान्स देणेबाबत तरतूद नसताना सुध्दा ॲडव्हान्स दिला आहे.

3) सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणातील परिच्छेद क्रमांक 38 उपपरिच्छेद क्रमांक 10 अन्वये सदर कामासाठी नगरपरिषदेने आयडीबीआय बँकेकडून 18 कोटी इतके कर्ज 10 वर्षाकरिता घेतले असून कर्जाचा व्याज दर 13 टक्के वार्षिक इतका आहे. तसेच सदरचे कर्ज दिनांक 28/2/2014 रोजी घेवून कर्जापोटी रक्कम रुपये 17.50 कोटी मोबीलायजेशन ॲडव्हान्स दिनांक 27/8/2015 रोजी अदा करुन मक्तेदाराकडून 9 टक्के व्याज मक्तेदार नगरपरिषदेस देणार असलेचे नमूद आहे.

4) सन 2018-19 चे लेखापरिक्षणातील परिच्छेद क्रमांक 47 मधील उपपरिच्छेद क्र.2 मध्ये नमूद केलेनुसार सन 2017-2018 अखेर रुपये 14 कोटी मोबीलायजेशन ॲडव्हान्स थकीत असलेचे दिसून येते. दिनांक 24/5/2018 रोजी 7 कोटी मोबीलायजेशन ॲडव्हान्स व व्याजापोटी रुपये 2539938/- संबंधित निधीत जमा दिसून येते. देयक क्रमांक 14 दिनांक 14/9/2018 मधून रुपये 7 कोटी मोबीलायजेशन ॲडव्हान्स व 9 टक्के दराने व्याज रककम रुपये 12600000/- पैकी रुपये 2539838/- व्याजाची रक्कम वसुल केली आहे. उर्वरित व्याज रक्कम रुपये 10060162/- ची वसुली अद्याप होणे बाकी आहे.

5) परंतु सन 2019-20 मधील अभिलेख्यानुसार उक्त नमूद थकीत रक्कम वसूल झाली किंवा नाही याबाबत कोणतेही लेखे उपलब्ध नाहीत.

6) न.पा. ने आयडीबीआय बँकेकडुन 13 टक्के दराने कर्ज घेवून मक्तेदारास 9 टक्के दराने आदा केले आहे. बँक

व्याज दर फरक 4 टकके आहे. नगरपरिषदेचे 4 टक्के दराने व्याजाचे नुकसान होत असलेमुळे सदरची रक्कम संबंधित मक्तेदार यांचेकडुन वसुल करणेत यावी अथवा महाराष्ट्र नगरपरिषदा , नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 96 मधील तरतूदीनुसार सदरच्या अनियमिततेबाबत झालेल्या अदाईगी बाबतच्या वसुलीची कारवाई करणेत यावी.

7) खालीलप्रमाणे UIDSSMT निधीतून रकमा वर्ग करण्यात आल्या आहेत. त्याबाबत प्रमाणके उपलब्ध झाली नाहीत. तथापि कोणत्या आधारे सदर रकमा इतर निधीस वर्ग करण्यात आल्या ते स्पष्ट होत नाहीत. नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण -3416/प्र.क्र.40/नवि-04 दिनांक 27 मे,2016 अन्वये योजनेसाठी मंजूर निधी इतरत्र वर्ग करणेचा कोणताही प्राधिकार नगरपरिषदेस नाही. तरी सदर रकमा निधीतील आहेत किंवा कसे याबाबत लेखे पडताळणीस उपलब्ध झाले नाहीत. तथापि सदर वर्ग रकमांची खात्री करता येत नाही.

प्र.क्र.	रक्कम रु.	वर्ग तपशील	शेरा
1/10.6.19	31655000	महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान राज्यस्तर योजना निधीकडे वर्ग	न.प.हिश्श्याची जादा रक्कम जमा झालेचे नमूद करून वर्ग करण्यात आली आहे.
2/10.6.19	29443107	14 वा वित्त्त्त आयोग निधी कडे वर्ग	

8) स्थायी निर्देश क्रमांक 5 दिनांक 13/10/2000 मधील बाब क्रमांक 1ब नुसार एका निधीमधून दुसऱ्या निधीमध्ये कोणत्याही कारणाकरिता रक्कम तात्पुरती जमा करण्याचे काही कारण नाही.तसेच अशी जमा केलेली रक्कम पुन्हा दुसऱ्या निधीत टाकल्यास ती बाब खर्च या शिर्षाखाली येऊ शकत नाही. अशा प्रकारे उत्पन्न व खर्च या ह्या बाबी अंदाजपत्रकात फुगवून दाखविल्या जातात, ही बाब अत्यंत गैर असून त्यामध्ये मोठे आर्थिक घोटाळे निर्माण होऊ शकतात.

उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

DATDJSM7401 (Ref No : 114, Hmm No : 109)

31 पाटबंधारे विभागाकडील पाणी उपसा देयकातील उणिवाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 17886943.00 /-

पाटबंधारे विभागांच्या देयकाच्या थकबाकीच्या दंडापोटी नगरपरिषदेचे नुकसान होत आहे. घरगुती व औद्योगिक कारणास्तव स्वतंत्र पाणीमापक यंत्र बसविणेत आलेले नसलेने संबंधित देयकाची योग्य गणना झाली असलेची खात्री होत नाही. सन 2019-20 पूर्ण कालावधीमध्ये फ्लोमीटर बंद असलेने उपसा केलेल्या पाण्याची गणना चुकीची झाली असण्याची शक्यता दिसून येते. त्यामुळे पाटबंधारे विभागाने मागणी केलेले देयक बिनचूक असल्याची खात्री होत नाही.

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2019-20 चे परीक्षणात पुढीलप्रमाणे पाटबंधारे विभागाकडील पाणी उपसा देयकावर खर्च करण्यात आला आहे. त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 82 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

अ.क्र.	प्र.क्र./दिनांक	रक्कम रुपये	तपशील
1	123/5.2.2020	28,86,943	सांगली पाटबंधारे
2	84/5.3.2020	50,00,000	कोल्हापूर पाटबंधारे
3	20/4.3.2020	1,00,00,000	सांगली पाटबंधारे
	एकूण	1,78,86,943	

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) मजरेवाडी उपसा केंद्र व सांगली पाटबंधारे उपसा केंद्र यांचेकडील पाणी देयकांची तपासणी केली असता सदर बिले लेखापरीक्षण वर्षाआधीपासून थकीत असलेचे दिसून येते. त्यामुळे थकबाकीच्या दंडापोटी नगरपरिषदेचे नुकसान होत आहे.

2) सांगली पाटबंधारे यांचेकडील सन 2019-20 करिता पाणी उपसा कोटा मंजूर पत्र क्रमांक जा.क्र.पा.उ.वि.सां./द.का.-2/1526/2020 दिनांक 14/10/2020 मधील अट क्रमांक 5 नुसार घरगुती व औद्योगिक कारणास्तव स्वतंत्र पाणीमापक यंत्र बसविणे व ते सुस्थितीत ठेवणे नगरपरिषदेवर बंधनकारक आहे. परंतु सदर`प्रमाणे स्वतंत्र पाणी मापक यंत्राचे अहवाल नस्तीस उपलब्ध नाहीत. त्यामुळे सांगली पाटबंधारे विभागास अदा केलेल्या घरगुती व औद्योगिक पाणी उपसा गणनेबाबत पडताळणी करता आली नाही.

3) जलअभियंता नगरपरिषद इचलकरंजी यांनी विभागास दिलेल्या पाणी वापर विवरणपत्र क्रमांक 1858-1 दिनांक 17/03/2020 मधील टिप क्रमांक 1 व 2 नुसार फ्लोमीटर नादुरुस्त असलेने तास व डीसचार्ज प्रमाणे

पाणी वापर प्रमाणपत्र दिल्याचे नमूद केले आहे. तसेच फ्लोमीटर दुरुस्ती प्रक्रिया सुरु असलेचे नमूद आहे. यावरून सन 2019-20 पूर्ण कालावधीमध्ये फ्लोमीटर बंद असताना विहित पद्धतीने पाणी उपसा बिल गणना झाली असलेबाबत खात्री करता येत नाही. तथापि पाटबंधारे विभागाने मागणी केलेले देयक कोणत्या आधारे गणना केली जाते, हे स्पष्ट होत नाही. तसेच यासंबधी उपसा केंद्राकडील कोणतेही अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत. याबाबत जादा बिलाने नगरपरिषदेचे नुकसान होत असणेची शक्यता नाकारता येत नाही.
4) पंचगंगा नदीतील मासिक पाणी उपसा अहवाल माहे फेब्रुवारी,2020 चे जलअभियंता नगरपरिषद इचलकरंजी यांनी शिरोळ पाटबंधारे उपविभाग,कुरुंदवाड यांना दिलेल्या पाणी वापर विवरणपत्र क्रमांक 1858 दिनांक 17/03/2020 मधील टिप क्रमांक 1 नुसार तास व डीसचार्ज प्रमाणे पाणी वापर प्रमाणपत्र दिल्याचे नमूद केले आहे. यावरून सन 2019-20 पूर्ण कालावधीमध्ये फ्लोमीटर च्या आधारे पाणी वापर गणना करणे आवश्यक असताना मोघम पाणी उपसा बिल गणना झाली आहे. तसेच पाटबंधारे विभागाने मागणी केलेले देयक कोणत्या आधारे गणना केली जाते, हे स्पष्ट होत नाही.
5) पाणी उपसा केंद्रावरील कोणतेही अभिलेख लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत. याबाबत जादा बिलाने नगरपरिषदेचे नुकसान होत असणेची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 1,78,86,943 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 129, Hmm No : 120)

32 नगररचना विभागाकडील भूसंपादन विषयक खर्चाचे लेखे प्राप्त न झालेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 3069843.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3069843.00/-

भूसंपादन लेखाशीर्षाअंतर्गत खर्चाचे अभिलेखे प्राप्त न झालेने रक्कम रुपये 3069843 ची पडताळणी करता आली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-20 चे लेखापरीक्षणात नगरविकास विभागाकडील भूसंपादन या लेखाशिर्षाखाली वार्षिक लेख्यानुसार पुढीलप्रमाणे खर्च दिसून येतो. त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 86 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि

पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

लेखाशीर्ष	**खर्च माहे**	**खर्च रक्कम रुपये**
ॲक्वीझिशन-जागा खरेदी (न.प.फंड)	जुलै 2019	70910
	नोव्हेंबर 2019	2905933
	डिसेंबर 2019	93000
	एकूण	**3069843**

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) मुंबई स्थानिक निधी लेखा लेखा परीक्षा अधिनियम, 1930 चे कलम 6 नुसार उपरोक्त अभिलेखे लेखापरीक्षणास सादर होणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त खर्चाबाबत वारंवार मागणी करूनही खर्चाची प्रमाणके, संबंधित नस्ती लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. तथापि सदर खर्च रक्कम रुपये 3069843 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 115, Hmm No : 110)

कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

33 वेतन देयक त्रुटी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 2

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

नगरपालिकेकडे वेतन देयक एकत्रित सादर केली जात नसलेबाबत निदर्शनास आले आहे., तथापी नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 347 अन्वये कार्यवाही केलेली नाही.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात नगरपालीकेल्या प्रत्येक विभागातून वेतन देयक स्वतंत्र तयार केली जात असले बाबत निदर्शनास आले आहे. या बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे.

1)नगरपरिषदेच्या नोंदवहीनुसार सन 2019-2020 अखेर प्रत्येक विभागातून वेतन देयक स्वतंत्र तयार केली जात असले बाबत निदर्शनास आले आहे. सबब, आस्थापनाचे वेतन हे आस्थापनेवरील मंजूर पदे, कार्यरत पदे, रिक्त पदे इ. आढावा घेवून कार्यरत पदांचीच वेतन देयके पारीत होत असले बाबत खात्री करता येत नाही सदर बाबतीत वित्तीय अनियमितता होण्याची शक्यता नाकारता येत नाही, ही बाब गंभीर असून नगपरिषदेने स्वतंत्र संगणक प्रणाली व्दारे सर्व कर्मचारी यांची वेतन देयके तयार होतील व त्याव्दारे वेतन देयके, वेतनवाढी, वेतन फरक, लेखांकन, इतर भत्ते, वेतनातील वसूली इ. बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

2)सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नियम 8 मध्ये वर्गणीची रक्कम निश्चित केली आहे. वर्गणीची रक्कम ही कर्मचाऱ्याच्या वितलब्धीच्या 6 टक्के रकमेपेक्षा कमी नसेल अशी तरतूद असून बऱ्याच कर्मचाऱ्यांची वर्गणी ही कमी घेतेलेचे निदर्शनास आले आहे.

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नांव	वितलबधी मुळवेतन	कपात केलेली वर्गणी
1	डॉ. सुनिलदत्त गणेश संगेवार	77700	1000
2	श्री. महेश सुभाष पांडव	41100	1000

3	श्री. महंमदसादिक आप्पासो गजबर	41000	1000

सदर कर्मचारी हे उदाहरण दाखल असून उर्वरित कर्मचाऱ्यांचे आपलेस्तरावर आढावा घेऊन त्यानुसार कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

DATSKKM8001 (Ref No : 3, Hmm No : 51)

34 धारवट झोपडपट्टी व महाराष्ट्र वे ब्रिजजवळ ड्रेनेज व्यवस्था करणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 489771.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 472813.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 16958.00/-

अंदाजपत्रक प्रमाणित नाही. अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविणेची कार्यवाही न करता जादा दर मंजूर केले आहेत. कामाचा माहिती फलक लावण्यात आल्याचे दिसून येत नाही. करारनामा मुद्रांक कमी घेणेत आले आहे. अपात्र मक्तेदाराची निवड करण्यात आली आहे. सुरवातीचे लीड अंतर कमी न करता बाब क्रमांक 8 चा दर देण्यात आला आहे. पाईपची समाधानकारक Hydraulic test झाली नसताना पुढील कामे करण्यात आली आहेत. विमा रक्कम कमी कपात केली आहे.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात धारवट झोपडपट्टी व महाराष्ट्र वे ब्रिजजवळ ड्रेनेज व्यवस्था करणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची पडताळणी करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 22 दिनांक 11/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील

कामाचे नाव	धारवट झोपडपट्टी व महाराष्ट्र वे ब्रिजजवळ ड्रेनेज व्यवस्था करणे
अंदाजपत्रकीय रक्कम	486946

DSR/SSR वर्ष/करारनामा दि.	2016-17
प्रशासकीय मान्यता	स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 96 दिनांक 30.12.2017
तांत्रिक मान्यता	क्रमांक व दिनांक नमूद नाहीत
निविदा रक्कम	रुपये 486946
मंजूर निविदा रक्कम	वाटाघाटीअंती 7% जादा दराने मंजूर
मक्तेदाराचे नांव	गुरुराज घोडके
कामाचे आदेश	दि.06/12/2018
काम सुरु दिनांक	दि.06/12/2018
काम पूर्ण दिनांक	दि.24/02/2019
कामाची मुदत	3 महिने
खर्च तपशिल	RA-I = 336989 RA-I =152782 (प्र.क्रमांक 13-82/04.03.2020) **TOTAL =489771**

याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे

1) अंदाजपत्रकावर तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक नमूद नाही. त्यामुळे तांत्रिक मान्यता कधी देण्यात आली ते स्पष्ट होत नाही.

2) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी रुपये 7% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी 7% प्रमाणे खर्च झालेली रक्कम रुपये 32041 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

3) स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 03/01/2006 मधील सूचना क्रमांक 29 नुसार रुपये 1 लक्ष व त्यावरील

खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. सूचना 30 नुसार असे सूचना फलक संबंधित कंत्राटदार यांनी स्वखर्चाने लावायची आहेत. अशा प्रकारची अट निविदा पत्र व करारपत्रामध्ये घालण्यात यावी, असे स्पष्ट नमूद केले असताना सदरप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. उक्त निर्देशातील सूचना क्रमांक 31 नुसार कामाची तपासणी करताना फलक लावण्यात आले किंवा नाही याची खात्री मुख्याधिकारी यांनी करावी, असे नमूद आहे. परंतु अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

5) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 27(iv) नुसार कंत्राटदार नोंदणीकृत व आवश्यक असलेले सर्व परवाना धारक असावा. उदाहरणार्थ बांधकाम विषयक बाबीमध्ये कंत्राटदार सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र धारक असावा, पाणीपुरवठा विषयक बाबी साठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील नोंदणीधारक असावा. परंतु सदरप्रमाणे उपरोक्त कामातील मक्तेदार हे त्यांचे कागदपत्रानुसार प्रमाणपत्रधारक नसलेचे दिसून येते. तथापि अपात्र मक्तेदराची निवड झाल्याचे स्पष्ट होते.

6) उपरोक्त कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील सन 2016-17 ची दरसूची वापरण्यात आली आहे. त्यामधील सर्वसाधारण सूचना (General Notes) क्रमांक 5 नुसार सर्व पूर्ण बाबींसाठी, वाळू,खाडी,विटा,दगड इ.साहित्य गोळा करणेसाठी सुरवातीचे अंतर (initial lead) 5 km. गृहीत धरण्यात आले आहे. परंतु पुढील बाबीच्या दराची गणना करताना सदर initial lead वजा करून दर आकारणे आवश्यक होते. परंतु चुकीचे दर गणना केलेने जादा दराचे प्रदान झाले आहे.

Item No.	**Details**	**Rate particular**	**Given rate**	**Due rate (given km rate after 5km lead rate)**	**Consumption per unit**	**Due Rate total**
1	2	3	4	5	6	7=5*6
8	P L in situ CC M-15hellip;etc.complete (Work Qty-15.41	Basic rate	5118	5118	1	5118
		Lead 15 km for metal	378.6772	425.48-247.89=177.59	0.89	158.05

	CuM)	above 40mm				
		Lead 20 km for sand	257.634	500.89-237.11=263.78	0.45	118.7
		Sugar cane area 5%	287.7656	255.9	1	255.9
		Total	**6043.08**			**5650.65**

उपरोक्तप्रमाणे नमूद बाबीसाठी रुपये 5650.65 प्रमाणे दर देय असताना रुपये 6043.08 घेतलेने रुपये प्रति घ.मी. 392.43 जादा दर अदा झाला आहे. तरी सदर 15.41 घ.मी. बाबीचे रुपये 392.43 प्रमाणे रक्कम रुपये 6047 वसूल करून भरणा होणे आवश्यक आहे.

7) मजीप्रा यांचेकडील दरसुची 2016-17 मधील General Notes मधील सूचना क्रमांक 17 नुसार संबंधित पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयक रक्कम अदा करू नये असे नमूद आहे. परंतु अशी test घेतली नसतानाही मक्तेदारास नमूद बाबीचे देयक रक्कम रुपये 8076 अदा करण्यात आले आहेत. तरी सदर रक्कम वसूलपात्र करणेत येत आहे.

8) दरसूची General Notes सूचना क्रमांक 22 नुसार 1% Insurance घेणे आवश्यक असताना RA-1 मधून अंदाजपत्रकाच्या 5% रक्कम कपात केली आहे. तरी उर्वरित 0.5% रुपये 2435 वसूल करून भरणा करावे.

9) दरसूची Section I(IV) RCC PIPE अ.क्रमांक 2(B) मधील NOTE नुसार HYDRULIC TESTING पूर्ण होईपर्यंत केवळ 85% दर देय ठरतील. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 16958 वसूलपात्र व रक्कम रुपये 472813 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 8, Hmm No : 5)

35 जलशुद्धीकरण केंद्रामध्ये ॲजिटेअर्स पुरविणे बसविणे व चाचणी देणे तसेच FLACULATOR/BRIDGE MOTORS ,CHLORINATOR UNIT दुरुस्ती व अनुषंगिक दुरुस्तीची कामे करणे कामाबाबत

अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 819243.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 813452.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5792.00/-

अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराच्या निविदा प्राप्त झाल्यास स्थायी निदेश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 प्रमाणे फेरनिविदा मागविणेबाबतची कार्यवाही केलेली नाही. करारनामा मुद्रांक कमी रक्कमेचा घेण्यात आलेला आहे. स्थायी निदेश क्रमांक 37 नुसार कामाच्या माहितीचे फलक कामाच्या ठिकाणी लावलेला नाही. स्थायी निर्देश क्रमांक 36 नुसार मक्तेदाराने जोडलेल्या करारनाम्यावर दोन स्थायी समिती सदस्यांची नावे व स्वाक्षरी घेतलेली नाही. काम सुरु करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम पुर्ण झाल्यानंतरच्या कामाचे चित्र/फोटो काढुन ठेवण्यात आलेले नाहीत. त्रयस्थ शासकीय संस्थेकडून कामाचे लेखापरीक्षण करून घेण्यात आलेल नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी- अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते. मक्तेदाराच्या देयकातून 1 टक्के आयकर कमी रक्कमेने वसुल केला आहे. सार्वजनिक बांधकाम नियमावली व लेखासंहितेतील तरतूदीनुसार वाढीव कामासाठी सक्षम तांत्रिक अधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात जलशुद्धीकरण केंद्रामध्ये अजिटेअर्स पुरविणे बसविणे व चाचणी देणे तसेच FLACULATOR/BRIDGE MOTORS ,CHLORINATOR UNIT दुरुस्ती व अनुषंगिक दुरुस्तीची कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची तपासणी केली असता त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 20 दिनांक 11/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील

कामाचे नाव	जलशुद्धीकरण केंद्रामध्ये अजिटेअर्स पुरविणे बसविणे व चाचणी देणे तसेच FLACULATOR/BRIDGE MOTORS ,CHLORINATOR UNIT दुरुस्ती व अनुषंगिक दुरुस्ती करणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार	नगर पालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 898136

डीएसआर वर्ष	PWD Electric CSR 2015-16
प्रशासकीय मान्यता	कौन्सिल सभा ठराव क्रमांक 218 दि.29.12.2018
तांत्रिक मान्यता	Hydrulic Engineer, नगरपरिषद इचलकरंजी क्रमांक 6/2016-17 (दिनांक नमूद नाही)
निविदा रक्कम	ई-निविदा रुपये 898136
मंजूर निविदा रक्कम	वाटाघाटीअंती4.95% जादा दराने रुपये 942593
मक्तेदाराचे नांव	तुषार इलेक्ट्रिकल
कामाचे आदेश	दि.07.05.2018
काम सुरु दिनांक	दि.07.05.2018
काम पूर्ण दिनांक	दि.30.06.2018
कामाची मुदत	3महिने
खर्च तपशिल	RA-I = 539132 RA-II =280112 (प्र.क्रमांक 370-238/20.3.2020) TOTAL =819244

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी रुपये 4.95% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी 4.95% प्रमाणे खर्च झालेली रक्कम रुपये 44458 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक

पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

3) स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 03/01/2006 मधील सूचना क्रमांक 29 नुसार रुपये 1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. सूचना क्रमांक 30 नुसार असे सूचना फलक संबंधित कंत्राटदार यांनी स्वखर्चाने लावायची आहेत. अशा प्रकारची अट निविदा पत्र व करारपत्रामध्ये घालण्यात यावी. उक्त निर्देशातील सूचना क्रमांक 31 नुसार कामाची तपासणी करताना फलक लावण्यात आले किंवा नाही याची खात्री मुख्याधिकारी यांनी करावी, असे नमूद आहे. परंतु अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

4) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 व न.प.अधिनियम,1969 चे कलम 93(4) नुसार मक्तेदाराने जोडलेल्या करारनाम्यावर दोन स्थायी समिती सदस्यांची नावे व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) काम सुरु करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम पुर्ण झाल्यानंतरच्या कामाचे चित्र/फोटो नस्तीस उपलब्ध नाहीत.

6) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी- अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

Item no.	Qty.as per Estimate	Qty as per MB	Rate per unit	कमी खर्च	जादा रक्कम
1B-revinding of electric motor 3phase upto 3hp.	4 no.s	1 no.	2289	6867	
2-supplying erecting DOL starter 400 V.3phase	6 no.s	9 no.s	2060.10	0	6180.30
5-pro.erectig giving test of centrifugal..	5 no.s	2 no.s	16433	49299	0
6-pro.CC Foundation	2 CuM	0	5673.15	11346.30	0
9-pro.structural	0.5 MT	0	56536.20	28268	0

steel work in rolled sections					
			एकूण	**95780.3**	**6180.3**

7) सदर मक्तेदार तुषार इलेक्ट्रीकल्स हे फर्म असलेने आयकर अधिनियम 1961 च्या कलम 194 सी अनुसार प्रदान देयकाची रक्कम रुपये 819244 च्या 2 टक्के आयकर रुपये 16385 वसुल करणे आवश्यक असताना 1 टक्के आयकर वसुल केला आहे तरी कमी आयकर रक्कम रू.5392 वसुल करून पुर्तता करावी.

8) सार्वजनिक बांधकाम नियमावली व लेखासंहितेतील तरतूदीनुसार एखाद्या बाबीसाठी वाढीव काम करावे लागत असल्यास त्यास योग्य त्या तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु अशी मान्यता न घेता वाढीव कामाचे देयक अदा केले आहे. तरी सदर वाढीव खर्च रक्कम लेखापरीक्षणास आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे. उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 5792 वसूलपात्र व रुपये 813452 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहेत.

DATDJSM7401 (Ref No : 9, Hmm No : 6)

36 प्रभाग क्रमांक 11 मेघदूत हॉटेल, शास्त्री सोसायटी, स्वामी मळा परिसरामध्ये GI पाईपलीन टाकणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 318581.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 312762.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5819.00/-

अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराच्या निविदा प्राप्त झाल्यास स्थायी निदेश क्रमांक 36 प्रमाणे फेरनिविदा मागविणेबाबतची कार्यवाही केलेली नाही. करारनामा मुद्रांक कमी रक्कमेचा घेण्यात आलेला आहे. स्थायी निदेश क्रमांक 37 नुसार कामाच्या माहितीचे फलक कामाच्या ठिकाणी लावलेला नाही. करारनामा मुद्रांक कमी रक्कमेचा घेण्यात आलेला आहे. स्थायी निर्देश क्रमांक 36 नुसार कंत्राटदार नोंदणीकृत परवाना धारक नाही. स्थायी निर्देश क्रमांक 37 नुसार विकास कामांमध्ये वापरण्यात येणाऱ्या घटक साहित्याच्या गुणनियंत्रण चाचण्या नियमित व वेळोवेळी घेऊन प्रयोगशाळेकडून अहवाल घेण्यात आलेल्या नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये बदल करून कमी- अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते. दरसुचीमधील General Notes

मधील सूचना क्रमांक 17 नुसार संबंधित पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयक रक्कम अदा करू नये असे नमूद असतानाही test शिवाय मक्तेदारास नमूद बाबीचे देयक अदा करण्यात आले आहे.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात प्रभाग क्रमांक 11 मेघदूत हॉटेल, शास्त्री सोसायटी, स्वामी मळा परिसरामध्ये GI पाईपलीन टाकणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची तपासणी केली असता त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 21 दिनांक 11/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील

कामाचे नाव	प्रभाग क्रमांक 11 मेघदूत हॉटेल, शास्त्री सोसायटी, स्वामी मळा परिसरामध्ये GI पाईपलाईन टाकणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार	नगर पालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 296877
डीएसआर	MJP CSR 2016-17
प्रशासकीय मान्यता	स्थायी समिती सभा क्रमांक 10 ठराव क्रमांक 128 दि.27.02.2018
तांत्रिक मान्यता	Hydrulic Engineer, नगरपरिषद इचलकरंजी क्रमांक , दिनांक नमूद नाही)
निविदा रक्कम	निविदा रुपये 296877
मंजूर निविदा रक्कम	वाटाघाटीअंती8% जादा दराने रुपये 320627
मक्तेदाराचे नांव	विजय लक्ष्मण खिलारे
कामाचे आदेश	दि.06.07.2018
काम सुरु दिनांक	दि.06.07.2018
काम पूर्ण दिनांक	दि.14.08.2018
कामाची मुदत	2महिने

खर्च तपशिल	RA-I व अंतिम =318581 (प्र.क्रमांक 8-77/4.3.2020)

1) अंदाजपत्रकावर तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक नमूद नाही. त्यामुळे तांत्रिक मान्यता कधी देण्यात आली ते स्पष्ट होत नाही.

2) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दि. 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 27 (iv) नुसार कंत्राटदार नोंदणीकृत व आवश्यक असलेले सर्व परवाना धारक असावा. उदाहरणार्थ बांधकाम विषयक बाबीमध्ये कंत्राटदार सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र धारक असावा, पाणीपुरवठा विषयक बाबी साठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील नोंदणीधारक असावा. परंतु सदरप्रमाणे उपरोक्त कामातील मक्तेदाराने नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तरी निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे दिसून येते.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दि.29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी रुपये 8% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी 8% प्रमाणे खर्च झालेली रक्कम रुपये 23750 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

4) स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 03/01/2006 मधील सूचना क्रमांक 29 नुसार रुपये 1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. सूचना 30 नुसार असे सूचना फलक संबंधित कंत्राटदार यांनी स्वखर्चाने लावायची आहेत. अशा प्रकारची अट निविदा पत्र व करारपत्रामध्ये घालण्यात यावी, असे स्पष्ट नमूद केले असताना सदरप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. उक्त निर्देशातील सूचना क्रमांक 31 नुसार कामाची तपासणी करताना फलक लावण्यात आले किंवा नाही याची खात्री मुख्याधिकारी यांनी करावी, असे नमूद आहे. परंतु अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

6) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 37 दि. 03/01/2006 मधील सूचना क्रमांक 17 नुसार विकास कामांमध्ये वापरण्यात येणाऱ्या घटक साहित्याच्या गुणनियंत्रण चाचण्या नियमित व वेळोवेळी घेणेत याव्यात, सूचना 18 नुसार प्रयोगशाळेकडून अहवाल प्राप्त झालेनंतरच देयके अदा करणेत यावीत. परंतु सदरप्रमाणे चाचण्या न घेता देयके अदा केली आहेत.

7) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या

मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी- अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते. तरी सक्षम मंजुरीशिवाय कामातील बदल लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. तसेच कामाचे अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ बनविले असल्याचे दिसून येत नाही.

Item no.	Qty.as per Estimate	Qty as per MB	Rate per unit	कमी खर्च रुपये	जादा रक्कम रुपये
1-Prov.ISI Mark 25mm Dia.GI pipe	500 Rmt	540 Rmt	138	0	5520
3a-Excavation for foundation in HM	95.24 CuM	55.60 CuM	164.22	6510	0
3b- Excavation for foundation in soft rock	95.24 CuM	69.50 CuM	451.86	11631	0
6-Suppl. erecting GI specials	1 job	1 job	19494	14228	0
8-Dewatering the excavated trenches pools of waterhellip;	96 bhp	0	63.24	6071	0
9-Higher charges for concrete breakers compressor	8 days	32 days	2350	0	56400
			एकूण	**38440**	**61920**

8) उक्त नमूद दरसुचीमधील General Notes मधील सूचना क्रमांक 17 नुसार संबंधित पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयक रक्कम अदा करू नये असे नमूद आहे. परंतु अशी test घेतली नसतानाही मक्तेदारास नमूद बाबीचे देयक रक्कम रुपये 5419 अदा करण्यात आले आहेत. तरी सदर रक्कम वसूलपात्र करणेत येत आहे.

9) दरसूची Section I(IV) RCC PIPE अनुक्रमांक 2(B) मधील NOTE नुसार Hydraulic test पूर्ण होईपर्यंत केवळ 85% दर देय ठरतील. परंतु याप्रमाणे कार्यवाही न करता सर्व देयके अदा करण्यात आली आहेत. ही बाब नियमानुकूल नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 5819 वसूलपात्र व रक्कम रुपये 312762 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

37 पंचगंगा व कृष्णा नदी उद्भवावरून येणाऱ्या दाबनलिकेच्या गळती काढणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1084709.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1084109.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 600.00/-

अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविणेची कार्यवाही न करता जादा दर मंजूर केले आहेत. कामाचा माहिती फलक लावण्यात आल्याचे दिसून येत नाही. करारनामा मुद्रांक कमी घेणेत आले आहे. पाईपची समाधानकारक Hydraulic test झाली नसताना पुढील कामे करण्यात आली आहेत. काही बाबीचे परिमाणामध्ये सक्षम मंजुरीशिवाय अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात पंचगंगा व कृष्णा नदी उद्भवावरून येणाऱ्या दाबनलिकेच्या गळती काढणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची पडताळणी करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 26 दिनांक 11/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील-

कामाचे नाव- पंचगंगा व कृष्णा नदी उद्भवावरून येणाऱ्या दाबनलिकेच्या गळती काढणे

लेखाशिर्ष/निधीचा प्रकार - नगर पालिका निधी नगरपरिषद निधी

अंदाजपत्रकीय रक्कम - रुपये 987032

डीएसआर वर्ष/करारनामा दि. - MJP CSR 2015-16

प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती सभा क्रमांक 2 ठराव क्रमांक 9 दि.29.04.2017

तांत्रिक मान्यता - जलअभियंता, नगरपरिषद इचलकरंजी क्रमांक, दिनांक नमूद नाही

निविदा रक्कम - निविदा रुपये 987032

मंजूर निविदा रक्कम - वाटाघाटीअंती 7.50% जादा दराने रुपये 1061059

मक्तेदाराचे नांव - मुरग्याप्पा भिमू पाटील

कामाचे आदेश - दि.29.01.2018

नगरपरिषद इचलकरंजी, 2019-2020

काम सुरु दिनांक - दि. 29.01.2018

काम पूर्ण दिनांक - दि. 25.01.2019

कामाची मुदत - 12 महिने

खर्च तपशिल - RA I II- उपलब्ध नाही

RA-III व अंतिम = 100950 (प्र.क्रमांक 10-79/04.03.2020)

एकूण खर्च=1084709 (पूर्ण कामांच्या माहितीच्या यादीनुसार)

1) पाणीपुरवठा विभागाने सादर केलेल्या पूर्ण अपूर्ण कामांच्या माहितीच्या यादीनुसार उपरोक्त कामावर रक्कम रुपये 1084709 इतका खर्च झाला आहे. परंतु पहिले व दुसरे धावते देयक तपासणीस उपलब्ध झाले नाही. त्यामुळे संबंधित देयकाबाबत पडताळणी करता आली नाही.

2) स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 03/01/2006 मधील सूचना क्रमांक 29 नुसार रुपये 1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. सूचना 30 नुसार असे सूचना फलक संबंधित कंत्राटदार यांनी स्वखर्चाने लावायची आहेत. अशा प्रकारची अट निविदा पत्र व करारपत्रामध्ये घालण्यात यावी, असे स्पष्ट नमूद केले असताना सदरप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. उक्त निर्देशातील सूचना क्रमांक 31 नुसार कामाची तपासणी करताना फलक लावण्यात आले किंवा नाही याची खात्री मुख्याधिकारी यांनी करावी, असे नमूद आहे. परंतु अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी रुपये 7.50% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी 7.50% प्रमाणे खर्च झालेली रक्कम रुपये 74027 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

4) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर 500 रुपये अधिक (+) दहा लाख रुपयांवरील रकमेच्या 0.1%rdquo; असे मुद्रांक शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे. म्हणजेच उपरोक्त कार्यकंत्राट हे रुपये 1061059 चे असलेने रुपये 600 चे मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते. तरी सदर शुल्क वसूल करून भरणा करावे.

5) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

Item no.	Qty.as per Estimate	Qty as per MB	Given Rate per unit	जादा/कमी काम	जादा/कमी खर्च रक्कम रुपये
1-Removing Lickages---	26 No.s	25 No.s	31300.28 per No.	-1 No.	-31300
2-filling in plinth	13 No.s	17 No.s	13325 per No.	+4 No.	+53300

6) Filling In plinth floors/trenches या बाबीनुसार पाईप ची समाधानकारक Hydraulic test होईपर्यंत केवळ 85% दर देय ठरतील. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) मोजमाप नोंदवही नुसार प्रत्येक लिकेजच्या कामाचे तपशीलवार बाबनिहाय कामांच्या बाबी नोंद घेणेत आलेली नाहीत. एका लिकेजच्या कामाचे दर ठरवून सर्व लिकेजसाठी एकाच दराने देयक अदा केले आहे. तरी तपशीलवार मोजमापाअभावी कामाची पडताळणी करता येत नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 600 वसूलपात्र व रक्कम रुपये 1084109 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 11, Hmm No : 8)

38 800 mm व्यासाची मजरेवाडी जॅकवेल कडून येणारी दाबनलिका काळा ओढा आमराई शेड जवळ सरकविणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 291965.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 282507.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9458.00/-

करारनामा मुद्रांक कमी रक्कमेचा घेण्यात आलेला आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराच्या निविदा प्राप्त झाल्यास स्थायी निदेश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 प्रमाणे फेरनिविदा मागविणेबाबतची कार्यवाही केलेली नाही. स्थायी निर्देश क्रमांक 37 नुसार 10% पेक्षा अधिक दराच्या प्राप्त निविदांबाबत सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. अंदाजपत्रकामध्ये Abstract नुसार घेणेत आलेले दर व प्रत्यक्षात DSR मधील दर यात तफावत दिसून येते. General Notes मधील सूचना क्रमांक 17

नुसार पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयकाची रक्कम मक्तेदारास अदा केलेली आहे. General Notes सूचना क्रमांक 22 नुसार 1% Insurance घेणे आवश्यक असताना RA-1 मधून अंदाजपत्रकाच्या 0.5% रक्कम कपात केली आहे.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात 800 mm व्यासाची मजरेवाडी जकवेल कडून येणारी दाबनलिका काळा ओढा आमराई शेड जवळ सरकविणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची तपासणी केली असता त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 24 दिनांक 12/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे. त्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

कामाचा तपशील-

कामाचे नाव	800 mm व्यासाची मजरेवाडी जकवेल कडून येणारी दाबनलिका काळा ओढा आमराई शेड जवळ सरकविणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार	नगरपालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 265779
डीएसआर वर्ष	MJP CSR 2018-19
प्रशासकीय मान्यता	स्थायी समिती सभा क्रमांक 6 ठराव क्रमांक 95 दि.18/08/2018
तांत्रिक मान्यता	जलअभियंता, नगरपरिषद इचलकरंजी क्रमांक 266, दिनांक नमूद नाही
निविदा रक्कम	निविदा रुपये 265779
मंजूर निविदा रक्कम	वाटाघाटीअंती12% जादा दराने रुपये 297672
मक्तेदाराचे नांव	मुरग्याप्पा भिमू पाटील
कामाचे आदेश	दि.02/01/2019
काम सुरु दिनांक	दि.02/01/2019
काम पूर्ण दिनांक	दि. 30/01/2019

कामाची मुदत	1महिने
खर्च तपशिल	RA-I व अंतिम = 291965 (प्र.क्रमांक 320-531/26.12.2019)

1) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

2) अंदाजपत्रकावर तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक नमूद नाही. त्यामुळे तांत्रिक मान्यता कधी देण्यात आली ते स्पष्ट होत नाही.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी रुपये 12% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी 12% प्रमाणे खर्च झालेली रक्कम रुपये 31893 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

4) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 37 नुसार 10% पेक्षा अधिक दराच्या प्राप्त झाल्यास सुधारित अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. ही बाब नियमानुकुल नाही.

5) उपरोक्त कामामध्ये खालीलप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये Abstract नुसार घेणेत आलेले दर व प्रत्यक्षात DSR मधील दर यात तफावत दिसून येते. तरी पुढीलप्रमाणे जादा अदा रक्कम रुपये 4112 वसूल होणे आवश्यक आहे.

Item	**MB Qty.**	**Rate as per DSR (Per Unit) (incl.increase in rate)**	**Given rate as per bill (Per Unit)**	**Excess rate per unit**	**जादा रक्कम अदा रु.**
1	**2**	**3**	**4**	**5=(4-3)**	**6=5x2**
2-dewatering the excavated trenches	240 dhp/hr	67.20	69.30	2.1	504
5-lowering laying and jointing SBR RUBBER gaskets 800mm C.I. S/S PIPES(without rubber	24.90 rmt	560.7	705.6	144.9	3608

ring)					
			एकूण		**4112**

6) उक्त नमूद दरसुचीमधील General Notes मधील सूचना क्रमांक 17 नुसार संबंधित पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयक रक्कम अदा करू नये असे नमूद आहे. परंतु अशी test घेतली नसतानाही मक्तेदारास नमूद बाबीचे देयक रक्कम रुपये 3617 अदा करण्यात आले आहेत. तरी सदर रक्कम वसूलपात्र करणेत येत आहे.

7) दरसूची Section I : C.I./D.I. PIPES मधील NOTE नुसार Hydraulic test पूर्ण होईपर्यंत केवळ 85% दर देय ठरतील. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8) दरसूची General Notes सूचना क्रमांक 22 नुसार 1% Insurance घेणे आवश्यक असताना RA-1 मधून अंदाजपत्रकाच्या 0.5% रक्कम कपात केली आहे. तरी उर्वरित 0.5% रुपये 1329 वसूल करून भरणा करावे.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 9458 वसूलपात्र व रक्कम रुपये 282507 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 13, Hmm No : 10)

39 मलशुद्धीकरण केंद्र (सिवेज ट्रीटमेंट प्लांट (STP)) देखभाल दुरुस्ती व प्रचालन करणे (त्रैवार्षिक) कामातील उणिवाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1735993.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1710389.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25604.00/-

प्रशासकीय मान्यता आदेश कामाच्या नस्तीसोबत तपासणीकामी उपलब्ध झालेले नाही. कार्यारंभ आदेशानुसार कामाच्या तपशिलाचा फलक लावण्यात आलेले नाही. मुदतवाढ करारांचे मुद्रांक शुल्क घेणेत आलेले नाही. अंदाजपत्रकातील काही बाबींवर बाजारभावातील दराप्रमाणे दर निश्चित करण्यात आले आहे परंतु त्याबाबत आवश्यक कागदपत्रे कामाच्या नस्तीसोबत उपलब्ध झालेले नाही.तसेच साहित्याचा साठा व इतर तपशील उपलब्ध नाही. प्रक्रियायुक्त पाणी पुनर्वापराबाबत कार्यवाही झालेली नाही. मलशुद्धीकरण केंद्रावरील कर्मचाऱ्यांचे लेखे उपलब्ध नाहीत. कामाचे प्रयोगशाळा चाचणी अहवाल उपलब्ध नसताना रक्कम रुपये 20000

चाचणी खर्च अदा करणेत आला आहे.

नगरपरिषद इचलकरंजी यांचेकडील सन 2019-20 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये सिवेज ट्रीटमेंट प्लांट (STP) देखभाल दुरुस्ती व प्रचालन करणे (त्रैवार्षिक) कामावर रक्कम रु.1735993 खर्च करण्यात आला आहे. त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 80 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील-

कामाचे नाव -	सिवेज ट्रीटमेंट प्लांट (STP) देखभाल दुरुस्ती व प्रचालन करणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार -	नगर पालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम -	रु.1162838.60 वार्षिक, रु.3488515.80 त्रैवार्षिक
डी.एस.आर. वर्ष	MJP DSR 2013-14
प्रशासकीय मान्यता -	उपलब्ध नाही. (जलअभियंता यांचे टिपणी दि.12.8.2014 वर नगराध्यक्ष यांनी कार्योत्तर मंजुरी घेणेविषयी सूचित केले आहे.)
तांत्रिक मान्यता -	आदेश उपलब्ध नाही. अंदाजपत्रक मुद्रांकित नाही.
निविदा रक्कम -	रक्कम रु.3488516
मंजूर निविदा रक्कम -	वाटाघाटीअंती 8.99 % जादा दराने मंजूररु.3802134
मक्तेदाराचे नांव -	ओम इंडस्ट्रीज,डोंबिवली
कामाचे आदेश ndash;	जा.क्र.इ.न.प./वसि/6649/1 2013 दि.01.12.2014
कामाची मुदत -	36 महिने
कंत्राटास पहिली मुदत वाढ (31.3.2018 पर्यंत)	आदेश क्र.14 दि.1.1.2018 कौन्सिल सभा क्र.24 ठराव क्र.282 दि.30.12.2017
कंत्राटास दुसरी मुदत वाढ 31.12.2018 पर्यंत	वर्क ऑर्डर-क्र.36 दि.1.4.2018 कौन्सिल सभा क्र.8 ठराव क्र.118 दि.29.09.2018

मोजमाप पुस्तक क्रमांक ndash;	258

खर्च तपशील-

अ.क्र.	**प्र.क्र.**	**दिनांक**	**रक्कम रु.**	**खर्च तपशील**	**मक्तेदार**	**प्रत्यक्ष कामाचा कालावधी**
1	89/41	5.11.19	573731	मलशुद्धीकरण	ओम इंडस्ट्रीज,डोंबिवली	उपलब्ध नाही.
2	86/40	6.9.19	636525	मलशुद्धीकरण	ओम इंडस्ट्रीज,डोंबिवली	1.6.2018 ते 30.11.2018= 6 महिने
3	87/40	6.9.19	525737	मलशुद्धीकरण	ओम इंडस्ट्रीज,डोंबिवली	1.1.2018 ते 31.5.2018=5 महिने
		एकूण	**1735993**			

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्र.36 दि.29.12.2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी रु.8.99% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी जादा दराचा खर्च आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) उपरोक्त कामाकरिता विहित प्रशासकीय मंजुरी घेणेत आलेचे दिसून येत नाही. जलअभियंता यांचे टिपणी दि.12.8.2014 वर नगराध्यक्ष यांनी सभेची कार्योत्तर मंजुरी घेणेविषयी सूचित केले आहे. परंतु अशा कार्योत्तर मंजुरीचे आदेश उपलब्ध नाहीत. तथापि सदर कामास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे की नाही याबाबत खात्री करता आली नाही.

3) मक्तेदार ओम इंडस्ट्रीज,डोंबिवली यांना दिलेल्या कामाच्या आदेशातील अट क्रमांक 8, करारनामा अट क्रमांक 19 नुसार कामाचे ठिकाणी कामाचा फलक लावणे गरजेचे होते. मात्र असा फलक लावलेबाबत छायाचित्र नस्तीस उपलब्ध नाही.

4) मक्तेदार ओम इंडस्ट्रीज,डोंबिवली यांचे कार्यकंत्राटास दिनांक 31.03.2018 पर्यंत 3 महिन्यांची प्रथम मुदतवाढ व दिनांक 31.12.2018 पर्यंत 9 महिन्यांची दुसरी मुदतवाढ देण्यात आली आहे. व रुपये 500 चे मुद्रांक पेपर वर मुदतवाढ करार करणेत आला आहे. तथापि सदर दोन्ही मुदतवाढीचे वेळी महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा)

कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर 500 रुपये अधिक (+) दहा लाख रुपयांवरील रकमेच्या 0.1%rdquo; असे मुद्रांक शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे. म्हणजेच उपरोक्त कार्यकंत्राट हे रु. 3802134 चे असलेने रु.10 लाखाचे वरील रक्कम रु.2802134 चे 0.1% प्रमाणे रुपये 2802 मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक होते. तरी दोन्ही मुदतवाढ करार हे नवीन कार्यकंत्राट असलेने रु.2802 प्रमाणे दोन करारांचे एकूण रुपये 5604 चे मुद्रांक शुल्क वसूल करून भरणा करावे.

5) नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण निश्चित करणेबाबत नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-2016/प्र.क्र.259/नवि-33 दिनांक 30 नोव्हेंबर, 2017 मधील परिच्छेद क्रमांक 5 मध्ये सांडपाणी पुर्नवापर प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे देण्यात आला आहे.

1.औष्णिक विद्युत केंद्र,

2.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत औद्योगिक क्षेत्र,

3.रेल्वे किंवा अन्य बल्क बायर्स,

4.कृषी प्रयोजनार्थ,

5.पिण्यायोग्य नसलेल्या घटकांसाठी प्रक्रियायुक्त पाणी पुनर्वापर

तसेच उक्त निर्णयातील परिच्छेद क्रमांक 6.2.3 नुसार राज्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिक्षेत्रातील उद्योगांना त्यांच्या सभोवतालच्या 50 कि.मी.परिघातील उपलब्ध प्रक्रियायुक्त सांडपाणी प्राधान्याने वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

नगरपरिषद इचलकरंजी हद्दीमध्ये पाण्याच्या पुनर्पवापराबाबत उक्त प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत औद्योगिक क्षेत्रांना प्रक्रियायुक्त पाणी पुरविणे आवश्यक होते. परंतु पुनर्वापराबाबत कोणतीही कार्यवाही झालेचे नस्तीवरून दिसून येत नाही.

6) मलशुद्धीकरण केंद्रावरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, उपस्थिती व इतर कामाचा अहवाल नस्तीस उपलब्ध नाही. त्यामुळे केंद्रावर प्रत्यक्ष किती कामगार कार्यरत असतात याबाबत पडताळणी करता आली नाही. त्यामुळे संबंधित कामगारांवर होणारा खर्च वैध असलेबाबाबत खात्री करता आली नाही.

7) अंदाजपत्रकानुसार पुढील नमूद बाबीवर बाजार भावाप्रमाणे दर ठरविण्यात आलेचे नमूद आहे. परंतु बाजार भाव कोणत्या आधारे निश्चित केला त्याबाबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तथापि सदर बाबींचे दर योग्य असलेबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

अ.क्र.	**देयक**	**बाब**	**दर**	**Unit**	**प्रत्यक्ष Qty.**	**एकूण**
1	87/40-6.9.2019=525737	Item 5-To operate and maintain STP by consumables	8000	Job	5	40000
		Item 6-T.C.L.	25	KG	250	6250

		Item 7-To operate and maintain STP by collecting sample and testing as per specification	1000	test	8	8000
2	86/40-6.9.2019=636525	Item 5-To operate and maintain STP by consumables	8000	Job	6	48000
		Item 6-T.C.L.	25	KG	300	7500
		7-To operate and maintain STP by collecting sample and testing as per specification	1000	test	12	12000
		एकूण				**121750**

8) उपरोक्त प्रमाणकांमध्ये पुरविण्यात आलेल्या T.C.L .,Consumables बाबत खरेदी साहित्याची साठा रजिस्टर उपलब्ध नाही. त्यामुळे अंदाजपत्रकानुसार व मोजमाप पुस्तिकेनुसार वापरलेले साहित्य यांची पडताळणी करता आली नाही. तरी T.C.L.वरील खर्च रु.13750 व Consumables वरील खर्च रु.88000 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहेत.

9) अंदाजपत्रकातील बाब 7 मध्ये नमूद केलेप्रमाणे District Public Health Laboratory किंवा any engineering college यांचेकडून नमुना चाचणी अहवाल घेणेकरिता दर अदा करण्यात आला आहे. परंतु सदरप्रमाणे नमूद प्रयोगशाळांचे चाचणी अहवाल सादर केले नसताना रुपये 20000 अदा करणेत आले आहेत. तरी सदर चाचणी वरील खर्च रक्कम रु.20000 वसूलपात्र करणेत येत आहे.

उपरोक्त उणिवापोटी प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पाची व्यवहार्यता पडताळणी करता आली नाही. तथापि मुद्दा क्रमांक 4 व 9 मधील उणिवापोटी रक्कम रुपये 25604 लेखापरीक्षणास वसूलपात्र व रुपये 1710389 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 93, Hmm No : 11)

40 जुना चंदूर रोड, चंदूर नाला येथे नाईक मळ्याजवळ मातीचा बंधारा बांधणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 338070.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 327431.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 10639.00/-

कामाचे पहिले धावते देयक रक्कम रुपये 161957 व मूळ मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. करारनामा मुद्रांक कमी रकमेचे घेण्यात आले आहे. महाराष्ट्र लेखा संहिता,2011 मधील नियम क्र.132(1) नुसार मूळ अंदाजपत्रक 10% पेक्षा अधिकचे असल्याने सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 नुसार अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक झालेल्या कामास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतलेली नाही. कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची स्वामित्व धनाची त्यावरील DMF ची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात जुना चंदूर रोड, चंदूर नाला येथे नाईक मळ्याजवळ मातीचा बंधारा बांधणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची तपासणी केली असता त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 28 दिनांक 15/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील-

कामाचे नाव - जुना चंदूर रोड, चंदूर नाला येथे नाईक मळ्याजवळ मातीचा बंधारा बांधणे

लेखाशिर्ष/निधीचा प्रकार

अंदाजपत्रकीय रक्कम - रुपये 299439

डीएसआर वर्ष MJP DSR 2018-19

प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती सभा क्र.9 ठराव नं.137 दि.23.10.2018

तांत्रिक मान्यता - जल अभियंता यांचेकडील क्र.468/19 रुपये 299439

निविदा रक्कम - रुपये 299439

मंजूर निविदा रक्कम - 12 % जादा दराने मंजूर रुपये 335372

मक्तेदाराचे नांव - दगडू बाबू वडर

कामाचे आदेश दि.01.01.2019

काम सुरु दिनांक - दि.01.01.2019

काम पूर्ण दिनांक - दि.30.06.2019

कामाची मुदत - 6 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक 229

खर्च तपशिल - RA-1=224517 (प्रत उपलब्ध नाही)

RA-2 FINAL=113552 (प्र.क्र.520-379 /26.3.2020)

TOTAL=338070

1) उपरोक्त कामाचे पहिले धावते देयक रक्कम रुपये 224517 हे तपासणीस उपलब्ध झालेले नाही. तथापि सदर

खर्च आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) उपरोक्त कामाची मूळ मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तरी मोजमापांची पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

4) लेखा संहिता,2013 मधील नियम क्र.132(1)नुसार मूळ अंदाजपत्रक 10% पेक्षा अधिक असण्याची शक्यता असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत येईल. परंतु अशी कार्यवाही न करता उपरोक्त कामाची निविदा 12% जादा दराने मंजूर करणेत आली आहे.

5) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

Item no.	Unit	Qty.as per Estimate	Qty as per MB	Given Rate per unit	कमी खर्च रुपये
3-prolowering laying jointing RCC pipes 450 mm	SqM	86.4	65.86	981.75	-20165.1
6-Pro. constructing coffer Dam	CuM	202.4	120.57	547.05	-44765.1
7-Pro.majdoor for TCL dosing	No.	120	336	326	70416

6) महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, मे-11, 2015/वैशाख21,1937,दिनांक11/05/2015अन्वये कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची स्वामित्व धनाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदर कामास 65.86 CuM rubble stone चे वापरण्यात आले असून त्यावरील royalty उक्त नियमाप्रमाणे रुपये 141.34 प्रति घ.मी.प्रमाणे एकूण रुपये 9309 व त्यावरील DMF चार्जेस रुपये 930 वसूल करून भरणा करावे.

7) सदरचे कामामध्ये T.C.L. पावडर पुरविणेकरिता रुपये 9500 ची पावडर खरेदी करून Dosing साठी वापरण्यात आलेल्या 336 मजुरांच्या मजुरीवर खर्च रुपये 109536 करण्यात आला आहे. परंतु जुना चंदूर रोड पुलाजवळ मातीचा बंधारा बांधणे या दुसऱ्या कामामध्ये उक्त कामा इतकीच T.C.L. पावडर पुरविली असून त्यासाठी 135 मजूर लागले आहेत. तरी उक्त कामामध्ये तितक्याच कामासाठी 201 जास्त मजूर कशाप्रकारे लागले याबाबत खात्री करता आली नाही. तथापि, सदर बाबीवरील खर्च लेखापरीक्षणास मान्य करता करता येणार नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 10639 वसूलपात्र व रक्कम रुपये 327431 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 96, Hmm No : 92)

41 14 वा वित्त मुलभूत अनुदानातून (16-17) बोअरवर सबमर्सिबल पंप व अनुषंगिक कामांच्या प्रक्रियेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 1440333.00 /-

नियमबाह्यपणे कामांची विभागणी करून निविदा प्रक्रिया राबविली आहे. मक्तेदार निवड योग्य प्रकारे झालेली नाही.

14 वा वित्त आयोग मुलभूत अनुदानातून (16-17) पुढीलप्रमाणे बोअरवर सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे या 15 कामांची रक्कम रुपये 1440333 ची देयके अदा करण्यात आली आहेत. त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 77 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.
1) स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29.12.2005 मधील सूचना क्र.18 नुसार कामाची विभागणी करून कार्यादेश देणे हो कृती नियमबाह्य आहे. एक प्रकारचे कामाची निविदा, जर पुढील तीन महिन्यात पुन्हा होणार असेल तर ती वेगवेगळी न बोलविता, एकत्र स्वरुपाची मागविण्यात यावी. असे स्पष्ट निर्देश असताना एकाच ठिकाणच्या कामांची विभागणी करून कामांची निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. तरी सदर प्रक्रिया सदोष दिसून येते.
2) स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29.12.2005 मधील सूचना क्र.19 नुसार नगरपरिषदांना काही कामे पुन्हा पुन्हा करावी लागतात.उदा. पाणीपुरवठा पाईपलाईन दुरुस्त्या,मोटर/पंप दुरुस्ती. अशाकामांना प्रत्येक वेळी निविदा बोलवणे शक्य होत नाही. अशा कामांकरिता विहित कालावधीकरिता दरकरार करणेसाठी निविदा मागविण्यात याव्यात. परंतु अशी कार्यवाही न करता प्रत्यके दुरुस्तीच्या कामासाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करून कामाचे आदेश देण्यात आले आहेत.
3) स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29.12.2005 मधील परिशिष्ट-ब(24) नुसार करारपत्राच्या वैधतेसाठी

अधिनियमातील तरतुदीनुसार करारपत्रावर स्थायी समिती सदस्यांची सही असावी परंतु उपरोक्त कामांच्या करारपत्रावर विनामुद्रांकित स्वाक्षऱ्या असलेने सदर स्वाक्षऱ्या स्थायी समिती सदस्यांच्या असलेबाबत खात्री होत नाही.

4) तुषार इलेक्ट्रिकल, कबनूर यांचे निविदा नस्तीस जोडलेले विद्युत अनुज्ञप्ती प्रमाणपत्र तपासले असता त्यावर bid capacity नमूद नाही. परंतु नगरपरिषद इचलकरंजीकडील मक्तेदार नोंदणी शिफारस प्रमाणपत्रानुसार तुषार इले.यांची bid capacity रुपये 10 लाख इतकी दिसून येते. तरी त्यांनी केलेली वार्षिक कामे ही रुपये 10 लाखाचे वर असलेचे दिसून येते. तुषार इलेक्ट्रिकल्स यांचे बँक solvency प्रमाणपत्र नस्तीस उपलब्ध नाही. तरी स्थायी निर्देश क्र.36 मधील सूचना 27(ii) नुसार मक्तेदार तुषार इलेक्ट्रिकल, कबनूर यांची आर्थिक क्षमता प्रमाणित होत नाही. तरी मक्तेदार निवड सदोष झाल्याचे दिसून येते.

5) स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 3.1.2006 मधील सूचना क्र.9 नुसार तांत्रिक अधिकाऱ्याने कामाची मोजमापे घेतलेल्या स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद मोजणी पुस्तकात करावी. त्याचप्रमाणे सोबत असलेले लोकप्रतिनिधी/नागरिक यांची स्वाक्षरी सुद्धा घेण्यात यावी. व अशी नोंद असल्याशिवाय लेखा विभागाने देयक अदा करू नये. असे स्पष्ट आदेशित केले आहे. परंतु उपरोक्त कामाचे मोजणी पुस्तकात तांत्रिक अधिकाऱ्याने विनादिनांकित स्वाक्षरी केली आहे. तसेच लोकप्रतिनिधी/नागरिक यांची स्वाक्षरी घेतलेली नाही. मोजणी पुस्तकासोबत बचत अधिक्य प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

6) सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका 1984 मधील परिशिष्ट क्र. 24 नुसार देयक पारीत केल्यावर मोजमाप पुस्तकातील नोंदींवर लाल शाईने रेष मारुन मोजमाप पुस्तकात प्रमाणक क्रमांक, दिनांक, रक्कम नमूद करणे आवश्यक आहे.परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 2011 मधील प्रकरण 17 वस्तुसूची अंतर्गत नियम 250 नुसार भांडारपाल,वस्तुसूची नोंदवही नमुना क्रमांक 21 मध्ये ठेवण्यात ठेवील. वस्तुसूची हा कायम अभिलेख असून ती प्राधिकृत अधिकाऱ्याच्या वैयक्तिक पर्यवेक्षणाखाली ठेवण्यात येईल.

8) प्रमाणे वस्तुची नोंदवही ही कायम अभिलेख असुन ती प्राधिकृत अधिकाऱ्याच्या वैयक्तिक पर्यवेक्षणाखाली ठेवण्यात आली पाहिजे. तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) जुने बोअर/हातपंप काढून त्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविण्यात आले आहेत. परंतु जुन्या साहित्याची साठा नोंदवही उपलब्ध नाही. त्यामुळे सदर साहित्य नगरपरिषद भांडार येथे पोहोच केलेबाबत खर्च मान्य करता येणार नाही.

10) प्रमाणकावर नमूद केलेनुसार सदरच्या कामांवर 14 व्या वित्त आयोग अंतर्गत 2016-17 मुलभूत अनुदानातून खर्च करण्यात आल्याचे नमूद आहे. परंतु सदर कामे नगरपरिषद निधीतून खर्च झाल्याचे दिसते. तरी सदर खर्च नेमका कोणत्या निधीमधून झाला आहे याबाबत स्पष्टता दिसून आली नाही.

11) सोलगे मळा सोमनाथ लोखंडे घराजवळ व लोखंडे घराजवळ सोलगे मळा या कामांच्या नावावरून ही कामे एकाच ठिकाणची असलेचे दिसून येते. तरी सदर कामे ही भिन्न असलेबाबत समर्पक कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन सादर होणे आवश्यक आहे.

DATRDMF8501 (Ref No : 98, Hmm No : 94)

42 नगरपरिषद हद्दीत विविध 8 बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे कामांतील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 754807.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 728209.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 26598.00/-

एका कामाचे देयक प्राप्त झाले नाही. कामाची विभागणी करून एकाच मक्तेदारास कार्यादेश देण्यात आले आहेत. एकूण खर्च रुपये 3 लाखाचे वर जात असून सदर कामांची एकत्रित ई-निविदा काढणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. कामाची चाचणी देणे करिता रक्कम रुपये 3000 प्रत्येक कामातून केली आहे. परंतु 6 कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत. हातपंप काढलेनंतरचे साहित्याबाबत कोणताही तपशील उपलब्ध नाही. नगरपरिषदेकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. 8 कामांचे मोजमापानुसार बाब 1 dismantling the hand pump etc ही Execute केलेली नाही. तरी संबंधित ठिकाणी हातपंप अस्तित्वात नसेल तर बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे हे काम कसे करता आले याबाबत खात्री करता आली नाही. महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार मुद्रांक शुल्क घेण्यात आलेले नाही. मोजमाप पुस्तकात एकूण झालेल्या कामाचे एकत्रित गोषवाऱ्यासह अंतिम मुल्यांकन दर्शवून तसे प्रमाणिकरण करण्यात आलेले नाही.

नगरपरिषद हद्दीत पुढीलप्रमाणे बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणेवर देयके अदा करण्यात आली आहेत. त्यातील पुढील नमूद 8 कामांची पूर्ण देयके प्रदान करण्यात आली आहेत. त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 78 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.
कामांचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ.क्र.	कामाचे नाव	खर्च रक्कम	मक्तेदाराचे नाव	काम पूर्ण

				दिनांक
1	प्र.क्र.3 सोलगे घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंपबसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	91715	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
2	प्र.क्र.रामनगर येथील गल्ली नं.1 जाधव घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंपबसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	98405	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
3	प्र.क्र.19 गट 4 चंद्रकांत घोटणे घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंपबसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	95220	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
4	प्र.क्र.14 हनुमान गल्ली नं.5 गोलंदाज घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	92193	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
5	प्र.क्र.13 रावळ घर इंदिरानगर येथे बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	98365	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
6	प्र.क्र.10 लिगडे मळा राजगिरे मिल्सजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंपबसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	92324	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
7	प्र.क्र.10 हनुमान नगर संजय साळुंखे घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंपबसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	95469	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
8	शिंदे घराजवळ कारंडे मळा गल्ली नं.1 बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे (प्रमाणक उपलब्ध नाही)	91116	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19

	एकूण	**754807**		

उपरोक्त कामांबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) उक्त नमूद अ.क्र.8 ldquo;शिंदे घराजवळ कारंडे मळा गल्ली नं.1 बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणेrdquo; या कामाचे देयक लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे संबंधित कामावरील खर्च पडताळणी करता आली नाही.

2) स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29.12.2005 मधील सूचना क्र.18 नुसार कामाची विभागणी करून कार्यादेश देणे हो कृती नियमबाह्य आहे. एक प्रकारचे कामाची निविदा, जर पुढील तीन महिन्यात पुन्हा होणार असेल तर ती वेगवेगळी न बोलविता, एकत्र स्वरुपाची मागविण्यात यावी. परंतु उक्त नियमाप्रमाणे कार्यवाही न करता कामाची विभागणी करून एकाच मक्तेदारास कार्यादेश देण्यात आले आहेत. ही बाब नियमबाह्य आहे.

3) अ.क्र.1 ते 8 मधील कामांवर एकूण रुपये 754807 इतका खर्च करण्यात आला आहे. सदर एकूण खर्च रुपये 3 लाखाचे वर जात असून सदर कामांची एकत्रित ई-निविदा काढणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

4) उपरोक्त सर्व कामांतील बाब क्र.9- Taking yield/ capacity testing of existing/new bore well नुसार कामाची चाचणी देणे करिता रक्कम रुपये 3000 ची तरतूद करून प्रत्येक कामातून ही रक्कम अदा केली आहे. परंतु अ.क्र.7 व्यतिरिक्त इतर 6 कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत. तरी सदर 6 देयकातून अदा करण्यात आलेली रुपये 3000 प्रमाणे रक्कम रुपये 18000 चा खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

5) पुढील कामांचे मोजमापानुसार बाब 1 dismantling the hand pump etc करिता रक्कम रुपये 1880 अदा करण्यात आले आहेत. परंतु सदरप्रमाणे हातपंप काढलेनंतरचे साहित्याबाबत कोणताही तपशील उपलब्ध नाही. नगरपरिषदेकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तरी सदर साहित्य साठा नोंदवहीस नोंद घेतलेची खात्री करता येत नाही. तरी उक्त बाबीवरील खर्च रक्कम रुपये 3760 लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

अ.क्र.	**कामाचे ठिकाण**	**बाब क्र.1 वरील खर्च रुपये**
1	प्र.क्र.3 सोलगे घराजवळ	1880
2	प्र.क्र.रामनगर येथील गल्ली नं.1 जाधव घराजवळ	1880
	एकूण	**3760**

6) पुढील कामांचे मोजमापानुसार बाब 1 dismantling the hand pump etc करिता अंदाजपत्रकात तरतूद करूनही MB नुसार सदर बाब Execute केलेली नाही. तरी संबंधित ठिकाणी हातपंप अस्तित्वात नसेल तर ldquo;बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणेrdquo; हे काम कसे करता आले याबाबत खात्री करता आली नाही. तथापि, बोअरच्या ठिकाणी हातपंप बसविल्याच्या या कामांवरील खर्च लेखापरीक्षणात तात्पुरता अमान्य

करणेत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	खर्च रक्कम रुपये
3	प्र.क्र.19 गट 4 चंद्रकांत घोटणे घराजवळ	95220
4	प्र.क्र.14 हनुमान गल्ली नं.5 गोलंदाज घराजवळ	92193
5	प्र.क्र.13 रावळ घर इंदिरानगर	98365
6	प्र.क्र.10 लिगडे मळा राजगिरे मिल्सजवळ	92324
7	प्र.क्र.10 हनुमान नगर संजय साळुंखे घराजवळ	95469
8	शिंदे घराजवळ कारंडे मळा गल्ली नं.1	91116
	एकूण	**564687**

7) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते परंतु केवळ रुपये 100 चे मुद्रांक घेणेत आले आहेत. तरी उपरोक्त 8 कामांचे उर्वरित मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 400 प्रमाणे रुपये 3200 वसूल करून भरणा करावे.

8) पुढील कामांतील बाब क्र.3 -G.I. पाईप पुरविणे व बाब क्र.4 मध्ये copper cable पुरविणे या बाबींवर केलेला खर्च पाहता G.I. पाईपची लांबी ही COPPER CABLE च्या लांबीपेक्षा अधिक दिसून येते. परंतु Standard Specification व अदांजपत्रकानुसार G.I. पाईप पेक्षा COPPER CABLE ही 5Rmt. पर्यंत जास्त असू शकेल. परंतु पुढील कामांचे मोजमापानुसार 5 Rmt. पेक्षा अधिक लांबीची Copper Cable चे देयक अदा करणेत आले आहे. तरी 5 Rmt.पेक्षा अधिक लांबीवरील खर्च दर प्रति Rmt.रुपये 78 प्रमाणे एकूण रुपये 1638 लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	बाब क्र.3 - G.I.पाईप (Rmt.)	बाब क्र.4 - copper cable (Rmt.)	5 Rmt. पेक्षा अधिक (Rmt.)	अधिक लांबीवरील खर्च रुपये
5	प्र.क्र.13 रावळ घर इंदिरानगर	55	70	10	780

7	प्र.क्र.10 हनुमान नगर संजय साळुंखे घराजवळ	54	60	1	78
8	शिंदे घराजवळ कारंडे मळा गल्ली नं.1	57	72	10	780
			एकूण	**21**	**1638**

9) स्थायी निर्देशानुसार मुख्याधिकारी यांनी कामांच्या कांही बाबीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसा शेरा मोजमाप पुस्तकात नमूद करणे आवश्यक असता तशी कार्यवाही नाही. मोजमाप पुस्तकात एकूण झालेल्या कामाचे एकत्रित गोषवाऱ्यासह अंतिम मुल्यांकन दर्शवून तसे प्रमाणिकरण करण्यात आलेले नाही.

उपरोक्त उणिवापोटी खर्च रक्कम रुपये 728209 तात्पुरती अमान्य व रुपये 26598 अंतिम अमान्य करणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 99, Hmm No : 95)

43 वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत डी झोन सांगली नाका येथील पाण्याची टाकी येथे 500 mm DIK-9 पाईप पुरविणे या अपूर्ण कामातील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 8418991.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 8418991.00/-

निविदाकाराने मंजूर केलेल्या काही दरापेक्षा अधिक दर मंजूर केलेचे दिसते. करारनामा वेगळ्याच दराचा दिसून येतो.प्रथम निविदेपेक्षा जादा दर असलेली फेरनिविदा मंजूर केल्याचे दिसून येते. प्रमाणक उपलब्ध न झालेने नेमक्या किती दराने देयक अदा करणेत आले आहे याची खात्री करता येत नाही. ई-निविदेबाबत शासन निर्णयाचा सोयीस्कर अर्थ लावून निविदा मंजूर केली असल्याचे दिसून येते. निविदा प्रक्रिया मक्तेदाराचे हितसंबंध जोपासणारी असल्याचे दिसून येते. कामाची मुदत संपली असूनही काम पूर्ण नाही व `मुदतवाढ मागणी केलेली नाही. योजनेच्या किर्दीमध्ये खर्चाचा तपशील नोंद नाही. अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात पुरवठा केल्याचे दिसून येते. मुदतीत पूर्ण अनुदान खर्च झालेले नाही व शिल्लक अनुदान शासनास परत करणेची कार्यवाही झालेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत डी झोन सांगली नाका येथील पाण्याची टाकी येथे 500 mm DIK-9 पाईप पुरविणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची पडताळणी करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 79 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील-

कामाचे नाव -	वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत डी झोन सांगली नाका येथील पाण्याची टाकी येथे 500 mm DIK-9 पाईप पुरविणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार	90% वैशिष्ट्यपूर्ण योजना शासन हिस्सा व 10% नगरपरिषद हिस्सा
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 1,95,21,510 /-
प्रशा.मान्यता	मा.जिल्हाधिकारी आदेश क्र.कार्या 11/नपा/आरआर/681E/2018 दि.15/11/2018
सुधारित प्रशा.मान्यता	मा.जिल्हाधिकारी आदेश क्र.कार्या 11/नपा/आरआर/348E/2020 दि.11/03/2020
डीएसआर वर्ष	MJP DSR 2018-19
काम मंजुरी ठराव	कौन्सिल सभा ठराव क्रमांक 11,ठराव क्रमांक 95 दिनांक 28/03/2018
तांत्रिक मान्यता -	आदेश उपलब्ध नाही. रुपये 1,95,21,510 /-
प्रथम निविदा	दि.28/12/2018 अखेर 2 निविदा प्राप्त
द्वितीय मुदतवाढ	दि.31/12/2018 अखेर 3 निविदा प्राप्त
फेरनिविदा दिनांक	दैनिक पुढारी व राष्ट्रगीत दि.12/02/2019
निविदा रक्कम -	रुपये 19521510 /-
मंजूर निविदा रक्कम -	12 % जादा दराने मंजूररुपये 2,18,64,091 /-
मुद्रांक शुल्क	रुपये 23500/-

मक्तेदाराचे नांव -	मुरग्याप्पा भिमू पाटील
कामाचे आदेश ndash;	जा.क्र.पा.पु./वसि/180 /2019 दि.13/09/2019
काम सुरु दिनांक -	दि. 13/09/2019
काम पूर्ण दिनांक -	सन 2019-20 अखेर अपूर्ण
कामाची मुदत -	3 महिने
कामास मुदतवाढ	संबंधित लेखे उपलब्ध नाहीत
मोजमाप पुस्तक क्रमांक ndash;	337
खर्च तपशिल -	RA-1= 8418991 (उपलब्ध नाही)

निविदा प्रक्रियेबाबत तपशील-

प्रथम निविदेस एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे प्रथम मुदतवाढ देण्यात आली. त्यात दोनच निविदा प्राप्त झाल्या. त्यामुळे पुन्हा द्वितीय मुदतवाढ देण्यात आली, यावेळेस पुढील तीन निविदा प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अ.क्र.	**निविदाधारक**	**प्राप्त निविदा दर**
L1	सिद्धिविनायक ट्रेडर्स	16.80% जादा
L2	M D INFRASTRUCTURE	17.81 % जादा
L3	साई भूमी CONSTRUCTION	19% जादा

यातील L1 निविदाधारक सिद्धिविनायक ट्रेडर्स यांनी वाटाघाटीस दिलेल्या उत्तरादाखलच्या दि.02/01/2019 च्या पत्रामध्ये टेंडरचे दर योग्य असून ते स्वीकृत करणेची विनंती केली आहे. परंतु पाणीपुरवठा विभाग 24/01/2019 चे टिपणीमध्ये L1 ने वाटाघाटीस असमर्थता दर्शविल्याचे नमूद करून फेरनिविदा प्रसिद्ध करणेस मागणी करून मुख्याधिकारी यांनी दि.25/01/2019 ला सदर टिपणी मंजूर केली आहे. त्यानुसार सिद्धिविनायक ट्रेडर्स ची 16.80% जादा दराची निविदा नाकारून फेरनिविदा काढण्यात आली आहे. त्यास दुसऱ्यांदा मुदतवाढ देऊनही पुढील एकच निविदा प्राप्त झाली आहे.

अ.क्र.	निविदाधारक	प्राप्त निविदा दर
L1	मुरग्याप्पा पाटील	30% जादा

सदर निविदाकारास विभागाने वाटाघाटीस पत्र जा.क्र.322 दि.18/02/2019 देण्यात आले आहे , त्यास उत्तर न आलेने दि.22/02/2019 रोजी वाटाघाटीचे स्मरणपत्र दिले आहे. त्यास उत्तरादाखल निविदाधारक मुरग्याप्पा पाटील यांनी दि.11/03/2019 रोजी 26.50% जादा दराने करणेस तयार असलेचे कळविले आहे. (आवक क्रमांक 22754,11.3.2019).

सदर निविदा प्रक्रियेबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) उपरोक्त तपशिलात नमूद केलेप्रमाणे फेरनिविदेतील निविदाकार पाटील यांनी वाटाघाटी स्मरणपत्राच्या उत्तरादाखल 26.50% जादा दराने पुरवठा करणेचे उत्तर कळविले असताना स्थायी समिती सभा क्र.4 मधील दर मंजुरी ठराव क्र.63 दि.11/09/2019 मध्ये रुपये 26.98 % जादा दराचा म्हणजेच 0.48% अधिकचा दर मंजूर केला आहे. परंतु करारपत्रानुसार 12% जादा दाराची निविदा मंजूर असलेबाबत नमूद आहे. व मुद्रांक शुल्क त्या प्रमाणातच घेणेत आले आहे.

2) निविदाकारास वाटाघाटीस निमंत्रण देऊनही उत्तर आले नसलेने स्मरणपत्र देऊन वाटाघाटी करणेत आल्या आहेत. सदरप्रमाणे स्मरणपत्र देणेबाबत योग्य ते कारण नमूद नाही. यावरून संबंधित मक्तेदाराचे हित जोपासलेचे दिसून येते.

3) निविदा समितीने दिनांक 12/02/2019 रोजी उक्त नमूद फेर ई-निविदा क्रमांक 16/2018-19 उघडली असून त्यामधील लिफाफा क्रमांक 2 बाबत तपशील निविदा समितीने दिला आहेत. त्यात नमूद केलेप्रमाणे निविदेमधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे अपुरी असलेचे दिसून आले नंतर दिनांक 12/02/2019 रोजी लेखी कागदपत्रे पूर्तता करणेची मागणी केली होती. असे स्पष्ट नमूद आहे. व त्यानंतर निविदाकाराने कागदपत्रांची पूर्तता केली व तो निविदेस पात्र ठरला असलेचे नमूद केले आहे. तसेच ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक 23/09/2013 चा आधार घेत सदर निविदा मंजूर केली असल्याचे नमूद केले आहे. परंतु शासन निर्णय दिनांक 23/09/2013 नुसार अशा प्रकारे दुसऱ्यांदा मुदतवाढ दिलेल्या निविदेचा निविदा भरण्याचा कालावधी संपल्यानंतर एक जरी निविदा प्राप्त झाली असेल तर ती उघडणेची कार्यवाही संबंधित निविदा प्राधिकारी यांनी करावी. व सदर निविदा प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा संचातील अटी व शर्तीनुसार छाननीअंती पात्र ठरत असल्यास, अशा निविदाकाराची निविदा स्विकारण्याचा निर्णय समितीपुढे ठेवावा. असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने निविदाकार पाटील यांची एकल निविदा उघडणेस पात्र असली तरी निविदा संचातील अटी व शर्तीनुसार छाननीअंती पात्र ठरत नसल्याने सदर निविदा स्विकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच निविदेमधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे अपुरी असलेने निविदाकारास कागदपत्रे पूर्तता करणेची मागणी करणे निविदा प्रणालीचे नियमास धरून नाही.

तथापि, उक्तप्रमाणे निविदा समितीने अत्यंत सदोष पध्दतीने निविदा मंजूर केली असल्याचे स्पष्ट दिसून येते.

4) उपरोक्तप्रमाणे प्रथम निविदेतील 16.80% जादा दराची सिद्धिविनायक ट्रेडर्स यांची पात्र निविदा दराबाबत

वाटाघाटीचे कारणावरून नाकारून फेरनिविदेतील 26.98% जादा दर मंजूर करण्यात आला आहे. म्हणजेच कमी दराची निविदा उपलब्ध असताना फेरनिविदा मागवून अधिक दराची निविदा मंजूर केली आहे. त्यामुळे अधिकच्या 10.18% दराच्या नाहक खर्च झाला आहे. तसेच फेरनिविदेवेळी एकच निविदाधारक असलेने तुलनात्मक दराचा लाभही झालेला नाही. एकंदरपणे सर्व निविदा प्रक्रिया सदोष पार पडली असून मक्तेदाराचे हितसंबंध जोपासणारी दिसून येते.

5) मक्तेदार मुरग्याप्पा पाटील यांची कागदपत्रे नस्तीस उपलब्ध नाहीत. त्यामुळे सदर मक्तेदार यांचे परवाना व निविदेसंबंधी इतर पात्रतेबाबत खात्री करता आली नाही.

कामाबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे-

6) कार्यारंभ आदेश दिनांक 13/09/2019 रोजी देण्यात आला आहे. व कामाची मुदत 3 महिने देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक 12/12/2019 ला मुदत संपली असूनही काम अपूर्ण आहे. तसेच मक्तेदाराने मुदतवाढ मागणी केलेचे पत्रही उपलब्ध नाही.

7) मक्तेदार मुरग्याप्पा पाटील यांनी 45 मीटर DI-K9 पाईप चे 38 नग पुरविलेचे बिल-चलन क्रमांक 47 दि.09/11/2020 रक्कम रुपये 48,74,551 (GST सह) सादर केले आहे.परंतु बिलामध्ये पुढीलप्रमाणे नग नमूद केले आहेत व दराचा स्वतंत्र तपशील दिलेला नसून एकत्रित बिल रक्कम नमूद केली आहे. तथापि, तपशीलवार बिल देण्यात आलेले नाही.

Quantity	Rate
6 मीटर चे 100 नग	उपलब्ध नाही
5 मीटरचा 1 नग	उपलब्ध नाही
4 मीटरचे 10 नग	उपलब्ध नाही

8) वैशिष्ट्यपूर्ण योजनेच्या रोजकीर्दीमध्ये प्रमाणकनिहाय खर्च नोंदविण्यात आलेला नाही. दिनांक 20.8.2019 रोजी प्रमाणक क्रमांक 1 ने रक्कम रुपये 5,07,21,142 जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे DAO DIGIPAY Account Kolhapur, कार्यासन 11 कडे वर्ग करण्यात आली आहे. परंतु यापैकी उपरोक्त कामाकरिता सन 2019-20 मध्ये नेमकी किती रक्कम वर्ग करण्यात आली किंवा खर्च झाली आहे याबाबत खात्री करता आली नाही. तसेच सदर वर्ग रकमेचे प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. तथापि सन 2019-20 मधील नेमक्या खर्चाची खात्री करता आली नाही.

9) उपरोक्त कामाचे पहिले धावते देयक रक्कम रुपये 161957 हे तपासणीस उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे सदर खर्चाची पडताळणी करता आली नाही. तसेच नेमक्या किती टक्के जादा दराने देयक अदा करणेत आले आहे याची खात्री करता येत नाही.

10) नगरपरिषद लेखा संहिता,2011 मधील नियम क्र.132(1)नुसार मूळ अंदाजपत्रक 10% पेक्षा अधिक

असण्याची शक्यता असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत येईल. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

11) महाराष्ट्र न.प.लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम/पुरवठा केल्याचे दिसून येते.

Item no.	Unit	Qty.as per Estimate	Qty as per MB	Given Rate per unit	जादा/कमी खर्च रुपये
1-Hier charges for jcb machine	Days	12	18	1184	+7104
2.providing and supplying TCL pavdar	25Kg bag	20	80	19	+1140
5-pro.dry rubble stone pitching	CuM	43.2	19.68	981.75	-23090
6-pro and constructing coffer dam	CuM	101.2	87.93	547.05	-7259
7-Pro.majdoor for TCL dosing	No.	120	135	326	+4890
3.pro.lowering laying jointing RCC pipe 400 mm dia.	Rmt	10	0	1158.35	-11580

12) प्रशासकीय आदेशातील अट क्रमांक 15 नुसार व वित्त विभागाकडील दिनांक 6/6/2008 व दिनांक 25/8/2015 चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार सन 2018-19 साठी मंजूर अनुदान दिनांक 31/3/2020 अखेर खर्च करणे बंधनकारक आहे. अन्यथा विहीत मुदतीनंतर म्हणजे दिनांक 31/3/2020 नंतर शिल्लक राहणारे अनुदान व्याजासह शासनास परत करणेची जबाबदारी मुख्याधिकारी यांचेवर राहील. असे आदेशित असताना उपरोक्त कामावर पूर्ण अनुदान खर्च दिसून येत नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी रक्कम रुपये 8418991 लेखापरीक्षणात तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 100, Hmm No : 96)

44 जुना चंदूर रोड पुलाजवळ मातीचा बंधारा बांधणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 205510.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 202050.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3460.00/-

कामाचे पहिले धावते देयक रक्कम रुपये 161957 व मूळ मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. करारनामा मुद्रांक कमी रकमेचे घेण्यात आले आहे. लेखा संहिता,2011 नुसार मूळ अंदाजपत्रक 10% पेक्षा अधिकचे असल्याने सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक झालेल्या कामास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतलेली नाही. कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची स्वामित्व धनाची त्यावरील DMF ची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात जुना चंदूर रोड पुलाजवळ मातीचा बंधारा बांधणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची तपासणी केली असता त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 29 दिनांक 15/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे. त्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

कामाचा तपशील-

कामाचे नाव	जुना चंदूर रोड पुलाजवळ मातीचा बंधारा बांधणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार	नगर पालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम -	रुपये 183373
डीएसआर वर्ष	MJP DSR 2018-19
प्रशासकीय मान्यता -	स्थायी समिती सभा क्र.9 ठराव नं.137 दि.23.10.2018
तांत्रिक मान्यता -	जल अभियंता यांचेकडील क्र.470/वर्ष नमूद नाही
निविदा रक्कम -	रुपये 183373
मंजूर निविदा रक्कम -	12 % जादा दराने मंजूररुपये 205378

मक्तेदाराचे नांव -	दगडू बाबू वडर
कामाचे आदेश ndash;	दि.01/01/2019
काम सुरु दिनांक -	दि.01/01/2019
काम पूर्ण दिनांक -	दि.30/06/2019
कामाची मुदत -	6 महिने
मोजमाप पुस्तक क्रमांक ndash;	185
खर्च तपशिल -	RA-1= 161957 (प्रत उपलब्ध नाही) RA-2 FINAL=43552 (प्र.क्र.519-378 /26.3.2020) TOTAL=205510

1) उपरोक्त कामाचे पहिले धावते देयक रक्कम रुपये 161957 हे तपासणीस उपलब्ध झालेले नाही. तथापि सदर खर्च लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) उपरोक्त कामाची मूळ मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे कामाच्या मोजमापांची खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

4) लेखा संहिता,2013 मधील नियम क्र.132(1)नुसार मूळ अंदाजपत्रक 10% पेक्षा अधिक असण्याची शक्यता असेल तर सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत येईल. परंतु अशी कार्यवाही न करता उपरोक्त कामाची निविदा 12% जादा दराने मंजूर करणेत आली आहे. तरी 12% प्रमाणे खर्च रक्कम लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

5) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे

परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत खात्री करता येत नाही. व सदर कामाचे अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ नसल्याचे दिसून येते. तथापि पुढीलप्रमाणे कमी-अधिक परिमाणाचा खर्च लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

Item no.	Unit	Qty.as per Estimate	Qty as per MB	Difference in Qty.Unit	Given Rate per unit	जादा /कमी खर्च रुपये
1	2	3	4	5=4-3	6	7=6x5
1-Hier charges for jcb machine	Days	12	18	+6	1184	+7104
2.providing and supplying TCL pavdar	25Kg bag	20	80	+60	19	+1140
5-pro.dry rubble stone pitching	CuM	43.2	19.68	-23.52	981.75	-23090
6-pro and constructing coffer dam	CuM	101.2	87.93	-13.27	547.05	-7259
7-Pro.majdoor for TCL dosing	No.	120	135	+15	326	+4890
3.pro.lowering laying jointing RCC pipe 400 mm dia.	Rmt	10	0	-10	1158.35	-11580

6) महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, मे-11, 2015/वैशाख21,1937,दिनांक11/05/2015अन्वये कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची स्वामित्व धनाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. तरी सदर कामास 19.68 CuM rubble stone चे वापरण्यात आले असून त्यावरील royalty उक्त नियमाप्रमाणे रुपये 141.34 प्रति घ.मी.प्रमाणे एकूण रुपये 2782 व त्यावरील DMF चार्जेस रुपये 278 वसूल करून भरणा करावे.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 3460 वसूलपात्र व रक्कम रुपये 202050 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 107, Hmm No : 103)

45 नगरपरिषद हद्दीत विविध सात बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे कामातील उणिवाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 685526.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 657826.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 27700.00/-

एका प्रकारच्या सर्व कामांची एकत्रित ई-निविदा काढणे आवश्यक होते. परंतु असे न करता कामांची विभागणी करून कार्यादेश दिले आहेत. ही बाब नियमबाह्य आहे. कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध नसताना सदर 7 देयकातून रुपये 3000 प्रमाणे रक्कम रुपये 21000 चा अदा करण्यात आले आहेत. लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही. करारनामा मुद्रांक कमी रकमेचा घेण्यात आलेला आहे. खरेदी साहित्याची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.

नगरपरिषद हद्दीत पुढीलप्रमाणे बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणेवर देयके अदा करण्यात आली आहेत. त्यातील पुढील 7 कामांची पूर्ण देयके प्रदान करण्यात आली आहेत. त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 76 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामांचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ.क्र.	कामाचे नाव	खर्च रक्कम	मक्तेदाराचे नाव	काम पूर्ण दिनांक
1	प्र.क्र.१० हनुमान नगर जिव्हेश्वर मंदिरजवळ बागवान यांचे घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	100852	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
2	प्र.क्र.१9 सुतार मळा गल्ली नं.1 प्रभाकर सुतार घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी	94253	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19

	देणे			
3	संजय गांधी नगर सांगली नाका येथे बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	96448	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
4	कुंभार घराजवळ भोई नगर येथे बोअरच्या ठिकाणी बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	98021	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
5	सोलगे मळा सोमनाथ लोखंडे घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	97495	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
6	कबाडे घराजवळ बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	101222	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
7	लोखंडे घराजवळ सोलगे मळा येथे बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे व अनुषंगिक साहित्य पुरविणे व चाचणी देणे	97235	तुषार इलेक्ट्रिकल,कबनूर	2/5/19
	एकूण	685526		

उपरोक्त कामांबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे-

1) स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29.12.2005 मधील सूचना क्र.18 नुसार कामाची विभागणी करून कार्यादेश देणे हो कृती नियमबाह्य आहे. एक प्रकारचे कामाची निविदा, जर पुढील तीन महिन्यात पुन्हा होणार असेल तर ती वेगवेगळी न बोलविता, एकत्र स्वरुपाची मागविण्यात यावी. परंतु उक्त नियमाप्रमाणे कार्यवाही न करता कामाची विभागणी करून एकाच मक्तेदारास कार्यादेश देण्यात आले आहेत. ही बाब नियमबाह्य आहे.

2) अ.क्र.1 ते 7 मधील कामांवर एकूण रुपये 685526 इतका खर्च करण्यात आला आहे. सदर एकूण खर्च रुपये 3 लाखाचे वर जात असून सदर कामांची एकत्रित ई-निविदा काढणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही. ही बाब नियमबाह्य आहे.

3) उपरोक्त सर्व कामांतील बाब क्र.9- Taking yield/ capacity testing of existing/new bore well नुसार कामाची चाचणी देणे करिता रक्कम रुपये 3000 ची तरतूद करून प्रत्येक कामाचे देयकातून ही रक्कम अदा केली आहे. परंतु वरील कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध नाहीत. तरी सदर 7 देयकातून अदा करण्यात आलेली

रुपये 3000 प्रमाणे रक्कम रुपये 21000 चा खर्च लेखापरीक्षणात वसूलपात्र करणेत येत आहे.

4) पुढील कामांचे मोजमापानुसार बाब 1 dismantling the handpump etc करिता रक्कम रुपये 1880 अदा करण्यात आले आहेत. परंतु सदरप्रमाणे हातपंप काढलेनंतरचे साहित्याबाबत कोणताही तपशील उपलब्ध नाही. नगरपरिषदेकडील साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तरी सदर साहित्य साठा नगरपरिषद भांडारात जमा केले किंवा नाही याची खात्री करता येत नाही. तरी उक्त बाबीवरील खर्च रक्कम रुपये 3760 लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

अ.क्र.	कामाचे ठिकाण	बाब क्र.1 वरील खर्च रुपये
2	प्र.क्र.19 सुतार मळा गल्ली नं.1 प्रभाकर सुतार घराजवळ	1880
3	संजय गांधी नगर सांगली नाका	1880
	एकूण	**3760**

5) पुढील कामांचे मोजमापानुसार बाब 1 dismantling the hand pump etc. करिता अंदाजपत्रकात तरतूद करूनही MB नुसार सदर बाब Execute केलेली नाही. यावरून सदर ठिकाणी हातपंप नसण्याची शक्यता दिसून येते. तरी संबंधित ठिकाणी हातपंप अस्तित्वात नसेल तर बोअरच्या ठिकाणी सबमर्सिबल पंप बसविणे हे काम कसे करता आले ही बाब स्पष्ट होत नाही. तथापि, बोअरच्या ठिकाणी हातपंप बसविल्याच्या या कामांवरील खर्च लेखापरीक्षणात तात्पुरता अमान्य करणेत येत आहे.

अ.क्र.	**कामाचे नाव**	**खर्च रक्कम रुपये**
1	प्र.क्र.10 हनुमान नगर जिव्हेश्वर मंदिरजवळ बागवान यांचे घराजवळ	100852
4	कुंभार घराजवळ भोई नगर	98021
5	सोलगे मळा सोमनाथ लोखंडे घराजवळ	97495
6	कबाडे घराजवळ	101222
7	लोखंडे घराजवळ सोलगे मळा	97235
	एकूण	**494825**

6) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क

आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते परंतु केवळ रुपये 100 चे मुद्रांक घेणेत आले आहेत. तरी उपरोक्त 7 कामांचे उर्वरित मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 400 प्रमाणे रुपये 2800 वसूल करून भरणा करावे.

7) पुढील कामांतील बाब क्र.3 -G.I. पाईप पुरविणे व बाब क्र.4 मध्ये COPPER CABLE पुरविणे या बाबींवर केलेला खर्च पाहता G.I. पाईपची लांबी ही COPPER CABLE च्या लांबीपेक्षा अधिक दिसून येते. परंतु Standard Specification व अदांजपत्रकानुसार G.I. पाईप पेक्षा COPPER CABLE ही 5 Rmt. पर्यंत जास्त असू शकेल. परंतु पुढील कामांचे मोजमापानुसार 5 Rmt. पेक्षा अधिक लांबीची Copper Cable चे देयक अदा करणेत आले आहे. तरी पुढीलप्रमाणे 5 Rmt. पेक्षा अधिक लांबीवरील खर्च दर प्रति Rmt. रुपये 78 प्रमाणे एकूण रुपये 3900 लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करणेत येत आहे.

अ.क्र.	**कामाचे नाव**	**बाब क्र.3 - G.I.पाईप (Rmt.)**	**बाब क्र.4 - copper cable (Rmt.)**	**5 Rmt. पेक्षा अधिक (Rmt.)**	**अधिक लांबीवरील खर्च रुपये**
1	प्र.क्र.10 हनुमान नगर जिव्हेश्वर मंदिरजवळ बागवान यांचे घराजवळ	55	78	18	1404
2	प्र.क्र.19 सुतार मळा गल्ली नं.1 प्रभाकर सुतार घराजवळ	48	62	9	702
3	संजय गांधी नगर सांगली नाका	51	62	6	468
5	सोलगे मळा सोमनाथ लोखंडे घराजवळ	57	70	8	624
7	लोखंडे घराजवळ सोलगे मळा	55	69	9	702
			एकूण	**50**	**3900**

8) स्थायी निर्देशानुसार मुख्याधिकारी यांनी कामांच्या कांही बाबीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसा शेरा मोजमाप पुस्तकात नमूद करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. मोजमाप पुस्तकात एकूण झालेल्या कामाचे एकत्रित गोषवाऱ्यासह अंतिम मुल्यांकन दर्शवून तसे प्रमाणिकरण करण्यात आलेले नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 27700 अंतिम अमान्य व रक्कम रुपये 657826 तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

46 प्रभाग क्रमांक 15 मधील जाधव मळा लाखे नगर व रोहिदास नगर परिसरामध्ये G.I. पाईपलाईन टाकणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 283554.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 299112.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4419.00/-

अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविणेची कार्यवाही न करता जादा दर मंजूर केले आहेत. कामाचा माहिती फलक लावण्यात आल्याचे दिसून येत नाही. करारनामा मुद्रांक कमी घेणेत आले आहे. पाईपची समाधानकारक Hydraulic test झाली नसताना पुढील कामे करण्यात आली आहेत. काही बाबीचे परिमाणामध्ये सक्षम मंजुरीशिवाय अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात प्रभाग क्रमांक 15 मधील जाधव मळा लाखे नगर व रोहिदास नगर परिसरामध्ये G.I. पाईपलाईन टाकणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची पडताळणी करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 25 दिनांक 11/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील-

कामाचे नाव -	प्रभाग क्रमांक 15 मधील जाधव मळा लाखे नगर व रोहिदास नगर परिसरामध्ये G.I. पाईपलाईन टाकणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार -	नगर पालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम -	रुपये 283554
डीएसआर वर्ष	MJP CSR 2016-17

प्रशासकीय मान्यता -	स्थायी समिती सभा क्रमांक 10 ठराव क्रमांक 128 दि.27.02.2018
तांत्रिक मान्यता -	जलअभियंता, नगरपरिषद इचलकरंजी क्रमांक, दिनांक नमूद नाही
निविदा रक्कम -	निविदा रुपये 283554
मंजूर निविदा रक्कम -	वाटाघाटीअंती 8.50% जादा दराने रुपये 307656
मक्तेदाराचे नांव -	विजय ल.खिलारे
कामाचे आदेश ndash;	दि.06.07.2018
काम सुरु दिनांक -	दि. 06.07.2018
काम पूर्ण दिनांक -	दि. 16.08.2018
कामाची मुदत -	2महिने
खर्च तपशिल -	RA-I व अंतिम = 303531 (प्र.क्रमांक 452-560/31.03.2020)

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी रुपये 8.50% जादाची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे. तरी 8.50% प्रमाणे खर्च झालेली रक्कम रुपये 24102 लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

2) स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 03/01/2006 मधील सूचना क्रमांक 29 नुसार रुपये 1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. सूचना 30 नुसार असे सूचना फलक संबंधित कंत्राटदार यांनी स्वखर्चाने लावायची आहेत. अशा प्रकारची अट निविदा पत्र व करारपत्रामध्ये घालण्यात यावी, असे स्पष्ट नमूद केले असताना सदरप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. उक्त निर्देशातील सूचना क्रमांक 31 नुसार कामाची तपासणी करताना फलक लावण्यात आले किंवा नाही याची खात्री मुख्याधिकारी यांनी करावी, असे नमूद आहे. परंतु अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10

लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

4) उक्त नमूद दरसुचीमधील General Notes मधील सूचना क्रमांक 17 नुसार संबंधित पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयक रक्कम अदा करू नये असे नमूद आहे. परंतु अशी test घेतली नसतानाही मक्तेदारास नमूद बाबीचे देयक रक्कम रुपये 4019 अदा करण्यात आले आहेत. तरी सदर रक्कम वसूलपात्र करणेत येत आहे.

5) दरसूची Section I 2(cix)ndash;G.I. PIPE मधील NOTE नुसार Hydraulic test पूर्ण होईपर्यंत केवळ 85% दर देय ठरतील. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

Item no.	Qty.as per Estimate	Qty as per MB	Given Rate per unit	जादा/कमी काम	जादा/कमी खर्च रक्कम रुपये
1-25mm pipe	650 rmt	508 rmt	138	-142 rmt	-19596
1-32 mm pipe	25 rmt	86 rmt	174	61 rmt	10614
7-pro. constructing BBM	20 No.s	26 No.s	1443 per No.	6 No.s	8658
9-Hire charges for concrete breaker and compressor	8 dyas	25 days	2350 per day	17 days	39950
				एकूण	39626

7) Refilling the trenches या बाबीची परिगणना करताना G.I.PIPE VOLUME वजा करणे आवश्यक होते. परंतु सदरप्रमाणे गणना न केलेने चुकीचे प्रदान झाले आहे.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 4419 वसूलपात्र व रक्कम रुपये 299112 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 126, Hmm No : 9)

47 प्रभाग क्रमांक 6 मधील राखी कोंड्या बंगला ते संदीप जैन बंगल्यापर्यंत BJP मार्केटमध्ये G.I. पाईप जोडणे कामाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 344674.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 336285.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8389.00/-

आयकर कमी कपात केला आहे.करारनामा मुद्रांक कमी घेणेत आले आहे. काही बाबीचे परिमाणामध्ये सक्षम मंजुरीशिवाय अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते. DSR व अंदाजपत्रकातील दर यात तफावत दिसून येते. पाईपची समाधानकारक Hydraulic test झाली नसताना पुढील कामे करण्यात आली आहेत.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षणात प्रभाग क्रमांक 6 मधील राखी कोंड्या बंगला ते संदीप जैन बंगल्यापर्यंत BJP मार्केटमध्ये G.I. पाईप जोडणे कामाची निविदा नस्ती,मोजमाप पुस्तिका व देयक यांची पडताळणी करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 23 दिनांक 11/02/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

कामाचा तपशील-

कामाचे नाव -	प्रभाग क्रमांक 6 मधील राखी कोंड्या बंगला ते संदीप जैन बंगल्यापर्यंत BJP मार्केटमध्ये G.I. पाईप जोडणे
लेखाशिर्ष/निधीचा प्रकार -	नगर पालिका निधी
अंदाजपत्रकीय रक्कम -	328540
डीएसआर वर्ष/करारनामा दि. -	MJP DSR 2018-19
प्रशासकीय मान्यता -	स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 137 दिनांक 23.10.2018
तांत्रिक मान्यता -	जलअभियंता,इचलकरंजी नगरपरिषद यांचेकडील क्रमांक 470- दिनांक नमूद नाहीत

निविदा रक्कम -	328540
मंजूर निविदा रक्कम -	वाटाघाटीअंती 4.90% जादा दराने मंजूर
मक्तेदाराचे नांव -	मुरग्याप्पा भिमू पाटील
कामाचे आदेश ndash;	दि.04/01/2019
काम सुरु दिनांक -	दि.04/01/2019
काम पूर्ण दिनांक -	दि.15/01/2018
कामाची मुदत -	6 महिने
मोजमाप पुस्तक क्रमांक ndash;	क्रमांक 182
खर्च तपशिल -	RA-I = 336813 RA-II FINAL =7861 (प्र.क्रमांक 9-78/04.03.2020) **TOTAL =344674**

1) आयकर अधिनियम 1961 च्या कलम 194 सी अनुसार प्रदान देयकाची रक्कम रुपये 344674 च्या 1 टक्के आयकर रुपये 3447 वसुल करणे आवश्यक असताना 1 टक्के आयकर वसुल केला आहे तरी कमी आयकर रक्कम रुपये 1643 वसूल करून पुर्तता करावी.

2) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) कायदा, 2015 नुसार झालेल्या अनुच्छेद 63 मधील सुधारणेनुसार ldquo;कार्यकंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक तर रुपये 500 चे मुद्रांक शुल्क आकारणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपरोक्त प्रत्येक कामाची ठरविण्यात आलेली रक्कम रुपये 10 लाखाचे आत असलेने रुपये 500 चे मुद्रांक घेणे आवश्यक होते. परंतु उपरोक्त कामाबाबत रुपये 100 चे मुद्रांक पेपर वर करार करण्यात आला आहे. तरी उर्वरित रुपये 400 वसूल करून भरणा करावे.

3) मक्तेदार मुरग्याप्पा भिमू पाटील यांनी वाटाघाटी अंती 4.90% दराने काम करणेस तयारी दर्शविली आहे. परंतु देयकातून 5% जादा दराने रक्कम अदा करणेत आली आहे. तरी 0.10% रक्कम रुपये 328 वसूल करून भरणा करावे.

4) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,2011 चे नियम 131 व निविदा अट 38 ब नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही बदल करता येणार नाहीत. असे असताना खालील बाबीचे परिमाणामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक प्रमाणात काम केल्याचे दिसून येते.

Item no.	**Qty.as per Estimate**	**Qty as per MB**	**Given Rate per unit**	**कमी खर्च रुपये**	**जादा रक्कम रुपये**
1-Prov.ISI Mark 100mm Dia.GI pipe (HEAVY)	170 Rmt	200 Rmt	906.24	0	27187
2-providing supplying G.I.special	9062.40 No.	0 CuM	9062.40	9062.40	0
3-pro.double flage sluice valve etc..	Rs.6852.26	0	Rs.6852.26	6852.26	0
Labour section				0	0
1.Excavation in hard rock	75 CuM	90 CuM	785.40	0	11781
4.lowering laying jointing G.I.pipes specials (heavy - 100mm)	170 rmt	200 rmt	119.70	0	3591
7.pro. laying in M-15	1.8 CuM	0	4160.58	7489	0
			एकूण	**23403.66**	**42559**

5) उपरोक्त कामामध्ये खालीलप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये Abstract नुसार घेणेत आलेले दर व प्रत्यक्षात DSR मधील दर यात तफावत दिसून येते.

Item	**Rate as per DSR**	**Given rate as per bill**	**Difference**
1-Prov.ISI Mark 100mm Dia.GI pipe (HEAVY)	768	906.24	138.24
3-pro.double flage sluice valve etc..	5807	6852.26	1045.26
Labour section			0
4.lowering laying jointing G.I.pipes specials (heavy -100mm)	106	119.7	13.7
5.making cross connection to existing distribution MAIN			0

(i) 150 mm	2602	2539	-63
(ii) 200 mm	2709	2643	-66

6) उक्त नमूद दरसुचीमधील General Notes मधील सूचना क्रमांक 17 नुसार संबंधित पाईपची समाधानकारक Hydraulic test झाल्याशिवाय Refilling of the trenches of pipeline या बाबीचे देयक रक्कम अदा करू नये असे नमूद आहे. परंतु अशी test घेतली नसतानाही मक्तेदारास नमूद बाबीचे देयक रक्कम रुपये 6018 अदा करण्यात आले आहेत. तरी सदर रक्कम वसूलपात्र करणेत येत आहे.

7) दरसूची Section I 2(cix)G.I. PIPE मधील NOTE नुसार Hydraulic test पूर्ण होईपर्यंत केवळ 85% दर देय ठरतील. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रुपये 8389 वसूलपात्र व रक्कम रुपये 336285 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DATRDMF8501 (Ref No : 127, Hmm No : 1)

48 स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वाहन खरेदी वर खर्चाबाबत.(DPR मधून)

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 14048305.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 154683.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 11786376.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 2107246.00/-

रु.3.00 लक्ष वरील खरेदी प्रक्रियेस जिल्हा खरेदी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असतना तशी मंजुरी घेण्यात आलेली नाही. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (आय) प्रमाणे 1% आयकर रक्कम कपात केली नाही. विहित मुद्रांकावर करारनामा न केल्याने शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे. पात्र निविदा धरकांची मुळ उत्पादक कंपनी एकच आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे दिसून येते. वाहनाचे डिलिवरी चलने नस्तीसोबत नाहीत. GEM पोर्टल वरील System Generated Contract Clause 1.1.14 (Seller must give on MRP for Automotive Chassis Fitted With Engine)नुसार पुरवठादाराने देयक रक्कमेच्या 15 % सुट देणे आवश्यक असताना न दिलेने अतिप्रदान झाले आहे.

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वाहन खरेदी वर (DPR मधून) खालीलप्रमाणे खर्च केला आहे. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 51 दि. 16/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 9765420 (Refuse Garbage Compactor)

खरेदी नग. 2

अक्र	प्र.क्र./दिनांक	रक्कम	तपशिल
1	5/16.1.2020	4986655	Kam- Avida Enviro eng. Pra. Ltd- Gem वरून Refuse Garbage Compactor खरेदी 1 नग
2	6/16/01/2020	4986655	Kam- Avida Enviro eng. Pra. Ltd- Gem वरून Refuse Garbage Compactor खरेदी 1 नग
3	3/17/07/2019	4074995	My car(Pune) Pvt. Ltd- Gem वरून टिप्पर ट्रक खरेदी 5 नग
	एकूण	14048305	

1)उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि. दि.1 डिसेंबर 2016 चे प्रकरण क्र. 2.9.4(ब) नुसार रु.3.00 लक्ष वरील खरेदी प्रक्रियेस जिल्हा खरेदी समितीची मंजुरी घेणे आवश्यक असतना तशी मंजुरी घेण्यात आलेली नाही.

2)महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 72 अन्वये प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) GeM वेब पोर्टल वरून खरेदी करताना GeM च्या कार्यप्रणालीनुसार जर वस्तूची किंमत रु.50000 पेक्षा जास्त असेल तर खरेदी अधिकाऱ्यास किमान 3 OEM (ORIGINAL EQUIPEMENT MANUFACTURER)कडील साहित्याची तुलना (आर्थिक/तांत्रिक)करणे आवश्यक आहे. परंतु एकच तांत्रिक निविदा मंजूर करून त्यांचीच आर्थिक निविदा मंजूर केली आहे. त्यामुळे दराबाबत तुलना झालेलीच नाही.

4) महाराष्ट्र शासन मुद्रांक अधिनियम 1958 चे अनुच्छेद 63 मध्ये दि. 24/4/2015 पासून सुधारणा केलेप्रमाणे रु.10 लाखावरील कार्यकंत्राटाच्या रकमेवर 0.1% मुद्रांक शुल्क देय ठरते. खालील तपशिलानुसार विहित

मुद्रांकावर करारनामा करून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे, तरी रक्कम रु. 14200/- वसूल करून पूर्तता करावी.

अक्र	तपशिल	अंदाजपत्रकीय र.	वसूल करावयाचे मुद्रांक र. रु.
1	Refuse Garbage Compactor	9765420	9300
2	टिप्पर ट्रक खरेदी	5337500	4900
	एकूण		14200

5)वरील तीनही देयकातून फक्त 2% GST कपात केला आहे. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (आय) प्रमाणे 1% आयकर रक्कम रु. 140483 वसूल होणे आवश्यक आहे.

6)प्र. क्र. 5 व 6 अन्वये न.पा. ने Refuse Garbage Compactor खरेदी केले आहेत. GeM Contract no. तसेच Sanction order नं. GEMC-511687713445021 दि. 29.7.2019 नुसार संभाव्य पुरवठा दि. 28/08/2019 आहे. पुरवठादाराने दि. 28/08/2019 च्या पत्रानुसार 90 दिवस कालावधी मिळावा अशी मागणी केली आहे. तसेच पुन्हा दि. 9.11.2019 नुसार दि. 25.11.2019 पर्यंत मुदतवाढ मिळावी यासाठी अर्ज केला आहे. परंतु प्रत्यक्षात Refuse Garbage Compactor चा पुरवठा दि. 27/11/2019 रोजी केला आहे. म्हणजेच वाहनांचा पुरवठा विलंबाने झाला आहे.

7) Bid no. GEM/2019/B/194756 दि. 28.2.19 नुसार 12 निविदाधारकांनी भाग घेतला असून 2 निविदाधारक पात्र ठरलेने पुन्हा फेरनिविदा करणेत आली त्यानंतर Bid no. GEM/2019/B/259070 दि. 14.6.19 नुसार 2 Refuse Garbage Compactor चा पुरवठा करणेसाठी निविदा मागविली आहे. त्यामध्ये एकूण 6 पुरवठादारानी भाग घेतला असून खालील 2 पुरवठादार पात्र ठरले आहेत. व त्यापैकी एक काम अविदा आर्थिक दृष्ठया पात्र ठेरलेने त्यांना BID AWARD केले आहे. परंतु खालील प्रमाणे दोन्हीही पात्र निविदा धरकांची मुळ उत्पादक कंपनी एकच आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे दिसून येते.

अक्र	SUPPLIER	MAKE
1	KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD	Kam-Avida
2	TNA ENGINEERING AND PROJECTS INDIA PRIVATE LIMITED	Kam-Avida

अंदाजपत्रकीय रक्कम रु. 5337500 (टिप्पर ट्रक)

खरेदी नग. 5 टिप्पर ट्रक

प्र. क्र. 3 अन्वये न.पा. ने 5 टिप्पर खरेदी केले असून दि. 18.2.2019 रोजी EXEL VEHICLES यांनी बिल सादर केले आहे. परंतु प्रमाणकानुसार सदर देयक हे MY CAR PUNE PVT PTD. यांना दि. 17.7.2019 रोजी बिल अदा केले आहे. यावरून बिल सादर करणारा व ज्यास बिल अदा केले वेगवेगळे असल्याचे दिसून येते.

8) सदर वाहनाचे डिलिवरी चलने नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे विहित मुदतीत वाहनांचा पुरवठा झाल्याची खात्री करता आली नाही.

9) GEM पोर्टल वरील System Generated Contract Clause 1.1.14 (Seller must give on MRP for Automotive Chassis Fitted With Engine)नुसार पुरवठादाराने देयक रक्कमेच्या 15 % सुट देणे आवश्यक असताना तशी सूट न दिलेने वरील 3 देयकांचे एकूण र. रु. 2107246 अतिप्रदान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी र. रु. 154683 वसुलपात्र र. रु. 2107246 अंतिम अमान्य र. रु. 11786376 तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 17, Hmm No : 16)

49 स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत बायोमायनिंग वरील खर्चाबाबत. (DPR मधून)

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 17

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 53762346.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 571172.00/-

1 कोटी पेक्षा जास्त रकमेच्या निविदा जाहिरात एका राष्ट्रीय वर्तमानपत्रात आणि एका राज्य स्तरीय वर्तमानपत्रात देणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. एकाही निविदा धारकाची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. वर्क ऑडर नस्तीसोबत नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर आवश्यक सर्व संबंधित खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नाही. तांत्रिक मान्यतेतील अट क्र. 29 नुसार घनकचरा संबंधित करण्यात येणा-या प्रक्रियेबाबत NEERI नागपूर संस्थेकडून तांत्रिक सहमती घेणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. देयकातून विमा रक्कम कमी वसूल केली आहे. उपकर

वसूल केला नाही. काम विहित मुदतीत पूर्ण झाले नाही.

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत 199120 क्युबिक मिटर कच-याचे बायोमायनिंग प्रक्रियेने विल्हेवाट लावणे वर (DPR मधून) खालीलप्रमाणे खर्च केला आहे. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 52 दि. 16/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अक्र	प्र.क्र./दिनांक	रक्कम
1	अंदाजपत्रकीय रक्कम रु.	89693604/-
2	जाहिरात	दै लोकमत व पुढारी
3	तांत्रिक मंजुरी	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र. मु.अ.(पुणे)/तांशा2 /इचलकरंजी/2163 दि. 6.12.18
4	निविदा सूचना	15.12.18 ते 4.1.19 लिफाफा उघडणे 5.1.19
5	वर्क ऑर्डर	1.3.19 (नस्तीसोबत नाही.)
6	कामाची मुदत	6 महिने (पावसाळा सोडून)

देयक तपशिल

अक्र	प्र.क्र./दिनांक	रक्कम	तपशिल
1	4/26/07/2019	26881173	(ए.सी. कोठारी) भागीदार प्रदीप हणमंत जाधव 1st RA
2	7/02/03/2020	26881173	(ए.सी. कोठारी) भागीदार प्रदीप हणमंत जाधव 2nd RA
	एकूण	53762346	

अक्र	निविदाधारक	रक्कम

1	(ए.सी. कोठारी)	0.10% कमी दराने
2	इंडीकॉन कन्सट्क्शन प्रा. लि.	1.60% जादा दराने
3	कॉसमॉस कन्सट्क्शन मशिनरीज	2.10% जादा दराने

1) शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.घकव्य/1006/प्र.क्र.53/नवि.16 दि.26.10.2006 मधील कृती क्र.5,मुददे क्र.33 ते 36 नुसार कच-यावरील प्रकिया हे अत्यंत भांडवली खर्चाचे काम असून व त्यात गुंतागुंतीचे तंत्रज्ञान असल्याने केंद्र शासनाच्या सूचनेनुसार घनकच-यावर प्रक्रिया करणारी सुविधा खाजगी चालकाकडे पुरवावी व प्रकिया केंद्रासाठी आवश्यक असणारी परवानगी खाजगी चालकाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मिळवावी असे नमूद करून प्रक्रियेसाठी वेळोवेळी जे तंत्रज्ञान अदययावत करावे लागेल, त्याचीही जबाबदारी खाजगी चालकावर असावी असे नमूद आहे. तथापी सदर प्रकल्पाची सुरक्षितता,वैज्ञानिक पध्दती,तांत्रीक मंजूरी, प्रकल्पासाठी आवश्यक असणारी राज्य प्रदुषण मंडळाची परवानगी याचे कोणतेही लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत, तसेच प्रक्रिये नंतरचा राहणारा कचरा याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येते याचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2)वरील तीन निविदा धारकांनी निविदा भरल्या असून वरीलपैकी एकही निविदा धारकाची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

3)महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-2014/प्र. क्र.82 भाग 3/ उद्योग-4, दि. 1.12.16 नुसार परि. क्र. 4.4.2 मधील 4 नुसार 1 कोटी पेक्षा जास्त रकमेच्या निविदा जाहिरात एका राष्ट्रीय वर्तमानपत्रात आणि एका राज्य स्तरीय वर्तमानपत्रात देणे आवश्यक असता लोकमत व पुढारी या वर्तमानपत्रात दिलेने सदर सदर निविदेस व्यापक प्रसिद्धी मिळाली नाही. व नगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा घेता आला नाही.

4) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 72 अन्वये प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

5) स्थायी निर्देश क्र.36 दि.29.12.2005 मधील सूचना क्रमांक 27(iv) नुसार कंत्राटदार नोंदणीकृत व आवश्यक असलेले सर्व परवाना धारक असावा परंतु निविदा नस्तीस वरील पैकी एकाही मक्तेदाराची कागदपत्रे नसलेने, नगरपरिषद लेखासंहिता, 2011 मधील नियम 466 (4) संलग्न परिशिष्ट 3 मधील मुद्दा क्र.13(घ) नुसार मक्तेदार हा सदर कामासाठी आर्थिक व तांत्रिक दृष्टया पात्र आहे की नाही याची तपासणी करता आली नाही.

6)तांत्रिक मान्यतेतील अट क्र. 21 नुसार सदर कामास सुरवात करण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर आवश्यक सर्व संबंधित खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली

नाही.

7)तांत्रिक मान्यतेतील अट क्र. 29 नुसार घनकचरा संबंधित करण्यात येणा-या प्रक्रियेबाबत NEERI नागपूर संस्थेकडून तांत्रिक सहमती घेणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

8) तांत्रिक मान्यतेतील अट क्र. 31 नुसार बायोमायनिगचे व लँडफिल ची कामे करण्यापूर्वी अस्तित्वातील डम्प करण्यात आलेल्या काचा-याचा परिमाणाचा सखोल अभ्यास करून तसेच ड्रोन सर्वे कंटूर मॅपिंग द्वारे त्याची परिमाणे निश्चित करावीत व रासायनिक व भौतिक पृथकरण करून आवश्यकतेनुसार कामे हाती घेणे आवश्यक होते त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

9)नस्तीसोबत काम मंजूर मक्तेदाराने र. रु. 235262 चे विमा भरलेले दि. 26.6.19 चे चलन आहे. सदर चलन कोषागार कार्यालयाकडून प्रमाणित करून घेतलेले नाही. परंतु मक्तेदारास प्रदान झालेल्या एकूण र. रु. 53762346 च्या 0.5% र. रु. 268813 एवढ्या रकमेचा विमा उतरविणे आवश्यक असताना र. रु. 33549 कमी विमा रक्कम मक्तेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

10) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. बीसीए 2009/प्र.क्र. 108/कामगार 7-अ दि. 17.6.2010 नुसार सदर कामातून 1% उपकर र. रु. 537623 वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे.

11)करारनाम्यातील अट क्र. 7 (7.1.1.) नुसार एकूण कामाच्या 40% काम पूर्ण झालेवर एकूण मंजूर रकमेच्या 30% रक्कम (पहिला हप्ता), 70% काम पूर्ण झालेवर 30% रक्कम (दुसरा हप्ता) व 100% काम पूर्ण झालेवर 40% रक्कम देणे आवश्यक आहे. व सदर कामाचा कालावधी कामाचा आदेश मिळाल्यापासून 6 महिने आहे. कामाचा आदेश हा दि. 1.3.19 रोजी दिला आहे. व मक्तेदारास कामाचा पहिला हप्ता दि. 26.7.19 रोजी अदा केला आहे.

12)देयकासोबत जोडलेल्या volume report दिनांक व सही नाही. तसेच मक्तेदाराने सादर केलेल्या RA बिलावर दिनाक नाही.

13)मे. ए. सी. कोठारी यांनी दि. 25.3.19 रोजी दिलेल्या पत्रानुसार 40 hp क्षमतेचे वीज कनेक्शन व पाणी कनेक्शन तातडीने मिळणे बाबत न.प. कडे अर्ज केला आहे. त्यानंतर दि. 5.4.19 रोजी परत 40 hp क्षमतेचे वीज कनेक्शन मिळणेबाबत अर्ज केला आहे. आरोग्य अधिकारी यांनी दि. 15/4/19 च्या नोटिशीद्वारे बायोमायनिंग प्रक्रियेला विलंब होत असलेने दंडात्मक कार्यवाही बाबत कळविले आहे. तसेच दि. 10.7.19 च्या पत्रान्वये मक्तेदाराने दि. 22.6.19 पासून सर्वत्र पाऊस असलेने काम बंद असलेचे कळविले आहे. असे असताना दि. 26.7.2019 रोजी कशाच्या आधारे मक्तेदारास कामाचा पहिला हप्ता अदा करणेत आला याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

14)मुख्याधिकारी यांचे दि. 29.1.2020 रोजीच्या आरोग्य अधिकारी यांना काढलेल्या ज्ञापानानुसार मु.अ. यांनी दि. 27.1.2020 रोजी समक्ष भेट दिली असता बायोमायनिंग प्रक्रिया करणेचे कामकाज बंद असल्याचे दिसून आले. तसेच सदर कामावर कोणतेही नियंत्रण नसल्याचे नसल्याचे नमूद केले आहे तसेच कंपोष्ट माती, दगड गोटे, प्लास्टिक यांचे ढीग साचलेले दिसून आले.

15)सदर प्रकल्पाची सुरक्षितता,वैज्ञानिक पध्दती,तांत्रीक मंजूरी, प्रकल्पासाठी आवश्यक असणारी राज्य प्रदुषण मंडळाची परवानगी याचे कोणतेही लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.व तसेच प्रक्रिये नंतरचा राहणारा कचरा याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येते याचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

16)कामाची मुदत ही पावसाळा सोडून 6 महिने असून दि. 1.3.19 रोजी काम चालू केले असून पावसाळ्याचे 4 महिने सोडून डिसेंबर 2019 अखेर काम पूर्ण होणे आवश्यक असता मार्च 2020 अखेर अपूर्ण असलेचे दिसून येते. त्यामुळे सदर काम योग्य त्या कार्यक्षमतेने व मुदतीत झालेचे दिसून येत नाही.

17)सदर कामाची वर्क आर्डर ही पावसाळा बंद झालेनंतर देणे आवश्यक असता मार्च मध्ये दिलेने सदर काम विहित मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही. तसेच कामाची वर्क आर्डर लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वर्क आर्डर मधील तरतुदीनुसार संबंधित मक्तेदाराकडून विलंब दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

वरील त्रुटी पुर्तेतेअभावी र. रु. 571172 वसुलपात्र र. व र. रु. 53191174 तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 21, Hmm No : 20)

50 आरोग्य विभागाकडे जंतुनाशके, किटकनाशके खरेदीतील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2410027.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2406827.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3200.00/-

सदर खर्चाचे तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. सदर जंतुनाशके व किटकनाशके औषधे उत्कृष्ट दर्जाचे असल्याबाबत दि इंडियन इंस्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स यांचा तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही. सदर खरेदी करण्यात आलेल्या जंतूनाशकांच्या बिलावर निर्मिती व वापराची अंतिम तारीख दिसून येत नाही. काही वस्तुंचा विलंबाने पुरवठा झालेला आहे. परंतु

पुरवठा दाराकडून विलंब शुल्क वसूल केले नाही. साहित्याची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात निवड महिन्यातील खर्च नस्ती तपासणी केली असता मागील प्रलंबित जंतुनाशके औषध खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च नोंद करण्यात आला आहे. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 46 दि.16/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अंदाजपत्रकीय रककम	
वार्षिक खर्च	2410027

अक्र	प्रक्र/दिनांक	रक्कम	पुरवठादार	तपशिल
1	621/31.3.2020	519200	श्री अग्रो इंजि. सोल्युशन	EM सोल्युशन खरेदी
2	624/31.3.2020	356827	एस. के. सेल्स	क्विक बाईट किटकनाशक
3	623/31.3.2020	940000	एस. जी. पाटील	बार्सिलो टॅब
4	625/31.3.2020	594000	डॉल्फिन सेल्स कार्पोरेशन	लार्व्हीटेक्स किटकनाशक
	एकूण	2410027		

वरील खर्चाबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) आयुक्त तथा नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्र. 36 दि. 29.12.2005 मधील बाब क्र. 09 नगरपरिषदेने निविदा मागविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी घेवून तांत्रिक मंजुरी घेतल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 72 अन्वये प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु तांत्रिक, प्रशासकीय मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) सदर जंतुनाशके व किटकनाशके औषधे उत्कृष्ट दर्जाचे असल्याबाबत दि इंडियन इंस्टीटयुट ऑफ मेडिकल

सायन्स यांचा तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

3)अक्र 1 बार्सिलो टॅब खरेदी खर्च व निविदा नस्ती तपासणी केली असता निविदा प्रकीयेमध्ये खालील त्रुटी दिसून येतात.

अक्र	मक्तेदार	दर
1	श्री अग्रो इंजि. सोल्युशन	1% जादा दराने
2	एस. जी. पाटील	अंदाजपत्रकीय दराने
3	माउली शेती सेवा केंद्र	9.57% जादा दराने

सदर पुरवठादरांची निविदेसोबत असलेली कागदपत्रे तपासली असता वरील तिनही विक्रेत्यांचा महाराष्ट्र दुकाने व अस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम 2018 नमुना ग. शॉप ACT मध्ये श्री अग्रो इंजि. सोल्युशन यांचे व्यवसायाचे स्वरूप हे इंडस्ट्रीयल मटेरीअल सप्लायर्स असे आहे. तसेच माउली शेती सेवा केंद्र यांच्या नोंदणी प्रमाणपत्रानुसार त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप हे शेतीची औषधे विक्री असे असताना 3 पात्र निविदा धारक नसताना पार पडलेली निविदा प्रक्रिया ही सदोष आहे.

4) एस. जी. पाटील यांना दि. 19.9.2019 रोजी वर्क ऑर्डर दिली आहे. करारपत्रातील अट क्र. 4 नुसार पुरवठा आदेश मिळालेपासून 10 दिवसात बार्सिलो टॅब पुरविणे आवश्यक आहे. व अट क्र. 6 नुसार मुदतीत पुरवठा न झालेस प्रति दिन रु. 100 दंड आकारला जाईल असे असताना बार्सिलो टॅब चा पुरवठा प्रत्यक्षात दि. 31.10.19 रोजी झाला आहे. म्हणजेच 32 दिवस उशिरा पुरवठा झालेने प्रति दिन रु. 100 प्रमाणे 32 दिवसांचे रु. 3200 दंड वसूल करून न.पा निधीत जमा करणे आवश्यक आहे.

5)सदर खरेदी करण्यात आलेल्या जंतूनाशकांच्या बिलावर निर्मिती व वापराची अंतिम तारीख दिसून येत नाही.

6) वरील पैकी एकाही जंतुनाशकाची साठानोंदवही लेखापारीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्याचा वापर कुठे व कसा केला याच्या नोंदी लेखापरीक्षणात तपासणी करता आली नाही. त्यामुळे सदर खरेदीचा वापर योग्य प्रकारे झाला किवा कसे हे समजू शकत नाही.

7)नपा सुधारित लेखासंहिता दिनांक 23 जानेवारी 2013 मधील प्रकरण 17 वस्तुसुची अंतर्गत नियम 250 प्रमाणे वस्तुची नोंदवही ही कायम अभिलेख असुन ती प्राधिकृत अधिकाऱ्याच्या वैयक्तिक पर्यवेक्षणाखाली ठेवण्यात आली पाहिजे.तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) स्टोअर विभागाकडे वस्तु सुची प्राप्त करण्याच्या कार्यपध्दतीबाबत नियम क्रं. 256 प्रमाणे वस्तुची मागणी प्राप्त झालेनंतर त्या वस्तु स्विकारुन भांडार अधिकारी यांनी पडताळणी करुन मोजमाप करुन व आवश्यकतेप्रमाणे माल वितरीत करेल व वितरण चलनास भांडार अधिकाऱ्याकडुन पोचपावती देण्यात येईल.

तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) माल पुरविण्याची चलने इत्यादि ची नस्ती संग्रही ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

10) लेखासंहिता नियम क्रं. 254 प्रमाणे साहित्य प्राप्त टिपणी 3 प्रतीत तयार करुन एक प्रत मागणी पत्र केलेल्या /मालाची मागणी केलेल्या विभागाकडे पाठविले पाहिजे साहित्य प्राप्त टिपणीव्दारे नमुना क्रं.21 मध्ये ठेवण्यात आलेल्या वस्तुसुची नोंदवहीमध्ये साहित्य प्राप्त झाल्याची नोंद करण्यात येईल.

11) सुधारित लेखासंहितेतील नियम क्रं. 256 प्रमाणे वस्तुसुची पुरवठादाराकडुन प्राप्त झालेली देयके, नियम 257 प्रमाणे देयकाची छाननी, नियम 258 ते 264 प्रमाणे साहित्य देणे व नियम क्रं. 265 प्रमाणे साहित्य परत करणे इत्यादि बाबीची नियमाप्रमाणे पुर्तता करणे आवश्यक आहे.

वरील अनियमिततेपोटी खर्च र. रु. 3200 वसुलपात्र व र. रु. 2406827 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 27, Hmm No : 25)

51 आरोग्य विभागा अंतर्गत डस्टबीन खरेदी खर्चातील अनियमितता बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 10

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 7283700.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 7283700.00/-

रुपये 1 कोटी पेक्षा जादा रक्कमांच्या निविदेंची जाहिरात एका राष्ट्रीय स्तरावरील दैनिक, एका राज्यस्तरीय दैनिक व 20000 पेक्षा जास्त खप असलेल्या जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिध्द करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे विस्तृत प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. त्यामुळे बाजारभावातील स्पर्धात्मक दराचा लाभ नगरपालिकेला झालेला नाही.नगरपरिषदेने निविदा मागविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
GeM पोर्टल कार्यप्रणाली नुसार खरेदीमधील उचित निविदाधारक सहभागी होणेसाठी कमीत कमी 2 भिन्न "मूळ वस्तू उत्पादक (OEM)" कडून कमीत कमी 3 पुरवठादार सहभागी होणे हिताचे होते. परंतु उपरोक्त दोन निविदाधारकांच्या निविदा ह्या एकाच उत्पादकाचे डस्टबीन असणाऱ्या आहेत.

आरोग्य विभागाअंतर्गत डस्टबीन खरेदी खर्चाचे अभिलेखे पडताळणी केली असता त्यामध्ये खालील उणीवा दिसून येतात. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 47 दि. 16/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

प्रशासकीय मान्यता-स्थायी समिती ठराव क्रमांक 267 दि.18-2-2019

तांत्रिक मान्यता-घेतलेली नाही.

प्रत्यक्ष खर्च-7283700/-

GEM पोर्टल वरुन BID NO-GEM/2018/B/121889 दि.17-11-2018 ने प्रसिध्दी सहभागी 21 BIDDERS पैकी 15 BIDDERS चे स्पेशिफीकेशन कॉलीफाय झाले.

स्पेशिफीकेशन-डस्टबिन 7.5 लिटर्स क्रेट ब्ल्यु व क्रेट ग्रीन

पुरवठा नग 125310 दर प्रतीनग सर्वकरासहित रुपये 125/-

पुरवठादार- श्रेयांश ट्रेडर्स इचलकरंजी.

कॉट्रॅक्ट व मंजूर आदेश-नंबर GEMC-511687788519133 दि. 2 जानेवारी 2019.

अक्र	प्र.क्र/दिनांक	रक्कम	तपशिल
1	141/29.6.19	2596200	श्रेयांश ट्रेडर्स इचलकरंजी. - 20770 नग खरेदी
2	142/29.6.19	4687500	श्रेयांश ट्रेडर्स इचलकरंजी. - 37500 नग खरेदी
		7283700	

वाटप नग-निरंक

शिल्लक नग-58270

वरील बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे स्थायी निदेश क्रमांक 36 क्रमांक नप्रसं/निविदा मागविणे/05/प्र.क्र.151/05/9 दि.29-12-2005 मधील अनुक्रमांक 33 तसेच महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-2014/प्र. क्र.82 भाग 3/ उद्योग-4, दि. 1.12.16 नुसार परि. क्र. 4.4.2 मधील 4 नुसार निविदा प्रसिध्द करण्याची पध्दती नमूद केली असुन त्यानुसार तसेच रुपये 1 कोटी पेक्षा जादा रक्कमांच्या निविदेंची जाहिरात एका राष्ट्रीय स्तरावरील दैनिक, एका राज्यस्तरीय दैनिक व 20000 पेक्षा जास्त

खप असलेल्या जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिध्द करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे विस्तृत प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. त्यामुळे बाजारभावातील स्पर्धात्मक दराचा लाभ नगरपालिकेला झालेला नाही.

2) आयुक्त तथा नगरपरिषद संचालनालय यांचे स्थायी निर्देश क्र. 36 दि. 29.12.2005 मधील बाब क्र. 09 नगरपरिषदेने निविदा मागविण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी घेतल्याचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) GeM पोर्टल कार्यप्रणाली नुसार खरेदीमधील उचित निविदाधारक सहभागी होणेसाठी कमीत कमी 2 भिन्न "मूळ वस्तू उत्पादक (OEM)" कडून कमीत कमी 3 पुरवठादार सहभागी होणे हिताचे होते. परंतु उपरोक्त दोन निविदाधारकांच्या निविदा ह्या एकाच उत्पादकाचे डस्टबीन असणाऱ्या आहेत.

4)सदर खरेदी ही GeM पोर्टलवर निविदा बोलवून केली आहे. निविदे मध्ये खालील 3 निविदा धारकांनी भाग घेतला असून श्रेयांश ट्रेडर्स इचलकरंजी. हे L1 असल्याने त्यांना डस्टबीन पुरविण्याची निविदा देणेत आली आहे.

अक्र	निविदाधारक	दर	
1	श्रेयांश ट्रेडर्स इचलकरंजी.	15663750	L1
2	समृद्धी ट्रेडर्स लि.	16077273	L2
3	समाधान इंडस्ट्रीज एलएलपी	16227645	L3

श्रेयांश ट्रेडर्स यांच्या निविदा नस्ती सोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता ते डस्टबीन चे मूळ उत्पादक नसून ते समृद्धी ट्रेडर्स लि. या कंपनीचे रीसेलर आहेत. तसेच त्यांच्या उद्योग आधार नोंदणी (MSME) प्रमाणपत्रानुसार त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप हे Other professional and Technical activites असे दिसून येते. म्हणजेच ते कोणत्याही प्रकारच्या वस्तूचे उत्पादक नाहीत. तसेच रिसेलर देखील नाहीत त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या वस्तूचा पुरवठा करण्यास पात्र नाहीत, असे असताना नियमबाह्य पणे अपात्र निविदा धारकाची निविदा मंजूर केलेचे दिसून येते. यावरून सदोष निविदा प्रक्रियेद्वारे केलेला खर्च वसूल होणे आवश्यक आहे.

5)नगरपरिषदेच्या 62655 मालमत्ताधारकांना ओला व सुका कचरा विलगीकरण करुन देण्यासाठी 125310 डस्टबीन खरेदिचे शासनाचे GEM पोर्टलवर आदेश क्रमांक GEMC-511687788519133 दि.2-1-2019 अन्वये एकुण 125310 नग खरेदिचे आदेश देण्यात आलेले आहेत. परंतू वरीलप्रमाणे 67040 नग पुरवठा करण्यात आले. GEM पोर्टल वर खरेदि करताना मिळकतींची संख्या 62655 असल्याने प्रतीमिळकत धारकास 1 किंवा 2 डस्टबीन दिल्यास अनुक्रमे 62655 किंवा 125310 इतके नग होतात परंतू प्रत्येक मिळकत धारकाच्या कुटुंबातील सदस्य संख्या लक्षात घेवुन त्याप्रमाणात वाटप केले असता डस्टबीन च्या एकुण संख्येमध्ये बचत झाले असते व अनावश्यक खरेदि टाळणे शक्य होते. परंतू अंदाजपत्रक सदोष तयार केल्यामुळे नगरपालिका

निधीची रक्कम वस्तु स्वरुपात नाहक गुंतून राहिली आहे.

6)सुधारीत खरेदि धोरण आदेश शासन निर्णय क्रमांक महाराष्ट्र शासन उदयोग ऊर्जा व कामगार विभाग भांखस-2014 प्र.क्र.82/भाग-III/उदयोग 4 दि.1-12-2016 नुसार 15 फेब्रुवारी नंतर खरेदी करण्यात येवु नये असे स्पष्ट नमूद करण्यात आले असुन खरेदि प्रक्रीया प्रत्यक्षात वर्षाअखेरीस करण्यात आल्यामुळे मिळकत धारकांना संबंधित डस्टबिनचा विनियोग विलंबाने प्राप्त झाला आहे.

7)पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा करावयाच्या नगांची संख्या 125310 असुन सन 2018-19 अखेर 67040 डस्टबीन साठी खर्च पडला असून सन 2019-2020 मध्ये 58270 उर्वरीत डस्टबीन खर्च पडला आहे.

8)सदर खरेदीची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच वाटप नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

9)डस्टबीन योग्य दर्जाचे असल्याबाबत सक्षम यंत्रणेकडून चाचणी तपासणी करुन घेण्यात आलेली नाही.

10) कॉट्रॅक्ट व मंजूर आदेश नंबर GEMC-511687788519133 दि. 2 जानेवारी 2019. नुसार पुरवठा आदेश देणेत आला असून त्यामध्ये संभाव्य पुरवठा दि. हा 17.1.2019 आहे. परंतु प्रमाणक क्र. 141 सोबत जोडलेल्या डिलिव्हरी चलन नुसार 20770 नगांचा पुरवठा हा दि. 25.3.19 रोजी व प्रमाणक क्र. 142 सोबत जोडलेल्या डिलिव्हरी चलन नुसार 37500 नगांचा पुरवठा हा दि. 22.3.19 रोजी झाला आहे. म्हणजेच 67 दिवस विलंबाने साहित्य पुरवठा झाला आहे. परंतु करारपत्र, तसेच पुरवठा आदेशामध्ये दंडाची तरतूद केली नाही.

वरील त्रुटी पूर्ततेअभावी र. रु. 7283700 वसुलपात्र ठरविण्यात येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 30, Hmm No : 28)

52 अमृत अभियान योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 5909304.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 5909304.00/-

ई निविदा मागवून काम करण्यात आलेले नाही. जिल्हास्तरीय दैनिक यामध्ये जाहिर ई निविदा देणे आवश्यक

असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तांत्रिक मंजुरी व प्रशासकिय मंजुरी नस्तीसोबत नाही. साठा नोंदवही तपासणीसाठी उपलब्ध झाली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-20 चे लेखापरिक्षण अमृत अभियान योजनेअंतर्गत खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.क्रं.	प्रमाणक क्रमांक/दिनांक	रक्कम	तपशिल
1	01/29/06/2019	1108560	समृध्दी एंटरप्रायजेस - ओला/सुखा कचरा स्टीकर तयार करणे
2	02/31/07/2019	891397	समृध्दी एंटरप्रायजेस-मालमत्ता धारक नावांचे बारकोड तयार करणे
3	06/04/09/2019	2299047	-------//-------
4	24/23/10/2019	795600	समृध्दी एंटरप्रायजेस- गमिंग स्टीकर तयार करणे
5	34/24/10/2019	131080	--------//-------
6	95/20/01/2020	197560	एस.के.प्रॉडक्शन्स- शॉर्ट फिल्म तयार करणे
7	96/20/01/2020	109680	एस.के.प्रॉडक्शन्स-स्वच्छ भारत जनजागृती प्रेरणागीत ऑडिओ तयार करणे
8	105/12/03/2020	70380	समृध्दी एंटरप्रायजेस-गमिंग शिट कोरोना बाबतची माहितीबाबत
9	109/31/03/2020	306000	-------//-------
		5909304	

वरीलप्रमाणेअमृत अभियान योजनेअंतर्गत खर्च करण्यात आलेला आहे त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन उदयोग,उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4,

दि.01/12/2016 मधील प्रकरण 4.1 नुसार रक्कम रू.3 लाखापेक्षा अधिक रकमेची खरेदी असताना ई निविदा मागवनू काम करणे आवश्यकता असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) स्थायी निर्देश क्र. 36 मधील 33 मध्ये अंदाजपत्रकीय रककम रू.10 लाखापेक्षा जास्त असल्याने राष्ट्रीय स्तरावरील दैनिक, राज्य स्तरावरील दैनिक व 20000 प्रती खप असलेले जिल्हास्तरीय दैनिक यामध्ये जाहिर ई निविदा देणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3.सदर नस्तीमध्ये प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी तपासणीसाठी उपलब्धं् झाली नाही.

1) सदर प्राप्त झालेल्या वस्तुंची नोंद साठा नोंदवही घेण आवश्यक आहे. साठा नोंदवही तपासणीसाठी उपलब्ध झाली नसल्यामुळे त्याच्या विनियोगाबाबत खात्री होत नाही.

5. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु.500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांकांवर करारनामा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

DATABPM8101 (Ref No : 31, Hmm No : 29)

53 आरोग्य विभागाअंतर्गत शहरातील सारण गटर्स सफाई करणे खर्चातील अनियमितता बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 648391.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 648391.00/-

1 वर्षावरील देयकास कौन्सिल ची मान्यता घेणे आवश्यक असता त्याप्रमाने कार्यवाही केली नाही. प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मान्यता घेतली नाही. सदर खर्चाचे मूळ अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

आरोग्य विभागाअंतर्गत सन 2019-2020 मध्ये शहरातील सारण गटर्स सफाई करणे खर्चाचे अभिलेखे

पडताळणी केली असता यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 61, दि. 23/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अक्र	प्र.क्र./दिनांक	रक्कम	पुरवठादार	बिल कालावधी	तपशिल
1	629/31.3.2020	648391	राहुल रोहिदास गायकवाड	25.8.15 ते 25.9.15	सारण गटर्स सफाई करणे

1)सदर खर्चाची मुळ नस्ती गहाळ झालेने मूळ नस्तीची झेरॉक्स प्रत लेखापरीक्षणास सादर करणेत आली होती. सदर नस्तीची पडताळणी केली असता सदर देयक हे 25.8.15 ते 25.9.15 या कालावधीतील असलेचे दिसून येते. 1 वर्षावरील देयकास कौन्सिल ची मान्यता घेणे आवश्यक असता त्याप्रमाने कार्यवाही केली नाही.

2)सदर खरेदीस प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच तांत्रिक मान्यता घेतली नाही.

3)सदर खर्चाचे मूळ अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

वरील त्रुटी पूर्तता अभावी रक्कम रु. 648391 वसूल होणे आवश्यक आहे.

DATRVPF8701 (Ref No : 33, Hmm No : 30)

54 कचरा डेपो येथे कचरा सपाटीकरणासाठी जेसीबी पुरविणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1243748.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1242948.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 800.00/-

अंदाजपत्रक तयार करताना सन 2014-15 मधील 400 कामाचे तास असे गृहीत धरून केले आहे परंतु प्रत्यक्षात 1188 तास वापर झाला आहे. याचाच अर्थ 788 जास जादा काम केले आहे. प्रशासकीय मंजुरी/तांत्रिक मंजुरी लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4 दि.01/12/2016 अन्वये ई निविदा मागवून काम देणे आवश्यकता असताना

तशी कार्यवाही केलेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी, जि.कोल्हापूर सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात कचरा डेपो येथे कचरा सपाटीकरणासाठी जेसीबी पुरविणेबाबत खालील प्रमाणकान्वये खर्च करण्यात आला आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
110	14/01/2020	123924	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 138 तास * 898/-
111	14/01/2020	160760	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 120 तास * 898/-
112	14/01/2020	98780	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 110 तास * 898/-
113	14/01/2020	97882	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 109 तास * 898/-
114	14/01/2020	83514	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 93 तास * 898/-
115	14/01/2020	122128	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 136 तास * 898/-
116	14/01/2020	98780	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 110 तास * 898/-
117	14/01/2020	96086	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 107 तास * 898/-

118	14/01/2020	121230	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 135 तास * 898/-
119	14/01/2020	108658	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 121 तास * 898/-
120	14/01/2020	132006	श्री प्रविण गायकवाड केलेले काम 147 तास * 898/-
		1243748	

याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1)कचरा डेपोवर आलेल्या कचरा लेव्हल करणे, कचरा गाडयांना जाणेसाठी वाट करून देणेसाठी रक्कम रू.1243748/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

2)सदरचे अंदाजपत्रक तयार करताना सन 2014-15 मधील 400 कामाचे तास असे गृहीत धरून केले आहे परंतु प्रत्यक्षात 1188 तास वापर झाला आहे. याचाच अर्थ 788 जास जादा काम केले आहे. नविन अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3)नस्तीसोबत प्रशासकीय मंजुरी/तांत्रिक मंजुरी लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच कामाच्या मुदतवाढीचे प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत 500/- व त्या पुढील प्रत्येक लाखास रू.100/- अशा मुद्राकांवर करार करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही त्यामुळे मुद्रांक शुल्क ची रक्कम रू.800/-वसुल करून शासन खाती भरणा करावी.

5)सदर कामाकरीता वापर करण्यात आलेला जेसीबी आरटीमान्यता प्राप्त असलेबाबतची तसेच विमा काढण्यात आलेला बाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

6) महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4 दि.01/12/2016 अन्वये ईनिविदा मागवून काम देणे आवश्यकता असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रू. 800/- वसुलपात्र व रक्कम रू.1242948/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATABPM8101 (Ref No : 34, Hmm No : 42)

55 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 1 ते 26 मधील घरोघरी कचरा गोळा करुन वाहतूक करुन कचरा डेपोमध्ये जमा करणे खर्चातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 14

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 52766377.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 51550437.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 1215940.00/-

घनकचरा व्यवस्थापन शासन निर्णय दि.26.10.2006 मधील नियमांचे पालन केले नाही. नगरपालिकेने वाहने मक्तेदाराच्या ताब्यात देणेपुर्वी सर्व वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नसलेचे दिसून येते. सदोष अंदाजपत्रक तयार केलेने प्रत्यक्षात वापर केलेल्या वाहनांपेक्षा जादा वाहन चालक, मदतनीस, इंधन व देखभालीच्या खर्चाचे मक्तेदारास प्रदान झाले आहे. निविदेस विस्तृत प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. निविदाकाराची तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द सिद्ध होत नसताना देखील सदर कामाची निविदा देणेत आली आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सदोष असलेचे दिसून येते. करारपत्रातील अट क्र. D(a) नुसार न.पा. ने मक्तेदारास पुरविलेल्या वाहनांवर RTO यांच्याकडील वैध वाहन परवाना असलेले ड्रायव्हर नेमणे बंधनकारक आहे तसेच प्रत्येक वाहनासोबत एका मदतनीसाची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच काम सुरु करण्यापूर्वी संबंधित नियुक्त कर्मचा-यांची यादी वैध ओळखपत्रासह न.पा. कडे सादर करणे बंधनकारक आहे. असे असताना सदर अटीचे पालन केलेचे दिसून येत नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 1 ते 26 मधील घरोघरी कचरा गोळा करुन वाहतूक करुन कचरा डेपोमध्ये जमा करणे खर्चातील अनियमिततेबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र.53 दि.16/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

1	कामाचे नाव	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वॉर्ड नंबर 1 ते 26 मधील घरोघरी कचरा गोळा करुन वाहतूक करुन कचरा डेपोमध्ये जमा करणे.

2	लेखाशिर्ष	14 वा वित्त आयोग
3	अंदाजपत्रकीय तरतूद	54011855
4	प्रशासकीय मान्यता	जिल्हाधिकारी कार्यालय क्रमांक कार्या-11/नपा/एस.आर/727 इ/18 दि.04-12-2018 रक्कम रुपये- 54011854/-
5	तांत्रिक मंजूरी	तांत्रिक मान्यता घेणेत आली नाही.
6	निविदा प्रक्रीया	ई निविदा पध्दतीने, टेंडर नोटीस दि.26-12-2018 टेंडर फॉर्म विक्री 26-12-2018 ते 15-1-2019, निविदा उघडणे दि.16-1-2019
7	मंजूर निविदा रक्कम	54011854
8	एकुण प्राप्त निविदा	दि. 15-1-2019 पर्यंत एकही निविदा प्राप्त न झाली नाही. त्यामुळे दि. 17. 1. 2019 रोजी फेरनिविदा प्रसिद्धी.
9	फेर निविदा	4 निविदा दिवलिफापा पध्दतीने त्यापैकी पात्र 4 निविदा 1)आराध्या एंटरप्रायजेस - अंदाजपत्रकीय दराने 2)रुपेश चव्हाण - 4.90% जादा दराने 3)स्वयंभू ट्रान्सपोट - 9% जादा दराने 2)शहानवाज चौधरी - 6.21% जादा दराने
10	मंजूर निविदा	आराध्या एंटरप्रायजेस - अंदाजपत्रकीय दराने
11	निविदा मंजूर आदेश	कौन्सील ठराव नं. 256 दि. 18.2.2019
12	कार्यारंभ आदेश	481/2018-19 दि. 08/03/2019
13	एकूण खर्च	52766377

घनकचरा व्यवस्थापन शासन निर्णय दि.26.10.2006 च्या परि.क्र.21 नुसार सर्व प्रभागासाठी साफसफाई व कचरा वाहतूक, प्रक्रिया यासाठी एकच निवीदा देवून त्यातून बहुव्याप्त कंपनीस कंत्राट दिले असते तर घनकचरा व्यवस्थापनावर नगरपरिषदेचे संनियंत्रण योग्य रितीने झाले असते. तथापी वरीलप्रमाणे फक्त कचरा वाहतुकीसाठी निविदा का देणेत आली याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात यावे. तसेच सन 2019-2020 मध्ये कचरा

वाहतुकीसाठी न.पा. ने मक्तेदाराच्या ताब्यात किती वाहने दिली याबाबत कोणतेही अभिलेखे नस्तीसोबत नाहीत. तसेच न.प. इचलकरंजी यांचे मार्फत घरोघरी जाऊन घनकचरा संकलन, वाहतूक बाबत मार्ग, नकाशा निश्चित करून दिले नाही. करारातील अट क्र. ए नुसार नगरपालिकेने वाहने मक्तेदाराच्या ताब्यात देणेपुर्वी सर्व वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नसलेचे दिसून येते.

अ) **<u>अंदाजपत्रक-</u>**

1)सदर खर्चाचे अंदाजपत्रक तपासणी केली असता न.पा. कडे सन 2019-2020 मध्ये 68 घंटागाडी व 2 च Refuse compactor असल्याचे दिसून येते. मात्र अंदाजपत्रक बनविताना 5 Refuse compactor चा खर्च धरून अंदाजपत्रक तयार केले आहे. वाहन अधिक्षक यांचे लेखापरीक्षणास सादर केलेल्या वाहन सद्यस्थिती अहवालानुसार न.पा. कडील कॉम्पकटर हे दि. 20.10.16 (MH09-Q-6871) व दि. 21.3.19 (MH09-Q-6873) पासून बंद असलेचे दिसून येते. त्यामुळे ते सन 2019-2020 मध्ये वापरात नाहीत तसेच दि. 27.11.19 रोजी नवीन 2 कॉम्पकटर खरेदी केलेचे दिसून येते. तरी देखील मार्च 2019 ते नोव्हेंबर 2019 एकूण 9 महिने कॉम्पकटर नसताना त्या वाहनावरील चालक, मदतनीस, इंधन व देखभालीच्या खर्चाची अंदाजपत्रकात तरतूद करून सदर खर्च अदा करणेत आला आहे. त्यामुळे सदर देयकामध्ये मक्तेदारास जादा प्रदान झाले आहे. यावरून हे अंदाजपत्रक सदोष असलेचे दिसून येते. तसेच वाहन अधिक्षक यांनी दिलेला वाहन सद्यस्थिती अहवाल व आरोग्य विभागाने प्रत्यक्ष बिलामध्ये दाखविलेली वाहने यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते. सबब तफावतीबाबत योग्य ते स्पष्टीकरण लेखापरीक्षणास सादर होणे आवश्यक आहे.

2)अंदाजपत्रकामध्ये 5 Refuse compactor व 5 टिप्पर ट्रक साठी तरतूद केली असून त्याप्रमाणे देयकामधून मक्तेदारास इंधन खर्च अदा केला आहे. परंतु प्रत्यक्षात अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेल्या वाहन संख्येपेक्षा कमी वाहनाचा म्हणजेच काही महिन्यांमध्ये एक वाहन व काही महिन्यांमध्ये दोनच वाहनांचा पूर्ण वर्षभर कचरा उठावासाठी वापर केलेचे दिसून येते. व इंधन खर्च मात्र दोन्ही वाहनासाठी अदा केला आहे. त्यामुळे अंदाजपत्रकातील वाहन संख्या व दर पृथथकरणानुसार जादा अदा र. रु. 1143040 संबंधित मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

अक्र	मक्तेदाराने वापरलेली वाहने महिना	जादा इंधन खर्च Refuse compactor	जादा इंधन खर्च टिप्पर ट्रक
1	10 मार्च - 31 मार्च 2019	68400	30400
2	एप्रिल 2019	91200	18240
3	मे 2019	91200	0

4	जून 2019	91200	0
5	जुलै 2019	91200	0
6	ऑगस्ट 2019	91200	0
7	सप्टेबर	91200	0
8	ऑक्टोबर 2019	91200	0
9	नोव्हेंबर 2019	91200	0
10	डिसेंबर 2019	114000	0
11	जानेवारी 2020	91200	0
12	फेब्रुवारी 2020	91200	0
		1094400	48640
	एकूण एकंदर	1143040	

3)वरील प्रमाणे Oil व Manitance साठी सुद्धा अंदाजपत्रकात 5 Refuse compactor व 5 टिप्पर ट्रक तरतूद करून त्याप्रमाणे मक्तेदारास देयक अदा केले आहे परंतु प्रत्यक्षात अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेल्या वाहन संख्येपेक्षा कमी वाहनाचा म्हणजेच काही महिन्यांमध्ये एक वाहन व काही महिन्यांमध्ये दोनच वाहनांचा पूर्ण वर्षभर कचरा उठावासाठी वापर केलेचे दिसून येते. व Oil व Manitance मात्र एकूण 10 वाहनासाठी अदा केला आहे. त्यामुळे जादा अदा रक्कम परीगनना करून संबंधित मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

4)अंदाजपत्रकामध्ये ड्रायव्हर, मदतनीस यांची संख्या देखील जादा दाखवून अंदाजपत्रक तयार केले आहे. परंतु प्रत्यक्षात अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेल्या ड्रायव्हर, मदतनीस संख्येपेक्षा कमी ड्रायव्हर, मदतनीस यांनी काम केलेचे दिसून येते. त्यामुळे त्यामुळे जादा अदा रक्कम परीगणना करून संबंधित मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

ब)<u>निविदा प्रक्रिया</u>

1) नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे स्थायी निदेश क्रमांक 36 क्रमांक नप्रसं/निविदा मागविणे/05/प्र.क्र.151/05/9 दि.29-12-2005 मधील अनुक्रमांक 33 तसेच महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-2014/प्र. क्र.82 भाग 3/ उद्योग-4, दि. 1.12.16 नुसार परि. क्र. 4.4.2 मधील 4 नुसार निविदा प्रसिध्द करण्याची पध्दती नमूद केली असुन त्यानुसार तसेच रुपये 1 कोटी पेक्षा जादा

रक्कमांच्या निविदेंची जाहिरात एका राष्ट्रीय स्तरावरील दैनिक, एका राज्यस्तरीय दैनिक व 20000 पेक्षा जास्त खप असलेल्या जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिध्द करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे विस्तृत प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. त्यामुळे बाजारभावातील स्पर्धात्मक दराचा लाभ नगरपालिकेला झालेला नाही.

2)सदर कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये आराध्या एंटरप्रायजेस यांना पात्र ठरविले असून त्यांनी दि. 14.3.19 रोजी सदर कामाची POWER OF ATTORNEY FOR SIGNING OF BID ही विठठल रामभाऊ जाधव, अरुण सीताराम रौदे व ताहीर उस्मान खलिफा तिघेही रा. इचलकरंजी यांच्या नावे केल्याचे दिसून येते. व या तीन लोकांनी मिळून भागीदारी कंपनी स्थापन केली असून तिचे नाव निकिता एंटरप्रायजेस असे ठेवले आहे. परंतु विठठल रामभाऊ जाधव, अरुण सीताराम रौदे व ताहीर उस्मान खलिफा तिघेही रा. इचलकरंजी हे आराध्या एंटरप्रायजेस चे भागीदार किवा भाग असलेचे कुठेलेही अभिलेखे नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे आराध्या एंटरप्रायजेस ने यांच्या सोबत केलेली POWER OF ATTORNEY FOR SIGNING OF BID ही लेखापरीक्षणामध्ये मान्य करता येत नाही.

3)POWER OF ATTORNEY FOR SIGNING OF BID करारपत्रातील अट क्र. 5 नुसार खालील प्रमाणे भांडवल गुंतवणूक केली आहे.

अक्र	भागीदाराचे नाव	भांडवल
1	विठठल रामभाऊ जाधव	25000
2	अरुण सीताराम रौदे	12500
3	ताहीर उस्मान खलिफा	12500
	एकूण	50000

वरील तपशिलावरून निविदाकाराची स्थायी निर्देश क्रं. 36 दिनांक 29 डिसेंबर 2005 मधील परिशिष्ठ ब मधील बाब क्रं. 15 मधील ब नुसार निविदाकाराची तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द सिद्ध होत नसताना देखील सदर कामाची निविदा देणेत आली आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सदोष असलेचे दिसून येते.

4)रुपेश टी. चव्हाण व शहानवाझ चौधरी यांच्या निविदा नस्तीतील कागदपत्रांची तपासणी केली असता दोघांच्याही निविदा नस्तीमध्ये काही 100 रु. चे मुद्रांक पेपर आहेत. त्यामध्ये त्यांनी काही वाहने भाड्याने घेणेबाबत करारपत्र केले आहे. त्या मुद्रांकावर मुद्रांक विकत घेणा-याचे नाव आराध्या एंटरप्रायजेस हस्ते श्री सनबे यांनी खरेदी केलेले दिसून येते. व करारपत्र लिहून घेणार हे रुपेश टी. चव्हाण व शहानवाझ चौधरी आहेत. यावरून श्री चव्हाण व श्री चौधरी हे आराध्या एंटरप्रायजेस या संस्थेसोबतच काम करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आराध्या एंटरप्रायजेस, रुपेश टी. चव्हाण व शहानवाझ चौधरी यांचे एकमेकासोबत हितसंबंध दिसून

येतात. व ते एकाच कंपनीचा भाग असलेचे दिसून येते. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे दिसून येते.

5)जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय आदेश क्रमांक कार्या-11/नपा/एस.आर/727 इ/18 दि.04-12-2018 मधील अट क्र. 10 नुसार सदर कामाचे अंदाजपत्रक वाहनांच्या होणा-या अंदाजित फे-यांवर आधारित आहे. परंतु प्रत्यक्षात कामकाज सुरु झालेनंतर Actual Data च्या आधारे अंदाजपत्रक सुधारणेची निविदेत तरतूद करणेत यावी. असे नमूद असताना सदर अटीचे पालन केलेचे दिसून येत नाही.

6)जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय आदेशातील अट क्र. 12 नुसार वर्षभरामध्ये कचरा डेपोवर संकलित झालेल्या ओल्या व सुक्या काचा-यावर कचरा डेपो वर प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. सदर अटीचे शंभर टक्के पालन केलेचे दिसून येत नाही.

7)आराध्या एंटरप्रायजेस यांनी सादर केलेल्या यादीमध्ये कर्मचारी संख्या एकूण 30 असून यामध्ये 2 महिला कर्मचारी आहेत.

8)करारपत्रातील अट क्र. D(a) नुसार न.पा. ने मक्तेदारास पुरविलेल्या वाहनांवर RTO यांच्याकडील वैध वाहन परवाना असलेले ड्रायव्हर नेमणे बंधनकारक आहे तसेच प्रत्येक वाहनासोबत एका मदतनीसाची नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच काम सुरु करण्यापूर्वी संबंधित नियुक्त कर्मचा-यांची यादी वैध ओळखपत्रासह न.पा. कडे सादर करणे बंधनकारक आहे. असे असताना सदर अटीचे पालन केलेचे दिसून येत नाही.

9)करारपत्रातील अट क्र. D(b) नुसार न.पा. ने मक्तेदारास पुरविलेल्या वाहनांचे दैनंदिन लॉगबुक ठेवून ते आरोग्य निरीक्षक यांनी लॉग बुकातील नोंदी योग्य असलेबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे. सदर अटीचे पालन केले नाही.

10)मक्तेदारास सदर कामास किती वाहने(वाहन संख्या) दिली आहेत याचा कुठेही करारपत्रात उल्लेख केला नाही. तसेच याबाबत कुठलेही अभिलेखे ठेवलेले नाहीत.

11)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक नगरो-2016/प्र.क्र.328/नवि-33 दि.4 ऑक्टोबर 2016 नुसार नगरपालिका क्षेत्रामध्ये पायाभुत सुविधा प्रकल्प राबविताना घ्यावयाच्या प्रणालीबाबत स्पष्टता देण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित कामाचे प्राप्त निविदा धारकांकडून वरील शासन निर्णयातील मुददा क्रमांक ब नुसार संबंधित कंत्राटदार हा नोंदणीकृत असल्याचे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र संबंधित नस्तीसोबत पडताळणी कामी उपलब्ध झाली नाही. सदर बाबत लेखे सादर करणे आवश्यक राहिल.

12)कचरा संकलन व वाहतूक कामाचे निविदा अट क्र. 8, 12, 32, 33, व 38 चे अनुसार कचरा वाहतुकीचे मोजमाप, वाहनांवर GPS सुविधा असणे, जमा झालेल्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कचरा संकलन नोंदवही ठेवणे व प्रभागनिहाय सदस्यांचे काम समाधानकारक झाल्याबाबत पत्र घेणे या बाबी देयकापुर्वी सादर करणे

पुरवठादारास बंधनकारक करणेत आले होते. तथापी तसा अहवाल प्राप्त झालेचे दिसून येत नाही.

13)घनकचरा व्यवस्थापन नियमावली 2016 चे नियम क्र. 15 (अ), (क), 24 (2) चे प्रारूप IV प्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाचा वार्षिक अहवाल ठेवनेत आला नाही याबाबत स्पष्टता करावी.

14)खालील तपशिलानुसार न.प. ने पुरविलेल्या वाहनाचे भाडे देयकातून वजा करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

अक्र	वाहन प्रकार/संख्या	कालावधी	भाडे	जादा अदा रक्कम
1	टिप्पर 5	10.3.19 मार्च 31.3.19	10000	32900
2	कॉम्पकटर/2	डिसेंबर 19	20000	20000
3	टिप्पर 5	एप्रिल 19	10000	20000
	एकूण जादा अदा			72900

वरील प्रमाणे एकूण जादा अदा रक्कम मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

घनकचरा व्यवस्थापनावर 14 वा वित्त आयोगाअंतर्गत खर्च पडलेला आहे. परंतू त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास पाठविणे आवश्यक आहे.

वरील अनियमिततेपोटी र. रु. 1215940 अंतिम अमान्य व र. रु. 51550437 करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 36, Hmm No : 32)

56 नगरपालिका हददीतील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1048000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1048000.00/-

तांत्रिक व प्रशासकीय मान्यता नस्तीसोबत नाही. निर्बिजीकरणासाठी इंडीयन व्हेटरनरी कौन्सिल/महाराष्ट्र

शासन पशुसंवर्धन विभागामार्फत निर्धारीत केलेले दर विचारात घेवुन कार्यवाही केलेली नाही. ठरलेल्या उदिदष्टाप्रमाणे कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात नगरपालिका हददीतील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे या बाबीवरील खर्चाबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

कामाचे नांव-नगरपालिका हददीतील भटक्या कुत्रयांचे निर्बिजीकरण करणे-न.पा.निधी

अंदाजपत्रकीय तरतूद- 3000000/-

प्रशासकिय मान्यता - घेतलेली नाही.

तांत्रिक मान्यता - घेतलेली नाही.

प्रसिध्दी - दै.पुढारी दि. 19-07-2019.

मंजूर निविदा - मे. सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन.

मंजूर दर - प्रती कुत्रा निर्बिजीकरण करणे रुपये 1700/- प्रमाणे.

खर्च मान्यता ठराव क्रमांक-----दि.

दर मान्यता ठराव क्रमांक - 50 दि.27-08-2019.

कामाचा कालावधी - वार्षिक.

करारनामा - दि. 09-09-2019

करारनामा मुंद्रांक - रुपये 1100/-

एकुण खर्चाची रक्कम रुपये - 1048000/-

वरील कामाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)ई निविदेमध्ये 1)सोसायटी फॉर ॲनिमल प्रोटेक्शन, कोल्हापुर रू.1750/-, 2) महिनिनाथ प्रतिष्ठान, पाथर्डी रू. 2205/- 3) मनुष्य व पशु कल्याण निर्मिती संस्था. रू. 1980/- यांनी निविदा भरल्या आहेत परंतु निविदेतील अटीप्रमाणे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र कोणत्याही निविदा धारकांनी जोडलेले नाही त्यामुहे फेर निविदा मागविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2)सदर कामासाठी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेतल्याचे संबंधित नस्तीसोबत पडताळणी कामी उपलब्ध

झाली नाहीत.

3)सदर कामानुसार प्रतीकुत्रयाचे निर्बिजीकरण करणे कामी रुपये 1700/- प्रतीकुत्रयासाठी दर निश्चित करुन कामाचा आदेश देण्यापुर्वी दरपृथ्थकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे देण्यात आलेला दर योग्य असल्याची खात्री होत नाही.सदर बाबत निर्बिजीकरणासाठी इंडीयन व्हेटरनरी कौन्सिल/महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागामार्फत निर्धारीत केलेले दर विचारात घेवुन त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

4)विविदा अटी व शर्तीमधील अट क्रमांक 13 नुसार निविदाधारक संस्थेने प्रत्येक महिना अखेरीस 500 ते 1000 कुत्रयांचे नसबंदी व लसीकरण करणे करण्याचे उददीष्ट असताना त्याप्रमाणे साध्य दिसुन येत नाही. या बाबत संबंधित मक्तेदारास निविदा अटीप्रमाणे खुलासा मागविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. माहे ऑगष्ट 2018 मध्ये 124 कुत्रयांचे व माहे सप्टेंबर ते निविदेचा कालावधी संपेपर्यंत नसबंदी व लसीकरण केलेल्याचा निरंक आहे. त्यामुळे दिलेले उददीष्ट साध्य झालेले नाही. त्यामुळे निविदा अटीचे उल्लंघन झालेले आहे.

5)सन 2019-20 मध्ये एकुण निर्बिजीकरण करण्यात आलेल्या 1244 इतक्या कुत्र्रयांचे (M/F) नसबंदि व लसीकरण झाल्याचे देयकावरुन दिसुन येते परंतु संबंधित नसबंदी करण्यात आलेल्या कुत्र्रयांचे पुढील प्रजनन झाले किंवा नाही याचा पाठपुरावा करुन सदर योजनेचे उपयोगिता कितपत सिध्द झाले याबाबत स्पष्टता दिसुन येत नाही. त्यामुळे नसबंदी करण्यात आलेल्या कुत्रयांचे पडताळणी करुन त्याचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

6) नसबंदि करण्यात आलेल्या कुत्रयांचे शस्त्रकिया ही रुल्स ऑफ ॲनिमल वेलफेअर बोर्ड व ॲनिमल बर्थ कंट्रोल ॲक्ट 2001व प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा नुसार झाल्याचे प्राधिकृत सक्षम अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

7) कुठल्या भागातून किती कुत्रयांचे पकडून तसेच त्यांचे निर्बिजीकरण कधी केले तसेच त्यांना त्याच भागात सोडले याचा सविस्तर अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही.

8)संबंधित निविदा धारकाकडे तज्ञ पशुवैदयकिय अधिकारी/पशुवैदय किती उपलब्ध आहेत याबाबतची माहिती दरपत्रकासोबत सादर केलेले नाही. निव्वळ एका पशुवैदयामार्फत वरील प्रमाणे मोठयाप्रमाणात नसबंदी करणे संयुक्तीक नाही.

वरील 1 ते 8 बाबींच्या पुर्ततेअभावी रक्कम रुपये 1048000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATABPM8101 (Ref No : 42, Hmm No : 34)

57 कचरा डेपो येथे कचरा सपाटीकरणासाठी डोझर पुरविणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1753800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1166200.00/-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 587600.00/-

सदरचे काम हे सन 2019-20 व 2018-19 मध्ये करण्यात आलेले आहे. सन 2019-20 व 2018-19 च्या DSR चा वापर करून अंदाजपत्रक तयार करून खर्च करणे आवश्यक होते परंतु प्रत्यक्षात सन 2015-16 चा DSR मधील दर DOZER D80 A-12 रू. 2923/- वापर करून अंदापत्रक तयार केले त्यामुळे संबंधित ठेकेदाराला जादा प्रदान झाले आहे.

नगरपरिषद इचलकरंजी, जि.कोल्हापूर सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात कचरा डेपो येथे कचरा सपाटीकरणासाठी डोझर पुरविणेबाबत खालील प्रमाणकान्वये खर्च करण्यात आला आहेक.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशिल
1	974/242	20/03/2020	125689	श्री शिवाजी धुमाळ केलेले काम 43 तास * 2923/- कालावधी-24/05/2019 ते 08/06/2019
2	373/241	20/03/2020	458911	श्री शिवाजी धुमाळ केलेले काम 157 तास * 2923/- कालावधी-05/03/2019 ते 23/05/2019
3	536/429	27/01/2020	207533	श्री शिवाजी धुमाळ केलेले काम 71 तास * 2923/- कालावधी- 01/02/2019 ते 28/02/2019

4	537/430	27/01/2020	245532	श्री शिवाजी धुमाळ केलेले काम 84 तास * 2923/- कालावधी-02/01/2019 ते 31/01/2019
5	144/450	29/06/2019	716135	श्री शिवाजी धुमाळ केलेले काम 245 तास * 2923/- कालावधी-26/10/2018 ते 31/12/2018
			1753800	

याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1)कचरा डेपोवर आलेल्या कचरा लेव्हल करणे, कचरा गाडयांना जाणेसाठी वाट करून देणेसाठी रक्कम रू.1753800/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

2) सदरचे अंदाजपत्रक तयार करताना 400 कामाचे तास असे गृहीत धरून केले आहे पंरतु प्रत्यक्षात 600 तास वापर झाला आहे. याचाच अर्थ 200 जास जादा काम केले आहे. नविन अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

3)सदरचे काम हे सन 2019-20 व 2018-19 मध्ये करण्यात आलेले आहे. सन 2019-20 व 2018-19 च्या DSR चा वापर करून अंदाजपत्रक तयार करून खर्च करणे आवश्यक होते पंरतु प्रत्यक्षात सन 2015-16 चा DSR मधील दर DOZER D80 A-12 रू. 2923/- वापर करून अंदापत्रक तयार केले आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झाले आहे.

1) सन 2018-19 मध्ये अ.क्र.3 ते 5 प्रमाणकांमधील एकूण 400 तास इतके काम झाले आहे.सन 2018-19 मधील मुळ दर रू.2000/- इतका आहे. परंतू प्रत्यक्षात सन 2015-16 चा दर आकारून संबंधिताला रक्कम अदा केली आहे त्यामुळे (2923 - 2000 = 923/-)इतके जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदान रक्कम रू. 369200/- (400 तास * 923) वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावे.

2) सन 2019-20 मध्ये अ.क्र. 1 ते 2 प्रमाणकांमधील एकूण 200 तास इतके काम झाले आहे.सन 2019-20 मधील मुळ दर रू. 1831/- इतका आहे. परंतू प्रत्यक्षात सन 2015-16 चा दर आकारून संबंधिताला रक्कम अदा केली आहे त्यामुळे (2923 - 1831 = 1092/-)इतके जादा प्रदान झाले आहे. तरी जादा प्रदान रक्कम रू. 218400/- (200 तास * 1092) वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावे.

4) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act

(Amendment) (Maha act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत 500/- व त्या पुढील प्रत्येक लाखास रू.100/- अशा मुद्राकांवर करार करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही त्यामुळे मुद्रांक शुल्क ची रक्कम रू.1900/-वसुल करून शासन खाती भरणा करावी.

5)सदर कामाकरीता वापर करण्यात आलेला डेझर आरटीमान्यता प्राप्त असलेबाबतची तसेच विमा काढण्यात आलेला बाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

6) महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4 दि.01/12/2016 अन्वये ई निविदा मागवून काम देणे आवश्यकता असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

तरी वरिल आक्षेपांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रू.587600/- वसुलपात्र व रक्कम रू. 1166200 /- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATABPM8101 (Ref No : 48, Hmm No : 37)

58 तांत्रिक तपासणी फी रक्कम खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 शासन निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 373000.00 /-

तांत्रिक तपासणी फी अदा केली आहे परंतु संस्थाची मूळ बिले, पोच / पावती नसताना देखील रक्कम अदा केली आहे.

नगरपरिषद इचलकरंजी कडील सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात घनकचराव्यवस्थापनअंतर्गत तांत्रिक तपासणी फी रक्कम अदा करणेत आली आहे.

अक्र्	प्र.क्र./दिनांक	रक्कम	तपशिल
1	2/20.6.2019	354000	डायरेक्टर, CSIR- NEERI नागपूर - घनकचराप्रकल्प अहवालातील बयोगस प्लांट, लिचेट Treatment

			plant प्रक्रिया अहवालतांत्रिक तपासणी फी.
2	1/20.6.2019	19000	शिवाजीविद्यापीठ कोल्हापूर Gem portal वरून खरेदी केलेल्या गाड्यांची तांत्रिक तपासणी फी.
		373000	

1)वरील प्रमाणकान्वये सदर संस्थाना तांत्रिक तपासणी फी अदा केली आहे. परंतु संस्थाची मूळ बिले, पोच / पावती नसताना देखील रक्कम अदा केली आहे. त्यामुळे सदर संस्थाची मुळ बिले, पोच / पावती लेखापरीक्षणास सादर करावी अन्यथा सदर रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

DATABPM8101 (Ref No : 66, Hmm No : 46)

59 कच-यापासून खत निर्मिती वरील खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 753695.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 753695.00/-

कच-यापासून खत निर्मिती प्रक्रिया राबविताना विहित नियमांचे तसेच अटी व शर्तीचे पालन केले नाही.

न.पा. इचलकरंजीने सन 2019-2020 मध्ये कच-यापासून खत निर्मिती वर खालील प्रमाणे खर्च केला आहे. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 54 दि.16/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

कामाचे नांव-मे.हायड्रोएअर टेक्टोनिक्स (पीसीडी) लिमिटेड व इ.न.प.यांच्या संयुक्त् विदयमान चालविण्यात येणा-या घनकच-यावरील करण्यात येणा-या प्रकल्पाचे काम करणेबाबत.

अंदाजित रक्कम व मंजूर दर- घन कच-याच्या वजनाच्या मोजमापाप्रमाणे व कराराप्रमाणे आणि कौ.ठ.क्र.28 दि.5-5-2015 नुसार रुपये 100/- प्रती टन प्रमाणे.

कामाचा अवधी-5 वर्षे किंवा न.प.प्रकल्प ताब्यात घेईपर्यंत यापैकी जे अगोदर असेल ते.

करारनामा-दि.28-5-2015 रु.100/- च्या मुंद्रांकावर.

मुळ प्रकल्पाचे अंदाजपत्रकीय रक्कम-6,10,00,000/-बिगर दिनांकित मुळ प्रकल्पाच्या करारनाम्यावरुन अंदाजपत्रकीय रक्कम नोंदविण्यात आलेली आहे.

मुळ मक्तेदार-. मे.हायड्रोएअर टेक्टोनिक्स (पीसीडी) लिमिटेड बेलापूर नवी मुंबई.

प्रकल्प प्रसथापनानंतरचे मक्तेदार- पीसीडी कंपनीचे सह भागीदार श्री.रमेश प्रेमराज मर्दा इचलकरंजी. कामाचा आदेश-जा.क्र.इ.न.प/वशी1065/2015 दि.28-5-2015.

सन 2019-2020 मधील वार्षिक खर्च- रुपये 753695/- इ.न.प.च्या वार्षिक लेख्यावरुन वरीलबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)घनकचराचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण (at source waste segratation) ही घनकचरा व्यवस्थापनातील महत्वाची क्रिया असलेने शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्रं. सन 2018-प्रक्र/ 212/नवी 34 दिनांक 27/4/2018 परि.7 मधील 1 ते 6 नुसार शहरात दररोज निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची 100 टक्के निर्मितीच्या जागीच ओला व सुका कचरा असे विलगीकरण होवून कचरा डेपोवर ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करावी व शासन निर्णय नगरविकास विभाग क्रं. स्वमअ/2018/प्रक्र 79 नवी 34 दिनांक 29/1/2018 नुसार ओल्या कचऱ्यापासुन विकेंद्रित अथवा केंद्रित पध्दतीने कंपोष्ट खत तयार करुन खताची तपासणी करुन खतामधील विक्री हरित महासिटी कंपोष्ट हा ब्रँड वापरण्यास मान्यता घ्यावी असे नमूद आहे.

अशा प्रकारची कार्यवाही नपाकडुन करण्यात येत नाही. ओल्या कचऱ्यावर नपाकडुन कंपोष्ट खता ऐवजी गांडुळ खत प्रकल्प राबविण्यात येत आहे व गांडुळ खत प्रकल्पाकरिता कोणाची मान्यता घेणेत आली याचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. तसेच सुक्या कचऱ्याचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

1.नगरपरिषदेने पीसीडी कंपनीबरोबर दि.9-5-2007 रोजी घनकच-यापासून खत तयार करणे, आरडीएफ व विटा तयार करणेचा प्रकल्प सुरु करणेत आला. संबंधित कंपनी वेळोवेळी कराराचा भंग करत असल्यामुळे कौ.ठ.नं.464 दि.23-2-2011 नुसार प्रकल्प ताब्यात घेण्याबाबत मंजूरी मिळाली. परंतू सदर प्रकल्प संबंधित कंपनीकडून नगरपरिषदेच्या ताब्यात त्यावेळी मिळालेला नाही. त्यानंतर सदर प्रकल्प वरील ठरावानुसार एकतर्फी ताब्यात घेणेबाबत नोटीस बजावण्यात आली. त्यानंतर सदरचा बंद पडलेला प्रकल्प हा संबंधित कंपनीच्या सह भागीदार श्री.रमेश प्रेमराज मर्दा यांना देण्यात आला आहे.

2.संबंधित प्रकल्पाचे डी.पी.आर.पडताळणीस उपलब्ध झाले नाही. नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील दि.24-4-2015 च्या कार्यालयीन टीप्पणी नुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कोल्हापूर यांचे दि.10-4-2015 रोजी दिलेल्या निर्देशानुसार टाईम बाँड ॲक्शन प्लॅन तयार करुन न.प.च्या घनकच-यावर प्रक्रिया करण्यासाठी

सायंटीफीक लँडफिल्ड साईट विकसित करणेस सूचित केले आहे. त्यानुसार व मुळ कंत्राटदाराच्या करारनाम्यातील अटीनुसार मुळ मक्तेदार यांनी काम न केल्यामुळे संबंधित मक्तेदार कंपनीस काळया यादिमध्ये टाकण्यासाठी कायदेशिर कार्यवाही न.प.प्रशासनाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित प्रकल्पाचे सुरुवात कौ.ठ.464 दि.23-2-2011 मधील उपलब्ध माहितीनुसार सदर प्रकल्प 2007 पासुन कार्यान्वित झाल्याचे दिसुन येते. परंतू सदर प्रकल्पाचे मुळ निविदा मधील काही भाग सदर ठरावात नमूद असल्याने सदर प्रकल्प हा संयुक्त भागीदारी तत्वावर असुन घनकच-यापासून ॲक्सीलरेटेड ॲरोबिक बायो कनव्हर्शन अंडर कंट्रोल कंडीशन या तंत्रादवारे खत व इंधन निर्मिती ची निविदा कौ.ठ.नं.373 दि.23-3-2007 अन्वये मंजूर करुन सदर प्रकल्पातून होणा-या नफयामधुन खर्च वजा जाता 50% नफा 30 वर्षाच्या मुदतीचा विचार करुन नफयाचे हिस्सा प्रती पाच वर्षांनी 25% ते 50% पर्यंत 20 वर्षाच्या कालावधीसाठी देण्याबाबत व पुढील 10 वर्षाचा नफा हा रिव्हॉल्वीग फंड म्हणुन राखीव निधी ठेवण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू सदर बाबत मक्तेदाराकडून योग्य अमलबजावणी होत असल्याबाबत आरोग्य व न.प.प्रशासन यांनी गांभिर्यान दखल घेवुन कार्यवाही केलेली नाही.

3.महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (mpcb) यांचे पत्र क्रमांक d.o.no.mpcb/ms2014/17दि.24-2-2014 अन्वये नगरपरिषदेच्या obtaining of authorization and compliance of municipal solid waste (m and h) rules 2000 नुसार न.प.हददीमध्ये प्रतीदिन 100 मे.टन कचरा गोळा होवुन कचरा डेपोमध्ये साठविले जाते परंतू त्यावर प्रक्रीया निरंक असल्याचे निर्देशित केले आहे. त्यामुळे सदर पत्रातील लोकलेखा समितीचे 13 वा अहवालातील अ.क्र.1.64 नुसार पर्यावरण विषयक मार्गदर्शक तत्वे न पाळणा-या न.प./संस्थेवर कारवाई करणेबाबत निर्देशित केले आहे. वरीलप्रमाणे पर्यावरण खात्याकडून स्पष्ट निर्देश असताना न.प.ने सदर बाब दुर्लक्षित केले आहे.

4.उपरोक्त् कामाची निविदा देताना मुळ निविदाधारक हा डिफॉल्टर असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराच्या भागिदारास पुन्हा निविदा मंजूर केल्यामुळे अनियमितता झालेली आहे. सदर मंजूर निविदाधारक हा पीसीडी कंपनीचा भागीदार म्हणुन अधिकृतरित्या कार्यरत असल्यामुळे व एकच फर्म असल्यामुळे अशा निविदाधारकास निविदा नाकारणे बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सदर निविदा पध्दत ही पारदर्शक झालेली नाही. निविदा मंजूर केल्यानंतर सुध्ध्दा पुर्वीच्या ठेकेदाराच्या कामाच्या अनुभवानुसार करारनाम्यातील अटीनुसार काम योग्य पध्दतीने होईलच असे म्हणता येणार नाही. तसेच मुळ मक्तेदार डिफॉल्टर असल्यामुळे संबंधितांवर निविदा करारातील अटीनुसार कारवाई करण्याऐवजी कोर्ट मॅटर वर अनावश्यक खर्च करण्यात आलेला आहे.

त्यामुळ वरीलप्रमाणे निविदा मंजूर करण्याऐवजी सदर कामाचे फेर निविदा काढणे नगरपालिका प्रशासनाचे स्थायी निदेश क्रमांक 36 नुसार आवश्यक आहे.

5.कचरा डेपोचे सदर काम सन 2007 पासून 2014 पर्यंत ठप्प असल्यामुळे प्रदुषण नियामक मंडळाच्या दि.24-2-2014 च्या अहवालानुसार दैनंदिन 100 मे.टनाप्रमाणे कचरा संकलन होत असुन कचरा डेपोमध्ये 2007 ते 2014 या कालावधीदरम्यान 365 दिवस x 7 वर्षे x 100 मे.टन प्रतीदिन या प्रमाणे 255500 मे.टन एवढा कचरा कचरा डेपोमध्ये आरंभि शिल्लक अंदाजित असुन त्यानंतर 2015 ते 2019-20 अखेर प्रतीदिन संकलित होणारा कचरा गृहीत धरल्यास कचरा डेपोच्या धारण क्षमतेपेक्षा जादा कचरा संकलित करुन डंपिंग केले जाते. त्यामुळे नवीन मक्तेदाराने प्रतीदिन किती कच-यावर प्रक्रीया केली व किती जागा डंपिंग एरिया मध्ये मोकळी झाली तसेच निर्माण करण्यात आलेल्या खत आरडीएफ व विटा इत्यादि बाबतचे वार्षिक नफा किती झाला याबाबत त्रयस्त संस्थेचे तांत्रिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे. व सन 2019-2020 मध्ये खत विक्रीतून न.पा.स किती नफा झाला याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत.

DATRVPF8701 (Ref No : 76, Hmm No : 56)

60 इचलकरंजी न.प. मधील सिसनं.139 अर्बन मैदान शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2488776.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2391910.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 96866.00/-

निविदा जाहिरात राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये देण्यात आलेली नाही त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक लाभ झालेला नाही. कामाची कार्यादेश नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. करारनामा योग्य त्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आलेला नाही. रॉयल्टीची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. मोजमाप नोंदवही लेखापरिक्षणा उपलब्ध झाली नाही त्यामुळे केलेल्या कामाची खात्री करता येत नाही.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2019-2020चे लेखापरिक्षणात इचलकरंजीन.प. मधील सिसिनं.139 अर्बन मैदान शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसति करणे

कामाचे नांव	इचलकरंजीन.प. मधील सिसिनं.139 अर्बन मैदान शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसति करणे

लेखाशिर्षक	
डीएसआर वर्ष	सन 2015-16
अंदाजपत्रकीय रककम	14045505/-
प्रशासकीय मंजूरी	क्र. 378 दि. 28/03/2018
तांत्रिक मंजूरी	सुपरिन्टेंडिंग इंजिनिअर, MJP, सांगली यांचे पत्र क्र. दि.20/05/2016
निविदा प्रक्रिया	ई टेंडर
निविदा रक्कम रुपये	14045505/- 27 टक्के जादा
मक्तेदाराचे नांव	श्री ईस्माईल बा. खानापुरे
कामाचा आदेश	क्र.बांधकाम/12/2019, दि.08/03/2019
काम सुरु दिनांक	08/03/2019
काम पुर्ण दिनांक	काम चालू
कामाची मुदत	9 महिने
मोजमाप पुस्तिका	क्र. 1116
कामावरील एकूण खर्च	2488726/-

प्र क्रं.	दिनांक	रक्कम	तपशील
20/74	23/09/2019	2488726/-	1 ले धावते देयक

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार रु.50 लक्ष पेक्षा अधिक अंदाजपत्रकीय खर्चाकरिता राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिक प्रकाशन, राज्य स्तरीय कोणतेही दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. स्थानिक वर्तमान पत्रात

जाहिरात दिल्यामुळे नगरपरषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाची कार्यादेश नोंदवही ठेवून त्यामध्ये सर्व कामांचा तपशील, कंत्राटदाराचे नाव, कार्यादेश क्रमांक,काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक इ.संबंधी नोंदी असतील, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/ 43/ 05 दि.03/01/2006 (स्थायी निर्देश क्र.37) नुसार अभिकर्त्याकडून कार्य पार पडण्यासाठी विविध अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. अ.क्र.(7) नुसार कामाचे देयक अदा करण्यापूर्वी मुख्याधिकारी यांनी स्थळ निरीक्षण करून कामाची गुणवत्ता योग्य आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.तसेच तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली किंवा नाही याचीही खात्री करणे आवश्यक आहे. मोजणीबाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्यासमोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. अशी 10% तपासणी करतेवेळी जास्त रक्कमेच्या बाबींची मोजणी तपासनीस प्राधान्य द्यावे. अशी तरतूद असताना याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अ.क्र.(8) व (9) नुसार कामाची मोजमापे घेताना मोजणी पुस्तकांत स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद करावी त्याचप्रमाणे कामाच्या दर्जाबाबत पाहणी करतेवेळी व मोजमापे घेतेवेळी लोकप्रतिनिधी,शहराचे प्रतिष्टीत नागरिक / सेवाभावी संस्थाचे प्रतिनिधी/ पत्रकार यांना सोबत ठेवावे व त्यांची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेण्यात यावी अशी तरतूद असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत 500/- व त्या पुढील प्रत्येक लाखास रू.100/- अशा मुद्राकांवर करार करणे आवश्यक आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. 14045505 + 27 टक्के जादा रक्कम रू. 3792286 = 17837791/- च्या प्रमाणात रक्कम रू.17400/- मुद्रांक शुल्का वर करार करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रू. 12200/- वर करार केला आहे. त्यामुळे कमी मुद्रांक शुल्क ची रक्कम रू.5200/- वसुल करून शासन निधीत भरणा करावी.

5) उपरोक्त कामाचे अंदाजपत्रकामध्ये दरपृथ्थकरणात ldquo;TMT FE 500 STEEL BARrdquo; या पूर्ण बाबीवर 5% शुगर केन एरिया चे जादा दर आकारण्यात आलेले आहेत. परंतु शासन निर्णय पीडब्ल्युआर/डीएसआर/1091/6577 प्लॅनिंग 3 दिनांक 8/7/2003 अन्वये असा जादा दर आकारता येणार नाही. तरी खालीलप्रमाणे जादा 5% अदा रक्कम रु. 60390/- वसूल करून भरणा करावी.

अ.क्र	तपशिल	अंदाजपत्रकाती दर	वारलेले प्रमाणे	मुळ दराच्या 5% वाढीव रेट	जादा प्रदान

1 ले धावते देयक	TMT 500	58908	10.087mt	2945.40/-	29710/-
					29710/-

6) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील राजपत्र क्र.67 दिनांक 15/05/2015 नुसार रु.141.34 प्रति घ.मी.दरानेरॉयल्टी घेणेची आहे. त्यानुसार उपरोक्त कामाचे मोजमाप नोंदवहीमधील बाबनिहाय गौण खनिज वापर पाहता खालीलप्रमाणे रॉयल्टीची रक्कम रू. 56324/- कपात करणे आवश्यक असताना ती केली नाही.

बाब तपशिल		मोजमाप नोंदवहीमधील वापरलेले परिमाण	एकूण परिमाण	दर	रॉयल्टीची रक्कम
Item No.3 M10 sand	0.445	58.03	25.82	141.34	3649.87
Item No.6 Filling in pillow floor with concretes soil, murum		323.45	323.45	141.34	45716
Item No.7 M20 sand	0.425	50.45	21.44	141.34	3030.50
Item No.8 CCM 20 columns	0.425	15.74	6.68	141.34	945.49
Item No.8 CCM 20 Beams	0.425	21.07	8.95	141.34	1265.66
Item No.14 Burnt Bricks	0.35	34.7	12.14	141.34	1716.57
					56324.09

7) रॉयल्टी रकमेच्या रू.56324/- 10 टक्के रक्कम वसूल करुन District Mineral Foundation, Kolhapur या

निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.त्यानुसार उपरोक्त देयकातील देय रॉयल्टी रक्कम रु. 56324/- चे 10% प्रमाणे रु.5632/-वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी..

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 96866/- अंतिम अमान्य व रककम रुपये 2391910/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

DATABPM8101 (Ref No : 32, Hmm No : 53)

61 इचलकरंजी न.प. मधील 2017-18 आराखडयामधील उदयान विकसित करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 10

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2692996.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1645296.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 1047700.00/-

निविदा जाहिरात राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये देण्यात आलेली नाही त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक लाभ झालेला नाही. कामाची कार्यादेश नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. करारनामा योग्य त्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आलेला नाही. रॉयल्टीची रक्क्म कपात करण्यात आलेली नाही.उदयानात वापरणारी झाडे स्पेसिफिकेशनप्रमाणे ठराविक उंचीचे जातीची झाडे लावलेबाबत उदयान निरिक्षक यांनी प्रमाणीत केलेले नाही.मोजमाप नोंदवही तपासणीस उपलब्ध झाली नाही.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2019-2020चे लेखापरिक्षणात इचलकरंजी न.प. मधील 2017-18 आराखडयामधील उदयान विकसित करणे.

कामाचे नांव	1. सिसनं.615,617,618 भाग- 1 उदयाने विकसित करणे 2. सिसनं.615,617,618 भाग- 2 उदयाने विकसित करणे 3. सिसि नं. 562 पंचवटी कॉलनी उदयान विकसित करणे 4. सिसिनं.618 आरगे भवन उदयान विकसित करणे

लेखाशिर्षक	अमृत हरितपटटा अभियान
अंदाजपत्रकीय रककम	1. 784226/- 2. 612711/- 3. 2243368/- 4. 2209996/-
प्रशासकीय मंजूरी	शा.नि.क्र.अमृत-2016/प्र.क्र.187(2)/नवि-33, दि.11/09/2017
तांत्रिक मंजूरी	शहर अभियंता, कोल्हापुर महानगपालिका यांचे पत्र क्र.12/2017 दि.08/09/2017
निविदा प्रक्रिया	ई टेंडर
मक्तेदाराचे नांव	1 श्री प्रविण बरगे 2. श्री प्रविण बरगे 3. श्री बसाप्पा तेली 4. श्री प्रविण बरगे
कामाचा आदेश	1 क्र.उदयान/7/2018 , दि.24/04/2018 2 क्र.उदयान/6/2018 , दि.24/04/2018 3. क्र.उदयान/10/2018 , दि.24/04/2018 4. क्र.उदयान/ /2018 , दि.24/04/2018
काम सुरु दिनांक	1 24/04/2018 2 24/04/2018 3. 24/04/2018 4. 24/04/2018
काम पुर्ण दिनांक	काम चालू
कामाची मुदत	6 महिने

मोजमाप पुस्तिका	तपासणीस उपलब्ध झाली नाही
कामावरील एकूण खर्च	1 503150/- 2 395253/- 3. 893593/- 4. 901000/-

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार रु.50 लक्ष पेक्षा अधिक अंदाजपत्रकीय खर्चाकरिता राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिक प्रकाशन, राज्य स्तरीय कोणतेही दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात दिल्यामुळे नगरपरषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाची कार्यादेश नोंदवही ठेवून त्यामध्ये सर्व कामांचा तपशील, कंत्राटदाराचे नाव, कार्यादेश क्रमांक,काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक इ.संबंधी नोंदी असतील, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/ 43/ 05 दि.03/01/2006 (स्थायी निर्देश क्र.37) नुसार अभिकर्त्याकडून कार्य पार पडण्यासाठी विविध अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. अ.क्र.(7) नुसार कामाचे देयक अदा करण्यापूर्वी मुख्याधिकारी यांनी स्थळ निरीक्षण करून कामाची गुणवत्ता योग्य आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.तसेच तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली किंवा नाही याचीही खात्री करणे आवश्यक आहे. मोजणीबाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्यासमोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. अशी 10% तपासणी करतेवेळी जास्त रक्कमेच्या बाबींची मोजणी तपासनीस प्राधान्य द्यावे. अशी तरतूद असताना याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अ.क्र.(8) व (9) नुसार कामाची मोजमापे घेताना मोजणी पुस्तकांत स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद करावी त्याचप्रमाणे कामाच्या दर्जाबाबत पाहणी करतेवेळी व मोजमापे घेतेवेळी लोकप्रतिनिधी,शहराचे प्रतिष्टीत नागरिक / सेवाभावी संस्थाचे प्रतिनिधी/ पत्रकार यांना सोबत ठेवावे व त्यांची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेण्यात यावी अशी तरतूद असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत 500/- व त्या पुढील प्रत्येक लाखास रू.100/- अशा मुद्राकांवर करार करणे आवश्यक आहे. कमी मुद्रांक शुल्क रक्कम रू. 1700/- संबंधिताकडून वसुल करावी.

कामाचे नाव	मुद्रांक शुल्क करार करणे आवश्यक	प्रत्यक्ष मुद्रांकावर केलेलो करारनामा	कमी मुद्रांक शुल्क रक्कम
सिसनं.615,617,618 भाग- 1 उदयाने विकसित करणे	500	100	400
सिसनं.615,617,618 भाग- 2 उदयाने विकसित करणे	500	100	400
सिसि नं. 562 पंचवटी कॉलनी उदयान विकसित करणे	1800	1300	500
सिसिनं.618 आरगे भवन उदयान विकसित करणे	1800	1400	400
			1700

5) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शा.नि.क्र.अमृत-2016/प्र.क्र.187(2)/नवि-33, दि.11/09/2017 अन्वये कामाची निविदा स्विकारणे दि.13/09/2017, प्राप्त निविदा स्विकृतीची सर्व कार्यवाही करणे दि.03/10/2017 व कामाचे कर्यादेश देणे दि. 05/10/2017 असे असताना प्रत्यक्षात शासनाच्या वेळापत्रकाप्रमाणे कामाची आखणी केली नाही. त्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

6)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शा.नि.क्र.अमृत-2016/प्र.क्र.187(2)/नवि-33, दि.19/05/2017 अन्वये काम पुर्ण करण्यासाठी 6 महिन्याची मुदत दिली आहे पंरतु प्रत्यक्षात मुदतीमध्ये काम पुर्ण केले नाही. करारनाम्यातील अट क्र. 12 प्रमाणे रू.500/- प्रतीदिन दंडाची तरतुद केली आहे. तरी खालील प्रमाणे मक्तेदारांकडून दंडाची रक्कम रू. 1046000/- वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

कामाचे नाव	काम सुरू दिनांक	मुदत 6 महिने	माहे मार्च 2020 पर्यंत जादा दिवस	दंडाची रक्कम
सिसनं.615,617,618 भाग- 1 उदयाने विकसित करणे	24/04/2018	24/10/2018	523 दिवस * 500/- प्रती दिन दंड	261500
सिसनं.615,617,618 भाग- 2 उदयाने	24/04/2018	24/10/2018	523 दिवस * 500/- प्रती दिन दंड	261500

विकसित करणे				
सिसि नं. 562 पंचवटी कॉलनी उदयान विकसित करणे	24/04/2018	24/10/2018	523 दिवस * 500/- प्रती दिन दंड	261500
सिसिनं.618 आरगे भवन उदयान विकसित करणे	24/04/2018	24/10/2018	523 दिवस * 500/- प्रती दिन दंड261500	261500
				1046000

7)सदर कामांची मोजमाप नोंदवही लेखापरिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाली नाही त्यामुळे कामाची खात्री करता येत नाही.

8)करारनाम्यातील अट क्र. 10 कर्मचा-यांचे EPF खाते काढणे आवश्यक असताना प्रत्यक्षात नस्तीसोबत EPF खातेबाबतची कागदपत्रे जोडली नाहीत.

9) करारनाम्यातील अट क्र.9 कर्मचा-याचा विमा काढणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

10)करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार उदयानात वापरणारी झाडे स्पेसिफिकेशनप्रमाणे ठराविक उंचीचे जातीची झाडे लावलेबाबत उदयान निरिक्षक यांनी प्रमाणीत केलेले नाही.

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 1047700/- अंतिम अमान्य व रककम रुपये 1645296/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

DATABPM8101 (Ref No : 39, Hmm No : 57)

62 न.प. हद्दवाढ झालेल्या भागातील नागरी सुविधांचा विकास करणे अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चातील अनियमितता बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 7852703.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 44219.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 6938513.00/- अंतिम अमान्य रक्कमरु. 870172.00/-

निविदेस व्यापक प्रसिद्धी देणेत आली नाही. दरपृथ्थकरणात BD Section ,ऐवजी RD Section चा दर देणे आवश्यक असता तसे न केलेने खालीलप्रमाणे रकमेचे अतिप्रदान झाले आहे. रॉयल्टी व डीएमएफ रक्कम कमी वसूल केली आहे. काम विहित मुदतीत पूर्ण झाले नाही तरी देखील विलंब शुल्क वसूल केले नाही. कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी.चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-2020 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये न.प.हद्दवाढ झालेल्या भागातील नागरी सुविधांचा विकास करणे अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चात खालील अनियमितता दिसून येतात. याबाबत अर्धसमासपत्र क्र.98 दि. 25/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही.

कामाचे नांव	न.प.हद्दवाढ झालेल्या भागातील नागरी सुविधांचा विकास करणे अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे
निधीचे नांव	हद्दवाढ अनुदान
अंदाजपत्रकीय तरतूद	रुपये 8569690
प्रशासकीय मान्यता	नगरविकास विभाग-2019/प्र.क्र.38/नवि16 दिनांक 31/7/2019
निविदा प्रक्रिया	ई निविदा
तांत्रिक मान्यता	
मक्तेदाराचे नांव	सुधीर आण्णा लाटकर
कामाचा आदेश	दिनांक 17/9/2019
काम सुरु दिनांक	17/9/2019 कामाची मुदत 60 दिवस

मोजमाप पुस्तक क्रं.	40 पान क्रं. 1 ते 29
कामावरील एकूण खर्च	रुपये 7852904

	दिनांक	रक्कम	मक्तेदार	तपशील
1	13/12/2019	2779990	सुधीर आ. लाटकर	पहिले देयक DIGIPAY
2	30/12/2019	2492482	सुधीर आ. लाटकर	दुसरे देयक DIGIPAY
3	13/3/2020	2580432	सुधीर आ. लाटकर	तिसरे देयक DIGIPAY
	एकूण	7852904		

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार रु. 50 लक्ष वरील अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राष्ट्रीय स्तरावरील दैनिक प्रकाशन, राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही

2)सदर कामासाठी सन 2018-2019 च्या राज्यदरसुची प्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन रक्कम खर्च करणेत आली आहे. देयकातील बाब क्रं.1 अन्वये 114.94 घमी खुदाईकरिता रुपये 156.85 प्रति घमी दर देवून दरपृथ्थकरण केले आहे. दरपृथ्थकरणात BD Section ,ऐवजी RD Section चा दर देणे आवश्यक असता तसे न केलेने खालीलप्रमाणे रकमेचे अतिप्रदान झाले आहे. देयकात राज्यदरसुची पान क्रं. 183 बाब क्रं. 21.2 BDA 1 चा मूळ दर रुपये 143/- दिला आहे. राज्यदरसुची पान क्रं. 32 बाब क्रं. 2.11 MORTH 301 चा रुपये 72/- दर देणे आवश्यक होते त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

बाब क्रं. व बाब	दिलेला दर	देय दर	तफावत

1 Excavation for foundation in earth, soil of all types	143	72	
+ 5 % Sugar factory area	7.15	3.6	
Total	150	75.6	74.00

वरील तपशिलान्वये रु. 74 जादा दर मक्तेदारास अदा केला आहे.

देयक तपशिल	परिमाण	जादा अदा दर	जादा अदा रक्कम
पहिले देयक	450.44	74	33333
दुसरे देयक	404.42	74	29927
तिसरे देयक	467.99	74	34632
		एकूण	97892

वरील कामाची निविदा ही अंदाजपत्रकीय रकमेच्या 6.78% जादा दराने मंजूर केली आहे. त्यामुळे 97892 वर 6.78% जादा दर रक्कम रु. 6637 तसेच 12% GST रक्कम रु. 11747 असे एकूण र. रु. 116276 रु. वसूल होणे आवश्यक आहे.

3)महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, मे-11, 2015 /वैशाख21, 1937, दिनांक11/05/2015 अन्वये कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची स्वामित्व धनाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक एमडीएफ/0615/प्र.क्रं./34/उदयोग-9, दि.01/09/2016 व शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना दि.1/03/2017 नुसार रॉयल्टी रकमेच्या 10 टक्के रक्कम (DMF) वसूल करुन District Mineral Foundation, Kolhapur या निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे. सदर कामात खालीलप्रमाणे गौण खनिजाचा वापर झालेला आहे.

अ.क्रं.	बाब	घमी
1	एम-10	98.15
2	एम 20	69.07
3	Paradi	117.19

	एकूण	284.41

एकूण घमी 284.41 x 141.34 प्रति घमीप्रमाणे रक्कम रुपये 40199/- इतकी व 10% DMF रक्कम रु. 4020 असे एकूण र. रु. 44219 वसुल करुन शासन निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

4)शासन निर्णय पीडब्ल्युडीआर/डीएसआर/1091-सीआर/6577/प्लॅनिंग-03, दिनांक.08/07/2003 आणि सार्वजनिक बांधकाम विभाग पत्र क्रमांक प्रशा./रस्ते-सांगली/5949/2005 दिनांक 8 ऑगस्ट,2005 नुसार अन्वये बांधकाम साहित्यासाठी वाढीव टक्केवारी देय नाही. वाढीव दर केवळ मजुरीच्या दरावरच घेणेत यावेत. तरी उपरोक्त कामांमध्ये वापरण्यात आलेले FE TMT STEEL हे बांधकाम साहित्यामध्ये समाविष्ट होत असलेने त्यावरील शुगर केन एरिया चा वाढीव 5% दर देण्यात आला आहे, तरी सदर बाबीवरील पुढील वाढीव दर खर्च रु. 58003 व या कामाची निविदा ही अंदाजपत्रकीय रकमेच्या 6.78% जादा दराने मंजूर केली आहे. त्यामुळे 58003 वर 6.78% जादा दर रक्कम रु. 3933 तसेच 12% GST रक्कम रु. 6960 असे एकूण र. रु. 68896 लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करणेत येत आहे.

देयक तपशिल	प्रत्यक्ष वापर QTY IN CuM	SSR पेक्षा जादा दर per CuM	एकूण वसूल पात्र रक्कम
पहिले देयक	6.397	3261.37	20863
दुसरे देयक	5.212	3261.37	16998
तिसरे देयक	6.176	3261.37	20142
		एकूण	58003

5)कामाचे आदेश हे दि. 17.9.2019 रोजी दिले असून कामाची मुदत 60 दिवस आहे. त्यानुसार सदर काम हे दि. 15.11.2019 रोजी पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु दि. 31.3.2020 अखेर सदर काम अपूर्ण असलेचे दिसुन येते. मक्तेदाराने कामासाठी मुदतवाढ मागणी अर्ज केलेला नाही व न.प.कडून कोणताही मुदतवाढ आदेश देण्यात आलेला नाही. त्यामुळे करारपत्रातील अट क्र. 5 नुसार प्रति दिन रु. 5000 प्रमाणे 137 दिवसांसाठी र. रु. 685000 दंडाची रक्कम मक्तेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे.

6)वरील कामासाठी सन 2018-2019 च्या राज्य दरसुचीचा अवलंब केला आहे. सदर राज्य दरसुचीतील सेक्शन D(i) नुसार मक्तेदाराने कामगार विमा पोलिसी सादर करणे आवश्यक आहे. मक्तेदाराने अशी विमा पोलिसी न घेतलेस कार्यकारी अभियंता (बांधकाम) विमा पोलिसी काढतील व मक्तेदाराच्या पहिल्या देयकातून मुळ रकमेच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून वसुली करणेची आहे तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

7)स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 3.1.2006 मधील सूचना क्र.29 नुसार रु.1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास

कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. परंतु सदरप्रमाणे उपरोक्त कामांचे फलक लावण्यात अलेचे नस्तीवरून दिसून येत नाही.

8)नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 131 नुसार प्रथमप्रसंगी प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या त्यांच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. परंतु गटरची कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी.चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

वरील त्रुटी पूर्ततेअभावी र. रु. 44219 वसुलपात्र र. रु. 870172 अंतिम अमान्य र. रु.6938513 तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 41, Hmm No : 54)

63 इचलकरंजी न.प. मधील 2016-17 आराखडयामधील उदयान विकसित करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3232462.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 2634262.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 598300.00/-

निविदा जाहिरात राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय वर्तमानपत्रामध्ये देण्यात आलेली नाही त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक लाभ झालेला नाही. कामाची कार्यादेश नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. करारनामा योग्य त्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आलेला नाही. मोजमाप नोंदवही लेखापरिक्षणा उपलब्ध झाली नाही त्यामुळे केलेल्या कामाची खात्री करता येत नाही.

इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर चे सन 2019-2020चे लेखापरिक्षणात इचलकरंजी न.प. मधील 2016-17 आराखडयामधील उदयान विकसित करणे

कामाचे नांव	1. सि.स.137 येथे उदयान विकसित करणे 2. शहापुर येथे उदयाने विकसि करणे

लेखाशिर्षक	अमृत हरितपटटा अभियान
अंदाजपत्रकीय रककम	1. 9276446/- 16.20 टक्के कमी 2. 5721839/- 15.15 टक्के कमी
प्रशासकीय मंजूरी	शा.नि.क्र.अमृत-2016/प्र.क्र.187(2)/नवि-33, दि.19/05/2017
तांत्रिक मंजूरी	शहर अभियंता, कोल्हापुर महानगपालिका यांचे दि.11/05/2017
निविदा प्रक्रिया	ई टेंडर
मक्तेदाराचे नांव	1 श्री ज्यातिराम बांगे 2. श्री रमेश शिंदे
कामाचा आदेश	1 क्र.उदयान/3602/2017 , दि.31/10/2017 2 क्र.उदयान/3698/2017 , दि. 06/11/2017
काम सुरु दिनांक	1 31/10/2017 2 06/11/2017
काम पुर्ण दिनांक	काम चालू
कामाची मुदत	6 महिने
मोजमाप पुस्तिका	तपासणीस उपलब्ध झाली नाही
कामावरील एकूण खर्च	1 2010155/- (3500000/- मागील वर्षी खर्च) 2 1222307

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील

तरतुदीनुसार रु.50 लक्ष पेक्षा अधिक अंदाजपत्रकीय खर्चाकरिता राष्ट्रीय स्तरावरील कोणतेही दैनिक प्रकाशन, राज्य स्तरीय कोणतेही दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात दिल्यामुळे नगरपरषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.120 नुसार नमुना क्र. 12 मध्ये कामाची कार्यादेश नोंदवही ठेवून त्यामध्ये सर्व कामांचा तपशील, कंत्राटदाराचे नाव, कार्यादेश क्रमांक,काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक इ.संबंधी नोंदी असतील, तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील आदेश क्रमांक नपप्रस- 1005/ विकास कामे/ 43/ 05 दि.03/01/2006 (स्थायी निर्देश क्र.37) नुसार अभिकर्त्याकडून कार्य पार पडण्यासाठी विविध अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. अ.क्र.(7) नुसार कामाचे देयक अदा करण्यापूर्वी मुख्याधिकारी यांनी स्थळ निरीक्षण करून कामाची गुणवत्ता योग्य आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.तसेच तांत्रिक अधिकाऱ्यामार्फत कामाची तपासणी झाली किंवा नाही याचीही खात्री करणे आवश्यक आहे. मोजणीबाबत स्वतः स्थळ निरीक्षण करून आपल्यासमोर कमीत कमी 10% बाबींची तपासणी करून घ्यावी. अशी 10% तपासणी करतेवेळी जास्त रक्कमेच्या बाबींची मोजणी तपासनीस प्राधान्य द्यावे. अशी तरतूद असताना याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अ.क्र.(8) व (9) नुसार कामाची मोजमापे घेताना मोजणी पुस्तकांत स्वाक्षरी व दिनांकाची स्पष्ट नोंद करावी त्याचप्रमाणे कामाच्या दर्जाबाबत पाहणी करतेवेळी व मोजमापे घेतेवेळी लोकप्रतिनिधी,शहराचे प्रतिष्टीत नागरिक / सेवाभावी संस्थाचे प्रतिनिधी/ पत्रकार यांना सोबत ठेवावे व त्यांची मोजमाप पुस्तकात स्वाक्षरी घेण्यात यावी अशी तरतूद असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 Maharashtra stamp Act (Amendment) (Maha act No.XX of 2015) मधील परिच्छेद क्र.34 केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत 500/- व त्या पुढील प्रत्येक लाखास रू.100/- अशा मुद्राकांवर करार करणे आवश्यक आहे. त्यानुसार अ.क्र. 2 मधील शहापुर येथील उदयाने विकसित करणे या कामाचे रू.4300/- वर मुद्रांक शुल्कवर करार करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात तो 4000/- वर केला आहे तरी रक्कम रू.300/- संबंधिताकडून वसुल करावी

5) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शा.नि.क्र.अमृत-2016/प्र.क्र.187(2)/नवि-33, दि.19/05/2017 अन्वये कामाची निविदा स्विकारणे दि.18/05/2017, प्राप्त निविदा स्विकृतीची सर्व कार्यवाही करणे दि.12/06/2017 व कामाचे कर्यादेश देणे दि.21/06/2017 असे असताना प्रत्यक्षात दि.31/10/2017 व 06/11/2017 रोजी उशीरा कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे शासनाच्या वेळापत्रकाप्रमाणे कामाची आखणी केली नाही.

6) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शा.नि.क्र.अमृत-2016/प्र.क्र.187(2)/नवि-33, दि.19/05/2017 अन्वये काम पुर्ण करण्यासाठी 6 महिन्याची मुदत दिली आहे पंरतु प्रत्यक्षात मुदतीमध्ये काम पुर्ण केले नाही. तरी खालील प्रमाणे मक्तेदारांकडून दंडाची रक्कम वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

अ. सि.स.137 येथे उदयान विकसित करणे या कामाचा कार्यरंभ आदेश दि.31/10/2017 रोजी दिला आहेत्यानुसार 01/05/2018 रोजी मुदत संपते पंरतू प्रत्यक्षात मार्च 2020 पर्यंत काम पुर्ण झालेले नाही दि.01/05/2018 ते 31/03/2020 या कालावधीत म्हणजेच प्रत्यक्ष 700 दिवस * रू. 500/- दंड प्रति दिन= 350000/- रूपये मक्तेदाराकडून वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

ब) शहापुर येथे उदयाने विकसि करणे या कामाचा कार्यरंभ आदेश दि.06/11/2017 रोजी दिला आहेत्यानुसार 06/05/2018 रोजी मुदत संपते पंरतू प्रत्यक्षात मार्च 2020 पर्यंत काम पुर्ण झालेले नाही दि.07/05/2018 ते 31/03/2020 या कालावधीत म्हणजेच प्रत्यक्ष 696 दिवस * रू. 500/- दंड प्रति दिन = 348000/- रूपये मक्तेदाराकडून वसुल करून पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

7) सदर कामांची मोजमाप नोंदवही लेखापरिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाली नाही त्यामुळे कामाची खात्री करता येत नाही.

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 598300/- अंतिम अमान्य व रककम रुपये 2634262/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

DATABPM8101 (Ref No : 43, Hmm No : 55)

64 सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चातील अनियमितता बाबत.(2016-17 DSR नुसार)

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3468157.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 24336.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 3358796.00/- अंतिम अमान्य रक्कमरु. 85025.00/-

5 लक्ष वरील कामाच्या निविदेस व्यापक प्रसिद्धी देणेत आली नाही. मक्तेदारास जादा GST रक्कम अदा करणेत आली आहे. देयकातून विमा रक्कम 1% कपात करणे आवश्यक असता अर्धा टक्का कपात केली आहे. कमी मुद्रांक शुल्क वसूल केलेचे दिसून येते. रॉयल्टी व DMF रक्कम वसूल केली नाही. कामांचे फलक लावण्यात आलेचे नस्तीवरून दिसून येत नाही. गटरची कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी. चे काम झाले आहे. तथापि,

मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-2020 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चामध्ये खालील अनियमितता दिसून येतात. सदर कामे सन 2016-2017 च्या डीएसआर नुसार करणेत आली आहेत. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 94 दि.25/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	मक्तेदाराचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	झालेला खर्च
1	प्र. क्र. 27 डॉ राधाकृष्णन विद्यामंदीर ते रूनवाल टॉवर पर्यंत गटर करणे.	संदेश ज. शिंदे	828265	828242
2	परीट घर ते जयराम पुजारी घर पर्यंत गटर करणे.	शशिकांत धोत्रे	504450	509312
3	प्र.क्र. 14 राहुल मोरे घर ते जमादार शेतापर्यंत आरसीसी गटर करणे.	प्रिया चं. नाईक	870485	780536
4	प्र.क्र. 22 ॲड. काजवे घरामागे शिंदे घर ते काजवे घर गटर करणे.	दयानंद शा. वडर	255270	259358
5	प्र.क्र. 22 करोसे घर ते ठोंबरे घर गटर करणे.	शिवाजी सी. धुमाळ	255270	255270
6	प्र.क्र. 4 कृष्णा नगर मधील गल्ली नं. 2 व्हदडी किराणा स्टोअर्स रस्ता दोन्ही बाजूस गटर करणे.	दर्शन ना. जोशी	436250	397487
7	कमला नेहरू सोसायटी मध्ये गटर दुरुस्ती करणे	सचिन पा. लोकरे	417150	437952
	एकूण खर्च			3468157

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील

तरतुदीनुसार रु. 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना वरील कामांमध्ये काही कामे 5 लाखाच्या वरील असून देखील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2)नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील स्थायी निर्देश क्र.36 दि.29/12/2005 मधील सूचना क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजुरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात. तथापि, कामाची अत्यंत निकड असल्यास अशा कामांना भागंशः (PART ORDER) आदेश देण्यात यावेत व उर्वरित कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात, असे स्पष्ट केले असताना या नियमाचे पालन न करता उपरोक्त कामासाठी जादा दरांची निविदा मंजूर करून त्याप्रमाणे देयक अदा करणेत आले आहे.

3)प्र. क्र. 27 डॉ राधाकृष्णन विद्यामंदीर ते रूनवाल टॉवर पर्यंत गटर करणे या कामातून मक्तेदारास 12% GST रक्कम अदा करणे आवश्यक असता 18% GST रक्कम अदा केली आहे. त्यामुळे खालील प्रमाणे जादा प्रदान र. रु. 42114 संबंधिताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

अ.क्रं.	मुल्यांकन र.	देय GST र.	अदा GST र.	जादा अदा र.
1	701900	84228	126342	42114

4)खालील कामांच्या देयकातून विमा रक्कम 1% कपात करणे आवश्यक असता अर्धा टक्का कपात केली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	मुल्यांकन र. रु.	कमी कपात विमा र.
1	प्र. क्र. 27 डॉ राधाकृष्णन विद्यामंदीर ते रूनवाल टॉवर पर्यंत गटर करणे.	828242	1385
2	प्र.क्र. 14 राहुल मोरे घर ते जमादार शेतापर्यंत आरसीसी गटर करणे.	780536	3453
3	प्र.क्र. 22 ॲड. काजवे घरामागे शिंदे घर ते काजवे घर गटर करणे.	259358	2477
4	प्र.क्र. 4 कृष्णा नगर मधील गल्ली नं. 2 व्हदडी किराणा स्टोअर्स रस्ता दोन्ही बाजूस गटर करणे.	381100	1644

5	कमला नेहरू सोसायटी मध्ये गटर दुरुस्ती करणे	417097	2086
	एकूण खर्च	2666333	11045

वरील तपशिलान्वये उर्वरित विमा रक्कम रु. 11045/- संबंधित मक्तेदारांकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

5)महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 महाराष्ट्र स्टॅप ॲकट (Amendment) मधील परिच्छेद क्र.34 नुसार केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे असून खालील तपशिलान्वये कमी मुद्रांक वसूल केलेचे दिसून येते.

अ.क्र.	काम क्र.	मक्तेदाराचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	वसूल मुद्रांक र.	कमी वसूल मुद्रांक र.
1	1	संदेश ज. शिंदे	828265	100	400
2	2	शशिकांत धोत्रे	504450	100	400
3	3	प्रिया चं. नाईक	870485	100	400
4	4	दयानंद शा. वडर	255270	100	400
5	5	शिवाजी सी. धुमाळ	255270	100	400
6	6	दर्शन ना. जोशी	436250	100	400
7	7	सचिन पा. लोकरे	417150	100	400
			एकूण		2800

वरील तपशिलान्वये मुद्रांकाची उर्वरित रक्कम रु.2800/- संबंधित मक्तेदारांकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

6)शासन निर्णय पीडब्ल्युडीआर/डीएसआर/1091-सीआर/6577/प्लॅनिंग-03, दिनांक.08/07/2003 आणि सार्वजनिक बांधकाम विभाग पत्र क्रमांक प्रशा./रस्ते-सांगली/5949/2005 दिनांक 8 ऑगस्ट,2005 नुसार अन्वये बांधकाम साहित्यासाठी वाढीव टक्केवारी देय नाही. वाढीव दर केवळ मजुरीच्या दरावरच घेणेत यावेत. तरी

उपरोक्त कामांमध्ये वापरण्यात आलेले FE STEEL व ISNP PIPES हे बांधकाम साहित्यामध्ये समाविष्ट होत असलेने त्यावरील शुगर केन एरिया चा वाढीव 5% दर देण्यात आला आहे, तरी सदर बाबीवरील पुढील कामांचा वाढीव दर खर्च रु. 42911 लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करणेत येत आहे.

कामाचे नाव	साहित्य	प्रत्यक्ष वापर QTY IN CuM	SSR पेक्षा जादा दर per CuM	एकूण वसूल पात्र रक्कम
प्र.क्र. 22 करोसे घर ते ठोंबरे घर गटर करणे.	FE STEEL	0.461	2533	1168
	ISNP PIPE	102	20.25	2066
प्र.क्र. 22 ॲड. काजवे घरामागे शिंदे घर ते काजवे घर गटर करणे.	FE STEEL	0.557	2533	1411
	300 MM PIPE	100.50	20.25	2035
प्र.क्र. 14 राहुल मोरे घर ते जमादार शेतापर्यंत आरसीसी गटर करणे.	FE STEEL	2.748	2533	6961
परीट घर ते जयराम पुजारी पर्यंत घर गटर करणे.	FE STEEL	1.937	2533	4906
कमला नेहरू सोसायटी मध्ये गटर दुरुस्ती करणे	Concrete Pipe	300	20.25	6067
प्र.क्र. 4 कृष्णा नगर मधील गल्ली नं. 2 व्हदडी किराणा स्टोअर्स रस्ता दोन्ही बाजूस गटर करणे.	ISNP PIPE	472.50	14.13	6676
प्र. क्र. 27 डॉ राधाकृष्णन विद्यामंदीर ते रूनवाल टॉवर पर्यंत गटर करणे.	ISNP PIPE	20.25	573.90	11621
			एकूण	42911

7)महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, मे-11,2015/वैशाख 21,1937,

दिनांक11/05/2015 अन्वये कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची स्वामित्व धनाची रक्कम वसूल करणे आवश्यक होते. तसेच शासन निर्णय क्रमांक एमडीएफ/0615/प्र.क्रं./34/उदयोग-9, दि.01/09/2016 व शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना दि.1/03/2017 नुसार रॉयल्टी रकमेच्या 10 टक्के रक्कम (DMF) वसूल करुन District Mineral Foundation, Kolhapur या निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

अ.क्र	काम क्र.	बाब	घमी	वसूल रॉयल्टी र.	कमी वसूल र.	10% DMF र.
1	2	Soling of 80 mm	15.16	0	2143	214
		M-10	8.50	0	1201	120
		M-20	8.54	0	1207	120
		Paradi	8.76	0	1238	124
2	4	Soling stone	8.74	0	1234	123
		M-20	2.19	0	310	31
		Paradi	4.82	0	681	68
2	7	एम-15	20.01	1434	1394	283
	एकूण		284.41		9408	1083
	एकूण एकंदर 10491					

वरील तपशिलान्वये रॉयल्टी रक्कम रुपये 9408/- व 10% DMF रक्कम रु. 1083 असे एकूण र. रु. 10491 वसुल करुन शासन निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

8)नगरपरिषद लेखासंहिता,2011 मधील नियम क्रमांक 131 नुसार प्रथमप्रसंगी,प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या त्यांच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. परंतु काही गटर कामांची कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी.चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

9)स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 3.1.2006 मधील सूचना क्र.29 नुसार रु.1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. परंतु सदरप्रमाणे उपरोक्त कामांचे फलक लावण्यात आलेचे नस्तीवरून दिसून येत नाही.

10)नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 131 नुसार प्रथमप्रसंगी प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या त्यांच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. परंतु गटरची कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी. चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

11)नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक 28/05/2018 नुसार त्रयस्थ शासकीय संस्थेकडून कामाचे लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी र. रु. 24336 वसुलपात्र, र. रु. 85025 अंतिम अमान्य व र. रु. 3358796 तात्पुरती करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 46, Hmm No : 36)

65 सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चातील अनियमितता बाबत.(2018-19 DSR नुसार)

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1601260.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 11489.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1497492.00/- अंतिम अमान्य रक्कमरु. 92279.00/-

देयकातून विमा रक्कम 1% कपात करणे आवश्यक असता अर्धा टक्का कपात केली आहे. 5 लक्ष वरील कामाच्या निविदेस व्यापक प्रसिद्धी देणेत आली नाही. कमी मुद्रांक शुल्क वसूल केलेचे दिसून येते. कामांचे फलक लावण्यात आलेचे नस्तीवरून दिसून येत नाही. SCADA प्रणाली न वापरलेने SCADA चे दर मूळ दरामधून वजा करणे आवश्यक असता न केल्याने जादा प्रदान झाले आहे. गटरची कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी. चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-2020 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत आर सी सी गटर बांधकाम करणे खर्चामध्ये खालील अनियमितता दिसून येतात. सदर कामे सन

2018-2019 च्या डीएसआर नुसार करणेत आली आहेत. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 95 दि. 25/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	मक्तेदाराचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	झालेला खर्च
1	भाटले मळा विहिरीजवळ आर सी सी सारण गटर करणे.	सुरज दांगडे	804551	840186
2	प्र.क्र. 22 गुंडवाडी वसाहती मधील मुदगल घर ते भंडारे घर गटर करणे.	प्रवीण टेके	421506	553383
3	प्र.क्र. 6 बीजेपी मार्केट कम्पौड लगत आरसीसी गटर करणे.	अलका ड. सूर्यवंशी	180766	207691
	एकूण खर्च			1601260

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार रु. 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना वरील कामांमध्ये काही कामे 5 लाखाच्या वरील असून देखील शासन निर्णयानुसार कार्यवाही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2)राज्यस्तरीय दरसूची संबंधी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ नागपूर यांचेकडील पत्र क्र. 7542 दि. 27.11.2017 चे पत्रानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाकडील गटर च्या कामामध्ये स्काडा न वापरलेस डीएसआर मधील मुळ दरामधून 6% रक्कम वजा करून त्यानुसार दर पृथकरण करणेत यावे. व स्काडा विरहित प्रणालीचा वापर करणेपुर्वी तांत्रिक मान्यता प्रदान करणा-या सक्षम प्राधिका-याची परवानगी घेणेत यावी, असे स्पष्ट असताना देखील सक्षम प्राधिका-याची परवानगी घेणेत आली नाही व मूळ दरामधून 6% रक्कम वजा करून दर पृथकरण करण्यात आले नाही. त्यामुळे खालील प्रमाणे र. रु. 46378 व त्यावरील 12% GST रक्कम रु. 5565 असे एकूण र. रु. 51943 जादा प्रदान रक्कम लेखापरीक्षणामध्ये अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	बाब	दिलेला दर	देय दर 6% SCADA वजा करून	जादा दर	QTY In CuM	रक्कम

1	भाटले मळा विहिरीजवळ गटर करणे	M-15	5298.10	5125.87	172.23	22.33	3864
		M-20	5802.65	5599.6	203.05	21.537	4373
		Paradi	12263.45	11678.53	584.92	33.12	19373
2	प्र.क्र. 22 गुंडवाडी वसाहती मध्ये गटर करणे.	M-15	5230.30	5056.6	173.7	14.49	2517
		Paradi	12016.95	11435.4	581.55	15.91	9252
3	प्र.क्र. 6 बीजेपी मार्केट आरसीसी गटर करणे.	M-15	5298.10	5005.76	292.34	23.94	6999
	एकूण जादा अदा रक्कम						46378

3)भाटले मळा विहिरीजवळ आर सी सी सारण गटर करणे या कामाची मोजमाप पुस्तिका क्र. 1101 तपासणी केली असता त्यामध्ये पान नं 50 वर सदर कामाची मापे नोंदवली असून त्यामध्ये TMT FE 500 ची परिगणना / बेरीज 1.364 असताना 1.664 नोंदवली आहे, 0.3 kg जादा परिगणना/ बेरीज नोंदवल्या मुळे खालील प्रमाणे जादा रक्कम रु.20139 व त्यावरील 12% GST रक्कम रु. 2417 असे एकूण र. रु. 22556 लेखापरीक्षणामध्ये अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

अ.क्र.	परिमाण	दर	जादा अदा रक्कम
1	0.3	67129.70	20139

4)खालील कामांच्या देयकातून विमा रक्कम 1% कपात करणे आवश्यक असता अर्धा टक्का कपात केली आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	मुल्यांकन र. रु.	कमी कपात विमा र.
1	भाटले मळा विहिरीजवळ आर सी सी सारण गटर करणे.	840186	7106
2	प्र.क्र. 22 गुंडवाडी वसाहती मधील मुदगल घर ते भंडारे घर गटर करणे.	780536	2260

3	प्र.क्र. 6 बीजेपी मार्केट कम्पौड लगत आरसीसी गटर करणे.	259358	923
	एकूण खर्च	1880080	10289

वरील तपशिलान्वये उर्वरित विमा रक्कम रु. 10289/- संबंधित मक्तेदारांकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

5)महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 महाराष्ट्र स्टॅप ॲकट (Amendment) मधील परिच्छेद क्र.34 नुसार केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे असून खालील तपशिलान्वये कमी मुद्रांक वसूल केलेचे दिसून येते.

अ.क्र.	काम क्र.	मक्तेदाराचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	वसूल मुद्रांक र.	कमी वसूल मुद्रांक र.
1	1	सुरज दांगडे	804551	100	400
2	2	प्रवीण टेके	421506	100	400
3	3	अलका ड. सूर्यवंशी	180766	100	400
			एकूण		1200

वरील तपशिलान्वये मुद्रांकाची उर्वरित रक्कम रु.1200/- संबंधित मक्तेदारांकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

6)शासन निर्णय पीडब्ल्युडीआर/डीएसआर/1091-सीआर/6577/प्लॅनिंग-03, दिनांक.08/07/2003 आणि सार्वजनिक बांधकाम विभाग पत्र क्रमांक प्रशा./रस्ते-सांगली/5949/2005 दिनांक 8 ऑगस्ट,2005 नुसार अन्वये बांधकाम साहित्यासाठी वाढीव टक्केवारी देय नाही. वाढीव दर केवळ मजुरीच्या दरावरच घेणेत यावेत. तरी उपरोक्त कामांमध्ये वापरण्यात आलेले FE STEEL व ISNP PIPES हे बांधकाम साहित्यामध्ये समाविष्ट होत असलेने त्यावरील शुगर केन एरिया चा वाढीव 5% दर देण्यात आला आहे, तरी सदर बाबीवरील पुढील कामांचा वाढीव दर खर्च रु. 17780 लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करणेत येत आहे.

कामाचे नाव	साहित्य	प्रत्यक्ष वापर QTY IN CuM	SSR पेक्षा जादा दर per CuM	एकूण वसूल पात्र

				रक्कम
भाटले मळा विहिरीजवळ आर सी सी सारण गटर करणे.	FE STEEL	2.339	3135.71	7334
प्र.क्र. 22 गुंडवाडी वसाहती मधील मुदगल घर ते भंडारे घर गटर करणे.	Concrete Pipe	120.75	47.68	5757
	FE STEEL	0.783	3135.71	2455
प्र.क्र. 6 बीजेपी मार्केट कम्पौड लगत आरसीसी गटर करणे.	Concrete Pipe	133	16.8	2234
			एकूण	17780

7)नगरपरिषद लेखासंहिता,2011 मधील नियम क्रमांक 131 नुसार प्रथमप्रसंगी,प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या त्यांच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. परंतु काही गटर कामांची कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी.चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

8)वरील कामासाठी सन 2018-2019 च्या राज्य दरसुचीचा अवलंब केला आहे. सदर राज्य दरसुचीतील सेक्शन D(i) नुसार मक्तेदाराने कामगार विमा पोलिसी सादर करणे आवश्यक आहे. मक्तेदाराने अशी विमा पोलिसी न घेतलेस कार्यकारी अभियंता (बांधकाम) विमा पोलिसी काढतील व मक्तेदाराच्या पहिल्या देयकातून मुळ रकमेच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून वसुली करणेची आहे तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

9)स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 3.1.2006 मधील सूचना क्र.29 नुसार रु.1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. परंतु सदरप्रमाणे उपरोक्त कामांचे फलक लावण्यात अलेचे नस्तीवरून दिसून येत नाही.

10)नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 131 नुसार प्रथमप्रसंगी प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या त्यांच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. परंतु गटरची कामे करताना सक्षम मंजुरीशिवाय गटरची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी.चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

11)नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक 28/05/2018 नुसार त्रयस्थ शासकीय संस्थेकडून कामाचे लेखापरीक्षण करून घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी र. रु. 11489 वसुलपात्र, र. रु. 92279 अंतिम अमान्य व र. रु. 1497492 तात्पुरती

अमान्य करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 57, Hmm No : 41)

66 प्र. क्र. 15 चैतन्य नगरी बावस्कर घरासमोर डांबरीकरण करणे खर्चातील अनियमितता बाबत. (रस्ता अनुदान)

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 9

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1007046.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 22626.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 959095.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 25325.00/-

5 लक्ष वरील कामाच्या निविदेस व्यापक प्रसिद्धी देणेत आली नाही. कमी मुद्रांक शुल्क वसूल केलेचे दिसून येते. कामांचे फलक लावण्यात आलेचे नस्तीवरून दिसून येत नाही. रॉयल्टी व डीएमएफ रक्कम कमी वसूल केली आहे. डांबर खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-2020 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये प्र. क्र. 15 चैतन्य नगरी बावस्कर घरासमोर डांबरीकरण करणे खर्चामध्ये खालील अनियमितता दिसून येतात. यामधील अनियमिततेबाबत अर्धसमासपत्र क्र. 96 दि. 25/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	मक्तेदाराचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	झालेला खर्च
1	प्र. क्र. 15 चैतन्य नगरी बावस्कर घरासमोर डांबरीकरण करणे	दिपक कुरकुटे	980530	1007046

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील

तरतुदीनुसार रु. 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2)महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 महाराष्ट्र स्टॅप ॲकट (Amendment) मधील परिच्छेद क्र.34 नुसार केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे रु. 200 च्या मुद्रांकावर करारनामा केलेने रु. 300 संबंधित मक्तेदारांकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावे.

3)महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, मे-11, 2015 /वैशाख 21,1937, दिनांक11/05/2015अन्वये कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची स्वामित्व धनाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. सदर कामात खालीलप्रमाणे गौण खनिजाचा वापर झालेला आहे. शासन निर्णय क्रमांक एमडीएफ/0615/प्र.क्रं./34/उदयोग-9, दि.01/09/2016 व शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना दि.1/03/2017 नुसार रॉयल्टी रकमेच्या 10 टक्के रक्कम (DMF) वसूल करुन District Mineral Foundation, Kolhapur या निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

अ.क्रं.	बाब	घमी	दर	रक्कम
1	MPM 40 MM Metal above	143.60	141.34	20296

वरील प्रमाणे रक्कम रुपये 20296/- इतकी व 10% DMF रक्कम रु. 2030 असे एकूण र. रु. 22326 वसुलकरुन शासन निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

4)सदर डांबरीकरण कामाकरिता डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बाबींना दिलेली अतिरिक्त लीड रक्कम रु. 25325/- लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

अनु.क्र	तपशिल	एम.बी.नुसार परिमाण	लीड रक्कम	जादा अदा
1	75 mm MPM	2279.46 sq.mt	4.97	11329
3	Tack Coat	2279.46 sq.mt	0.65	1482
3	20 MM OGC	2279.46 sq.mt	3.37	7682

4	Seal Coat	2279.46 sq.mt	2.12	4832
	एकूण			25325

5)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात यावीत व काम पूर्ण झाल्यावरही तेथील परिसराची सुधारित छायाचित्रे घेण्यात यावी असे असतांनाही नस्तीत याप्रमाणे छायाचित्रे आढळली नाही यावरून सदर शासन निर्णयानुसार करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

6)नगरपरिषद लेखासंहिता, 2011 मधील नियम क्रमांक 131 नुसार प्रथमप्रसंगी,प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या त्यांच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. परंतु सक्षम मंजुरीशिवाय रस्त्याची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी.चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

7)वरील कामासाठी सन 2018-2019 च्या राज्य दरसुचीचा अवलंब केला आहे. सदर राज्य दरसुचीतील सेक्शन D(i) नुसार मक्तेदाराने कामगार विमा पोलिसी सादर करणे आवश्यक आहे. मक्तेदाराने अशी विमा पोलिसी न घेतलेस कार्यकारी अभियंता (बांधकाम) विमा पोलिसी काढतील व मक्तेदाराच्या पहिल्या देयकातून मुळ रकमेच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून वसुली करणेची आहे तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

8)स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 3.1.2006 मधील सूचना क्र.29 नुसार रु.1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. परंतु सदरप्रमाणे उपरोक्त कामांचे फलक लावण्यात अलेचे नस्तीवरून दिसून येत नाही.

9)न.प.लेखासंहिता 2011 नियम 139 प्रमाणे नगरअभियंत्याने नियम 210 मध्ये विहित केल्यानुसार नमुना 62 मध्ये पूर्णतेचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे.परंतु अशा विहित नमुन्यात पूर्णतेचा अहवाल उपलब्ध नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी र. रु. 22626 वसुलपात्र, र. रु. 25325 अंतिम अमान्य व र. रु. 959095 तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 64, Hmm No : 45)

67 विक्रमनगर आरगे माळ परिसर डांबरी पॅचवर्क करणे खर्चातील अनियमितता बाबत. (न.पा. फंड)

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1052820.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3929.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1024315.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 24576.00/-

5 लक्ष वरील कामाच्या निविदेस व्यापक प्रसिद्धी देणेत आली नाही. कमी मुद्रांक शुल्क वसूल केलेचे दिसून येते. कामांचे फलक लावण्यात आलेचे नस्तीवरून दिसून येत नाही. रॉयल्टी व डीएमएफ रक्कम कमी वसूल केली आहे. डांबर खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-2020 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये विक्रमनगर आरगे माळ परिसर डांबरी पॅचवर्क करणे खर्चातील अनियमितता बाबत. (न.पा. फंड) खर्चामध्ये खालील अनियमितता दिसून येतात. याबाबत अर्धसमासपत्र क्र.97 दि. 25/03/2021 देण्यात आले होते तथापी त्यास उत्तर प्राप्त झाले नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	मक्तेदाराचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	झालेला खर्च
1	विक्रमनगर आरगे माळ परिसर डांबरी पॅचवर्क करणे	पाकिजा Construction	962980	1052820

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.466 परिशिष्ट-3 मधील खंड 19 मधील तरतुदीनुसार रु. 5 लक्ष ते 50 लक्ष पर्यंत अंदाजपत्रकीय खर्चाकरिता कोणतेही राज्य स्तरीय दैनिक प्रकाशन व दैनंदिन 20,000 प्रतींची विक्री असणारे जिल्हास्तरीय प्रकाशनामध्ये निविदा सूचना देणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही.

2)महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग 8 असाधारण दि.24/04/2015 क्र.47 महाराष्ट्र स्टॅप ॲकट (Amendment) मधील परिच्छेद क्र.34 नुसार केलेल्या सुधारणा अन्वये रु.10 लक्ष पर्यंत रु. 500/- व त्यापुढील रक्कमेच्या प्रत्येक लाखास रु.100/- या प्रमाणे मुद्रांक घ्यावयाचे रु. 100 च्या मुद्रांकावर करारनामा केलेने रु. 400 संबंधित मक्तेदारांकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावे.

3)शासन निर्णय क्रमांक एमडीएफ/0615/प्र.क्रं./34/उदयोग-9, दि.01/09/2016 व शासन उदयोग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना दि.1/03/2017 नुसार रॉयल्टी रकमेच्या 10 टक्के रक्कम (DMF) वसूल करुन District Mineral Foundation, Kolhapur या निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे. सदर कामामध्ये 16041 इतकी रॉयल्टी रक्कम कपात करणेत आली असून त्यावरील 10% DMF रक्कम रु. 1604 वसुल करुन शासन निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

4)सदर डांबरीकरण कामाकरिता डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही

करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बाबींना दिलेली अतिरिक्त लीड रक्कम रु. 25576/- लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

अनु.क्र	तपशिल	एम.बी.नुसार परिमाण	लीड रक्कम	जादा अदा
1	75 mm MPM	1801.55 sq.mt	4.32	7783
3	B C	61.66 sq.mt	269.57	16622
3	Tack Coat	1801.55 sq.mt	0.65	1171
	एकूण			25576

5)सदर कामातून मक्तेदारास गौण खनिज स्वामित्व शुल्कापोटी र. रु. 16041 अदा करण्यात आली असून त्यावर 12% दराने GST रक्कम रु. 1925 अदा केली आहे. तरी वरील रक्कम रु. 1925 वसूल होणे आवश्यक आहे.

6)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात यावीत व काम पूर्ण झाल्यावरही तेथील परिसराची सुधारित छायाचित्रे घेण्यात यावी असे असतांनाही नस्तीत याप्रमाणे छायाचित्रे आढळली नाही यावरून सदर शासन निर्णयानुसार करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

7)नगरपरिषद लेखासंहिता, 2011 मधील नियम क्रमांक 131 नुसार प्रथमप्रसंगी,प्राधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या त्यांच्या मंजुरीशिवाय मूळ अंदाजपत्रकामध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाही. परंतु सक्षम मंजुरीशिवाय रस्त्याची लांबी वाढवण्यात आली आहे, त्यामुळे एकूण कामावर अंदाजपत्रकाहून जादा घ.मी.चे काम झाले आहे. तथापि, मंजुरीशिवाय अधिकचा खर्च झाला आहे.

8)वरील कामासाठी सन 2018-2019 च्या राज्य दरसुचीचा अवलंब केला आहे. सदर राज्य दरसुचीतील सेक्शन D(i) नुसार मक्तेदाराने कामगार विमा पोलिसी सादर करणे आवश्यक आहे. मक्तेदाराने अशी विमा पोलिसी न घेतलेस कार्यकारी अभियंता (बांधकाम) विमा पोलिसी काढतील व मक्तेदाराच्या पहिल्या देयकातून मुळ रकमेच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून वसुली करणेची आहे तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

9)स्थायी निर्देश क्रमांक 37 दिनांक 3.1.2006 मधील सूचना क्र.29 नुसार रु.1 लक्ष व त्यावरील खर्चाच्या विकास कामांची माहिती फलक कामाचे साईटवर लावण्यात यावे. परंतु सदरप्रमाणे उपरोक्त कामांचे फलक लावण्यात अलेचे नस्तीवरून दिसून येत नाही.

वरील त्रुटी पुर्ततेअभावी र. रु. 3929 वसुलपात्र, र. रु. 24576 अंतिम अमान्य व र. रु. 1024315 तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

DATRVPF8701 (Ref No : 74, Hmm No : 52)

68 प्रभाग क्रं. 3 भुईनगर येथे गटर्स करणे

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 547696.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 547696.00/-

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार सदर कामाची निविदा रु. 3 लक्ष ते रु. 50 लक्ष पर्यंतच्या निविदेंची जाहिरात एका मराठी-1 व इंग्रजी-1 राज्यस्तरीय दैनिक व 20,000 पेक्षा जास्त खप असलेले जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक असताना वृत्तपत्रामध्ये तशी जाहिरात प्रसिद्ध करणेत आलेली नाही, महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत.कमी मुद्रांकावर करारनामा करण्यात आलेला आहे, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात आलेली नाहीत, लेखासंहिता नियम 172(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्याधिकारी स्वाक्षरी नाही, with Scadardquo; नुसार देण्यात आलेला असून काम ldquo;with Scadardquo; नुसार करण्यात आलेले नाही., स्थायी निर्देशक्रमांक 36 अनुसार काम सुरु होण्यापूर्वी साहित्य चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. कामाची मूळ मोजमाप

पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही ,महाराष्ट्र शासन नगरपालिका लेखासंहिता 2011 नियम 139,141 नुसार मुख्याधिकारी यांनी नमुना नं.62 मध्ये काम पुर्णत्वाचा दाखला निर्गमित केला नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात प्रभाग क्रं. 3 भुईनगर येथे गटर्स करणे नस्तीमधील उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्रं.105 दिनांक 25/03/2021 अन्वये निर्गमित केले होते. तथापि त्यास अनुपालन प्राप्त झाले नाही.

कामाचे नांव	प्रभाग क्रं. 3 भुईनगर येथे गटर्स करणे
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 558750/-
डीएसआर वर्ष	2018-2019
योजना	दलित्तेतर योजना
प्रशासकीय मंजूरी	क्रं.कार्या/11/नपा/एसआर/61ई/18 जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर दिनांक 17/12/2018
तांत्रिक मंजूरी	दिनांक 30/10/2018
निविदा प्रक्रिया	ई निविदा
निविदा रक्कम	रुपये 476532/-
मंजूर निविदा	अंदाजपत्रकीय दराने
मक्तेदाराचे नांव	भिमराव पाथरवट
कामाचा आदेश	जा.क्रं. बांध/15/2019 दिनांक 28/5/2019
काम सुरु दिनांक	28/5/2019
काम पुर्ण दिनांक	11/6/2019
कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तका क्रं.	1103

कामावरील खर्च		रुपये 547696	
प्र.क्रं.	दिनांक	रक्कम	तपशील
314	2/7/19	547696	पहिले व अंतिम देयक

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार सदर कामाची निविदा रु. 3 लक्ष ते रु. 50 लक्ष पर्यंतच्या निविदेंची जाहिरात एका मराठी-1 व इंग्रजी-1 राज्यस्तरीय दैनिक व 20,000 पेक्षा जास्त खप असलेले जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक असताना वृत्तपत्रामध्ये तशी जाहिरात प्रसिद्ध करणेत आलेली नाही.

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत. विभागाने कार्यादेश नोंदवही ठेवली नाही.

3) सदर कामाचे निविदा स्विकृतीनंतर मक्तेदाराकडुन करारनामा घेताना मुंबई अधिनियम 1958 व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार पहिल्या 10 लाखार्यंत रक्कम रुपये 500/- व पुढील प्रत्येक लाखाकरिता रुपये 100/- याप्रमाणे वसुल करणे आवश्यक असता ते वसुल करण्यात आले नाही. तरी वरील कामामध्ये रुपये 100/- चा करारनामा करण्यात आला असल्यामुळे संबंधिताकडुन रक्कम रुपये 400/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात यावीत व काम पूर्ण झाल्यावरही तेथील परिसराची सुधारित छायाचित्रे घेण्यात यावी असे असतांनाही नस्तीत याप्रमाणे छायाचित्रे आढळली नाही यावरून सदर शासन निर्णयानुसार करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

5) लेखासंहिता नियम 172(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कामांच्या कांही बाबीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसा शेरा मोजमाप पुस्तकात नमूद करणे आवश्यक असता तशी कार्यवाही नाही.

6) एम 15 कामाचे दरपृथ्थकरण तपासले असता सदर दर ldquo;with Scadardquo; नुसार देण्यात आलेला असून काम ldquo;with Scadardquo; नुसार करण्यात आलेले नाही. राज्यस्तरीय दरसूची संबंधी अधिक्षक अभियंता सार्व. बांधकाम मंडळ नागपुर यांचे कडील दि.27/11/2017 चे पत्रानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाकडील कॉन्क्रीटीकरणाच्या कामामध्ये Reversible drum type mixer/concrete batch mix plant with scadaया बाबी वगळून साधारण ड्रम मिक्सरने काम करावयाचे झाल्यास कॉन्क्रीटच्या बाबीच्या एसएसआर मधील मुळ दरातून 6% रक्कम वजा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही त्यामुळे मक्कतेदारास खालीलप्रमाणे रककम रू. 5836/- चे अतीप्रदान झाले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

तपशील	देय दर	अदा दर	तफावत
डीएसआर दर	4757	4757	
वजा स्काडा	285.42	117	
वजा 2 टक्के लेबर चार्जेस	89.43	92.801	
अधिक लीड चार्जेस	430.72	430.72	
एकूण	4812.87	5027.92	
अधिक 5 टक्के शुगर एरिया	219.11	227.36	
अधिक 2 टक्के लेबर चार्जेस	89.43	92.80	
एकूण	5121.41	5298.10	176.69

एकूण तफावत प्रति घमी 176.6967 गुणिले 37.66 घमी प्रमाणे रुपये 6654/- जादा अदा झाल्याने अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

7) नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देशक्रमांक 36 अनुसार काम सुरु होण्यापूर्वी साहित्य चाचणी अहवाल घेणे आवश्य़क असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8) कामाची मूळ मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही त्यामुळे झालेल्या कामाची सत्यता लेखापरीक्षणामध्ये पडताळता आली नाही.

9) सदर कामाच्या नस्तीस जोडलेल्या मोजमाप पुस्तकाच्या झेरॉक्स नुसार बाब क्रं.3 एमएस 15 चे एकूण काम 31.44 घमी येत असताना त्याची एकूण बेरीज 37.66 घमी घेतलेने मक्तेदारास 6.22 घमी जादा प्रदान झले आहे. म्हणजेच 6.22 घमी x 5348.08 = 33265 /- अधिक 12 जीएसटी रुपये 3992/- असे एकूण रुपये 37257/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

10)महाराष्ट्र न.प.लेखा संहिता 1971 नियम 176 नमुना नं.132 नुसार कमी जादा केलेल्या कामाचा मोजमापाचा गोषवारा देयका सोबत जोडलेला नाही.

11)महाराष्ट्र शासन नगरपालिका लेखासंहिता 2011 नियम 139,141 नुसार मुख्याधिकारी यांनी नमुना नं.62 मध्ये काम पुर्णत्वाचा दाखला निर्गमित केला नाही. लेखासंहिता नियम 139 नुसार काम पुर्ण होईल तेव्हा नगर अभियंता,नियम 210 मध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार नमुना 62 मध्ये पुर्णत्वाचा अहवाल सादर करेल काम पुर्णत्वाच्या दाखल्यामध्ये कामाचे नांव, कंत्राटदाराचे नांव, कामाचे प्राधिकार, कार्यारंभ आदेश, काम सुरु व

पुर्ण दिनांक तपशिल नमुद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 547696/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DATAAMM8501 (Ref No : 104, Hmm No : 100)

69 प्रभाग क्रं. 8 जवाहनगर संतोषी माता ते विठ्ठल मंदिर रस्ता डांबरीकरण करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 12

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 919723.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 844825.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 74898.00/-

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार कार्यवाही नाही, लेखा संहिता 2011 चे नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत,कमी रक्कमेवर करारनामा करण्यात आलेला आहे, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात आलेली नाहीत, सदर कामाची नस्ती पाहता प्रथम मागणीलाच 2 निविदा प्राप्त वैध असताना आर्थिक लखोटा उघडण्यात आला आहे ,करारनाम्यातील अटी नुसार प्रतिदिन रुपये 100/- प्रमाणे दंड आकारुन 248 दिवसाचे रुपये 24800/- वसुल करणे आवश्यक, असता OGC ldquo;with Scadardquo; नुसार दर देण्यात आला असून सदर काम ldquo;with Scadardquo; नुसारकरण्यात आलेले नाही, गौण खनिजावरील स्वामित्वधन आकारणेबाबत अधिसुचना महसुल व वनीकरण मंत्रालय मुंबई दिनांक 11 मे 2015 अन्वये कार्यवाही नाही, महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. संचालनालयाचे स्थायी निर्देशक्रमांक 36 अनुसार काम सुरु होण्यापूर्वी साहित्य चाचणी अहवाल घेणे आवश्य़क असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात प्रभाग क्रं. 8 जवाहनगर संतोषी माता ते विठ्ठल मंदिर रस्ता डांबरीकरण करणे नस्तीमधील उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 101 दिनांक 25/03/2021 अन्वये

निर्गमित केले होते. तथापि त्यास अनुपालन प्राप्त झाले नाही.

कामाचे नांव	प्रभाग क्रं. 8 जवाहनगर संतोषी माता ते विठ्ठल मंदिर रस्ता डांबरीकरण करणे
योजना	नागरी दलित्तेतर
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 738773/-
प्रशासकीय मंजूरी	2819 दिनांक 9/3/2019
तांत्रिक मंजूरी	दिनांक 20/8/2019
निविदा प्रक्रिया	ई निविदा
निविदा रक्कम	रुपये 735773/-
मंजूर निविदा	10.46 टक्के जादा दराने
मक्तेदाराचे नांव	ओम कन्स्ट्रक्शन
कामाचा आदेश	जा.क्रं. बांध/1/2019 दिनांक 27/5/2019
काम सुरु दिनांक	27/5/2019
काम पुर्ण दिनांक	रनिंग
कामाची मुदत	2 महिने
मोजमाप पुस्तका क्रं.	पान क्रं. 17 ते 21
कामावरील खर्च	रुपये 919723/-

प्र.क्रं.	दिनांक	रक्कम	तपशील
917	27/6/2019	917723/-	पहिले व अंतिम देयक

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार सदर कामाची निविदा रु. 3 लक्ष ते रु.

50 लक्ष पर्यंतच्या निविदेंची जाहिरात एका मराठी-1 व इंग्रजी-1 राज्यस्तरीय दैनिक व 20,000 पेक्षा जास्त खप असलेले जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक असताना वृत्तपत्रामध्ये तशी जाहिरात प्रसिद्ध करणेत आलेली नाही.

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत. विभागाने कार्यादेश नोंदवही ठेवली नाही.

3)सदर कामाचे निविदा स्विकृतीनंतर मक्तेदाराकडुन करारनामा घेताना मुंबई अधिनियम 1958 व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार पहिल्या 10 लाखार्यंत रक्कम रुपये 500/- व पुढील प्रत्येक लाखाकरिता रुपये 100/- याप्रमाणे वसुल करणे आवश्यक असता ते वसुल करण्यात आले नाही. तरी वरील कामामध्ये रुपये 100/- चा करारनामा करण्यात आला असल्यामुळे संबंधिताकडुन रक्कम रुपये 400/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात यावीत व काम पूर्ण झाल्यावरही तेथील परिसराची सुधारित छायाचित्रे घेण्यात यावी असे असतांनाही नस्तीत याप्रमाणे छायाचित्रे आढळली नाही यावरून सदर शासन निर्णयानुसार करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

5) लेखासंहिता नियम 172(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कामांच्या कांही बाबीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसा शेरा मोजमाप पुस्तकात नमूद करणे आवश्यक असता तशी कार्यवाही नाही.

6) सदर कामाची नस्ती पाहता प्रथम मागणीलाच 2 निविदा प्राप्त वैध असताना आर्थिक लखोटा उघडण्यात आला आहे असे न करता पुन्हा निविदा मागवणे आवश्यक होते त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया सदोष दिसून येत आहे

7) सदर काम 27/7/2019 अखेर पुर्ण करणे आवश्यक असता मात्र सदरचे काम अपुर्ण असल्याने करारनाम्यातील अटी नुसार प्रतिदिन रुपये 100/- प्रमाणे दंड आकारुन 248 दिवसाचे रुपये 24800/- वसुल करुन निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास करावी.

8) बाब क्रं. 3 चे कामाचे दरपृथ्थकरण तपासले असता OGC ldquo;with Scadardquo; नुसार दर देण्यात आला असून सदर काम ldquo;with Scadardquo; नुसारकरण्यात आलेले नाही, राज्यस्तरीय दरसूची संबंधी अधिक्षक अभियंता सार्व. बांधकाम मंडळ नागपुर यांचे कडील दि.27/11/2017 चे पत्रानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाकडील कॉन्क्रीटीकरणाच्या कामामध्ये Reversible drum type mixer/concrete batch mix plant with scadaया बाबी वगळून साधारण ड्रम मिक्सरने काम करावयाचे झाल्यास कॉन्क्रीटच्या बाबीच्या एसएसआर मधील मुळ दरातून 6% रक्कम वजा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही त्यामुळे मक्कतेदारास खालीलप्रमाणे रककम रू. 7605/- चे अतीप्रदान झाले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

तपशील	देय दर	अदा दर	तफावत
डीएसआर दर	112	112	
वजा 4 टक्के स्काडा	4.48	0	
वजा 2 टक्के लेबर चार्जेस	2.24	2.24	
अधिक लीड चार्जेस	12.11	12.11	
एकूण	117.39	121.87	
अधिक 5 टक्के शुगर एरिया	5.26	5.26	
अधिक 2 टक्के लेबर चार्जेस	2.24	2.24	
एकूण	124.89	129.60	4.71

एकूण तफावत 4.71 घमी गुणिले रुपये 1614.75 प्रमाणे रुपये 7605/- जादा अदा झाल्याने अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

9) शासकीय कामासाठी गौण खनिजावरील स्वामित्वधन आकारणेबाबत अधिसुचना महसुल व वनीकरण मंत्रालय मुंबई दिनांक 11 मे 2015 अन्वये सुचित केले आहे. सदर कामात खालीलप्रमाणे गौण खनिजाचा वापर झालेला आहे.

अ.क्रं.	बाब	परिमाणxप्रमाण	घमी
1	75एमएमMPM	0.63 x 1940.55	122.25

एकूण घमी 122.25 x 141.34 प्रति घमीप्रमाणे रक्कम रुपये 17279/- इतकी वसुल तसेच 10 टक्के डीएमएफ चार्जेस रुपये 1728/- वसुल करुन शासन निधीत भरणा करुन पुर्तता .लेखापरिक्षणास दाखवावी.

10) बाब क्रं. 2 नुसार एमपीएम 75 एमएम मोजमाप पुस्तक पान क्रं. 4 व 5 वरील गणितीय चुकामुळे 11.1 घमी नुसार (11.1 घमी x 224.75) रुपये 2495/- जादा अदा झाले आहे ते वसुल करुन निधीत भरणा करुन पुर्तता दाखवावी.

11) सदर डांबरीकरण कामाकरिता डांबराचा वापर करण्यात आला असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/2011/प्रक्र 464/ रस्ते दिनांक 21.11.11 मधील नियम 1-ड नुसार कामासाठी

वापरण्यात येणाऱ्या डांबराच्या खरेदीची मूळ प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बाबींना दिलेली अतिरिक्त लीड रक्कम रु. 20319/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नसून ती अमान्य करण्यात येत आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्रं.	तपशील	लिड	काम	लीड वसुली
1	Tack coat	0.65	1614.75	1050
2	75 mm MPM	4.97	1940.55	9645
3	20 mm premix (OGC)	3.37	1614.75	5442
4	Seal coat	2.59	1614.75	4182
	एकूण			20319

वरीलप्रमाणे रक्कम रुपये 20319/- लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही ती वसुल करुन निधीत भरणा करुन पुर्तता दाखवावी.

12) नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देशक्रमांक 36 अनुसार काम सुरु होण्यापूर्वी साहित्य चाचणी अहवाल घेणे आवश्य़क असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 74898/- अंतिम अमान्य व रक्कम रु.844825 तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

DATAAMM8501 (Ref No : 105, Hmm No : 101)

70 प्रभाग क्रं.3 दत्त मंदिर परिसरात गटर्स करणे

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 10

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 415810.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 415810.00/-

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार कार्यवाही नाही, लेखा संहिता 2011 चे

नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत,कमी रक्कमेवर करारनामा करण्यात आलेला आहे, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात आलेली नाहीत, सदर दर ldquo;with Scadardquo; नुसार देण्यात आलेला असून काम ldquo;with Scadardquo; नुसार करण्यात आलेले नाही., मुदत 2 महिने असताना मुदतीत काम पुर्ण न झाल्याने प्रतिदिन रुपये 100/- प्रमाणे दिनांक 20/2/2020 ते 31/3/2020 अखेर 40 दिवसाचे (40 दिवस x100/-) 4000/- दंड वसुल करुन निधीत भरणा करणे आवश्यक, कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही, महाराष्ट्र शासन नगरपालिका लेखासंहिता 2011 नियम 139,141 नुसार मुख्याधिकारी यांनी नमुना नं.62 मध्ये काम पुर्णत्वाचा दाखला निर्गमित केला नाही,

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात प्रभाग क्रं.3 दत्त मंदिर परिसरात गटर्स करणे नस्तीमधील उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 106 दिनांक 25/03/2021 अन्वये निर्गमित केले होते. तथापि त्यास अनुपालन प्राप्त झाले नाही.

कामाचे नांव	प्रभाग क्रं.3 दत्त मंदिर परिसरात गटर्स करणे
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 446255/-
प्रशासकीय मंजूरी	क्रं.कार्या/11/नपा/आरआर/512/18 जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर दिनांक 17/12/2018
तांत्रिक मंजूरी	दिनांक - 2018/2019
निविदा प्रक्रिया	ई निविदा
निविदा रक्कम	रुपये 380792/-
मंजूर निविदा	अंदाजपत्रकीय दराने
मक्तेदाराचे नांव	दर्शन जोशी

कामाचा आदेश	जा.क्रं. बांध/3/दलीतवस्ती/2019 दिनांक 19/12/2019
काम सुरु दिनांक	19/12/2019
काम पुर्ण दिनांक	19/2/20
कामाची मुदत	2 महिने
मोजमाप पुस्तका क्रं.	1007 पान क्रं. 64
कामावरील खर्च	रुपये 415800/-

प्र.क्रं.	दिनांक	रक्कम	तपशील
25	29/1/20	195000	पहिले देयक
592	29/1/20	220800	दुसरे व अंतिम देयक (न.प.फंड)
	एकूण	415800	

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत. विभागाने कार्यादेश नोंदवही ठेवली नाही.

2)महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात यावीत व काम पूर्ण झाल्यावरही तेथील परिसराची सुधारित छायाचित्रे घेण्यात यावी असे असतांनाही नस्तीत याप्रमाणे छायाचित्रे आढळली नाही यावरून सदर शासन निर्णयानुसार करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

3) लेखासंहिता नियम 172(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कामांच्या कांही बाबीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसा शेरा मोजमाप पुस्तकात नमूद करणे आवश्यक असता तशी कार्यवाही नाही.

4)शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार सदर कामाची निविदा रु. 3 लक्ष ते रु. 50 लक्ष पर्यंतच्या निविदेंची जाहिरात एका मराठी-1 व इंग्रजी-1 राज्यस्तरीय दैनिक व 20,000 पेक्षा जास्त खप असलेले जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक असताना वृत्तपत्रामध्ये तशी जाहिरात प्रसिद्ध

करणेत आलेली नाही.

5) दुसरे व अंतिम देयक रक्कम रु. 220800/- न.प.फंडातून खर्ची टाकण्यात आलेले असून सदर खर्च रक्कम नप.फंडात वर्ग करण्यात यावी.

6) एम 15 कामाचे दरपृथ्थकरण तपासले असता सदर दर ldquo;with Scadardquo; नुसार देण्यात आलेला असून काम ldquo;with Scadardquo; नुसार करण्यात आलेले नाही. राज्यस्तरीय दरसूची संबंधी अधिक्षक अभियंता सार्व. बांधकाम मंडळ नागपुर यांचे कडील दि.27/11/2017 चे पत्रानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाकडील कॉन्क्रीटीकरणाच्या कामामध्ये Reversible drum type mixer/concrete batch mix plant with scadaया बाबी वगळून साधारण ड्रम मिक्सरने काम करावयाचे झाल्यास कॉन्क्रीटच्या बाबीच्या एसएसआर मधील मुळ दरातून 6% रक्कम वजा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही त्यामुळे मक्कतेदारास खालीलप्रमाणे रककम रू. 5836/- चे अतीप्रदान झाले आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे

तपशील	देय दर	अदा दर	तफावत
डीएसआर दर	4757	4757	
वजा स्काडा	285.42	117	
वजा 2 टक्के लेबर चार्जेस	89.43	92.801	
अधिक लीड चार्जेस	430.72	430.72	
एकूण	4812.87	4977.92	
अधिक 5 टक्के शुगर एरिया	219.11	227.36	
अधिक 2 टक्के लेबर चार्जेस	89.43	92.80	
एकूण	5121.41	5298.10	176.66

एकूण तफावत रु.प्रती घ.मी. 226.67/- गुणिले एकूण घ.मी. 37.20 प्रमाणे रुपये 6572/- जादा अदा झाल्याने अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

7) सदर कामाची मुदत 2 महिने असताना मुदतीत काम पुर्ण न झाल्याने प्रतिदिन रुपये 100/- प्रमाणे दिनांक 20/2/2020 ते 31/3/2020 अखेर 40 दिवसाचे (40 दिवस x100/-) 4000/- दंड वसुल करुन निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

8) कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही त्यामुळे झालेल्या कामाची सत्यता पडताळता आली नाही.

9)महाराष्ट्र शासन नगरपालिका लेखासंहिता 2011 नियम 139,141 नुसार मुख्याधिकारी यांनी नमुना नं.62 मध्ये काम पुर्णत्वाचा दाखला निर्गमित केला नाही. लेखासंहिता नियम 139 नुसार काम पुर्ण होईल तेव्हा नगर अभियंता,नियम 210 मध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार नमुना 62 मध्ये पुर्णत्वाचा अहवाल सादर करेल काम पुर्णत्वाच्या दाखल्यामध्ये कामाचे नांव, कंत्राटदाराचे नांव, कामाचे प्राधिकार, कार्यारंभ आदेश, काम सुरु व पुर्ण दिनांक तपशिल नमुद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

10)आयकर,जीएसटी,सेस.विमा कपाती केलेल्या आहेत त्याची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

वरील पुर्ततेअभावी रक्कम रुपये 415810/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

DATAAMM8501 (Ref No : 106, Hmm No : 102)

71 प्रभाग क्रं. 1 शाहु सोसायटी मधील रस्त्यांना गटर्स करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 11

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 791257.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 791257.00/-

शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार कार्यवाही नाही, लेखा संहिता 2011 चे नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत,कमी रक्कमेवर करारनामा करण्यात आलेला आहे, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात आलेली नाहीत, सदर दर ldquo;with Scadardquo; नुसार देण्यात आलेला असून काम ldquo;with Scadardquo; नुसार करण्यात आलेले नाही., कामाची मोजमाप पुस्तिका लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही, महाराष्ट्र शासन

नगरपालिका लेखासंहिता 2011 नियम 139,141 नुसार मुख्याधिकारी यांनी नमुना नं.62 मध्ये काम पुर्णत्वाचा दाखला निर्गमित केला नाही,देयक निरंक नोंदवण्यात आलेले आहे

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात प्रभाग क्रं. 1 शाहु सोसायटी मधील रस्त्यांना गटर्स करणे नस्तीमधील उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्रं.107 दिनांक 25/03/2021 अन्वये निर्गमित केले होते. तथापि त्यास अनुपालन प्राप्त झाले नाही.

कामाचे नांव	प्रभाग क्रं. 1 शाहु सोसायटी मधील रस्त्यांना गटर्स करणे
अंदाजपत्रकीय रक्कम	रुपये 927200/-
डीएसआर वर्ष	2017-2018
योजना	दलित वस्ती सुधार योजना
प्रशासकीय मंजूरी	क्रं.कार्या/11/नपा/एसआर/104/18 जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर दिनांक 26/2/2018
तांत्रिक मंजूरी	/2017-2018
निविदा प्रक्रिया	ई निविदा
निविदा रक्कम	रुपये 927200/-
मंजूर निविदा	अंदाजपत्रकीय दराने
मक्तेदाराचे नांव	रामू वेल भांडारी
कामाचा आदेश	28/12/2018
काम सुरु दिनांक	28/12/2018
काम पुर्ण दिनांक	1/2/2019
कामाची मुदत	60 दिवस
मोजमाप पुस्तका क्रं.	1120 पान क्रं. 11

कामावरील खर्च		रुपये 791257/-	
प्र.क्रं.	दिनांक	रक्कम	तपशील
	2018-19	791257	पहिले व दुसरे देयक
10	2/7/19	नील बिल	तिसरे व अंतिम देयक

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनाक 27/09/2018 नुसार सदर कामाची निविदा रु. 3 लक्ष ते रु. 50 लक्ष पर्यंतच्या निविदेंची जाहिरात एका मराठी-1 व इंग्रजी-1 राज्यस्तरीय दैनिक व 20,000 पेक्षा जास्त खप असलेले जिल्हास्तरीय दैनिकामध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक असताना वृत्तपत्रामध्ये तशी जाहिरात प्रसिद्ध करणेत आली किंवा नाही याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणामध्ये सादर करण्यात आली नाहीत.

2)महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 120 नुसार नमुना नं.12 कार्यादेश नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आल्या नाहीत. विभागाने कार्यादेश नोंदवही ठेवली नाही.

3) सदर कामाचे निविदा स्विकृतीनंतर मक्तेदाराकडुन करारनामा घेताना मुंबई अधिनियम 1958 व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार पहिल्या 10 लाखार्यंत रक्कम रुपये 500/- व पुढील प्रत्येक लाखाकरिता रुपये 100/- याप्रमाणे वसुल करणे आवश्यक असता करारनामा सादर करण्यात आला नाही त्यामुळे याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे लेखापरीक्षणामध्ये तपासता आले नाही.

4) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.26/नवि-4 दिनांक 08/02/11 मधील अ.क्र.7 नुसार काम सुरु करण्यापूर्वी तेथील परिसराची छायाचित्रे घेण्यात यावीत व काम पूर्ण झाल्यावरही तेथील परिसराची सुधारित छायाचित्रे घेण्यात यावी असे असतांनाही नस्तीत याप्रमाणे छायाचित्रे आढळली नाही यावरून सदर शासन निर्णयानुसार करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

5) लेखासंहिता नियम 172(1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुख्याधिकारी यांनी कामांच्या कांही बाबीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसा शेरा मोजमाप पुस्तकात नमूद करणे आवश्यक असता तशी कार्यवाही नाही.

6) नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देशक्रमांक 36 अनुसार काम सुरु होण्यापूर्वी साहित्य चाचणी अहवाल घेणे आवश्य़क असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7)महाराष्ट्र न.प.लेखा संहिता 1971 नियम 176 नमुना नं.132 नुसार कमी जादा केलेल्या कामाचा मोजमापाचा गोषवारा देयका सोबत जोडलेला नाही.

8) सदर कामाचा Third Patry Audit Report दिनांक 6/2/2019 रोजी प्राप्त झाला असून सदरचा रिपोर्ट Govt.

polytechnic Kolhapur चा आहे. सदर रिपोर्ट नुसार Third Party audit वेळी सदर कामाची मोजमाप पुस्तिका सादर केली नसल्याचे दिसून येते त्याचप्रमाणे लेखापरीक्षणामध्ये सुद्धा कामाची मोजमाप पुस्तिका सादर करण्यात आली नाही त्यामुळे खर्चाची सत्यता पडताळता आली नाही.

काम सुरु दिनांक	4/10/2018
काम पुर्ण दिनांक	23/10/2018
मोजमाप पुस्तिका	उपलब्ध नाही
कामाची मुदत	60 दिवस
कामावरील खर्च	रुपये 263750

रक्कम	तपशील
263750	दिपक शंकर शिंगाडे मक्तेदार यांना अदा

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) सदर कामाचे निविदा स्विकृतीनंतर मक्तेदाराकडुन करारनामा घेताना मुंबई अधिनियम 1958 व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार पहिल्या 10 लाखार्यंत रक्कम रुपये 500 व पुढील प्रत्येक लाखाकरिता रुपये 100 याप्रमाणे वसुल करणे आवश्यक असता ते वसुल करण्यात आले नाही. तरी वरील कामामध्ये रुपये 100 चा करारनामा करण्यात आला असल्यामुळे संबंधिताकडुन रक्कम रुपये 400 वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) सदर कामातील बाब क्रमांक 2 नुसार नमूद बाबीसाठी साठी सांगली नाका ते अंगणवाडी क्रमांक 52 साठी लीड चार्जेस घेतले आहे ते लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

बाब- प्रो.फिक्सिंग कंटेनर सिस्टीम			
बाब	वॉटर टँकसंख्या	जादा लीड चार्जेस	एकूण
अंगणवाडी क्रमांक 52	2	945	1890
एस टी ऑफिस	2	945	1890
शॉपिंग सेंटर	1	945	945
शिवाजी उद्यान	2	945	1890

सुंदरबाग	2	945	1890
एकूण			8505

बाब	वॉटर टँकसंख्या	जादा लीड चार्जेस	एकूण
अंगणवाडी क्रमांक 52	2	945	1890
एस टी ऑफिस	2	945	1890
शॉपिंग सेंटर	1	945	945
शिवाजी उद्यान	2	945	1890
सुंदरबाग	2	945	1890
एकूण			8505

वरील रक्कम रुपये 8505 संबंधिताकडुन वसुल करुन न.पा.निधीत भरणा करुन पुर्तता दाखवावी.

3)साहित्य खरेदी केले आहे त्याचा चाचणी अहवाल नस्तीसोबतजोडण्यात आलेला नाही.

4)शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विकास/1098/प्रक्र 2889/शासन हमी दिनांक 19/8/1998 विमा संचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र जा.क्रमांक प्राविनिय/2300/ सहविमा /सांबावि/ संकीर्ण/फ दिनांक 20/4/2001 व सम क्रमांकाचे शासन परिपत्रक दिनांक 8मे 2002 अन्वये वित्त विभागाच्या आदेशान्वये कंत्राटी कामाच्या 1 टक्का विमा रक्कम रुपये 2637 वसुल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक आहे.

5)महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक BCA/2009/CR-108 /labour 7 1 dated 17/6/2010 अन्वये 1 टक्का उपकर रुपये 2637 इतकी कपात करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

6)आयकर अधिनियम 1961 चे कलम 94सी नुसर एक टक्का आयकर रक्कम रुपये 2637 वसुल करुन शासन निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

उपरोक्त पुर्ततेस्तव वसुलपात्र रक्कम रुपये 16816 व रक्कम रुपये 246934 लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

96 भविष्य निर्वाह निधी परतावा / ना परतावा अग्रीमा बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 5

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9ब

अग्रिमाचा संपूर्ण नियम व उपकलम यांचे सह नोंद करणे आवश्यक आहे. अग्रिम हप्त्यांची वेतन देयकामध्ये वजावट करीत असताना किती हप्त्यांपैकी कितवा हप्ता वसूल केला यांची नोंद घेणे आवश्यक आहे, दोन्ही परताव्याच्या रकमेसमोर परताव्याच्या हप्त्याचा क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. स्वतंत्र आदेश काढणेबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. अर्जासोबत मागील वर्षाच्या भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र जोडेणे आवश्यक आहे.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 च्या लेखापरीक्षण कालावधीमध्ये भविष्य निर्वाह निधी परतावा / नापरतावा अग्रीम प्रमाणकांची तपासणी केली असता याबाबत लेखापरीक्षणाचे अभीप्राय खालील प्रमाणे आहेत.

1)भविष्य निर्वाह निधी परतावा / नापरतावा अग्रीम आदेश काढताना त्यामध्ये भविष्य निर्वाह निधी मधील कोणत्या नियमाने अग्रिम मंजूर करणेत आले त्याचा संपूर्ण नियम व उपकलम यांचे सह नोंद करणे आवश्यक आहे.

2)महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 14 मधील कलम (1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हप्त्यांची परिगणना करताना संख्या 36 पेक्षा जास्त हप्त्यांपर्यंत परत फेड करु शकतात असे असताना नगरपरिषद इचलकरंजी कर्मचाऱ्यांना अग्रीम देताना कर्मचाऱ्यांच्या आधीच्या परताव्याची शिल्लक व नवीन अग्रीम मिळून परताव्याच्या हप्त्यांची रक्कम काढणेची असताना याबाबत कार्यवाही केलेली नाही. तसेच खातेवही नमुना नंबर 98 मध्ये दोन्ही परताव्याच्या रक्कमेसमोर परताव्याच्या हप्त्यांचा क्रमांक नमूद केलेला नाही. प्रथम अदा केलेल्या अग्रीमाची परतफेड पूर्ण झाले किंवा कसे तसेच नवीन अग्रीमाचा हप्ता कोणत्या महिन्यापासून सुरु केला परताव्याचे अग्रीमाचा हप्ता कोणत्या महिन्यापासून सुरु केला परताव्याचे हप्ते थकित आहेत किंवा कसे? याबाबत लेखा परीक्षणास पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

3)अग्रीम मंजूरीचे आदेश, आदेश मंजूरीचे टिपणीमध्ये लेजर ब्रॉडशिटमधील शिल्लक रक्कमांची पडताळणी करुन मगच स्वतंत्र आदेश काढणेबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 13 मधील कलम (1) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्वी घेतलेल्या अग्रिमाचे किमान बारा हप्ते किंवा त्या अग्रिमाचा शेवटचा हप्ता, यापैकी जो आधी असेल त्याची परतफेड होईपर्यंत कोणत्याही वर्गणीदाराला अग्रिम मंजूर करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे तरी कर्मचाऱ्यांना अग्रिम मंजूर करण्यात आले आहे.

5) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नियम 16 टीप 2 अन्वये वर्गणीदाराने, तो जर घर बांधणार असेल तर त्या घराच्या किंवा तो जर घर वाढवून घेणार असेल किंवा त्यात फेरफार करणार असेल तर त्यासंबंधीचा, घर किंवा त्या घराची जागा ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्राच्या स्थानिक नगरपालिकेने येथोचितरीत्या मान्य केलेला नकाशा सादर केल्यानंतर आणि तो नकाशा प्रत्यक्षपणे मान्य असला तरच रक्कम काढण्यास मंजूरी देण्यात येईल अशी तरतूद आहे, परंतू रक्कम काढण्याबाबत नियमानुसार कार्यवाही केली नाही.

कर्मचार्याचे नाव	अग्रिम रक्कम	कारण
सौ. सुरेखा महावीर देमाण्णा	500000	जुणे घर रिपेरी फेरफार दुरुस्ती
सौ. महादेवी सुरेश दोन्नमणी	450000	जुणे घर रिपेरी फेरफार दुरुस्ती
सौ. कांचन पारीसा भरगगोंडा	995000	जुणे घर रिपेरी फेरफार दुरुस्ती

DATSKKM8001 (Ref No : 55, Hmm No : 40)

97 नोकर तसलमात रक्कम प्रलंबित असले बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 10439338.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 10439338.00/-

नोंदवहीतील नोंदी अपुर्ण असून त्या परिपुर्ण करुन प्रमाणित कलेल्या नाहीत. तसलमात रकमेची समायोजन विहित कालावधीत केलेले नाही. ताळमेळ घेण्यात आलेला नाही. तसलमात वसुलीबाबत कार्यवाही केलेली नाही.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात तसलमात रक्कम प्रलंबित असलेबाबत या बाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे.

1) नगरपरिषदेच्या नोंदवहीनुसार सन 2019-2020 अखेर 291059/- इतकी रक्कम प्रलंबित आहे. सदरहू तसलमाती या सन 2001-2002 पासून प्रलंबित आहेत त्याचे समायोजन अद्यापही करण्यात आलेले नाही. सदर बाबतीत वित्तीय अनियमितता झालेली आहे, ही बाब गंभीर असून यामध्ये आर्थीक गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) तसलमात नोंदवही न.पा.लेखासंहिता 1971 च्या नियम 189 व 190 (1) नुसार नमुना नंबर 147 मध्ये ठेवण्यात आलेली असून सदर नोंदवहीतील नोंदी या मुख्याधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे सदर नोंदवहीतील तसलमात रक्कमेबाबतची निश्चिती होत नाही ही बाब गंभीर आहे.

3) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निर्देश क्र. 35 मधील अ.क्र.15 अन्वये प्रलंबित अग्रीम समायोजनास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. संबंधीत खातेप्रमुखांवर तसेच जबाबदार कर्मचाऱ्यांवर लेखी जबाबदारी सोपवावी. त्यानुसार थकबाकीदारांना रक्कमेच्या समायोजनासाठी कमाल 60 दिवसांची मुदत द्यावी, मुदतीत समायोजन न झाल्यास ही रक्कम नगरपरिषद अधिनियम 1965 चे कलम 96 नुसार नगरपरिषदेची आर्थिक हानी समजण्यात यावी. त्यासाठी सक्तीची उपाययोजना अंमलात आणाव्यात व संबंधितांना उक्त अधिनियमाचे कलम 150,151,152 अन्वये अनुक्रमे मागणीचे बील द्यावे. नोटीस द्यावी तरीही रक्क्म वसुल न झाल्यास अधिपत्र बजावून वसूली करण्यात यावी तसेच स्थायी निर्देश क्र. 35 मधील अनुक्रमांक 17 व 18 अन्वये वरील प्रमाणे रक्कम 15 दिवसांत रक्कम वसूल न झाल्यास 12% चक्रवाढ व्याजाची आकारणी करण्यात यावी सदर समायोजनासाठी खातेप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करावी. समायोजन न होणाऱ्या रक्कमेची वसूली वेतनातून सक्तीच्या मार्गान करण्यात यावी.

यापूर्वीच्या लेखापरीक्षणात देखील सदर आक्षेप नोंदविण्यात आला आहे,सदर बाब अतिशय गंभीर असून समायोजनाची कार्यवाही पुर्ण करुन अनुपालन सादर करावे. तो पर्यंत रक्कम रुपये 10439338/- वसुलपात्र करणेत येत आहे.

DATSKKM8001 (Ref No : 72, Hmm No : 49)

98 दिव्यांगाना 5 टक्के आर्थिक तरतूदीमधुन लाभ देणेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 231000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 220500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 10500.00/-

दिव्यांग अपंग लाभार्थि शासकीय सेवेत असताना लाभ देण्यात आलेला आहे. इतर लाभार्थांना थेट बँक खात्यावर रककम जमा केली असून त्यांनी कोणत्या वस्तु खरेदी केल्या याबाबत समजून येत नाही. फलश्रुती अहवाल नाही.

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात दिव्यांगाना 5 टक्के आर्थिक तरतूदीमधुन लाभ देणेबाबत अर्धसमासपत्र क्रं. 117 दिनांक 25/03/2021 अन्वये निर्गमित करण्यात आले होते त्यानुसार त्यास अनुपालन प्राप्त झाले नाही.

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात 40 टक्के ते 59 टकके अपंगाना 10500/- प्रमाणे 22 अपंग लाभार्थ्यांना रककम रुपये 231000/- मंजूर करण्यात आले आहे. न.पा.कडील कौन्सील ठराव नंबर 238 दिनांक 31/1/2020 ने मंजूरी देण्यात आली आहे शासन निर्णय क्रं. डिसीटी/2316/प्रक्र 133/का.1417 दिनांक 5 डिसेंबर 2016 नुसार विविध कल्याणकारी योजनोमध्ये वस्तु स्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात भरणा करणेत यावे असे नमूद आहे. त्यानुसार लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)श्रीम. राजश्री अवधुत केसरकर या राष्ट्रीय परिवहन इचलकरंजी येथे लिपीक पदी कार्यरत असून न.पा.नी रक्कम रुपये 10500/- डीबीटीव्दारे रक्कम वर्ग करण्यात आली आहे. संबंधित लाभार्थि शासकीय सेवेत असल्याने रक्कम रुपये 10500/- वसुल करुन न.पा. निधीत भरणा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

2) इतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केलेल्या रकमेबाबत संबंधित लाभार्थ्यांनी कोणत्या वस्तु खरेदी केल्या याची माहिती उपलब्ध झाली नाही.

3) संबंधितानी लाभ घेतल्यानंतर फलश्रुती अहवाल घेण्यात आलेला नाही त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली किंवा कसे हे समजुन येत नाही.

उपरोक्त पुर्ततेस्तव वसुलपात्र रक्कम रुपये 10500/- व रक्कम रुपये 220500/-लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATABKF8401 (Ref No : 56, Hmm No : 75)

99 अग्निशमन कर कमी दराने वसूल केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3336016.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1670826.00/-

शासन आदेशाप्रमाणे अग्निशमन कर वसूल न केल्याने रक्कम 2% वसूल न करता 1% पेक्षा कमी दराने वसूल केल्याने नगरपालिकेचे रक्कम रु. 1670826/- आर्थिक नुकसान झालेले आहे.

इचलकरंजी नगरपालिका कर वसुली विभागाचे सन 2019-20 चे लेखापरीक्षणात नगरपालिकेने अग्निशमन कर 2% टक्के ऐवजी 1% पेक्षा कमी लावला आहे. त्यामुळे नगरपालिकेचे रक्कम चे नुकसान झाले आहे. त्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 10 दि. 29/01/2021 देण्यात आले होते त्यास उत्तर प्राप्त झाले नाही. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शासन अधिसूचना नगरविकास विभाग क्र. एमयुडी/1089/1288/प्र.क्र41/91 नवी 32 दिनांक 1/4/92 नुसार नगरपरिषदेने अग्निशमन व आणीबाणी सेवेच्या व्यवस्थापनासाठी मालमत्ता 1% पेक्षा कमी दराने कर आकारणी केली आहे.

सन	संयुक्त कर	अग्निशमन कर केलेली वसुली	अग्निशमन कर करावयाची वसुली 2% प्रमाणे	वसूल पात्र रक्कम
2019-20	166800800	1665190	3336016	1670826

सन 2019-20 मध्ये रक्कम रु. 3336016/- अग्निशमन कर वसूल करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. तरी रक्कम रु. 1670826/- सबंधीताकडून वसुलात आणावी.

DATRKPF9301 (Ref No : 61, Hmm No : 86)

100 कर मागणी नोंदवहीतील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 705813.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 705813.00/-

कर मागणी रजिस्टर मध्ये खालीलप्रमाणे तफावत दिसून येते.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात कर मागणी नोंदवहिची तपासणी केली असता कराची चालू मागणी, चालू वसुली व थकबाकी यातील तफावतीबाबत अर्धसमास पत्र क्रं. 19 दिनांक 10/02/2021 अन्वये निर्गमित केले होते. त्यास कोणतेही अनुपालन प्राप्त न झालेने खालील आक्षेप नोंदविनेत येत आहे.

मालमत्ता क्र.	मालमत्ता धारकाचे नाव	सन 2019-20 ची चालू मागणी	चालू वसुली	सन 2019-20 ची चालू थकबाकी (घेतलेली)	घेणे आवश्यक चालू थकबाकी	तफावत
13000624	श्री.अ.अ.मुजावर	5493	00	3768	5493	1725
13000663	श्री.गु.गु.सनदी	4828	00	1120	4828	3708
13000674	श्री.सु.ना.आभाळे	2037	00	00	2037	2037
13000675	श्रीम.सो.आ.पाटील	1075	00	00	1075	1075
13000677	श्रीम.सो.आ.पाटील	824	00	00	824	824
13000692	श्री.महावीर क.आ.किनिंगे	4259	00	259	4259	4000
21000203	श्री.अ.शा.भिडे	6074	00	468	6074	5606
21000205	श्री.अ.शा.भिडे	3125	00	209	3125	2916
21000232	श्रीम.ल.भा.जोशी	5687	00	00	5687	5687

21000456	श्री.शा.द.गैबान	5681	00	00	5681	5681
21000475	श्री.हे.प्र.कलागते	13144	00	144	13144	13000
21000396	श्रीम.शे.प्र.घाटगे	9314	00	00	9314	9314
21000498	श्रीम.सु.धो.कुलकर्णी	4058	00	00	4058	4058
21000567	श्री.ग.माँ.उकले	3200	00	97	3200	3103
21000570	श्री.दि.ह.सूर्यवंशी	1831	00	118	1831	1713
25000259	श्री.ता.रा.जाधव	6557	00	2557	6557	4000
25000261	श्री.बा.ता.शेळके	5574	667	3457	4907	1450
25000277	श्री.ल.ह.कदम	9998	2917	581	7081	6500
25000354	श्री.रा.भ.सोनी	4908	00	52	4908	4856
25000389	श्री.वी.आ.घाटगे	3331	00	00	3331	3331
25000390	श्रीम.हे.ज.गायकवाड	5950	00	2950	5950	3000
35001100	श्री.अ.र.मुल्ला	4665	00	00	4665	4665
35001139	श्री.अ.रा.निशानदार	5914	00	00	5914	5914
35001194	श्री.बै.ग.पाटील	1106	00	00	1106	1106
35001227	श्री.आ.गो.ताटे	3449	00	00	3449	3449
35001250	श्री.बा.म.पाटील	3212	00	00	3212	3212
35001274	श्री.सा.ता.देवमोरे	4891	00	00	4891	4891
35001285	श्री.सु.बा.देवमोरे	1114	00	00	1114	1114
35001301	श्री.शि.वि.पोटे	1447	00	00	1447	1447

41000685	श्री.इचलकरंजी गावचावडी न्यायाधीश निवास	5426	00	00	5426	5426
41000821	श्री.स.ना.पाटील	5198	1530	1488	3668	2180
41000808	श्री.अ.बे.बा.ऐतवडे	1020	00	00	1020	1020
41000940	श्री.बा.म.नांदनिवाले	3608	00	00	3608	3608
51001662	श्री.संजय गणपती होगाडे	12119	00	00	12119	12119
51001447	श्री.प्र.ग.कितुरे	57944	00	33146	57944	24798
51001508	श्री.पं.प्र.तगारे	17100	00	7374	17100	9726
51001565	श्री.गोविंद कॉप्लेस A9	4570	00	00	4570	4570
51001566	श्री गोविंद कॉप्लेस GFB2	4570	00	00	4570	4570
51001594	श्री. गोविंद कॉप्लेस E2	7399	00	00	7399	7399
51001602	श्री दत्त कॉप्लेक्स बेसमेंट A7	3390	00	00	3390	3390
51001604	श्री दत्त कॉप्लेक्स GFB1	4111	00	00	4111	4111
51001605	श्री दत्त कॉप्लेक्स GFB2	3926	00	00	3926	3926
61000486	श्री.ल.य.जाधव	1048	00	00	1048	1048
61000492	सौ.शो.रा.खोंद्रे	4332	00	272	4332	4060
61000555	श्री.क.आ.कामत	3796	00	00	3796	3796`

61000626	श्री.कृ.गुं.लोखंडे	1106	00	00	1106	1106
61000656	श्री.धों.प्र.र.कुलकर्णी	5521	00	21	5521	5500
61000710	श्री.पां.बा.शिंपी	2264	00	00	2264	2264
61000744	श्री.पां.पा.चव्हाण	1656	00	00	1656	1656
72000687	श्री.ग.दा.भोसले	3005	240	00	2765	2765
72000689	सौ.सु.वा.कुलकर्णी	2645	00	00	2645	2645
72000713	श्री.वि.म.कोठावळे	12803	6000	303	6803	6500
72000714	श्री.कि.बा.वाईकर	7606	5500	00	2106	2106
72000733	श्री.चं.अ.गागडे	17566	00	00	17566	17566
72000908	श्री.प्र.ग.हातळगे	1839	00	00	1839	1839
72000936	सौ.क.पां.दवडते	5168	00	00	5168	5168
72000942	श्री.ता.बा.कांबळे	6771	00	2197	6771	4574
72000974	श्री.म.तु.गेजगे	619	00	00	619	619
72000985	श्री.रा.शि.कुरणे	1082	00	00	1082	1082
82001754	प्रभुकुंज हर्षवर्धन बिल्डर्स	6229	00	00	6229	6229
82001769	श्री.के.बा.कांबळे	12173	00	6841	12173	5332
82001806	श्री.बाबासाहेब पाटील	3518	00	00	3518	3518
82001823	श्री.बाबासाहेब पाटील	4040	00	00	4040	4040
82002093	श्री.प्र.धों.कांबळे.	5825	00	00	5825	5825

111000157	श्री.मो.बोहरा	5002	00	00	5002	5002
111000191	श्रीम.शां.बा.सुलतानपुरे	97389	50013	415	47376	46961
111000192	श्री.शा.चो.पुरोहित	6884	00	00	6884	6884
111000253	श्रीम.पा.म.पाटील	57692	00	45580	57692	12112
122000322	श्री.नि.अ.डांबाल	45297	00	00	45297	45297
122000356	श्रीम.रु.तु.तुरंबेकर	9390	00	4140	9390	5250
122000370	सौ.रे.गौ.छाजेड	2487	00	00	2487	2487
122000426	श्री.सं.बा.घुत	3165	00	177	3165	2988
122000447	श्री.मो.मां.पाटणी	3085	00	00	3085	3085
122000465	श्री.ग.ज्ञा.पोवार	49838	00	1239	49838	48599
122000476	श्री.गो.द.नाईक	25585	00	00	25585	25585
122000477	सौ.न.गो.नाईक	15560	00	00	15560	15560
122000493	श्री.द.रा.लोले	21711	00	2297	21711	19414
122000522	श्री.ब.यु.मुजावर	4105	00	00	4105	4105
122000534	सौ.सु.ब.मुंदडा	15205	00	1783	15205	13422
122000541	श्री.म.भ.शर्मा	9092	00	00	9092	9092
12200553	श्री.वि.वि.रसाळ	20037	00	110	20037	19927
122000554	श्री.सु.रा.रसाळ	6123	00	00	6123	6123
142000647	श्री.सं.य.नाईक	2885	00	00	2885	2885
142000660	श्री.अ.श्री.फाटक	12344	00	00	12344	12344

142000692	श्री.बा.रा.बिडला	4639	00	00	4639	4639
142000711	श्री.म.के.करवा	17826	00	538	17826	17288
143000021	श्री.भा.सं.फाटक	11840	00	00	11840	11840
151000004	श्री.फी.मौ.बागवान	1355	00	00	1355	1355
151000005	श्रीम.मी.मौ.बागवान	1378	00	00	1378	1378
151000074	श्री.जैन गोसावी असो.	5488	00	956	5488	4532
151000112	श्री.सु.बं.लायकर	4292	00	00	4292	4292
152000002	श्री.वि.शं.स्वामी	36357	8547	2810	27810	25000
152000043	श्री.हो.मा.केसरवाणी	4420	00	00	4420	4420
152000049	श्री.ह.रा.केसरवाणी	2087	00	00	2087	2087
161000003	श्री.भ.शं.सोनी	26717	00	309	26717	26408
161000008	श्री.जू.मो.धूत	29272	00	00	29272	29272
162000097	श्री.रा.वि.म्हेत्रे	7048	00	00	7048	7048
162000136	श्री.ता.रा.पोहळे	14416	1924	4592	12492	7900
162000168	श्री.आ.बा.मकोटे	32329	00	7329	32329	25000
182000271	श्री.प्र.ज.बडिया	29370	00	00	29370	29370
182000285	श्री.द.शं.दरीवे	29035	00	00	29035	29035
182000287	श्रीम.सु.प्र.पाटील	21683	00	1683	21683	20000
182000291	श्री.क.जी.पाटील	22227	00	00	22227	22227
193000609	श्रीम.वि.वा.आनंदाचे	8172	00	00	8172	8172

193000620	श्री.सु.गो.वाकरे	3083	00	00	3083	3083
193000654	श्री.बा.रा.लाटवडे	4914	00	00	4914	4914
193000709	श्रीम.स्मि.द.कुलकर्णी	7679	00	00	7679	7679
193000812	श्री.सु.ब.चित्तलागीया	7209	00	00	7209	7209
193000856	श्री.बा.प.बिरंजे	8518	00	00	8518	8518
193000890	श्री.अ.अ.भोमाज	5691	00	00	5691	5691
एकूण						705813

तरी उपरोक्त रक्कम रु. 705813/- आक्षेपाधीन ठेवनेत येत आहे.

DATRKPF9301 (Ref No : 70, Hmm No : 82)

101 सन 2018-19 ची कराची थकबाकी व सन 2019-20 ची सुरुवातीची शिल्लक यातील तफावतीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 112535253.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 112535253.00/-

कर विभागाकडील सन 2018-19 मधील अखेरची शिल्लक व सन 2019-20 मधिल कराची सुरुवातीची शिल्लक यामध्ये तफावत दिसून येते.

नगर परिषद, इचलकरंजी चे सन 2019-2020 चे लेखापरिक्षणामध्ये कर विभागाकडील सन 2018-19 मधील अखेरची शिल्लक व सन 2019-20 मधिल कराची सुरुवातीची शिल्लक यामध्ये खालीलप्रमाणे तफावत दिसून येते.

अ.क्र.	कराचा तपशील	थकबाकी रक्कम सन 2018-19	सुरुवातीची शिल्लक सन 2019-20	तफ़ावत
1	संयुक्त कर	137341271	73421373	63919898
2	वृक्ष कर	5291439	2634234	2657205
3	विशेष स्वच्छता कर	618637	523012	95625
4	ड्रेनेज कर	4562271	2856706	1705565
5	पाणीपट्टी कर	66417415	47338574	19078841
6	विशेष शिक्षण कर	14305192	7213262	7091930
7	शिक्षण कर	37845981	23049788	14796193
8	रोजगार हमी	7274757	4981548	2293209
9	अग्नीशमन कर	1641658	959707	681951
10	घनकचरा	10548684	10333848	214836
11	करमणूक कर	--	--	--
12	जाहीरात कर	--	--	--
एकूण				112535253

वरील करांच्या तफ़ावतीचा ताळमेळ ले.प.द्यावा.

DATRKPF9301 (Ref No : 81, Hmm No : 84)

102 कचरा संकलन शुल्क कमी वसुल केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020

अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 5540340.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5540340.00/-

कचरा संकलन शुल्क कमी दराने वसुल केल्याने नगरपरिषदेचे रुपये 5540340/- ने नुकसान झाले आहे.

नगरपरिषद इचलकरंजी चे सन 2019-20 च्या लेखापरीक्षणात कचरा संकलन शुल्क वसुली बाबतची तपासणी केली असता त्यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब नगरविकास विभाग दिनांक 19 डिसेंबर 2018 अधिसूचना अन्वये नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 मध्ये नमूद केलेप्रमाणे नगरपरिषदेने प्रत्येक घरामागे दरमहा रुपये 30/- प्रमाणे कचरा संकलन शुल्क वसुल करणे आवश्यक आहे. तथापि लेखापरीक्षण सालात नगरपरिषदेने प्रती मिळकत प्रति महिना 20/- रुपये दराने कचरा संकलन शुल्क वसुल केलेले आहे. त्यामुळे नगरपरिषदेचे प्रत्येक वर्षी खालीलप्रमाणे आर्थिक नुकसान होत आहे.

मालमत्ता प्रकार (a)	मालमत्ता संख्या (b)	आकारलेला दर (प्रति महिना) (c)	आकारणेयोग्य दर (प्रति महिना) (d)	तफावत (प्रति महिना) (d-c)	वार्षिक तफावत(प्रति मालमत्ता) (d*12) (e)	एकूण तफावत (रु.) (b*e)
घरगुती	36857	20	30	10	120	4422840
व्यावसायिक	3725	20	45	25	300	1117500
एकूण						5540340

नगरपरिषद हद्दीत सन 2019-20 मध्ये एकुण 40582 खातेदार/मिळकतधारक आहेत. प्रती मिळकत धारक प्रतीमहिना रु. 20/- प्रमाणे आकारणी करणेत आलेने लेखापरीक्षण वर्षामध्ये नगरपालिकेचे एकूण रक्कम

रु.5540340/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी आर्थिक नुकसानीची रक्कम विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.

DATRKPF9301 (Ref No : 85, Hmm No : 87)

103 एक्झमशन, कोर्ट, शासकीय व इतर इमारतींवर एकत्रित कर समायोजीत केलेमुळे झालेल्या नुकसानीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 61200552.00 /-

महाराष्ट्र नगरपालीका अधिनिमय 1965 मधील कलम 149 ते 162 व 164 ते 172 मधील तरतुदीनुसार जर कार्यवाही करुन तदनंतरच ज्या रक्कमा वसुल होणार नाहीत अशाच रक्कमा कलम 167 नुसार निर्लेखीत करता येतात तथापि कलम 149 ते 162 व 164 ते 172 मधील तरतुदीनुसार कार्यवाही केलेचे दिसुन येत नाही.

इचलकरंजी नगरपरिषदचे सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात कर विभागाकडील मिळकतीवरील एकत्रित कराची थकबाकी समायोजित केलेबाबत अर्धसमास पत्र क्रं.37 दिनांक 10/03/2021 अन्वये माहीती सादर करणेबाबत सुचीत केले होते तथापी त्याबाबत अनुपालन सादर केले नाही. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1)इचलकंरजी नपा चे सन 2019-2020 चे लेखापरीक्षणामध्ये नगरपालीकेचे वॉर्ड क्रमांक 1 ते 26 मधील शासकीय मिळकतीवरील एकत्रित कराची थकबाकी रक्कम रुपये 61200552/- इतकी रक्कम कर विभागाकडील डिमांड रजिस्टरमधुन कमी करणेत आली असून संबंधित रक्कम कमी करणेबाबत न.प.ने कोणताही ठराव करणेत आलेचे दिसून येत नाही. (सोबत विवरणपत्र) तरी संबंधित रक्कम सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता कोणत्या प्राधीकारान्वये समायोजित करणेत आली याची माहिती समजून येत नाही. तसेच सदरच्या मिळकतीवरील कर वसुल केला नसलेस सदरचे कालावधीत वसुली करणेबाबत केलेल्या प्रयत्नांची/नोटीस निर्गमीत केली असलेस त्याबाबतच्या प्रती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत

2)महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 मधील कलम 167 नुसार महाराष्ट्र नगरपालिका अधिनिमय 1965 मधील कलम 167 नुसार मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेस अधिन राहुन आणि राज्य शासन याबाबतीत जे नियम करील त्यांचे अधिन राहुन वसुल न होण्याजोगा कोणताही कर निर्लेखीत करणेची तरतुद असुन वरील समायोजीत केलेली रक्कम ही मा. जिल्हाधिकारी अथवा शासन मान्यता घेवुन निर्लेखीत केली असलेबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलबध झालेले नाहीत.सदरची वसुली वसुल करणेबाबत महाराष्ट्र नगरपालिका अधिनिमय 1965 मधील कलम 149 ते 162 व 164 ते 172 मधील तरतुदीनुसार जर कार्यवाही करुन तदनंतरच ज्या रक्कमा वसुल होणार नाहीत अशाच रक्कमा कलम 167 नुसार निर्लेखीत करता येतात तथापि कलम 149

ते 162 व 164 ते 172 मधील तरतुदीनुसार कार्यवाही केलेचे दिसुन येत नाही.

3)वसूल केलेल्या रकमेमध्ये समायोजित केलेल्या रकमेचा समावेश असलेने वसूल केलेल्या रकमेची टक्केवारी हि प्रत्यक्षात वसूल केलेल्या रकमेपेक्षा जास्त दिसून येते त्यामुळे शासनाची फसवणूक केलेचे निष्पन्न होते.

सबब अशाप्रकारे नियमबाहयरित्या कराच्या रक्कमा निर्लेखीत केलेमुळे नगरपालीकेचे नुकसान होत असलेचे सिध्द होत असलेमुळे महाराष्ट्र नगरपरीषदा, नगरपंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 96 मधील तरतुदीनुसार सदरच्या अनियमीतेबाबतच्या अदायगीबाबतच्या वसुलीबाबतची कारवाई करणेत यावी.

DATSSMM9501 (Ref No : 90, Hmm No : 68)

104 ऑफलाईन पद्धतीने बांधकाम परवाना प्रक्रियेतील अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 7

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 492366.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 492366.00/-

इमारत बांधकाम परवानगीची नोंदवही नमुना क्रमांक 38 मध्ये ठेवण्यात आलेली नाही. संगणकीय आज्ञावली अंमलात आलेली असताना 245 परवाने हे ऑफलाईन पद्धतीने देण्यात आले आहेत. सुधारित रेडी रेकनर चे दर उपलब्ध असताना जुन्या दराने विकास शुल्क आकारणी केलेने कमी विकास शुल्क आकारणी व भरणा झाली आहे. कामगार कल्याण उपकर बँकेत/कोषागारात जमा झालेल्या रक्कमेचा ताळमेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अर्जदारांनी स्वतः भरलेल्या उपकर पावत्यांची खात्री होत नाही. तसेच सदर पावत्या ह्या मूळ प्रतीत नसून झेरोक्स असलेने व त्यावर उपरी लेखन दिसून येत असलेने उपकर भरणा रकमेबाबत साशंकता निर्माण होते. नगररचना विभागाने कर विभागास माहिती न दिल्याने बांधकाम परवान्यांतील पूर्ण बांधकामांवर कर आकारणी झाली किंवा कसे याबाबत पडताळणी करता येत नाही.

नगरपरिषद इचलकरंजीकडील सन 2019-20 चे लेखापरीक्षणात नगररचना विभागाकडील संगणकीय आज्ञावली मधून ऑनलाईन बांधकाम परवाने देण्यात येत असताना काही प्रकरणांत ऑफलाईन पद्धतीने परवाने देण्यात आले आहेत. सन 2019-20 मधील नगरपरिषद इचलकरंजी कडील अशा प्रकरणांची मुद्रांकित

यादीनुसार करून त्यातील उणिवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 85 दिनांक 25/03/2021 निर्गमित केले असता त्यास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. तथापि पुढीलप्रमाणे आक्षेप कायम करणेत येत आहे.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 2011 मधील नियम 63(10) अन्वये इमारत बांधकाम परवानगीची नोंदवही नमुना क्रमांक 38 मध्ये ठेऊन लेखा प्रमुखाने दरमहा अद्ययावत, संतुलित करावयाचे, पडताळणी करावयाचे व मुद्रित करावयाचे आहे. परंतु विभागाने सदरप्रमाणे नोंदवही ठेवलेली नाही.

2) लेखापरीक्षण कालावधीमधील विभागाने सादर केलेली संगणकीय मुद्रांकित बांधकाम परवाना यादी पाहता 245 परवाने हे ऑफलाईन पद्धतीने देण्यात आले असल्याचे दिसून येते. शासनाने इमारतींच्या बांधकामासाठी लागणाऱ्या विविध परवानगी प्रकरणांत एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून संगणकीय आज्ञावली व BPMS संकेतस्थळ वापरात आणली आहे. असे असताना उक्तप्रमाणे ऑफलाईन पद्धतीने परवाने देण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. त्यामुळे संगणकीय आज्ञावलीमधून 100% परवाने देण्याच्या शासनाचा हेतूस बाधा पोचते.

3) नगरपरिषद इचलकरंजीकरिता विकास शुल्क वाढविणेबाबत महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.26/03/2007 ldquo;The Ichalkaranji Municipal Council Regulation for Development Charge 2002 नुसार शासनाने दिनांक 01/04/2003 पासून बांधकाम परवाना विकास शुल्क आकार हा रुपये 45 प्रती चौरस मीटर इतका सर्व क्षेत्राकरिता संमत केला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 कलम 124 ख(2) नुसार जमीन व इमारती यांच्या वापराचे विकास आकाराचे दर दुसऱ्या अनुसुचीच्या स्तंभ (4) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी विकास आकार बसवील व त्याची वसुली करील. सदर दर वेळोवेळी वाढविता येईल. दुसऱ्या अनुसुचीच्या स्तंभ (4) अन्वये मुद्रांक शुल्क सिद्ध गणकामध्ये (रेडी रेकनर) उल्लेख केलेल्या विकसित जमिनीच्या दरांच्या 2 टक्के प्रमाणे प्रती चौरस मीटर विकास आकार बसवावयाचा आहे. नगरपरिषद इचलकरंजीकडे 2017 मध्ये रेडी रेकनर शेवटचा अद्ययावत दर आहे. वार्षिक दरसूची 2017 (रेडी रेकनर) विकसित जमिनीचा दर पाहता नगरपरिषद हद्दीतील बहुतांश भागांचे दर वाढलेचे दिसून येते. परंतु नगरपरिषदेने जुन्या दरानेच विकास शुल्क आकारणी केली आहे. उक्त नमूद कलमान्वये नगरपरिषदेला प्रकरण 6(क) च्या इतर तरतुदींना अधिन राहून, वेळोवेळी वाढीव दर कमी करता येईल आणि अशा कमी केलेल्या दराने विकास आकार बसविता येईल;मात्र कोणत्याही बाबतीत हा दर दुसऱ्या अनुसुचीच्या स्तंभ (4) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरापेक्षा कमी असणार नाही. म्हणजेच नगरपरिषदेला, विकसित जमिनीच्या दरांच्या 2 टक्के (प्रती चौरस मीटर) पेक्षा कमी विकास शुल्क आकारता येणार नाही. असे असताना रुपये 45 प्रती चौरस मीटर या जुन्या दराने आकारणी केल्यामुळे रुपये 45 पेक्षा अधिक विकास शुल्क देय असणाऱ्या प्रकरणांत कमी आकारणी व भरणा झाले आहे.

उदाहरणदाखल प्रकरणे पुढीलप्रमाणे-

अ.क्र.	मालकाचे नाव	सर्वे नं.	रेडी रेकनर नुसार देय विकास शुल्क	जमा पावतीनुसार विकास शुल्क	कमी विकास शुल्क

1	अशोक बापुसो सरनाईक व इतर	616	10846	4950	5896
2	दिलीप महादेवराव काटकर	17178	27516.33	12187	15329.33
3	रमेश राजाराम धमाणे	598	33827.43	19515	14312.43
4	श्वेता सतीश भस्मे आणि इतर	593	25162.41	14590	10572.41
				एकूण	**46110.17**

सदरचे लेखापरीक्षण हे चाचणी लेखापरीक्षण असलेने उपरोक्तप्रमाणे रक्कम रुपये 46110 वसूल करून उर्वरित प्रकरणांबाबत सदरप्रमाणे पडताळणी करून कमी झालेले विकास शुल्क वसूल भरून भरणा करावे.

4) उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय:क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108 /कामगार 7-अ दिनांक 17/06/2010 व शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108 /कामगार 7-अ दिनांक 21/07/2011 अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम 1996 तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम 1998 अंतर्गत उपकर वसूल करावयाची कार्यपद्धती निश्चित करणेत आली आहे. त्यामधील परिच्छेद क्रमांक 1 (3) नुसार नगरपालिकेने त्यांना त्यांच्या विभागीय प्रमुखांना नोंदवही ठेवणे व मासिक विवरण पुढील महिन्याच्या 10 तारखेपूर्वी अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याण मंडळ, मुंबई (परिशिष्ट 2 प्रमाणे) यांच्याकडे पाठवावे. जेणेकरून यांना जमा केलेल्या उपकराच्या रक्कमेचा तसेच बँकेत/कोषागारात जमा झालेल्या रक्कमेचा (परिशिष्ट 3 प्रमाणे) ताळमेळ घेणे शक्य होईल.

परंतु नगरपरिषद इचलकरंजीने सदरप्रमाणे मंडळाशी कोणताही ताळमेळ घेतलेचे दिसून येत नाही.

ऑफलाईन प्रकरणांच्या नस्तीमधील कामगार कल्याण उपकर जमा पावत्या तपासल्या असता सदर पावत्या या मूळ पावत्या नसून झेरॉक्स असलेचे दिसून येते. तसेच श्रीकृष्ण शिवगोंडा दत्तवाडे यांची देय कामगार उपकर रुपये 17305 ची भरणा पावती उपलब्ध नाही.

तथापि, कामगार कल्याण उपकर रकमेंचा कोणताही विहित ताळमेळ नसलेने व भरणा पावत्यांच्या मूळ प्रती उपलब्ध नसलेने सदर पावत्यांच्या सत्यतेबाबत साशंकता निर्माण होते.

अ.क्र.	मालकाचे नाव	झेरॉक्स कामगार विमा उपकर पावती	देय भरणा रुपये	त्रुटी
1	रमेश राजाराम धमाणे	77693	77693	मूळ पावती उपलब्ध नाही. झेरॉक्स प्रतीवर उपरी लेखन दिसून येते.
2	श्वेता सतीश भस्मे आणि इतर	41659	41659	
3	श्रीकृष्ण शिवगोंडा दत्तवाडे	उपलब्ध नाही	17305	

4	अशोक बापुसो सरनाईक व इतर	22990	22990	
5	दिलीप महादेवराव काटकर	40722	40722	
6	सुंदर गोपाल काब्रा	173470	173470	
7	प्रेमलता सत्यनारायण गट्ठाणी	72417	72417	
		एकूण	**446256**	

उपरोक्त प्रमाणे एकूण रुपये 446256 उपकर भरणा मूळ पावत्या सादर कराव्यात तोपर्यंत सदर रकमा

भरणा असलेचे मान्य करता येणार नाही.

5) औद्योगिक क्षेत्रात रहिवासी बांधकाम परवाना देय नसताना पुढील सर्वे नं.चे औद्योगिक क्षेत्रात मोडत असताना या प्रकरणात औद्योगिक व रहिवास बांधकाम परवाना देण्यात आला आहे. सदर परवाना नियमबाह्य आहे.

अ.क्र.	मालकाचे नाव	सर्वे नं.	बांधकाम परवाना
1	रमेश राजाराम धमाणे	598	रहिवास व औद्योगिक
2	सुंदर गोपाल काब्रा	404	रहिवास व औद्योगिक

6) प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना विकास शुल्क,वृक्ष कर माफ करण्यात आला आहे. नगरपरिषद कौन्सिल विशेष सभा क्रमांक 6 ठराव क्रमांक 122 दि.20.07.2017 नुसार प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना 30 चौ.मी. चटईक्षेत्र पर्यंतच्या बांधकामासाठी परवाना शुल्क/विकास शुल्क, वृक्ष कर माफ करणेचा ठराव संमत झाला आहे. परंतु महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 चे कलम 124 ख(3ख) नुसार असा ठराव संमत करण्यात आल्यानंतर प्राधिकरण विनियामांना राज्य शासनाची पूर्व मंजुरी मिळविण्याकरिता पुढील कार्यवाही करील. तथापि अशी मंजुरी घेतलेबाबत शासनाचे मंजुरी आदेश नस्तीस उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे उक्त नमूद केलेप्रमाणे माफ करण्यात आलेले शुल्क लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

7) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 189 नुसार प्राप्त बांधकाम परवानगी अर्जाची छाननी करून बांधकामास परवानगी दिल्यानंतर नगररचना विभागाकडून सदर बांधकाम परवाना प्रकरणांची माहिती कर निर्धारण विभागास देण्यात येईल व त्यानुसार कर विभाग नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नमुना क्रमांक 35 मध्ये कर निर्धारण करून नमुना क्रमांक 27 मध्ये कर मागणी नोंदवहीमध्ये नोंद घेईल. तथापि नगररचना विभागाने माहिती देण्याबाबत कार्यवाही केलेचे दिसून येत नाही. तथापि, लेखापरीक्षण वर्षाआधीच्या बांधकाम परवान्यांतील पूर्ण बांधकामांवर कर आकारणी झाली किंवा कसे याबाबत पडताळणी करता येत नाही.

उपरोक्त अनियमिततेपोटी खर्च रक्कम रु.492366 वसूलपात्र करणेत येत आहे.

DATDJSM7401 (Ref No : 94, Hmm No : 12)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

105 मालमत्ता विभागाकडील कमी रकमा जमा असलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 2

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9क

गुंतलेली रक्कम रु. 259390.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 259390.00/-

कमी जमेबाबत.

नगर परिषद, इचलकरंजी सन 2019-2020 मधील मालमत्ता विभागाकडील पावती पुस्तके व पोटकीर्द तपासली असता खालीलप्रमाणे कमी जमा असलेचे आढळून आले. त्याबाबत अर्धसमास पत्र क्र.42 दिनांक 10/03/2021 अन्वये सूचित केले होते, त्याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त न झालेने खालील आक्षेप कायम करणेत येत आहे.

1)भगतसिंग स्विमिंग टँक

पावती पुस्तक क्र.	दिनांक	पावती क्र.	रक्कम	कमी जमा
330	11.04.2019	32968 ते 32971	70 * 4	280
330	17.04.2019	32972 ते 32973	70 * 2	140
330	18.04.2019	32974 ते 32977	70 * 4	280
134	01.04.2019	33326 ते 33332	70 * 7	490
--	03.05.2019	8670	990-500	490
एकूण				1680

2) शंकर रावपुजारी स्विमिंग टँक

पावती पुस्तक क्र.	दिनांक	पावती क्र.	पावती संख्या	कमी जमा
73	01.04.2019	7281 ते 7300	27	43060
296	02.04.2019	29501 ते 29590	90	55600
334	02.04.2019	33333 ते 33348	70	1120
296	03.04.2019	29547 ते 29590	44	51350
334	04.04.2019	33358 ते 33367	70	700
111	--	11086	2630	2630
--	05.04.2019	11087	3170-990	2180
--	05.04.2019	11088	3170-990	2180
--	05.04.2019	11090	1110-540	570
--	04.04.2019	33349 ते 33357	630	630
296	04.04.2019	29591 ते 29600	97690	97690
एकूण				257710

तरी संबंधित कमी जमा वसूल करून अनुपालन सादर करावे.

DATSSKF6501 (Ref No : 16, Hmm No : 15)

106 पाणीपुरवठा विभागाकडील कमी जमेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9क

गुंतलेली रक्कम रु. 1745051.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1745051.00/-

कमी जमेबाबत.

नगर परिषद, इचलकरंजी सन 2019-20 चे लेखापरीक्षाणादरम्यान पाणी पुरवठा वसुली पावत्या व पोटकिर्दची पडताळणी करून तपासणी केली असता खालीलप्रमाणे कमी जमा असल्याचे आढळून आले. त्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 41 दिनांक 10/03/2021 अन्वये सूचित केले होते, त्याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त न झालेने खालील आक्षेप कायम करणेत येत आहे.

पावती क्र.	दिनांक	पावतीवरील रक्कम	पोटकिर्दीला रक्कम	कमी जमा
10526	17.01.2020	3600	--	3600
10527	17.01.2020	3600	--	3600
10528	17.01.2020	3600	--	3600
10716	17.01.2020	3600	--	3600
11260	31.01.2020	1800	--	1800
12602	31.01.2020	1800	--	1800
12831	31.01.2020	1800	--	1800
17453	28.02.2020	1800	--	1800
2030	12.03.2020	1800	--	1800
एकूण				23400

बुक क्र.	पावती क्र.	दिनांक	पावतीवरील रक्कम	पोटकीर्द रक्कम	कमी जमा
108,109,110	10717 ते 10930	21.01.2020	2359636	637985	1721651

वरीलप्रमाणे पोटकिर्दीला कमी जमा असल्याचे आढळून आले, तरी वरील कमी जमेचा मेळ घेऊन अनुपालन सादर करणेत यावे.

DATSSKF6501 (Ref No : 19, Hmm No : 18)

107 मालमत्ता कर वसुलीचे धनादेश न वटता कर मागणी रक्कम कमी झाल्याबाबतची अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 3

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी

अनियमितता कलम : 9क

गुंतलेली रक्कम रु. 6518321.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 6518321.00/-

मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 8 नुसार धनादेशाने प्राप्त होणाऱ्या रकमा संधर्भात ती रक्कम ज्या दिवशी बँकेकडून वटविनेत येईल व बँक खाती जमा होईल तेंव्हा ती रक्कम जमा झालेची समजण्यात यावी तधनंतर विहित नमुन्यातील अंतिम पावती देऊन रक्कम त्या दिवशी मिळालेची नोंद घेऊन रकमा वसुलात आणाव्यात असे स्पष्ट नमूद असताना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

नगर परिषद, इचलकरंजी सन 2019-20 मधील लेखापरीक्षणातील अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.43 दिनांक 10/03/2021 अन्वये सूचित केले होते, त्याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त न झालेने खालील आक्षेप कायम करणेत येत आहे.

मालमत्ता कर विभागाचे लेखापरीक्षणात मालमत्ता कर व इतर कर संबंधित मालमत्ता धारकांनी आर्थिक वर्षात धनादेशाद्वारे न.प.कडे भरणा केला होता त्यापैकी कर विभागाने पुरविलेल्या माहितीप्रमाणे एकूण रक्कम रु.518321/- चे 279 धनादेश आजपर्यंत संबंधित मालमत्ता धारकांच्या बँक खाती पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे वटलेली नाहीत मात्र सदर रकमांचे धनादेश प्राप्त होताच कर संकलन विभागाकडून मालमत्ता धारकांना त्याच दिनांकाच्या वसुली पावत्या संबंधित मालमत्ता धारकांना प्रदान करणेत आलेले आहेत यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मालमत्ता कराची एकूण रक्कम रु.6518321/- संबंधित मालमत्ता धारकाकडून नगरपालिकेस प्रत्यक्षात आजपर्यंत प्राप्त झाली नाही मात्र कर विभागाने सदरच्या रकमा नियमबाह्य करून मागणी नोंदवहीतून कायमस्वरूपी कमी केले आहेत त्यामुळे न.प.चे कायमस्वरूपी आर्थिक नुकसान झाले आहे.

2)मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 8 नुसार धनादेशाने प्राप्त होणाऱ्या रकमा संधर्भात ती रक्कम ज्या दिवशी बँकेकडून वटविनेत येईल व बँक खाती जमा होईल तेंव्हा ती रक्कम जमा झालेची समजण्यात यावी तधनंतर विहित नमुन्यातील अंतिम पावती देऊन रक्कम त्या दिवशी मिळालेची नोंद घेऊन रकमा वसुलात आणाव्यात असे स्पष्ट नमूद असताना तशी कार्यवाही न करता मालमत्ता धारकाकडून धनादेश प्राप्त

होण्याच्या दिनांकास विहित नमुन्यातील अंतिम वसूल पावती प्रदान करून रकमा वसूल कीर्द मध्ये नोंदवून मागणी नोंदवहीतून रकमा कमी करण्याची अनियमितता केलेली आहे यामुळे न.प.चे एकूण मालमत्ता कर मागणी रकमेतून रक्कम रु. 6518321/- प्रत्यक्षात प्राप्त नसतानाही कायमस्वरूपी कमी होऊन न.प. ला नाहक आर्थिक झळ सोसावी लागली आहे.

3) न वटलेले धनादेशाबाबतसंबंधित मालमत्ता धारकावर बँक नियमानुसार तसेच अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आजपर्यंत कोणतीही उचित न्यायिक अथवा दंडनीय कार्यवाही झालेचे आढळून आले नाही. यामुळे एकूण रक्कम रु. 6518321/- इतके मालमत्ता कर उत्पनाचे कायमस्वरूपी नुकसान झाले आहे, याचा दुष्परिणाम न.प.च्या आर्थिक स्थितीवर झाला आहे त्यामुळे अशा आर्थिक नुकसानीची रक्कम रु. 6518321/- संबंधिताकडून व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे.

तरी संबंधित उणीवांबाबत अनुपालन सादर करणेत यावे.

DATSVKM7201 (Ref No : 24, Hmm No : 23)

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

108 बँक ताळमेळ न घेतलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व-निधी व शासन निधी
अनियमितता कलम : 9ड

बँक ताळमेळ घेणेत आलेला नाही.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात अर्धसमास पत्र क्रं. 87 दिनांक 25/03/2021 अन्वये बँक ताळमेळ न घेतलेबाबत निर्गमित केले होते. तथापि त्यांचे कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही. याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

इचलकरंजी नगरपरिषद कडील सन 2019-2020 या लेखापरिक्षण कालावधीतील रोजकिर्दीप्रमाणे शिल्लक रक्कम आणि प्रत्यक्ष बँक खाती असलेली रक्कम दिनांक 31/3/2020 रोजी खालीलप्रमाणे तफावत असल्याचे आढळून आले.

अ. क्रं	अनुदानाचे नांव	बँकेचे नांव	खाते क्रं.	पासबुकाप्रमाणे शिल्लक	रोजकिर्दप्रमाणे शिल्लक	तफावत
1	नागरीदवसु निधी	आयडीबीआय	3919	31730713	30649210	1081503
2	स्वच्छ म.अभि.	आयडीबीआय	159586	14556908	12152108	2404800
3	UIDSSMT ड्रेनेज	आयडीबीआय	120487	9221641	8433163	788478
4	नागरी दवसुनिधी	सेंट्रल बँक		2574948	2467693	107305
5	रस्ता अनुदान	जनता बँक	1674	152658	151462	1196
6	14वा वित्तआयोग	आयडीबीआय	7857	9362685	401176	896150

7	नगरोत्थान राज्य	आयडीबीआय	171083	7542185	5642185	1900000
8	पायाभुत सुविधा	आयडीबीआय	19401	1189310	1415543	226233
9	रमाई	बँक ऑफबडोदा	11415	884898	879423	5475
10	IHSDP योजना	महा. बॅक	9881	3337278	2863974	473304
11	रस्ता अनुदान	आयडीबीआय	3926	7209180	7193958	14230
12	विशेष रस्ता अनु.	आयडीबीआय	8303	124977	69730	55247
13	नगरोत्थान	आयडीबीआय	34098	4905398	4770450	134948
14	अमृत अभियान	आयडीबीआय	187077	43441015	43000155	440860
15	14वा वित्त	आयडीबीआय	97744	4513194	2819351	1693843
16	नागरी दलितेतर	एचडीएफसी	15181	8259702	8038434	221268
17	इनप swm	एचडीएफसी	47299	14779144	13946181	932963
18	अमृत अभियान	आयडीबीआय	210454	11599169	11528224	70945

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 395 ते 403 मध्ये नमूद केलेप्रमाणे बँक ताळमेळ घेणे आवश्यक आहे परंतु लेखापाल/ मुख्याधिकारी यांनी योग्य ती दक्षता घेतली नाही. तरी सर्व निधीचा बँक ताळमेळ घेवून लेखापरिक्षणास पुर्तता दाखवावी.

DATPSSM7401 (Ref No : 14, Hmm No : 13)

109 अखर्चित रकमा शासनास परत करणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

अखर्चित निधी शासनास भरणा करण्यात आलेल्या नाहीत.

इचलकरंजी नगरपरिषद,इचलकरंजी सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात अखर्चित निधी शासनास परत न केलेबाबत अर्धसमास पत्र क्रं. 92 दिनांक 25/3/2020 अन्वये निर्गमित केले होते त्यास उत्तर सादर केलेले नाही.

सन 2019-2020 च्या लेखापरिखण कालावधीत विविध निधीचे रेखांकन करत असताना खालील निधीमध्ये रकमा शिल्लक असल्याचे दिसून आले.

अ.क्रं.	निधीचे नांव	दि.31/3/20 अखेर अखर्चित रककम
1	12वा वित्त आयोग (घनकचरा व्यवस्थापन)	1957362
2	अनु.जाती व नवबौध्द घटक वैयक्तिक शौचालय व नळ जोडणी योजना	3039435
3	तिर्थक्षेत्र विकास योजना	198520
4	सुजल निर्मल योजना	3223524
5	12 वा वित्त आयोग इतर विकास कामे	3102190.53
6	कमी खर्चाची स्वच्छता योजना	708668
7	नाविन्यपुर्ण योजना अनुदान	71014.00
8	13 वा वित्त आयोग	1812501.00
9	पायाभुत सुविधा विशेष अनुदान	2103431.00
10	स्थानिक आमदार निधी	1190199.00
11	अल्पसंख्यांक आयोग	1013774.00

	एकूण	18420618.53

वित्त विभाग शासन परिपत्रक कं.संकीर्ण/2018/प्रक्र 60/18/कोशा-प्रशा 5/दिनांक 14 मार्च 2018 नुसार कार्यवाही करुन पुर्तता लेखापरिक्षणास दाखवावी.

DATPSSM7401 (Ref No : 29, Hmm No : 90)

110 नपा निधीचे बॅक ताळमेळ न घेतलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9ड

बँक ताळमेळ घेणेत आलेला नाही.

इचलकरंजी नगरपरिषद सन 2019-2020 चे लेखापरिक्षणात लेखा विभागास अर्धसमास पत्र क्रं. 88 दिनांक 25/03/2021 अन्वये नपा निधीचा बॅक ताळमेळ न केलेबाबत निदर्शनास आलेल्या त्रुटीची पुर्तता करण्यास सुचित केले होते.तथापि त्यांचे कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही. त्याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

इचलकरंजी नगरपरिषदेकडील सन 2019-2020 या लेखापरिक्षण कालावधीतील रोजकिर्दी प्रमाणे शिल्लक रक्कम प्रत्यक्ष बँक खाती असलेली रक्कम दिनांक 31/3/2020 रोजी खालीलप्रमाणे तफावत असल्याचे आढळून आले

अ. क्रं.	बँकेचे नांव	खाते क्रं.	रोजकिर्दी प्रमाणे शिल्लक	बँक पासबुक प्रमाणेशिल्लक	तफावत
1	आयडीबीआय बँक	34089	30305908	46622689	16316781
2	आयडीबीआय चालू खाते	1860	5787600	27023226	21235626

3	स्टेट बँक IDSMT	6197	15075307	16522194	1446887
4	आयडीबीआय गुंठेवारी	134	434962	1575369	1140407
5	आयडीबीआय वेतन	161	4786143	50664008	45877865
6	आयडीबीआय डिपॉ.	444	5300927	25697110	20396183
7	IDBI शिक्षण रोजगार	34104	1758272	7480557	5722285
8	IDBI ऑनलाईन	12485	518819	2236848	1718029
9	IDBI वृक्षकर	912	4845471	4837804	7667
10	IDBI रस्ता खुदाई	8870	4438533	6786765	2348232
11	IDBI स्पेशल पाणीपट्टी	3331	5749252	12637393	6888141
12	IDBI IGM	4876	283391	288324	95067
13	HDFC कचरा संकलन	72496	32667	551862	519195

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 395 ते 403 मध्ये नमूद केलेप्रमाणे नगरपरिषदेने प्रत्येक महिना अखेर रोकडवहीत नोंदविलेल्या जमा व खर्चाच्या नोंदी पासबुकातील नोंदीबरोबर बाबवर तुलना करुन शिल्लकेशी जुळणी करुन कांही फरक असेल वा तफावत असेल तर त्याबाबत रोकडवहीत तळ टिपेत स्पष्टीकरण देवून बँक ताळमेळ घेणे आवश्यक आहे मात्र लेखापाल यांनी योग्य ती दक्षता घेतली नसल्याचे न.पा. निधीचा बँक ताळमेळ घेता आलेला नाही. तरी वरील निधीचा बँक ताळमेळ घेवून दाखवावा.

DATPSSM7401 (Ref No : 65, Hmm No : 83)

111 तीन वर्षावरील ठेवी व्यपगत न केले बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 4

लेखा शीर्ष :00 शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 190 (3) अन्वये नगरपालिकेकडे 3 वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागाणी न केलेल्या सर्व शिल्लक ठेवी प्रत्यक्ष वर्ष अखेर व्यपगत करणे आवश्यक आहे, तथापी नगरपरिषदेने तशी कार्यवाही केलेली नाही.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नमुना नं. 147 मध्ये वर्ष निहाय नोंदी घेवून वर्गीकरणाशी मेळ घेतल्याचे मुख्याधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 190 (3) अन्वये नगरपालिकेकडे 3 वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिल्लक ठेवी प्रत्येक वर्ष अखेर व्यपगत करणे आवश्यक आहे, तथापी नगरपरिषदेने तशी कार्यवाही केलेली नाही. तरी सन 2016-2017 च्या ठेवी व्यपगत कराव्यात.

3) सुरक्षा ठेव / अनामत रक्कम प्रदान केलेनंतर संबंधित प्रमाणकाचा क्रमांक,दिनांक व रक्कम संबंधित महिन्याच्या रकान्यामध्ये नमूद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) योजनांच्या सुरक्षा ठेवी जमा व खर्च नमुना नं 147 ला घेण्यात आलेल्या नाहीत.

तरी वरील बाबींची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

DATSKKM8001 (Ref No : 69, Hmm No : 47)

112 इचलकरंजी नगरपालिका,अधिकारी व कर्मचारी यांचे लोकहितास्तव सेवा पुनर्विलोकन करने बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 1

लेखा शीर्ष :00 शासन निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नियम 10 व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमाक एसआरसी 1085/1029/43/15 दि.12.5.1886 नगर परिषद संचालनालय परिपत्रक क्रमाक संकीर्ण 10-2000/प्र.क्र.88/8 दि.19.10.2000 नुसार कार्यवाही न केले बाबत.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे लेखापरीक्षणात अधिकारी व कर्मचारी यांचे लोकहितास्तव सेवा पुनर्विलोकन अनियमिततेबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे,

1)महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नियम 10 व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमाक एसआरसी 1085/1029/43/15 दि.12.5.1886 नगर परिषद संचालनालय परिपत्रक क्रमाक संकीर्ण 10-2000/प्र.क्र.88/8 दि.19.10.2000 नुसार नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी यांचे वयाच्या 50-55 व्या वर्ष पलीकडे किंवा आहार्ताकारी सेवेची 30 वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांची नागर परिषदेतील सेवा पुढे ठेवण्यासाठी व पात्रता अजमवण्यासाठी त्यांची गोपनीय अहवाल / सचोटी व शारीरिक क्षमता विहित केलेल्या निकषाच्या आधारे त्यांचे प्रकरण पुनर्विलोकन करून सुयोग्य व कार्य क्षम अधिकारी व कर्मचारी यांनाच लोकहितास्तव सेवेत ठेवावे व अकार्य क्षम तसेच संशयास्पद सचोटी असणारे अधिकारी / कर्मचारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करावे असे आदेश आहेत, उपरोक्त नमूद आदेशाप्रमाणे सन 2019-2020 या वर्षात लोकहितास्तव पुनर्विलोकन केल्याचे आढळून आले नाही.

DATSKKM8001 (Ref No : 53, Hmm No : 39)

113 सेवा पुस्तकातील उणीवा बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 16

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम 1981 मधील नियमान्वये व शासन निर्णयानुसार सेवा पुस्तकात नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

इचलकरंजी नगरपालीकेच्या सन 2019-2020 चे वित्तीय वर्षातील कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तकाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे उणीवा दिसून आल्या आहेत. यावर खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1)सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.साप्रवि/हिंदी भाषा/1092/प्र.क्र.29 व साप्रवि/हिंदी भाषा/1076/28 दि. 10/6/1976 व शा.नि.क्र.1092/1570/प्र.क्र.143/9210 दि. 1/1/93 अन्वये सेवेतील सर्व अधिकारी कर्मचारी

यांना एतदर्थ मंडळाची हिंदी व मराठी भाषा उत्तीर्ण झाले बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे. अशा नोंदी सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

2)महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.वेपूर 1309/प्र.क्र.69 सेवा-9 दि. 29/4/2009 नियम 14 नुसार 6 व्या वेतन आयोगाच्या दि. 1/1/2006 ते 31/3/2009 अखेर वेतन फरकाची रक्कम 5 समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधी खातेवर जमा केले बाबतची नोंद सेवा पुस्तकामध्ये घेणे आवश्यक आहे, परंतू अशा नोंदी सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

3)म.ना.से. नियम 1981 मधील नियम 38 अन्वये सेवा पुस्तकामध्ये सर्व घटनांची व जन्मतारखेची नोंद करताना जन्मतारीख कागदोपत्री पुराव्यावरुन पडताळून पाहावी आणि आधारभूत कागदपत्राचे स्वरुप नमूद करुन तशा अर्थाचे प्रमाणपत्र देणेबाबत नमूद केले आहे, अशी कार्यवाही केले नसल्याबाबत लेखापरीक्षणात आढळून आले आहे. तरी सर्व सेवापुस्तके पडताळून तशा नोंदी घेवून अनुपालन सादर करावे.

4)सेवा पुस्तकात रकाना क्र.8 मध्ये कर्मचाऱ्याची प्रत्येक वर्षी स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे, परंतू त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

5)नियम क्र. 36 ते 45 नुसार सेवा पुस्तकाची सेवा पट कर्मचाऱ्याची सेवा अखंडता इ. बाबी अभिलेख पडताळणी केले बाबतची नोंद सेवा पुस्तकात शेवटी दिलेली नाही.

6)सेवा पुस्तकात रजा मंजुरीचे आदेश क्रमांक व दिनांक नमूद नाही, रजा मंजूरीबाबत सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही.

7)आस्थापनेवरील सर्व कर्मचारी/अधिकारी यांची जात पडताळणी बाबत महाराष्ट्र शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभाग क्र.cbc/10/2004/प्र.क्र.570/मावक/5 दि. 5 मार्च 2005 मधील सुचनेनुसार जात पडताळणी केले बाबतची नोंद सेवा पुस्तकात घेतल्याचे दिसून आले नाही.

8)आस्थापनेवरील सर्व कर्मचारी / अधिकारी यांची चारित्रय पउताळणी बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक.बीसीए/1093/14999/प्र.क्र.59/16 अ दि. 9/3/1994 मधील सूचनेनुसार कर्मचाऱ्यांचे चारित्रय व पूर्व चारित्रय पोलीस तपासामध्ये चांगले असणे आवश्यक आहे, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 मधील नियम 40 नुसार कर्मचाऱ्यांचे चारित्रय पडताळणी झाल्याबाबतच्या नोंदी सेवापुस्तकांमध्ये घेणे अनिवार्य आहे. अशा नोंदी आढळून आल्या नाहीत, अशा कर्मचाऱ्यांचा आढावा घेवून नोंदी पुर्ण करुन अनुपालन सादर करावे.

9)शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर 2019/प्र.क्र.1/सेवा-9/ दि. 30 जानेवारी, 2019 चे नियम 6 नुसार विकल्प व वचन पत्र सेवापुस्तकात आढळून आले नाहीत.

10)सेवा पुस्तकात शासन परिपत्रक क्र.वेपुर-2019/प्र.क्र.8/सेवा-9 दिनांक 20 फेब्रुवारी 2019 नुसार

वेतननिश्चितीबाबतचे विवरणपत्र आढळून आले नाही.

11)शासन निर्णय क्र.टी-आर-8/1163/2026/ दि. 23/10/1963 शा.नि.वित्त विभाग दि. 10/06/2015 अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यांस आपले स्वग्राम घोषीत करणे आवश्यक आहे, तशा नोंदी सेवापुस्तकात आढळून आल्या नाहीत.

12)शासन निर्णय वित्त विभाग क्र. सेनिवे 1007/62/सेवा -4 दि. 4/1/2008 नुसार सेवा निवृत्तीस प्रकरणा सोबत स्थायित्व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे, कोणत्याही कर्मचाऱ्यास त्याच्या शासकीय सेवेतील एकापदावर स्थायित्व मिळणे आवश्यक आहे. शासन निर्णय साप्रवि दि. 11/09/2014 व 11/09/2017 नुसार कर्मचाऱ्यांना स्थायित्व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

13)सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ वेळेवर मिळण्यासाठी नामनिर्देशने आवश्यक आहेत, 1) निवृत्तीवेतन 2) सेवाउपदान 3) भविष्यनिर्वाह निधी 4) गटविमा योजना 5) NPS राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना इ. सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात सदर नामनिर्देशने भरुन सक्षम प्राधिकारी यांची स्वाक्षरी घ्यावी.

14)रजा लेखा अपुर्ण आहे उदा. 1) गौतम सुखदेव कांबळे 2) रमेश सिदाम बन्ने

15)वेळोवेळी वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांचे विकल्प, विहित वचन / बंधपत्र घेण्यात आले नाहीत. उदा. 6 वा वेतन आयोग, 7 वा वेतन आयोग.

16)जात प्रमाणपत्र वैधता नोंद आढळून आली नाही. उदा. 1) डॉ.सुनिलदत्त गणेश संगेवार 2) नितीन प्रभाकर बनगे 3) ज्योती सर्जेराव साठे 4) भारती राजाराम तांबे 5) रमेश सिदाम बन्ने

उपरोक्त 1 ते 16 बाबी पूर्ण करुन अनुपालन सादर करावे.

DATSKKM8001 (Ref No : 62, Hmm No : 44)

114 बालवाडी विभागातील विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 6

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 3178825.00 /-

ई निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. पट संख्येनुसार निश्चित केलेल्या लाभार्थि संख्या जुळत नाही.27 बाबीवर खर्च करण्यात आले आहे त्याची साठा नोंदवहीस नोंद नाही. सदरची खरेदी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस करणे आवश्यक आहे. सदरहून खरेदी ही Gem Portal वर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.शासकीय कपातीची चलने उपलब्ध झाली नाहीत.

इचलकरंजी नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखापरिक्षणात महिला व बालकल्याण विभागाकडील बालवाडी विभागातील विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदी बाबत त्रुटींचे अर्धसमासपत्र क्रं. 118 दिनांक 25/03/2021 अन्वये निर्गमित करण्यात आले होते त्यानुसार त्यास अनुपालन प्राप्त झाले नाही.

कामाचे नांव		बालवाडी विभागातील विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदीबाबत	
लेखाशिर्षक		न.पा.निधी	
अंदाजपत्रकीयर क्कम		रुपये 5500000/-	
प्रशासकीय मंजूरी		स्थायी समिती सभा ठरावक्रं. 41 दिनांक 29/6/2019	
दर मान्यता		कौन्सील ठराव क्रं. 87 दिनांक 29/8/2019	
प्रमाणक क्रं.	दिनांक	रक्कम	तपशील
227	20/1/2020	3178825	शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग

वरील रक्कम रुपये 3178825/-शाळा व्यवस्थापन समितीकउे वर्ग करण्यात आली आहे याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1)ई निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2)एकूण 8 बालवाडया असून पट संख्यानुसार मंजूर केलेल्या नाहीत. त्यामुळे निश्चित केलेली विद्यार्थि संख्यायाची लेखापरिक्षणास खात्री होत नाही.

3)कौन्सील ठराव नंबर 87 दिनांक 29/8/2018 नुसार सन 2018-2019 व 2019-2020 करिता 27 बाबीवर रक्कम रुपये 3178825/- इतका खर्च दर्शविण्यात आला आहे. याबाबत साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

4)वरील खरेदी ही शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला करुन विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आलेला नाही.

5)वरील खरेदी ही महाराष्ट्र शासनाचे उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण/2016 प्रक्र 215/उद्योग 4 दिनांक 24 ऑगष्ट 2017 प्रमाणे सदरहु खरेदी ही GEM Portal वर करणे आवश्यक असता तशी कार्यवाही झालेली नाही.

6)सदर कामाच्या शासकीय वसुली उदा. आयकर, जीएसटीची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत ती उपलब्ध करुन लेखापरिक्षणास दाखवावी.

उपरोक्त पुर्ततेस्तव रक्कम रुपये 3178825/- लेखापरिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATABKF8401 (Ref No : 58, Hmm No : 77)

115 नगरपरिषद शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तकात सेवेसंबंधित आवश्यक त्या नोंदी न घेतल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020
अनियमितता संख्या : 8

लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी
अनियमितता कलम : 9ड

कार्यालयातील सेवापुस्तके तपासणी केली असता त्यामध्ये त्रुटी आढळून आल्या.

नगरपरिषद इचलकरंजी सन 2019-2020 च्या लेखा परिक्षणात शिक्षण मंडळाकडील वेतन देयके तपासणीवेळी कर्मचाऱ्यांची सेवापुस्तकात आवश्यक त्या नोंदी न घेतल्याबाबत अर्धसमास पत्र क्रं.91 दिनांक 25/03/2021 ने निर्गमित केले होते त्यास अनुसरुन लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 चे नियम 45 अन्वये खालील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांची वार्षिक पडताळणी केलेली नाही.

